अखिल भारतीय मराठी
साहित्य महामंडळाचे

# अक्षरयात्रा

२०२०-२०२१




## एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन

संपादक

डॉ. दादा गोरे

# अक्षरयात्रा

२०२०-२०२१

संपादक

**डॉ. दादा गोरे**

# अक्षरयात्रा

## २०२०-२०२१

### एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन


**संपादक**

**डॉ. दादा गोरे**

**संपादक मंडळ**

**डॉ. रामचंद्र काळुंखे** - औरंगाबाद
**डॉ. उज्ज्वला मेहंदळे** - मुंबई
**श्रीमती सुनिताराजे पवार** - पुणे
**श्री. गजानन नारे** - अकोला

**प्रकाशक**
डॉ. दादा गोविंदराव गोरे
कार्यवाह, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ,
औरंगाबाद - ४३१ ००५

●

**छपाई**
गोदा प्रकाशन
जयनगर, नवा उस्मानपुरा,
औरंगाबाद - ४३१ ००५

●

**अक्षरजुळणी**
गौरव कॉम्प्युटर्स, औरंगाबाद.

●

**स्वागत मूल्य**
₹ ३००/-

## – अनुक्रम –


- संपादकाचे मनोगत... ६
- अध्यक्षीय... - प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील ११
- **कविता**
  - १. एकविसाव्या शतकातील स्त्रियांची कविता - डॉ. पी. विठ्ठल २९
  - २. २००० नंतरची स्त्रीलिखित कविता - डॉ. कविता मुरुमकर ४८
- **कथा**
  - ३. एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे कथालेखन - डॉ. अनिरुद्ध मोरे ७३
  - ४. एकविसाव्या शतकातील महत्त्वाच्या कथा लेखिकांचे भावविश्व - डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे ९२
- **समीक्षा**
  - ५. स्त्री समीक्षकांचे एकविसाव्या शतकातील योगदान - डॉ. कैलास अंभुरे १००
  - ६. एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे समीक्षा लेखन - डॉ. सुजाता शेणई ११९
- **कादंबरी**
  - ७. २००० नंतरच्या स्त्री कादंबरीकारांच्या लेखनातील स्थित्यंतरे - प्रा. विद्या कुलकर्णी १३७
  - ८. २००० नंतरची मराठी स्त्रीवादी कादंबरी - डॉ. वर्षा गणगणे १४७
- **नाटक**
  - ९. दोन हजारनंतरचे स्त्रियांचे नाट्यलेखन - डॉ. गोविंद काजरेकर १५२
- **ललित लेखन**
  - १०. एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे निवडक ‘ललित लेखन’ - डॉ. पद्मरेखा धनकर १५७
  - ११. अनुभवाचे अंत:स्वर (२००० नंतरचे स्त्रियांचे ललितलेखन) - डॉ. सीमा शेटे-रोठे १६५
- **बालसाहित्य**
  - १२. एकविसाव्या शतकातील मराठी बालसाहित्य : स्त्रियांचे योगदान - डॉ. पृथ्वीराज तौर १७१
  - १३. दोन हजार नंतरचे बालसाहित्य - डॉ. ज्ञानदा आसोलकर १८०
- **चरित्र**
  - १४. एकविसाव्या शतकातील आत्मचरित्रे - डॉ. वर्षा तोडमल १९०

# संपादकाचे मनोगत...

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा २०२०-२१ चा 'अक्षरयात्रा' हा वार्षिकांक काढताना खूप अडचणी आल्या असतील याची आपणास कल्पना आहेच. जागतिक पातळीवर कोविड-१९ चे संकट मानवी जीवन उद्ध्वस्त करू पाहत आहे. त्यावर संयमाने, धीराने, जिद्दीने आणि संशोधनवृत्तीने मानव विजय मिळविणार याचा आपणाप्रमाणेच मलाही विश्वास आहे. परंतु त्याने आजतरी आपल्या जवळच्या अनेक मित्रांचा, आप्त-नातेवाईकांचा बळी घेतलेला आहे, घेत आहे. याची आपणास जाणीव आहेच. यापूर्वी जागतिक स्तरावर माणूस इतका अगतिक कधीच झाला नव्हता. असो...

अलीकडे स्त्रिया अनेक विषयांवर लिहू लागल्या आहेत. त्यांच्या साहित्याची चिकित्सा व्हावी, समीक्षा आणि मूल्यमापन व्हावे म्हणून यावेळी जाणीवपूर्वक 'एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन' या विषयावर 'अक्षरयात्रा'चा अंक काढण्याचे आम्ही ठरविले आहे. अगदी तेराव्या शतकापासून स्त्रिया लेखन करताना दिसतात. महदंबा ही मराठीतील पहिली कवयित्री (१२३८-१३०८) काव्यलेखन करताना दिसते. संत साहित्यातील मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई या अभंग निर्मिती करताना दिसतात. अर्थात या लेखिकांची संख्या मात्र खूप कमी आहे. त्यात नामदेव-ज्ञानेश्वरांच्या कालखंडानंतर थेट १७व्या शतकापर्यंत एकही कवयित्री, लेखिका मराठी वाङ्मयाच्या इतिहासात आपणास भेटत नाही. संत तुकारामांची शिष्या संत बहिणाबाई (१६२८-१७००) आणि संत रामदासांची शिष्या संत वेणाबाई (१६२७-१६७८) आपणास भेटतात. यानंतर थेट एकोणीसाव्या शतकापर्यंत आपणास पुन्हा लेखिका लिहिताना दिसत नाहीत. पुढे सावित्रीबाई फुले (१८३०-१८८७) आणि १८५० साली जन्मलेल्या ताराबाई शिंदे या लेखिका आपणास दिसतात. याचा अर्थ तेराव्या शतकानंतर जवळजवळ ३५० वर्षे आणि १७ व्या शतकानंतर जवळजवळ १५० वर्षे एकही लेखिका लेखन करताना आपणास दिसत नाही. म्हणजे मधला ५०० वर्षांचा कालखंड आपणास रिकामाच दिसतो.

असे का व्हावे? हा प्रश्न आहे. स्त्रियांना शिक्षण नव्हते असे म्हणावे तर संत कवयित्रींना कोणते शिक्षण होते? हा प्रश्न उभा राहतो. त्यात या कवयित्री

संत मुक्ताबाई सोडल्या तर बाकीच्यांचा सामाजिक स्तर खूपच सामान्य होता. मुक्ताबाईंनाही त्यांच्याच समाजाने बहिष्कृत केलेले होतेच.

तेराव्या शतकात नामदेव-ज्ञानेश्वरांच्या काळात महाराष्ट्रात यादवांचे राज्य होते. रामचंद्र यादव (१२७१-१३१७) यांचे राज्य मुबारक शाह खिलजीने १३१७ मध्ये संपविले. १३२१ ते २६ देवगिरी-दौलताबादवर सुलतान मलिक बहादूर ऊर्फ गिआसुद्दीन तुघलक याचे शासन होते. अल्लाउद्दीन खिलजीने (१२९६-१३१६) दक्षिणेवर स्वारी केली. तेव्हा महाराष्ट्रात मुसलमानी सत्तेचा अंमल सुरू झाला. ही मुसलमानी सत्ता म्हणजे धर्मवेडी सत्ता. इतर धर्मियांच्यावर अन्याय अत्याचार सुरू झाले. हिंदूंचे सक्तीने धर्मांतर सुरू झाले. यादवांची नुसती सत्ताच संपली नाही तर यादव घराण्यातील स्त्रियांना पळवून घेऊन जाऊन त्यांचे धर्मांतर करण्यात आले. राजघराण्यातील स्त्रिया जिथे सुरक्षित नाही राहू शकल्या तिथे सामान्यजनाच्या स्त्रियांचे आणि जनतेचे काय हाल झाले असतील याची कल्पना करवत नाही.

अशा या सत्तापरिवर्तनाच्या काळात आणि त्यानंतरही स्त्रियांचे लेखन झाले नसेल हे लक्षात येते. किंवा त्यांनी लिहिले तरी ते नष्ट करण्यात आले असावे, त्यामुळेच महानुभाव साहित्य सांकेतिक लिपीत लिहिले गेले. रवळो व्यासाने १३५३ मध्ये सकळ लिपी तयार केली. १३६३ मध्ये सुंदरी लिपीचा अंगीकार केला गेला. पुढे पारमांडल्य, वज्रलिपी, अंकलिपी इत्यादी लिपीमुळे महानुभाव साहित्याचे अस्तित्व टिकून राहिले. पंडिती वाङ्मयाच्या काळात एकही पंडित स्त्री का झाली नसावी? हा प्रश्न मनात येतो. मराठी राजवटीतही फक्त दोन-तीन लेखिका दिसतात. पेशव्यांच्या काळातही एकही लेखिका असल्याचे आपणास दिसत नाही. हे असे का झाले असेल लक्षात येत नाही. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात स्त्रियांच्या लेखनाचे संख्यात्मक दृष्टीने आणि काळाच्या दृष्टीने असे तुकडे तुकडे दिसतात. हे तुकडे मनात सारखे टोचत राहतात.

विसाव्या शतकातील स्त्री मात्र लेखनाकडे वळलेली दिसते. सावित्रीबाई आणि महात्मा जोतीराव फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला. १८ जुलै १८५७ रोजी मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्या अगोदर १८५६ मध्ये मॅट्रिक पास झालेली पहिली बॅच बाहेर पडली. त्यांची आणि नंतरच्या लेखकांची जागतिक स्तरावरील वाङ्मयाची ओळख झाली. एवढेच नाही तर कथा,

कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र आणि वैचारिक साहित्याच्या लेखनात लेखकाप्रमाणेच लेखिका लेखन करताना दिसतात.

एकविसाव्या शतकात लेखन करणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच मोठी आहे. त्यातल्या त्यात कवयित्रींची संख्या खूपच जास्त आहे. पण या कालखंडातील लेखिकांच्या लेखनाची दखल समीक्षकांनी फारशी घेतलेली दिसत नाही. या कालखंडात सर्वच वाङ्मय प्रकारात लेखिकांनी वाङ्मयनिर्मिती केलेली दिसते. स्त्रिया लिहिताना दिसतात. आमची अपेक्षा या कालखंडात निर्माण झालेल्या स्त्रियांच्या साहित्यावर समीक्षा व्हावी, चिकित्सा आणि विवेचन व्हावे, त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन व्हावे हा हेतू होता. तो कितपत पूर्ण झाला हा प्रश्न आहेच.

या काळातील स्त्रियांनी निर्माण केलेल्या साहित्यावर जेवढी चिकित्सा, समीक्षा लेखकांनी केली ती पाहता ती खूपच कमी आणि तुटपुंजी आहे. या कालखंडातील लेखिका इतर समीक्षक (?) पुरुषांप्रमाणे पुन्हा वाङ्मयाच्या गतकाळातील साहित्याचाच अधिक विचार करताना दिसतात. संत साहित्य, बा.सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, ह.ना. आपटे, सरोजिनी वैद्य, इंदिरा संत, दुर्गा भागवत, वा. म. जोशी इत्यादी सारख्या लेखकांच्या साहित्याचाच विचार अधिक करताना दिसतात. त्यातही विशिष्ट वर्गातील साहित्यिकांच्या साहित्याचाच पुन्हा-पुन्हा विचार होताना लक्षात येतो. त्या विचारातही फारसे नवीन काही आहे असे दिसत नाही. अभ्यासक्रमात व वाङ्मयाच्या इतिहासात असलेल्या लेखकांच्या साहित्याचेच मूल्यमापन अधिक होताना दिसते. तथाकथित बडे समीक्षक/साहित्यिकसुद्धा नवीन पिढीतील लेखकांच्या साहित्याचा फारसा विचार करताना दिसत नाहीत. त्याच त्या जुन्या पिढीतील लेखक आणि त्यांचे तेच ते साहित्य पुन्हा पुन्हा लक्षात घेतले जाते.

लेखन करणाऱ्या बहुतेक स्त्रियाच नव्हे तर पुरुषसुद्धा प्राध्यापक असल्याचे दिसतात. महाराष्ट्रात अनेक विद्यापीठे सुरू झाली. संशोधनात असलेली पूर्वीची गुणवत्ता एकदम घसरणीला लागली. कवी आणि कवयित्रींप्रमाणेच आज पीएच.डी. धारकही उदंड झाले आहेत. त्यांच्या गुणवत्तेची कीव येते. पीएच.डी. च्या संशोधनाचे विषय, ग्रंथरूपात प्रकाशित झालेले दिसतात. महाविद्यालयीन सेवेत स्थिर व्हावयाचे असेल तर आणि वरिष्ठ श्रेणी हवी असेल तर किमान दोन लेख लिहिणे अथवा एखादे लेखांचे पुस्तक असणे गरजेचे झाले. या गरजेपोटी

झालेले समीक्षालेखन केवळ आढावावजा असल्याचे दिसते. गांभीर्याने समीक्षालेखन केलेले ग्रंथ संख्येच्या दृष्टीने फारच कमी आहेत. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेत. ज्यात लेखन गुणवत्ता असल्याचे दिसते. पीएच.डी. चे प्रबंध मग स्त्री अथवा पुरुष अभ्यासकाचे असो, त्यात पाने भरभरून इतर अभ्यासकांच्या ग्रंथातील उतारेच्या उतारे पाहावयास मिळतात. याला समीक्षा अगर संशोधन तरी कसे म्हणावे?

कथा-कादंबरी लेखनात, दलित ग्रामीण जीवनातील चित्रणही या काळातील लेखिकांनी फारसे केलेले दिसत नाही. कथा, कादंबरी, लेखनात मध्यमवर्गीय, उच्चवर्गीय आणि लेखनाची परंपरा असलेल्या स्त्रिया विशेषत्वाने लेखन करताना दिसतात. त्यांचे बरेच लेखनही लक्षात घ्यावे असे आहे. कविता महाजन, प्रज्ञा दया पवार, अनुराधा पाटील, नीरजा, अरुणा ढेरे, मोनिका गजेंद्रगडकर, सुनंदा गोरे, आसावरी काकडे, सानिया अशी काही नावे पुन्हा पुन्हा समोर येतात. अपवाद म्हणून प्रतिमा इंगोले, मधू सावंत, ललिता गादगे, शोभा रोकडे, सुचिता खल्लाळ, सिसिलिया कार्व्हालो, अरुण सबाने, छाया महाजन, प्रिया धारूरकर, रसिका देशमुख, संजीवनी तडेगावकर, माधवी गोरे-मुठाळ अशा स्त्रिया आपले ग्रामीण आणि शहरी जीवनातील आगळेवेगळे अनुभवसंवेदन प्रामाणिकपणे साहित्यनिर्मितीसाठी उपयोजिताना दिसतात.

एकोणविसाव्या शतकात कविता मात्र उदंड निर्माण झालेली आहे, होत आहे. शहरी आणि ग्रामीण या दोन्ही पातळीवर कवयित्री काव्यनिर्मिती करताना दिसतात. त्यातही फेसबुकसारख्या आधुनिक माध्यमाचा आधार घेऊन ती अधिक प्रसारित होताना दिसते. याचाही विचार होणे गरजेचे आहे. नाटक आणि समीक्षा लेखन करणाऱ्या लेखिकांची संख्या फारच मर्यादित असल्याचे दिसते. बालमनावर सुसंस्कार व्हावे, नवीन वैज्ञानिक जीवनाचे आकलन व्हावे म्हणून बालसाहित्याची निर्मिती मात्र लेखिका आणि लेखक करताना दिसतात.

'एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन' हा 'अक्षरयात्रा'साठी विषय नक्की झाल्यानंतर अनेक लेखिकांना आणि लेखकांना फोन केले. जवळजवळ २५ ते ३० साहित्यिक मित्र या विषयावर आनंदाने लिहिण्यास तयार झाले. परंतु २००० नंतर निर्माण झालेले लेखिकांचे साहित्य यावरच लेख हवे असे त्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांच्या लेखनात अडचणी निर्माण झाल्या. आपापल्या परीने अडचणी सांगून बऱ्याच लेखिकांनी आणि लेखकांनी ''माफ

करा वेळ नाही'' असे विविध कारणे व अडचणी सांगून लिहिता येत नाही म्हणून कळविले. अर्थात त्यांच्या खरंच अडचणी असू शकतील(?) हे लक्षात घेऊन त्यांनी स्वीकारलेल्या विषयावर नवीन लेखक मित्रांचा शोध घ्यावा लागला.

'एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन' या विषयावर कथा, कादंबरी, कविता, नाटक, समीक्षा, बालसाहित्य, ललित लेखन, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मय प्रकारांचा विचार 'अक्षरयात्रा' यात करण्यात आला आहे. डॉ. पी. विठ्ठल, डॉ. कैलास अंभुरे, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. कविता मुरुमकर, डॉ. अनिरुद्ध मोरे, डॉ. पद्मरेखा धनकर, डॉ. मिनाक्षी बऱ्हाटे, डॉ. सुजाता शेणई, डॉ. गोविंद काजरेकर, डॉ. वर्षा गणगणे, डॉ. सीमा शेटे-रोठे, डॉ. ज्ञानदा आसोलकर, डॉ. वर्षा तोडमल या सर्व मित्रांनी आमच्या विनंतीला मान देऊन आपल्या व्यस्ततेच्या वेळेतून 'अक्षरयात्रा' साठी वेळ देऊन लेखन केले. त्यांच्यामुळेच हा अंक आम्ही काढू शकलो. या सर्व मित्रांचा मी आभारी आहे.

महामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून कोविड-१९ च्या जीवघेण्या मानसिक अवस्थेतून जातानाही त्यांच्या अनुभवी चिंतनातून आपली भूमिका मांडली. त्यांचेही मी मनापासून आभार मानतो. ज्यांनी ज्यांनी 'अक्षरयात्रा'साठी लेखन केले, त्यांनी खूपच मेहनत घेतलेली आहे हे मान्य करावे लागते. या अंकाच्या संपादक मंडळातील मित्र डॉ. रामचंद्र काळुंखे, श्रीमती सुनिताराजे पवार, डॉ. उज्ज्वला मेहंदळे आणि श्री. गजानन नारे यांच्या सहकाराशिवाय हा 'अक्षरयात्रा' चा अंक तयार होऊ शकला नसता याची मला जाण आहे. या सर्व मित्रांचे असेच सहकार्य मिळत राहो ही इच्छा!

या अंकात काही कमतरता असेल तर ती माझ्यामुळे असेल. वाचक मला समजून घेतील ही अपेक्षा आहे.

- डॉ. दादा गोविंदराव गोरे
'अक्षर', ४९, जयनगर, नवा उस्मानपुरा,
औरंगाबाद - ४३१ ००५
फोन : ९४२२२०६८२०
E-mail : gore.dada@gmail.com

# अध्यक्षीय...

**- कौतिकराव ठाले पाटील**

'अक्षरयात्रा' हे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे 'वार्षिक' आहे हे आता सर्वांनाच ठाऊक झालेले आहे. 'कोरोना'च्या धुमाकुळीमुळे २०२०-२१ चा अंक काढायचा की, काढू नये अशा द्विधा मन:स्थितीत साहित्य महामंडळ होते. ते स्वाभाविकही होते. चिनमध्ये निघालेला हा विषाणू जवळपास अर्ध्यापेक्षा जास्त जगाचा प्रवास करीत भारतात आला. संपूर्ण जग वेठीला धरून त्याने जागच्याजागी खुंटवून ठेवले. त्याची फार मोठी झळ मानवी व्यवहाराला बसली. सर्व व्यवहार, सर्व उपक्रम बंद झाले. फक्त जिवंत कसे राहता येईल या एकाच प्रश्नाभोवती संपूर्ण मानवजात बांधली गेली. त्याला महाराष्ट्रीय समाजही अपवाद नव्हता व नाही.

९ मार्च २०२० रोजी महाराष्ट्रात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला. १७ मार्च २०२० रोजी मुंबईच्या कस्तुरबा इस्पितळात ६४ वर्षांच्या पुरुष रुग्णाचा कोरोनामुळे मृत्यू झाला. २० मार्च रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी 'महाराष्ट्र बंद' जाहीर केले. २२ मार्च २०२० रोजी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी भारतबंदचा आदेश दिला आणि ९ मार्च २०२० पासून २२ मार्च २०२० पर्यंत अवघ्या तेरा दिवसांत सर्व भारतीय समाज भारत सरकारच्या आदेशाने घरातल्या घरात अनामिक भीतीच्या दहशतीखाली स्थानबद्ध झाला. सर्व जीवनव्यवहार थांबले. सांस्कृतिक व्यवहारांचे कोणी नाव काढेनासे झाले. सर्व गोष्टी फक्त माणसाच्या 'जगण्या'जवळ येऊन थांबल्या. आनुषंगिक गोष्टींचे वारे वाहणे स्तब्ध झाले. जणू सर्व जगच गोठून गेले अशी स्थिती निर्माण झाली. निसर्गाचा हा खेळ पाहून मानवजातीला आपण मध्ययुगात किंवा त्याच्याही आधीच्या काळात जगत आहोत की काय असा प्रश्न पडला.

'कोरोना'चे आगमन महाराष्ट्रात होईपर्यंत इतर संस्थांप्रमाणेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचेही काम आपल्या गतीने व आपल्या पद्धतीने चालू होते. उस्मानाबादला ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सर्वार्थाने यशस्वीपणे पार पडलेले होते. त्याच्या आगेमागे पुढच्या ९४व्या साहित्य संमेलनासाठी नाशिकहून एक, अंमळनेरहून एक आणि परभणी

जिल्ह्यातील सेलूहून एक अशी तीन निमंत्रणे साहित्य महामंडळाकडे आली होती. गरज पडलीच तर चवथे उदगीरहून मागून घेता येण्यासारखे होते. पण सारे जगच खिळून गेल्यामुळे आलेली तिन्ही निमंत्रणे साहित्य महामंडळाला दफ्तरात बांधून ठेवावी लागली. सर्वांप्रमाणेच माझ्या समोरही 'माणसांचे जगणे' हाच प्रश्न महत्त्वाचा होता. माझ्या दृष्टीने माणसांच्या जगण्यापेक्षा साहित्य संमेलन ही अजिबात महत्त्वाची गोष्ट नव्हती. म्हणून या वर्षी साहित्य संमेलनच घेऊ नये असे माझे मत तयार झाले. साहित्य महामंडळातील इतर काही ज्येष्ठ सहकाऱ्यांनाही तसेच वाटत होते. पण जसजसा काळ चालला तसतशी प्रसारमाध्यमे चुळबूळ करू लागली. कल्पित व अंदाजाने बातम्या देऊ लागली. कांही वेळा मला प्रश्न विचारू लागली. माझे उत्तर अर्थातच ठाम व नकारार्थीच होते. पण समाज कितीही संकटात असला तरी त्याचा विचार न करता संकटातही संधी शोधणारा व साधणारा एक वर्ग समाजात नेहमीच कार्यरत असतो. या वर्गाला अशा गोष्टींना **'सोयीचा मुलामा चढवणे'** सहज जमत असते; किंबहुना त्यात तो वर्ग वाकबगार असतो. त्याचा विवेकाशी व समाजाच्या हिताशी संबंध असतोच असे नाही. खरे म्हणजे नसतोच. शिवाय आपल्या जवळ असलेल्या आर्थिक साधनांच्या बळावर त्याची पाठराखण करणारा एक वर्गही त्याने हमखास हाताशी बाळगलेला असतो. अलीकडे राजकीय पक्ष्यांच्या कट्टर अनुयायांना काही लोक 'भक्त' म्हणून उपहासत असतात. या संधीसाधू वर्गाने बाळगलेल्या अशा लोकांत आणि या 'भक्तां'त तसा काहीच फारक नसतो. बरोबर असो की चूक असो बोलून, लिहून किंवा तिखटपणे त्यांच्या सोयीची प्रतिक्रिया देऊन त्यांची पाठराखण करणे, त्यांना आडवे येणाराला विरोध करणे आणि मिळेल तो लाभ पदरात पाडून घेणे एवढेच या 'भक्त'सदृश लोकांचे काम असते. जनमानस कलुषित करण्यासाठी आणि समोरच्यांचे मनोबल खच्ची करण्यासाठी अशा लोकांचा या वर्गाला हमखास उपयोग होत असतो. खाल्लेल्या मिठाला जागणे असा मराठीत एक वाक्प्रचार आहे. तो अशा लोकांना बरोबर लागू पडतो. बोलून किंवा प्रतिक्रिया देऊन ते भाविष्यातील मिठाचीही तरतूद करून ठेवत असतात. काही वेळा हे काम काही वृत्तपत्रांचे ठरावीक वार्ताहर व काही वृत्तवाहिन्याही करीत असतात.

अलीकडे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाकडे काही लोक 'धंदा' म्हणून पाहू लागले आहेत असे माझे निरीक्षण आहे. 'समाजसेवा' या

गोंडस नावाच्या आवरणाखाली त्यांचा हा उद्योग चालतो. या उद्योगात राजकीय नेत्यांचा 'राजरोस' उपयोग करून घेता येतो. किंबहुना तेवढ्यासाठीच शक्यतो परक्या मुलखात साहित्य संमेलनाचा घाट घातला जातो. अशा संमेलनाची इमारत पूर्णपणे 'अस्मिते'च्या आणि 'स्वाभिमाना'च्या भावनिक मुद्यांवर उभी केलेली असते. अशी इमारत उभी करू द्यायची की नाही हे साहित्य महामंडळाच्या निर्णयावर अवलंबून असते. निमंत्रक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढे केलेल्या 'देकारा'ला आधी साहित्य महामंडळाचे पदाधिकारी स्थानिक संबंधांपोटी आणि नंतर, साहित्य महामंडळ पदाधिकाऱ्यांच्या भिडेखातर तयार झाले की, जिथं, ज्या गावात, ज्या परिसरात एकाही मराठी माणसाचं वास्तव्य नाही, जिथल्या एकाही माणसाला मराठी भाषाच येत नाही, अशा ठिकाणीही विविध भाषिक व प्रांतिक राजकीय नेत्यांच्या मोठ्या उपस्थितीत मराठी भाषेच्या नावाखाली मराठी साहित्य संमेलनाचा उत्सव साजरा केला जाणे सहज शक्य होते. खरे म्हणजे उद्घाटनात आणि समारोपात व्यासपीठावर लेखकांपेक्षा राजकीय नेत्यांची मोठी उपस्थिती पाहून त्याला राजकीय संमेलन का म्हणू नये; साहित्य संमेलन का म्हणावे असा प्रश्न जाणत्या रसिकाला पडू शकतो. अशा उत्सावासाठी इतिहासकाळात त्या भागात कार्य केलेल्या व मराठी जनमानसात स्थान असलेल्या एखाद्या मोठ्या व्यक्तीच्या नावाचा किंवा ऐतिहासिक स्थळाचा मोठ्या खुबीने उपयोग करून घेण्यात येतो. प्रत्यक्ष मराठी भाषेचे, मराठी साहित्याचे व मराठी माणसांचे कोणतेच भले त्यातून होत नाही / होत नसते. भावना तेवढ्या कुरवाळल्या जातात, अस्मिता तेवढी पोसली जाते. **नाही म्हणायला अशा मराठी साहित्य संमेलनाच्या नावाखाली प्रदेश पर्यटनाला तेवढा हातभार लागतो, हे खरे!**

संत नामदेव महाराजांच्या नावाखाली पंजाबमध्ये **घुमानला** सहा-सात वर्षांपूर्वी असेच एक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आम्ही म्हणजे साहित्य महामंडळाने **महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मराठी माणसे नेऊन घेतलेले आहे.** ते कोणासाठी घेतले होते हा प्रश्न अजूनही माझ्या व माझ्याप्रमाणेच अनेकांच्या मनात ठाण मांडून आहे. म्हणून त्यावेळी हे संमेलन **घुमानला** द्यायला माझा व्यक्तिश: विरोध होता. पण संमेलनाला विरोध म्हणजे संत नामदेवांना विरोध असा भावनिक मुद्दा पुढे आला. शिवाय संत नामदेव हे मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातील नरसी-बामणीचे, म्हणजे आमच्या मातीतले.

आमचे भूमिपुत्र. त्यांनी भागवत धर्माच्या-वारकरी पंथाच्या-आणि महाराष्ट्राचे परमदैवत श्रीविठ्ठल यांच्या भक्तीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी २४ वर्षे भारतभ्रमण केले होते. त्यांपैकी २० वर्षे पंजाबात, अमृतसरजवळ 'घुमान' या लहानशा गावात त्यांचे वास्तव्य होते. पंजाबात विठ्ठलभक्तीचा व भागवतधर्माचा त्यांनी मोठा प्रचार व प्रसार करून तो तेथील शिख समाजाच्या मनामनात रुजवला. **पंजाबी भाषेतून पदरचना केली. त्यामुळे शिखांचे ते परमगुरू ठरले.** गुरू गोविंदसिंग यांनी सांगितलेल्या शिखांच्या धर्मवचनात-'गुरू ग्रंथसाहिबा'त-नामदेवांची एक नाही, दोन नाही तर सदुसष्ट गितं पवित्र मानून समाविष्ट केली. त्यांना एका अर्थाने आद्य गुरूचा मान दिला. एवढा **कळसावरचा महत्त्वाचा मराठी संतकवी हा आमच्या मातीतला. मराठवाड्यातला.** या गोष्टीचा अभिमान इतर मराठी जनांपेक्षा आम्हा मराठवाड्यातील प्रतिनिधींना कांकणभर अधिकच असणार! त्यामुळे आमची प्रादेशिक अस्मिता आडवी आली आणि तिने आम्हाला अडचणीत आणले. कुरकुरत का होईना, आमचा विरोध आम्हाला मागे घ्यावा लागला. त्यामुळे मराठी साहित्य संमेलन हे मराठी माणसांसाठी असते याचाच आम्हाला विसर पडला आणि केवळ 'नामदेवां'च्या नावाखाली, नामदेवांच्या नावावर, **घुमानला एकही मराठी माणूस तेथील निवासी नसताना म्हणजे शून्य मराठी माणसा(सां)साठी पंजाबच्या उत्तर भागात, पाकिस्तानच्या सीमेलगत ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आम्ही केवळ घेतलेच नाही तर मोठा 'उत्सव' म्हणून 'साजरे' केले. आणि त्या निमित्ताने पाकिस्तानच्या सरहद्दीपर्यंत जाऊन तेथून 'वाघा बॉर्डर', अमृतसर,** चंदीगडपर्यंतचा प्रदेश, भाकरा-नांगल हे १९५५ साली पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंनी दूरदृष्टीने बांधलेले भारतातील सर्वात मोठे धरण आणि बियास व सतलज ह्या उत्तर भारतातील दोन महत्त्वाच्या नद्या, सुवर्णमंदिर, जालीयनवाला बाग ही ऐतिहासिक व धार्मिकस्थळे हे पर्यटन साधून घेतले. निमंत्रक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि इतर संयोजकांनी केंद्र सरकारमधले, पंजाब सरकारमधले आणि महाराष्ट्रातील असे किमान दीड डझन 'सत्ता'धारी, मंत्री, पुढारी संमेलनाच्या उद्घाटन समारंभात आणि समारोप-समारंभात व्यासपीठावर आणून व त्यांना भाषणे द्यायला लावून त्यांच्या स्वागताचे व सरबराईचे श्रेय पदरात पाडून घेतले. अशा साहित्य संमेलनाच्या नावाने सत्तेतील मोठमोठे पुढारी जेव्हा आणले जातात तेव्हा साहित्य संमेलनाचे काही भले होते असे नाही. पण अशा साहित्य संमेलनामुळे

भले होत असणार ते गरज नसताना योजनाबद्ध रीतीने त्यांना तिथे आणणारांचे व व्यासपीठावर लेखकांच्याऐवजी मोक्याच्या जागी या नेत्यांना बसवणारांचेच! सरकारी दरबारी अडलेली वैध, अवैध कामे मार्गी लावायला, काढून घ्यायला किंवा सार्वजनिक हिताच्या नावाखाली नवी कामे पदरात पाडून घ्यायला साहित्य संमेलनाइतके दुसरे चांगले साधन असू शकत नाही; हे अधिक स्पष्ट करून सांगायची गरज नाही. एरवी मराठी भाषेचे किंवा मराठी साहित्याचे कोणतेही काम न करणारी व वेगळ्या उद्देशाने स्थापन झालेली महाराष्ट्रातली एखादी संस्था महाराष्ट्राबाहेर, दूर उत्तर भारतात असे फुकटचे उद्योग कशासाठी करील हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. **महाराष्ट्रापासून इतक्या दूर, तेथील शून्य टक्के मराठी माणसांसाठी मराठी साहित्य संमेलन घेऊन, त्या संमेलनाने मराठी भाषेची किंवा मराठी संस्कृतीची तिथे कोणती रुजवणूक केली जाते याचे उत्तर साहित्य महामंडळाने स्वतःच्या आत डोकावून गंभीरपणे देण्याची गरज मला वाटते, नव्हे ती मराठी साहित्य महामंडळाची व आजचा अध्यक्ष म्हणून माझीही जबाबदारी आहे.**

संत नामदेवांच्याच नावासाठी, त्यांच्या कार्याच्या वेगळेपणाचे व मोठेपणाचे स्मरणच करायचे होते तर ते निमंत्रकांना व निमंत्रक संस्थेला मराठवाड्यात हिंगोली जिल्ह्यात नरसी-बामणीला त्यांच्या जन्मगावीही संमेलन घेऊन करता आले असते. पण मग दिल्ली व पंजाबचे मातब्बर राजकीय नेते कसे आणता आले असते? घुमानला साहित्य संमेलन घेण्यातली खरी मेख तर इथेच होती.

घुमानला साहित्य संमेलन घेतले तेव्हापासून संत नामदेवांच्या 'स्मरणा'पलीकडे साहित्य महामंडळाने काय साधले हा प्रश्न मला सतावत होता. कुठे तरी चुकल्याची जाणीव होत होती. त्यातच कोरोना ऐन भरात असताना, घुमानला संमेलन घेतलेल्या संस्थेने साहित्य महामंडळाभोवती **भावनिक** आणि **अस्मितेचे** मुद्दे घेऊन दिल्लीला संमेलन देण्यासाठी / घेण्यासाठी पुन्हा एकदा जाळे फेकले. साहित्य महामंडळाकडे तसे निमंत्रण दिल्याच्या अनुकूल बातम्याही वर्तमानपत्रांतून छापून आणल्या. त्या व्हॉट्स-ॲपवर मला पाठविण्याची आणि माझ्यावरचा दबाव वाढविण्याचीही सोय केली. वस्तुतः संस्था पुण्याची असल्यामुळे पुण्यात अगर पुणे जिल्ह्यातील एखादे गाव संमेलनासाठी त्या संस्थेच्या अध्यक्षाला व पदाधिकाऱ्यांना निवडता आले असते आणि मन भरून जाईपर्यंत मराठी भाषेची सेवा त्यांना करता आली असती. पण त्यांनी तसे केले नाही. कारण

त्यांना ते नको होते. पुण्यात किंवा पुणे परिसरातील सामान्य मराठी रसिकांत त्यांना रस नव्हता. त्यांना रस होता तो जिथे सर्वसत्ताधीश राजकारणी नेते एकवटलेले असतात तिथे, उत्तर भारतात; दिल्लीत. मग दिल्लीतील मराठी लोकांना संमेलन नको असले तरी! दोनच वर्षांपूर्वी, आधी निमंत्रण देऊन व महामंडळाने ते निमंत्रण स्वीकारल्यावर दिल्लीकरांनी ते स्पष्ट नाकारलेले आहे हे ठाऊक असतानाही पुण्याच्या संस्थेला व तिच्या पदाधिकाऱ्यांना मात्र दिल्लीलाच साहित्य संमेलन घ्यायचे होते. त्यासाठी त्यांनी जी दोन कारणे शोधली होती ती खासच होती. त्यापैकी पहिले कारण होते ते हीरक महोत्सवी महाराष्ट्रदिनाचे. दिल्लीत महाराष्ट्रदिनाच्या दिवशी संमेनल घेऊन महाराष्ट्रदिन त्यांना साजरा करावयाचा होता आणि त्यातून मराठी माणसांचा आवाज त्यांना दिल्लीकरांना व उत्तर भारतातील राजकीय नेत्यांना दाखवायचा होता. शरद पवारांना या संमेलनाचे स्वागताध्यक्ष करून त्यांना 'मोठे' करायचे होते. तसे ते विविध व्यक्तींची व राजकीय नेत्यांची नावे घेऊन दरवेळी पुन्हा पुन्हा मला फोनवर सांगत होते. याचा अर्थ इतके दिवस शरद पवार त्यांच्या दृष्टीने 'लहान'च होते. दिल्लीला संमेलन घेतले तर पंतप्रधानांसह दिल्लीतील इतर नेत्यांसमोर हात जोडून, लीन होऊन त्यांचे स्वागत केल्याने, त्यांना हार तुरे घालून व त्यांचा सत्कार केल्यानेच ते मोठे होणार होते. यासंबंधी ते मला वारंवार फोनवर काय काय सांगत होते ते तेच जाणे! त्यासाठी कोणाकोणाची नावे ते फोनवर घेत होते! बिचारे विठ्ठल मणियार, कोण व कुठले हे मला अजूनही माहीत नाही. त्यांच्या नावाचा फोनवर अनेक वेळा उल्लेख त्यांनी केला. आणखीही काही नावे सांगितली. मधल्यामध्ये मला माहीत नसलेल्या लोकांची नावे ते फुशारकीने का सांगत आहेत हे मला कळत नव्हते. असतीलही ते मोठे! आहेत, हे मी मला माहीत नसतानाही मान्य करतो. पण त्यांचा, त्यांच्या मोठेपणाचा आणि साहित्य महामंडळाचा, त्यांचा आणि माझा काय संबंध हे मला कळत नव्हते. स्वागताध्यक्ष होऊन शरद पवार 'मोठे' झाल्याशिवाय आणि मराठी साहित्य संमेलनातून महाराष्ट्राचा मराठी आवाज उत्तरेतील पुढाऱ्यांना ऐकवल्याशिवाय 'महाराष्ट्राची, मराठी माणसाची दिल्लीत किंमतच' वाढणार नव्हती असे काहीसे त्या सर्वांचे म्हणणे होते. त्यांचे हे 'म्हणणे' फोनवर मला पटवून देण्याचा तर हा प्रयत्न नव्हता? 'शरद पवारांना लहान करू नका!' ही ठळक शीर्षकाची लोकसत्तेतील बातमी काय सुचवते? संमेलनासाठी चाललेला आटापीटाच ना!

या साहित्य संमेलनामुळे मराठी माणूस दिल्लीकरांच्या व उत्तर भारतीयांच्या नजरेत एकदम **'मोठा व वजनदार'** होणार होता. केवळ एवढ्याचसाठी या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना दिल्लीत ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पाहिजे होते. कसेही करून हे संमेलन मिळवायचेच यासाठी त्यांनी पक्की व्यूहरचना केली होती. म्हणून पुण्यातून जमेल तितक्या आणि नागपूरहून 'नागपूर लोकसत्ते'मार्फत शरद पवारांच्या नावाने आणि दिल्लीच्या नावाने तद्दन खोट्या आणि कल्पित बातम्या देऊन दररोज पहिल्या पानावर जाडजूड टाइपात व चौकटी टाकून बातम्यांचा रतीब त्यांनी घातला आणि लोकसत्तेसारख्या मोठ्या वर्तमानपत्राचे अर्धे अर्धे पान कांही दिवस अक्षरश: वाया घालवले. एरवी एका आवृत्तीतील बातमी दुसऱ्या ठिकाणच्या आवृत्तीत क्वचित देणाऱ्या 'लोकसत्ते'नेही हा 'चविष्ट रतीब' खंड न पडू देता सर्व ठिकाणच्या आवृत्त्यांत घालणे चालूच ठेवले. ह्या प्रभावी (?) परिणामकारक (?) व दिशाभूल करणाऱ्या बातम्या लिहून देण्यासाठी साहित्य महामंडळाचाच नागपूरातील एक माजी पदाधिकारी त्यांनी हाताशी धरला होता अशी त्यावेळी नागपूरात जोरदार चर्चा होती, जी माझ्यापर्यंत झिरपत आली होती. अशा बातम्यांमुळे माझ्यावरचा दबाव वाढेल अशी त्यांची समजूत असावी. पण त्यांची समजूत चुकीची होती. एखाद्या वेळी, एखाद्या ठिकाणचे पदाधिकारी भिडेपोटी बळी पडले किंवा 'हुरळले' म्हणू फार तर! पण प्रत्येक वेळी सगळीकडचेच 'हुरळतील' हा त्यांचा भ्रम दूर व्हायला अजून त्यांना थोडी वाट पाहावी लागणार होती. पण त्यांच्या अशा प्रयत्नांचा एक परिणाम मात्र झाला. त्यांच्या उद्दिष्टाप्रमाणे माझ्यावरचा दबाव वाढण्याऐवजी शरद पवारांचे नाव निष्कारण मध्ये येत असल्यामुळे मला प्रचंड मनस्ताप झाला. शरद पवारांनी आणि त्यांच्या अनुयायांनी ह्या बातम्यांकडे कसे पाहिले मला माहीत नाही. पण त्यांच्या नावाने व नावावर या लोकांनी 'नागपूर लोकसत्ते'ला किंवा ज्याच्या नावाने त्या बातम्या छापल्या त्या वार्ताहराला हाताशी धरून केलेला हा खेळ शरद पवारांना कमीपणा आणणारा होता हे खातरीने सांगता येऊ शकते. **'साहित्य संमेलनात शरद पवारांचे सहस्त्रचंद्रदर्शन'**, **'शरद पवारांना लहान करू नका!'** अशा पहिल्या अर्ध्या अर्ध्या पानावर **उचकवणाऱ्या शीर्षकाच्या बातम्या देऊन, त्या बातम्या देणाऱ्यांना खरोखरच शरद पवारांना मोठे करायचे होते की, लहान करायचे होते असा प्रश्न त्यावेळी अनेकांना पडला व त्यांच्या हेतूबद्दलच शंका वाटायला लागली.** हे

सगळे ते साहित्य महामंडळाच्या व नाशिककरांच्या दिशेने हेतूत: फेकत होते हे माझ्या लगेच लक्षात आले आणि त्यापाठीमागचा उद्देशही मला समजला. त्यामुळे लोकांचा गैरसमज होऊ नये म्हणून हे सारे लिहावे लागले; नाहीतर साहित्य महामंडळाने या उद्योगाची दखलसुद्धा घेतली नसती.

हे सगळे करण्यापाठीमागचा उद्देश हा की, दिल्लीला साहित्य संमेलन देण्यासाठी शरद पवारांसारख्या जगन्मान्य नेत्याच्या नावाचे माझ्यावर आणि साहित्य महामंडळावर दडपण यावे आणि आम्ही दिल्लीसाठी त्यांनी दिलेले निमंत्रण निमूटपणे स्वीकारावे; त्यांना साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दिल्लीची वाट मोकळी करून द्यावी. पण कोणत्या का कारणाने होईना, घुमानच्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने एकदा फटका खाल्ल्यावर तीच चूक साहित्य महामंडळाला पुन्हा करू देणे निदान मला तरी मान्य नव्हते. म्हणून या निमंत्रणावर, बातम्यांवर, फोनवर दिलेल्या आश्वासनांवर आणि वेळोवेळी फोनवर घेतलेल्या ओळखी-अनोळखी व्यक्तींच्या नावांवर काहीही न बोलता मी मौन पाळले. साहित्य संमेलनाच्या नावाने कोणाच्या तरी उद्दिष्टपूर्तीसाठी अशी वाट करून देणे हे साहित्य संमेलनाचा व साहित्य महामंडळाचा गैरवापर करू देण्यासारखे होते / आहे, साहित्य महामंडळाच्या उद्दिष्टाला बाधा आणणारे होते / आहे म्हणून मी फक्त ऐकत व पाहत राहिलो. एखादा दुसरा अपवाद वगळता त्यावर प्रतिक्रिया देण्याचे टाळले / टाळत राहिलो. आपण दिल्लीला साहित्य संमेलन मिळवूच असे जे त्यांना वाटत होते ही त्यांची आशा व भ्रम दूर केला नाही व त्यांना उत्तेजनही दिले नाही. कारण नाही तरी निर्णय काही मी एकटा घेणार नव्हतो; निर्णय संपूर्ण साहित्य महामंडळच घेणार होते.

दिल्लीला साहित्य संमेलन मागण्यासाठी त्यांनी जे दुसरे कारण दिले होते ते तर फारच हास्यास्पद होते. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाला २६१ वर्षे झाली, त्या युद्धाची आठवण साजरी करण्यासाठी साहित्य संमेलनाचा महोत्सव त्यांना दिल्लीत हवा होता. या युद्धात मराठ्यांचा दारुण पराभव झाला होता. कशातही न मोजता येणारी कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सामरिक, वांशिक अशी सर्वच बाबतीत महाराष्ट्राची व मराठी समाजाची अतुलनीय हानी या युद्धाने केली होती.

''कोणत्याही बाबतीत फक्त फायदे आणि स्वार्थ पाहिला की, मोठी विसंगती समोर येत असते. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाला २६१ वर्षे झाली,

त्याची आठवण म्हणून दिल्लीला संमेलन मागण्यासाठी ते देत असलेले हे कारणही अतिशय विसंगतीपूर्ण व तारतम्य सोडून होते. जगभर नेहमी 'विजया'चे **'उत्सव'** होताना आपण पाहिले आहेत, पाहत असतो. पण पानिपतच्या ज्या तिसऱ्या युद्धात आपला पराभव झाला, त्या पराभवाचाही संमेलन घेऊन 'उत्सव' साजरा करावा ही आजच्या काळातली विधिनिषेध हरवलेली मागणी होती. आपण इतिहासही आपल्या स्वार्थासाठी सोयीने कसा वापरतो याचे हे अतिशय ठळक उदाहरण आहे. नाही तर ज्या युद्धात महाराष्ट्राची अख्खी पिढी बर्बाद झाली, सव्वा लाख माणसे मारली जाऊन घरोघरी विधवांचा विलाप वाट्याला आला, हजारो स्त्री-पुरुष गुलाम म्हणून पकडून नेण्यात आले. ज्यांचे वंशज आज परके होऊन बदललेल्या नावाने, धर्माने, भाषेने परक्या भूमीवर वावरताना दिसून येतात, त्या घटनेने मराठी राज्याचे भवितव्य कायमसाठी बदलून टाकले, ज्याची आठवण मराठी माणसाला आजही बेचैन करते, त्या घटनेची / युद्धाची आठवण साजरी करायला साहित्य संमेलन द्या असे म्हणणे हे कशाचे लक्षण आहे? एरवी २४ तास टीआरपी वाढविण्यासाठी लटपटी-खटपटी करणाऱ्या मिडियाला मात्र हे ऐकू आले नाही, दिसले नाही. उलट काही वाहिन्यांनी निर्ढावलेपणाने स्वत:च न्यायाधीशाच्या भूमिकेत शिरून दिल्लीसाठी चर्चेचे 'गु-हाळ' मात्र चालवलेले दिसले. विचार, विवेक, तारतम्य हरवल्याचेच किंवा फक्त फायदे आणि स्वार्थ पाहिल्याचेच हे लक्षण नाही का?'' - (एका ज्येष्ठ लेखिकेच्या पुणे येथे दिलेल्या भाषणातून.) मला वाटते यावर आणखी वेगळे काही बोलण्याची गरज नाही.

• • •

कोरोनाचा जोर कमी झाला; महाराष्ट्राने त्यावर मात केली असे चित्र नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस निर्माण झाले. निर्बंध असलेले व्यवहार सुरू झाले. मंदिरे उघडली गेली. सांस्कृतिक कार्यक्रम सुरू झाले. वर्तमानपत्रांचे व लेखक - रसिकांचे साहित्य संमेलनाची विचारणा करणारे फोन सुरू झाले, बदलत असलेले समाजातील वातावरण व कमी होत असलेली भीती लक्षात घेऊन साहित्य महामंडळानेही साहित्य संमेलन न घेण्याचा विचार बाजूला सारला आणि ९४ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या मांडणीचे काम हातात घेतले. रीतसर बैठक घेऊन प्रक्रिया सुरू केली आणि पूर्ण चर्चेनंतर, नाशिकच्या

'लोकहितवादी मंडळा'चे निमंत्रण स्वीकारल्याचे जाहीर केले. त्यापूर्वी निमंत्रक संस्थेचे अध्यक्ष श्री. जयप्रकाश जातेगावकर आणि त्यांच्या संस्थेतील त्यांचे सहकारी पदाधिकारी यांना कोरोनाच्या आपत्तीमुळे सर्व शासकीय नियम पाळून आपल्याला हे संमेलन घ्यावे लागेल, हे लक्षात घेऊन फार मोठे साहित्य संमेलन घेण्याऐवजी निमंत्रक संस्थेला आणि स्वागतमंडळाला 'झेपेल' एवढेच 'आटोपशीर' साहित्य संमेलन आपण घ्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कमी निधीत बसेल, फक्त एकाच मंडपात होईल एवढेच साहित्य संमेलन आपण घेऊ अशी साहित्य महामंडळाची भूमिका आडपडदा न ठेवता त्यांच्यासमोर मांडली. पुढे काय घडणार आहे याचा अंदाज त्यांनाही नसल्यामुळे त्यांनाही ते त्यांच्या आटोक्यातले वाटले व तशी कबुलीही त्यांनी दिली. कोरोनामुळे सरकारकडून या संमेलनाला दरवर्षीप्रमाणे पन्नास लाख रुपये मिळतील असे वाटत नाही. तर जास्तीत जास्त साडेसोळा ते सतरा लाखांपर्यंतच सरकारी अनुदान मिळू शकेल असा अंदाजही साहित्य महामंडळाचा अध्यक्ष म्हणून मी त्यांना सांगितला. उस्मानाबादला एका वर्षापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनाचा काटकसरीचा, कमी खर्चाचा व साधेपणाचा आदर्श समोर ठेवून संमेलन उभे केल्यास आटोपशीर पण उत्तम व परिणामकारक साहित्य संमेलन घ्यायला साहित्य महामंडळ नाशिककरांना शक्य ते सर्व सहकार्य करील असे आश्वासनही साहित्य महामंडळाच्या वतीने मी लोकहितवादी मंडळाला दिले. लोकहितवादी मंडळाचे अध्यक्ष श्री. जयप्रकाश जातेगावकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांदेखत हे सर्व मान्य केले आणि 'स्वागताध्यक्ष' फक्त आमच्या मनाप्रमाणे करू (निवडू) द्या अशी मागणी त्यांनी महामंडळाकडे केली. साहित्य महामंडळाच्या वतीने आम्ही ती मान्य केली आणि साहित्य महामंडळाची स्थळ निवडीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यथावकाश नाशिकला संमेलन दिल्याची घोषणा केली.

समजा साहित्य महामंडळाने दबावाखाली येऊन व 'नागपूर लोकसत्ते'च्या वार्ताहराने दिलेल्या खोट्या बातम्यांमुळे नाशिक साहित्य संमेलनाशी ज्यांचा अजिबात संबंध येणार नव्हता त्या शरद पवारांना चर्चेत आणण्यात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ निमित्त होऊ नये म्हणून साहित्य महामंडळाने दिल्लीला साहित्य संमेलन दिले असते तर अशाच ऐतिहासिक घटनांशी संबंध असलेल्या भावनिक मुद्द्यांच्या आधाराने भविष्यात उत्तर भारतात किंवा पूर्व व पश्चिम भारतात दुसऱ्या एखाद्या संस्थेने अशा प्रकारच्या संमेलना(नां)ची मागणी

केलीच नसती याची हमी कोण देणार होते? **बंगालमध्ये कलकत्त्याजवळच्या श्रीरामपूर येथे पहिले मराठी पुस्तक छापले गेले त्याला अमुक इतकी वर्षे झाली म्हणून किंवा मराठी फौजेने पश्चिमेला अटकेपर्यंत कूच केले होते व अटकेपार मराठी सत्तेचा झेंडा फडकविला होता त्याला अमुक इतकी वर्षे झाली म्हणून तिथे साहित्य संमेलन द्या, त्याचा उत्सव साजरा करू अशा मागणीला (मागण्यांना) भविष्यात साहित्य महामंडळाला कदाचित तोंड द्यावे लागले असते. हा धोका साहित्य महामंडळाने वेळीच ओळखला आणि 'घुमान'च्या साहित्य संमेलनाच्या निर्णयामुळे निर्माण झालेला हा सिलसिला इथेच थांबविला आणि भावनेच्या भरात एकदा झालेली चूक हीरक महोत्सवी महाराष्ट्रदिनाच्या व पानिपतच्या तिसऱ्या युद्धाच्या २६१ व्या वर्षाच्या फेकलेल्या जाळ्यात न अडकता दुरुस्त केली.** माझ्या दृष्टीने साहित्य महामंडळाने घेतलेला हाच निर्णय योग्य होता / आहे. हां, एक मात्र खरे की, या निर्णयामुळे दिल्लीसाठी निमंत्रण दिलेल्या संस्थेची व तिच्या पदाधिकाऱ्यांची साहित्य महामंडळाला व साहित्य संमेलनाला गृहीत धरून आखलेली गणिते बिघडली असण्याची शक्यता आहे. पण तो साहित्य महामंडळाचा प्रश्न नाही.

नाशिकला साहित्य संमेलन देण्याचा निर्णय जाहीर झाला तेव्हा हे प्रकरण थांबणे आवश्यक होते. पण दुर्दैवाने तसे झाले नाही. साहित्य महामंडळाच्या बैठकीनंतर आणि ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिकला होईल हे जाहीर झाल्यानंतरही दिल्लीसाठी आग्रही असणाऱ्या संस्थेच्या अध्यक्षांनी या निर्णयात बदल करण्यासाठी पुढील दोन तीन दिवस मला जे फोन केले, मी फोन उचलत नाही म्हणून वारंवार जे प्रयत्न केले आणि फोन उचलल्यावर किंवा खूप मिसकॉल पाहून उत्तर म्हणून मीच उलट फोन केल्यावर ते जे माझ्याशी बोलले त्यातून काही धक्कादायक बाबीही पुढे आल्या. त्यात गेले काही दिवस ते जे बोलत होते, छापून आणत होते. (छापून येत होते असे म्हणू या फार तर!) ते तर होतेच **पण त्याशिवाय माझ्यावरचा रागही ते 'इतरांच्या तोंडी घालून' व्यक्त करत होते. त्यात 'मला पाहून घेणे फार काही अवघड नाही' अशी सौम्यशी धमकीही होती. त्यांचे असे, 'दुसऱ्याच्या फोनचा हवाला' देऊन सहज बोलता बोलता सफाईदारपणे दिलेल्या धमक्यांचे मला दोनदा फोन आले.** ते ऐकून वाईट वाटले. एरवी अतिशय मृदू व सुसंस्कृतपणे वागणाऱ्या व बोलणाऱ्या माणसाचा आपली गृहीतके चुकली की कसा तोल

जाऊ शकतो त्याचे हे चांगले उदाहरण होते. धमक्यांच्या फोनमुळे त्यांच्या चेहऱ्यावरचा मृदूपणाचा व सुसंस्कृतपणाचा बुरखा विनासायास फाटला आणि त्यापाठीमागच्या पक्क्या हिशेबी व स्वत:चे हितसंबंध पाहणाऱ्या माणसाचा मुखवटा समोर आला. दोन्ही वेळी सूचित केलेल्या धमक्यांच्या फोनवर मी काहीही प्रतिक्रिया न देता नेहमीप्रमाणे त्यांचे बोलणे फक्त ऐकून घेतले. धमक्यांचे उपप्रकरण मी निर्माण होऊ दिले नाही; गप्प बसून माझ्यापुरते ते प्रकरण मी तिथेच संपविले. तरीही ३० जानेवारी २०२१ रोजी सकाळी सकाळी त्यांनी, आदल्या दिवशी संध्याकाळी एका ज्येष्ठ लेखिकेने पुण्यात दिलेल्या भाषणाच्या निमित्ताने मला फोन करून आपली मळमळ सविस्तरपणे व्यक्त केली. मी फक्त ऐकून घेतले. कारण त्यांना ताटकन् तोडून टाकणे त्याक्षणी मला योग्य वाटले नाही.

• • •

साहित्य संमेलनाचे स्थळ जाहीर केले तरी साहित्य महामंडळावर कोरोनाचे दडपण होतेच. कोरोनाचा प्रभाव कमी झाला असे वाटत असले तरी तो कधी डोके वर काढील याचा भरवसा नव्हता. म्हणून फार विलंब न करता हे संमेलन उरकून घ्यावे या प्रयत्नात मी होतो. त्या दृष्टीने नाशिककरांची एप्रिल-मे महिन्याची मागणी मी फेटाळून लावली आणि मार्चअखेर संमेलन घेण्याचा विचार पक्का केला. साहित्य महामंडळाशी व स्वागतमंडळाच्या प्रतिनिधींशी चर्चा करून अगदी होळीचा दिवसही संमेलनासाठी वापरायचा असे ठरविले आणि सर्वांनी मिळून तारखा पक्क्या केल्या. त्यापूर्वी पत्रव्यवहाराला व नवनिर्वाचित अध्यक्षाला भाषण लिहायला पुरेसा वेळ मिळावा म्हणून साहित्य महामंडळाने अध्यक्ष निवडीची, तीन दिवसांच्या कार्यक्रमपत्रिकेची प्रक्रिया पूर्ण केली होती. ज्येष्ठ कथाकार श्री. भारत सासणे आणि ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्यापैकी कोणाही एकाच्या नावावर साहित्य महामंडळाच्या बैठकीत एकमत होईना म्हणून उपस्थित सदस्यांची मते जाणून घेऊन डॉ. जयंत नारळीकर यांची संमेलनाध्यक्ष म्हणून बहुमतांनी निवड केली. त्यानुसार ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाल्याचे अभिनंदनासह त्यांना फोनवर कळविले. त्यांच्या या निवडीचा, त्यांच्या पत्नी श्रीमती मंगलाताई नारळीकर यांनी त्यांच्या वतीने सानंद स्वीकार केला आणि त्याक्षणी ९४ व्या

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची, संमेलनाआधीची साहित्य महामंडळाने करावयाची संपूर्ण प्रक्रिया आपल्या बाजूने पूर्ण झाली.

नाशिकच्या निमंत्रक संस्थेने स्वागतमंडळाच्या निर्मितीसाठी पंधरा एक स्वागत सदस्यांची नोंदणी करून स्वागताध्यक्ष म्हणून श्री. छगन भुजबळ यांची प्रथम निवड केली. श्री. छगन भुजबळ हे केवळ नाशिक शहरातीलच नव्हे तर नाशिक जिल्ह्यातील प्रभावशाली व्यक्तिमत्त्व. त्यांच्या शब्दाला नाशिकमध्ये मोठा मान व मोठे वजन. निधी संकलनाला त्यांच्या प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचा मोठा उपयोग होणार होता. निमंत्रण देतेवेळी साहित्य महामंडळाने निमंत्रकांना निमंत्रक संस्थेच्या ऐपतीनुसार व कोरोनाचे संकट लक्षात घेऊन कमी खर्चात आटोपशीर साहित्य संमेलन घ्या असे सुचविले होते. त्याबरोबरच संमेलनात सर्व नाशिककरांना समावून घ्या, नाशिक शहरातून जितके स्वागत सभासद होतील तितके करा; त्यातूनही मोठा निधी उभा राहू शकतो; त्यामुळे हे संमेलन फक्त लोकहितवादी मंडळाचे होणार नाही तर ते संपूर्ण नाशिकच्या रसिक-वाचकांचे, नाशिकच्या जनतेचे होईल. पंधरा लाख लोकसंख्येच्या शहरातून पाचशे स्वागत सभासद होणे काहीच कठीण नाही. पाचशे सभासदांच्या वर्गणीतून पंचवीस लाख रुपयांचा निधी सहज उभा राहू शकतो. नाशिक शहराच्या बाहेरच्या संपूर्ण जिल्ह्यातील लोकांना संमेलनाशी जोडून घेतले आणि शंभर-दोनशे स्वागत सभासद तेथून केले तर कोणावरही फार मोठा बोजा न टाकतासुद्धा निधीत मोठी भर पडेल आणि साहित्य संमेलन फक्त लोकहितवादी मंडळाचे न राहता संपूर्ण नाशिक शहरातील व जिल्ह्यातील सर्व लोकांचे होईल, सर्वांना हे संमेलन आपले वाटेल. संमेलनाच्या कामाचा भारही सर्वांमध्ये वाटला जाईल. पण दुर्दैवाने महिना दीड महिना गेला तरी तसे चित्र काही निर्माण झाले नाही. तसे चित्र निर्माण होण्यासाठी प्रयत्नच केले गेले नाहीत. पुन्हा पुन्हा विषय उकरून काढून व सांगूनही स्वागत सभासदांची संख्या पस्तीसच्या पुढे व लोकहितवादी मंडळाच्या बाहेर गेली नाही; जाऊ दिली नाही. ती वाढावी असे संमेलनाच्या सूत्रधारांनाच वाटत नाही / नव्हते असे दोघा-चौघांजवळ चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडून कळले. हेही त्यांनी मला भीतभीतच सांगितले. श्री. छगन भुजबळ यांच्या निधिसंकलन क्षमतेवर, एका अर्थाने श्री. छगन भुजबळांवरच त्यांनी सर्व 'भार' टाकून दिला व इतर मांडणी करण्यासाठी ते मोकळे झाले.

साहित्य संमेलनाच्या निधीच्या 'अंदाजपत्रका'बद्दलही अशीच अनाकलनीय

स्थिती होती. पुन्हा पुन्हा बदलत जाणारे व दरवेळी ‘कोटी’त वाढत चाललेले अंदाजपत्रक काही वेळा वर्तमानपत्रांच्या बातम्यांतून तर काही वेळा व्हॉट्स-ॲपवर आलेल्या ‘पोस्ट’मधून कळत होते. मुळात साहित्य संमेलन घेण्याचे आणि देण्याचे ठरले तेव्हा ते एका मंडपात आटोपशीर आणि कमी खर्चात घेण्याचे बोलणे झाले होते. पण स्वागताध्यक्षांची निवड झाल्यावर त्यांचे समाजातील वजन आणि त्यांची निधिसंकलनाची क्षमता पाहून ‘निमंत्रका’ने संमेलनाच्या अंदाजपत्रकाबाबतचा आपला ‘अजेंडा’ बदलला. त्यांच्या संकलनक्षमतेचा त्यांच्याही नकळत पुरेपूर लाभ घ्यायचा असे लोकहितवादी मंडळाने ठरविले असावे असा एक तर्क निघतो. कारण पंधरा-सोळा लाख गृहीत धरलेले शासन अनुदान पहिल्या फटक्यात श्री. छगन भुजबळांनी शासनाकडून दरवर्षीइतकेच म्हणजे पन्नास लाख रुपये इतके करून घेतले. ठिकठिकाणी शब्द टाकून निधी संकलनाचा वेग वाढविला. जसजसा निधीचा आकडा फुगत चालला तसतसे हे अंदाजपत्रकही ‘बदलत’ गेलेले दिसते. या बदलत व वाढत जाणाऱ्या अंदाजपत्रकाबद्दल व त्यातून होणाऱ्या खर्चाबद्दल नाशिकचे काही लोक माझ्याकडे तक्रारी करू लागले; प्रश्नचिन्हे उभी करू लागले. साहित्य संमेलन हे साहित्य महामंडळाचे असल्यामुळे जरी ‘निधी’ ‘नाशिक’चाच असला तरी माझी अस्वस्थता वाढली. स्वागत सभासद पस्तीसच्या वर व लोकहितवादी मंडळाच्या बाहेर जाऊ न देण्याचे कारण कदाचित ‘निधी’ हेच असावे अशी शंका लोकांना येऊ लागली. तसे लोक बोलून दाखवू लागले. आजपर्यंत एकाही साहित्य संमेलनाला असे चार किंवा पाच कोटी रुपयांचे ‘अंदाजपत्रक’ कोणी केले नव्हते; एकदा अंदाजपत्रक केल्यावर त्यात वरचेवर बदल कधीच कोणत्याही संमेलनात झाला नव्हता. गेल्या वर्षी उस्मानाबादला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला एक कोटीच्या आसपासचा अंदाज आम्ही केला होता. खर्चही एका कोटीच्या आसपासच झाला. सर्व पाहुणे हॉटेलांमधून उतरविले होते. अपवादात्मक उदाहरण सोडले तर कोणाची गैरसोय झाल्याची तक्रार माझ्यापर्यंत पोहचलेली नाही. उस्मानाबाद लहान गाव होते असे मानले आणि तिथल्यापेक्षा अधिक चांगली व्यवस्था केली तर नाशिकला तेवढ्याच मोठ्या संमेलनासाठी खर्च फार तर दीडपट, फारच झाले तर दुप्पट होऊ शकतो. मग एवढ्या निधीची गरज काय असा प्रश्न मला पडला. मी अस्वस्थ झालो. स्वागताध्यक्ष श्री. छगन भुजबळ निधी जमा करू शकतात; पण फार वेळ देऊ शकत नसल्यामुळे कामाच्या

प्रमाणात व कामाच्या दर्जानुसार निधीचा खर्च होतो की नाही यावर लक्ष ठेवू शकत नाही. म्हणून कामे देण्याची पद्धत एकहाती असण्याऐवजी त्यांनी ती योग्य व्यक्तींवर व ती बहुहाती सोपवावी. कारण स्वागताध्यक्ष म्हणून ती त्यांची जबाबदारी आहे. संमेलनाचे सर्व व्यवहार नीट नेटके झाले तर श्रेय नाशिककरांना मिळेल पण चुकीचे व्यवहार झाले तर स्वागताध्यक्ष म्हणून श्री. छगन भुजबळांच्या नावावर / नावानेच फक्त चर्चा होईल. असे होणे चुकीचे आहे म्हणून मी त्यांची समक्ष भेट मागितली. आमच्या दोघांच्या भेटीची वेळही त्यांनी दिली. पण मी पोहचण्याआधीच स्वागताध्यक्ष श्री. छगन भुजबळ यांच्याकडे आमच्यात - (जे चालले होते, - ज्याच्यासंबंधी लोक तक्रारवजा बोलत होते, - वर्तमानपत्रे विरोधात लिहायला लागली होती) - त्यासंबंधी चर्चाच होऊ नये, आम्हा दोघांना बोलताच येऊ नये यासाठी लोकहितवादी मंडळाने नाशिक शहरातील काही वजनदार लोक आधीच आणून बसविले होते. त्यामुळे तिथे जमलेल्या २०-२५ जणांच्या साक्षीने आमची भेट झाली. पण ज्या निधी संकलनाच्या, दररोज वाढत जाणाऱ्या अंदाजपत्रकाच्या, जमा-खर्चाच्या प्रश्नांवर मला त्यांच्याशी स्पष्टपणे बोलायचे होते, एकहाती व्यवहाराचे विकेंद्रीकरण, बहुहातीकरण करण्याच्या व वाढत जाणाऱ्या अंदाजपत्रकावर आणि त्या अनुषंगाने पाय फुटण्याची शक्यता असणाऱ्या अवास्तव व अनाकलनीय खर्चाच्या प्रश्नांवर बोलायचे होते, ते राहून गेले. दुसऱ्या दिवशी स्वत: स्वागताध्यक्ष श्री. छगन भुजबळ यांनाच 'कोरोना' झाल्याचा 'लघुसंदेश' मला आला. पुढे कोरोना झपाट्याने वाढत गेला आणि पुढील पंधरा दिवसांनंतर साहित्य संमेलनच स्थगित करावे लागले. ज्या तारखांना हे संमेलन घेण्याचे ठरविले होते तोपर्यंत नाशिक शहराने कोरोना संकटाच्या उपद्रवाने रौद्र रूप धारण केले. त्यामुळे या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने भविष्यात निधीवरून संभवू शकणाऱ्या चर्चेलाही कारण मिळण्याची शक्यता मावळली आणि सूक्ष्म नजरेच्या जागरूक नाशिककरांच्या तोंडी व लेखी तक्रारींतून माझी व साहित्य महामंडळाची सुटका झाली.

• • •

साहित्य संमेलन हे रसिक-वाचकांचे म्हणजे लोकांचे असते. साहित्य महामंडळ निरनिराळ्या ठिकाणी सामाजिक कार्य करणाऱ्या, समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींच्या साहाय्याने रसिक-वाचकांसाठी मराठी भाषेचा व मराठी

साहित्याचा हा उत्सव साजरा करीत असते. समाजात वजन असलेल्या व्यक्ती आपला वेळ देऊन मराठी भाषेचा हा उत्सव एखाद्या संस्थेच्या साहाय्याने आयोजित करीत असतात. इथे उलटेही म्हणता येईल; ते असे की, एखादी संस्था समाजात वजन असणाऱ्या व्यक्तीच्या साहाय्याने मराठी भाषेचा हा उत्सव साजरा करीत असते. काही वेळा पाच-दहाजण एकत्र येऊन आपल्या गावाच्या / शहराच्या मदतीने हे कार्य करीत असतात. याचा अर्थ साहित्य संमेलनाच्या नियोजनात मुख्य महत्त्व लोकांना असते. लोकसहभागामुळे व लोकसहभागावर साहित्य संमेलनाचे 'यश' अवलंबून असते. निधिसंकलनापासून लहान सहान कामांत नेहमीच 'लोक' हा घटक महत्त्वाचा असतो. **समाजात आपल्या शब्दाला वजन असणारी व्यक्ती नियोजनाच्या बाजूने साहित्य संमेलनाचे सर्व प्रकारचे नेतृत्व करीत असते.** यात निधिसंकलनाला असाधारण महत्त्वाचे स्थान असते. निरनिराळ्या संस्था, बँका, उद्योजक, कंत्राटदार, व्यापारी, अधिकारी, नोकरदार, रसिक, वाचक आणि सामान्य नागरिक हे अशा उपक्रमांना ऐतपतीनुसार 'देणगी' रूपात किंवा 'स्वागत शुल्क' रूपात मदत करीत असतात. **लोकांच्या भाषेचे हे साहित्य संमेलन असल्यामुळे महाराष्ट्राचे लोककल्याणकारी सरकारही आपणहून कशाचीही अपेक्षा न करता खर्चातील आपला वाटा उचलत असते; त्यासाठी साहित्य संमेलनाला आर्थिक मदत करीत असते.** नाशिकला दिलेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठीही निमंत्रक संस्थेकडून व स्वागतमंडळाकडून साहित्य महामंडळाची लोकसहभागाबद्दल व लोकवर्गणीबाबत हीच अपेक्षा होती. साहित्य संमेलन देताना साहित्य महामंडळाने निमंत्रक संस्थेच्या अध्यक्षांकडे व त्यांच्या सहकाऱ्यांकडे हीच अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु साहित्य महामंडळाने केलेली सूचना निमंत्रक संस्थेने, स्वागतमंडळाने दुर्दैवाने लक्षात घेतली नाही. लोकांकडे, लोकवर्गणीकडे, लोकसहभागाकडे त्यांनी पुरेसे लक्ष दिले नाही. त्यांनी निधिसंकलनात ज्या घटकाकडे अधिक लक्ष दिले तो घटक **'लोक'** या **'संज्ञेत'** येत नाही. त्यामुळे साहित्य महामंडळाच्या मूळ उद्देशाला व धोरणालाच बाधा येते. एका फटक्यात जास्त निधी जमा होतो म्हणून त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आमदारांशी बोलून 'आमदार निधी'तून संमेलनासाठी मोठी रक्कम मिळविली. परंतु **'आमदार निधी' हा काही आमदारांचा स्वत:चा पैसा नसतो. तो त्यांनी त्यांच्या वैयक्तिक कमाईतून जमा केलेला नसतो. तो महाराष्ट्र सरकारचाच पैसा असतो.**

**महाराष्ट्र सरकार प्रत्येक आमदाराला आपापल्या मतदारसंघात छोटी मोठी सार्वजनिक हिताची कामे करावीत म्हणून असा ठरावीक निधी मंजूर करीत असते. अशा कामांसाठी सरकारने प्रत्येक आमदाराला मंजूर केलेला निधी म्हणजेच आमदार निधी. हा निधी आमदारांच्या हातात कधीच दिला जात नसतो.** प्रत्यक्ष व्यवहारात काय घडते हे सर्वश्रुत असले तरी या निधीवर, खरे पाहता मतदारसंघातील जनतेचाच, त्यांच्यासाठी करावयाच्या छोट्या मोठ्या कामांचाच अधिकार असतो. अशा कामांना सरकार या निधीतील रकमेशिवाय दुसऱ्या कोणत्याच नावाने वेगळी, जास्तीची रक्कम देत नसते. **आमदारांच्या निधीतून साहित्य संमेलनाला देऊ केलेले किंवा दिलेले पैसे याला लोकवर्गणी म्हणता येत नाही.** आमदारांच्या ह्या कृतीलाही लोकसहभाग असे म्हणता येणार नाही. त्यांना स्वत:हून या संमेलनाला आर्थिक साहाय्य करायचेच असेल तर ते त्यांना या निधीशिवाय स्वतंत्रपणे करता येऊ शकते. साहित्य संमेलन तशी कधीच कोणावर सक्ती करीत नसते. जे देतील त्यांची मदत घ्यायची, जे देणार नाहीत पण त्यांना सहभागी व्हायचे आहे त्यांचेही साहित्य संमेलनात रसिक / कार्यकर्ते म्हणून स्वागत करायचे असे साहित्य संमेलनाचे धोरण परंपरेनेच कायम केलेले आहे. म्हणून तर आज जवळपास दीडशे वर्षे होत आली तरी साहित्य संमेलनाचे महत्त्व आणि स्थान टिकून आहे. किंबहुना वरचेवर ते वाढतेच आहे, याचे कारण सर्वार्थाने, सर्वच बाबतीतला लोकसहभाग हेच आहे.

**आमदार निधी हा सरकारचा पैसा आहे. हा पैसा आणि सरकारने दिलेले / देऊ केलेले पन्नास लाख रुपयांचे अनुदान मिळून जवळपास दीड कोटी रुपये होतात. दीड कोटी रुपयात उत्तम दर्जाचे साहित्य संमेलन होऊ शकते. मात्र हा सर्व निधी महाराष्ट्र सरकारचा असल्यामुळे ते महाराष्ट्र सरकारचे साहित्य संमेलन होईल. कारण एका अर्थाने सर्व खर्च सरकारच करीत असल्यामुळे सरकारच या संमेलनाचे यजमान राहील. त्यासाठी लोकहितवादी मंडळाची व नाशिककरांची गरजच उरणार नाही. मग साहित्य संमेलनही लोकांचे, नाशिककरांचे, लोकहितवादी मंडळाचे होणार नाही. या संमेलनात 'लोक' फक्त सरकारच्या संमेलनाचे 'श्रोते' राहतील. लोकांच्या सहभागातून निधी जमा केलेला नसल्यामुळे लोक म्हणजे नाशिककर आपलं 'सत्त्व', 'स्वत्व' आणि 'सार्वभौमत्व' हरवून बसतील. नाशिककरांना हे**

**चालेल का? चालणार नसेल तर आमदार निधी साहित्य संमेलनासाठी वापरता कामा नये. नाशिक शहरातील व जिल्ह्यातील शिक्षण व इतर संस्था, कारखाने, बँका, उद्योजक, कंत्राटदार, हॉटेलमालक, व्यापारी, सरकारी अधिकारी, कर्मचारी, नोकरवर्ग, लेखक, रसिक व सामान्य लोक यांनी आपापल्या ऐपतीनुसार स्वागताध्यक्ष श्री. छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली 'निधी' जमा केला पाहिजे; निधी दिला पाहिजे. तो नेटकेपणाने, योग्य पद्धतीने कसा खर्च होईल ते पाहिले पाहिजे. कोणी 'एकतंत्री' कारभार करत असेल तर त्याला त्यापासून रोखले पाहिजे; ऐकत नसेल तर बाजूला केले पाहिजे; तरच नाशिकचे ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दोषरहित करता येईल; ते नाशिककरांचे होईल.** अर्थात कोरोनाच्या संकटाने तशी संधी आपणा सर्वांना दिली तरच! नसता हे संमेलन या जीवघेण्या संकटामुळे रद्द होण्याचीच शक्यता जास्त!

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा मराठी समाजाच्या आस्थेचा व आनंदाचा सर्वोच्च सोहळा आहे. कालौघात त्यात गरजेनुसार इष्ट ते बदल झाले; समाजाच्या गरजेनुसार भविष्यातही होत राहतील; ते आवश्यकही आहेत. पण या सोहळ्याला कोणी आपल्या सोयीसाठी व स्वार्थासाठी वापरू पाहत असेल, चुकीचे वळण देण्याचा प्रयत्न करत असेल तर भिडेला बळी न पडता त्याला अटकाव केला पाहिजे या कर्तव्यभावनेने व पोटतिडिकेने साहित्य महामंडळाचा अध्यक्ष म्हणून मला हे लिहावे लागले. यात कोणावर आरोप / टीका करणे हा हेतू नाही; हे समजून घेतले म्हणजे पुरे!

स्थळ : औरंगाबाद — अध्यक्ष
दिनांक : २६ मार्च २०२१ — अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

# एकविसाव्या शतकातील स्त्रियांची कविता

**- डॉ. पी. विठ्ठल**

एकविसाव्या शतकात म्हणजे साधारण दोन हजार नंतर लिहिल्या गेलेल्या स्त्रियांच्या कवितेचा विचार करताना या काळाची पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. या काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत महत्त्वाच्या अशा घडामोडी घडलेल्या आहेत. या प्रत्येक घडामोडींचा आपल्या जगण्याशी प्रत्यक्ष संबंध आलेला आहेच असे नाही, परंतु तरीही प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे 'काळ' हा लिहिणाऱ्या माणसाला प्रभावित करत असतोच. अगदीच राजकीय वगैरे घडामोडी बाजूला ठेवल्या तरी मागच्या दोन दशकात जगभरात माहिती आणि तंत्रज्ञानासह कितीतरी क्षेत्रात विस्मयकारी बदल झाले आहेत. या सगळ्या बदलांचा स्त्रियांच्या जगण्यावर दूरगामी परिणाम झाला आहे. आपल्या पारंपरिक जगण्यालाही या काळाने प्रचंड प्रभावित केले आहे. १९९० नंतर प्रामुख्याने आपल्या चर्चाविश्वात दाखल झालेल्या 'जागतिकीकरण' या घटनेने अर्थव्यवस्थेसकट आपल्या समग्र जगण्याला बाधित केले आहे. विशेष म्हणजे या काळात सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग कमालीचा वाढला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि माहिती तंत्रज्ञानामुळे नोकरी, व्यवसाय आणि एकूणच रोजगाराच्या संधीत झालेली वाढ हे या काळाचे वैशिष्ट्य आहे. या काळात खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या जगण्याचे अवकाश खुले झाले आणि तिच्या क्षमतांचा विस्तार झाला आहे. नवी संपर्कमाध्यमे याच काळात आपल्या जगण्याचा भाग झाली. आर्थिक बदलाने जीवनमानाचा उंचावलेला स्तर ही एक बाजू या काळात प्रकर्षाने दिसत असली तरी स्त्रियांचे प्रश्न, त्यांचे शोषण, त्यांच्याविषयीचे पारंपरिक पूर्वग्रह, त्यांचे वस्तूकरण, हिंसाचार, बलात्कार, कौटुंबिक कलहातून आणि अन्य कारणांमुळे होणारा अत्याचार इ. खूप नकारात्मक बाबी या काळात घडल्या आहेत. आणि भोवतालात उपभोग्य वस्तूंच्या बाजारपेठा गजबजल्या आहेत. आणि या प्रत्येक बाजारपेठांना एक 'स्त्री' हवी आहे.

आर्थिक पुनर्रचनेची प्रक्रिया गतिमान होत असताना स्त्रियांच्या कौटुंबिक वा सामाजिक स्थितीत मोठे परिवर्तन घडले, असे दिसत असले तरी तिच्या

दैनंदिन जगण्यात फार फरक पडलेला आहे, असे म्हणता येत नाही. विशेषत: भौतिक प्रगतीची अनेकानेक दालने खुली होत असताना स्त्रियांच्या शोषणाच्या, लैंगिक छळाच्या घटना थांबलेल्या नाहीत. उलट मोठ्या प्रमाणात त्यात वाढ झाली असल्याचेच एक नकारात्मक चित्र आहे. सिनेमा, नाटक, टी. व्ही., जाहिरातीचे क्षेत्र असो की, युट्युबसह अस्तित्वात आलेले मनोरंजनाचे नवे प्लॅटफॉर्म असोत- या क्षेत्रात स्त्रियांचा वावर प्रचंड वाढल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. यामागचे बाजारकेंद्री अर्थकारण लक्षात घ्यायला हवे. लैंगिक गोष्टींचा विचार करून किंवा मार्केट व्हॅल्यू लक्षात घेवून तिचे – तिच्याही नकळत वस्तुरूपीकरण केले जाते, ही बाब लक्षात येऊ नये इतक्या सहजतेने घडत आहे. नव्या शतकातला तिचा अस्तित्वासाठीचा संघर्ष अद्यापही कायम आहे.. विविध स्वरूपाच्या सामाजिक स्तराचा विचार केला तर हे चित्र अधिकच निराशाजनक दिसते. म्हणजे आपल्या सामाजिक क्षेत्राचा कितीही विकास झालेला असला किंवा जगण्याचे नवे प्रारूप आकाराला आलेले असले तरी पुरुषांच्या वर्चस्ववादी धारणांचे हिंसक दबाव कायम आहेत. शिक्षण वा तत्सम आधुनिक विचारांचाही प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला असला तरी व्यक्तिगत जीवनातल्या कोणत्याही आवडीनिवडीचे स्वातंत्र्य इथल्या व्यवस्थेने तिला बहाल केलेले नाहीत, हे वास्तव नाकारता येत नाही. अजूनही स्त्री ही कौटुंबिक जबाबदारीचा अपरिहार्य घटक समजली जाते. धर्म आणि रूढी परंपरांचे ओझे तिला दूर करता आलेले नाहीत. मागच्या पाच- पंचवीस वर्षात स्त्रीवादाचा आवाज अधिक प्रखर झाला हे खरे आहे, मात्र या आवाजाचे क्षेत्र मर्यादित आहे. ते व्यापक व्हायला आणखी मोठा काळ जावू द्यावा लागणार आहे. त्याशिवाय स्त्रियांच्या जगण्याच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या चौकटी ओलांडता येणार नाहीत. निर्भत्सनेची शिवराळ भाषा थांबवता येणार नाही. काळ बदलला म्हणजे एकूणच सामाजिक, सांस्कृतिक प्रारूप बदलते असे समजण्याचे कारण नाही. वर्ष किंवा शतक बदलले तरी सामाजिक दैनंदिनीची पाने फडफडत राहतात. व्यक्तीचा आणि मूल्याचा संकोच होत राहतो.

२००० ते २०२० हा काळाचा एक प्रदीर्घ आणि प्रागतिक टप्पा भासत असला तरी या टप्प्यात रीती रिवाजांचे, रूढी परंपरांचे, भ्रामक समजूतींचे, शोषणाचे, प्रतिगामी संकल्पनांचे, जाती-धर्माचे, श्रद्धा-अंधश्रद्धांचे, हिंसेचे,

वर्चस्वाचे, विसंवादाचे, राजकारणाचे, विविध विचारधारांचे कितीतरी समकालीन आवाज एकवटलेले आहेत. आज लिहिणाऱ्या स्त्रियांच्या कवितेत हे आवाज येतात का? येत असतील तर त्याचे स्वरूप कसे आहे? म्हणजे हा आवाज स्पष्ट आहे की क्षीण? हा आवाज थेट आहे की प्रतिकात्मक? जे आजचे वास्तव आहे त्या वास्तवाला आजची स्त्री कविता भिडते की ती पारंपरिक स्वरूपाच्या भावकवितेतच गुंतलेली आहे? सौंदर्यानुभूतीचे दर्शन घडवते की समाजमनाची स्पंदने टिपते? 'मी-तू'च्या आवर्तनातच फिरते, की स्त्री संवेदनेचे नवे प्रश्न समोर ठेवून व्यवस्था बदलाची मागणी करते. असे कितीतरी प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. अर्थात या सर्वच प्रश्नांची उत्तरे शोधणे किंवा स्त्रियांच्या कवितेतून त्याचा अन्वयार्थ लावणे हे सोपे नाही. परंतु या वाचनातून किमान काही निष्कर्षापर्यंत नक्कीच जाता येते.

२००० नंतर म्हणजे मागच्या किमान वीस वर्षात मराठीत शेकडो कवितासंग्रह प्रकाशित झालेले असले आणि त्यात कवयित्रींचीही संख्या लक्षणीय असली तरी दखलपात्र नावे मात्र फारशी नाहीत. ज्या कवयित्री १९८०-१९९० पासून किंवा त्यापूर्वीपासून कवितालेखन करत आहेत, अशा अनेक कवयित्रींचे लेखन आजही सुरू आहे. शिवाय दरवर्षी नव्या कवयित्रींचे काही आश्वासक संग्रहही नव्याने दाखल होत आहेत. या काळात मोठ्या संख्येने कविता लिहिली गेली असली तरी कवितेच्या प्रस्थापित रूपात किंवा सामाजिक अवकाशात फार व्यापक काहीतरी घडले आहे असे मात्र म्हणता येत नाही. अकादमी किंवा चार सहा मानाच्या पुरस्काराच्या पलीकडे स्त्रियांच्या कवितेने मराठीची कक्षा भेदल्याचे चित्र नाही. अर्थात हे एकूणच मराठी कवितेच्या बाबतीतही म्हणता येईल. कोणतीही चांगली निर्मिती एकाच भाषेत अडकून पडत नाही. ती वैश्विक होते. पण अशी वैश्विक कविता लिहिली गेली आहे, असे म्हणता येत नाही. तशी क्षमता असलेल्या कवयित्री मराठीत नक्कीच आहेत. त्यांचे अनुभव, त्यांची जीवनदृष्टीही वैश्विक आहे, पण त्यांची अभिव्यक्ती मात्र अजूनतरी मर्यादित आहे.

आजची स्त्री कविता खूप वैशिष्ट्यपूर्ण आहे. विविध सामाजिक स्तरातल्या स्त्रिया लेखन करत असल्यामुळेही एक नवी संवेदनशीलता मराठी कवितेत पहावयास मिळते. वेदिका कुमारस्वामी किंवा दिशा पिंकी शेख अशा काही प्रातिनिधिक नावांचा विचार यासंदर्भात करता येईल. अर्थात निर्मितीची मोठी

क्षमता असलेल्या, पण अद्यापही स्वत:च्या लिहिण्याला गतिमान करू न शकलेल्या अनेक कवयित्री आहेतच. समाजमाध्यमानेही (विशेषत: फेसबुक, व्हॉट्सअप आणि युट्युब) कवितेच्या आणि एकूणच साहित्याच्या कक्षा अधिक विस्तारल्या आहेत. या माध्यमाकडेही आता गांभीर्याने बघायला हवे. या माध्यमाला सरसकट उथळ म्हणून चालणार नाही. इथेही एक स्वतंत्रपणे लिहिणारा वर्ग आहे आणि येथील आविष्काराला तितक्याच आस्थेने बरीवाईट दाद देणारा वाचकही आहे. याचा अर्थ असा की, आता माध्यमामुळे विस्तारत चाललेल्या अशा क्षेत्राचाही विचार करावा लागणारच आहे. येथील लेखन भलेही फार निर्दोष नसेल, पण तेसुद्धा महत्त्वाचे आहे. कारण येथे समकालीन समाज, संस्कृती आणि एकूणच जीवनव्यवहाराचे तीव्र पडसाद उमटत असतात.

एका शतकातून दुसऱ्या शतकातील प्रवेश ही काही आखीव रेखीव प्रक्रिया नसते. काळ आपल्या वेगाने धावत असतो आणि आपण आपल्या सोयीने दिवसरात्रीचा अन्वयार्थ लावत बसतो. म्हणजे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लेखन करणाऱ्या अनेक कवयित्रींचे २००० नंतरही लेखन सुरू आहे. सुहासिनी इर्लेकर यांच्यापासून ते रजनी परुळेकर, प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, मलिका अमर शेख, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, नीलिमा गुंडी, अंजली कुलकर्णी, आसावरी काकडे, शैला सायनाकर, सुमती लांडे, माया पंडित, अनुपमा उजगरे, नीरजा, प्रज्ञा दया पवार, वृषाली किन्हाळकर, ललिता गादगे, सिसिलिया कार्व्हालो यांच्यापर्यंत अनेक कवयित्रींच्या कविता या काळात प्रकाशित झाल्या आहेत. प्रारंभीच्या काळी आत्मनिष्ठ, स्मृतीसंवेदनेची कविता लिहिणाऱ्या कवयित्रींच्या कविता नंतरच्या काळात मात्र अधिक व्यापक झालेल्या दिसतात. १९७०-८० च्या दशकात लेखन करणाऱ्या कवयित्रींच्या जीवनजाणिवा प्रामुख्याने मध्यमवर्गीय भावचित्रे रेखाटणाऱ्या होत्या. आधीच्या पिढीतल्या इंदिरा संत, शांता शेळके वगैरे कवयित्रींचा थोडाफार प्रभाव नक्कीच होता. परंतु उपरोलिखित कवयित्रींनी मात्र अनुभूतीचे, आशयाचे नवे आविष्कार कवितेत आणले. सर्जनाच्या शक्यता तपासून पहिल्या. स्त्रियांच्या पृष्ठस्तरीय जगण्याला त्यांनी व्यापकतेने समजून घेतले. पारंपरिक संकेतांची वाट पुसून अत्यंत प्रगल्भ कविता लिहिली. मलिका अमर शेख, नीरजा, प्रज्ञा दया पवार यांची कविता तर स्त्रीवादाचा एक सर्वोत्तम आविष्कार मानता येईल.

समाजमनातील स्त्री प्रतिमांचा त्यांनी केलेला विचार अनेकार्थाने महत्त्वाचा आहे. पुरुषसत्ताकारणाची चिकित्सा करतानाच त्यांनी स्त्रियांच्या आत्मशोधाचा रस्ता अधिक प्रशस्त केला आहे. पुरुषी सत्तासंघर्ष, लिंगभेद, स्पर्श संवेदनेचे उभे आडवे आयाम, शोषण, हिंसा आणि जातीय धारणांचाही या कवयित्रींनी वेध घेतला आहे. कप्पेबंद स्त्री जगण्याचा या काळात झालेला विचार नात्यांची पुनर्बांधणी करणारा असला तरी शरण जायला नाकारणारा देखील आहे. स्त्रियांच्या स्थितीशील जगण्याला, त्यांना अधिकाधिक जागरूक करणारा देखील आहे. खोट्या स्नेहसंबंधाच्या पायवाटा मोडून वास्तवाची जाणीव करून देणारी ही कविता न्याय हक्काची नवी भाषा बोलते. विवाह किंवा कुटुंबसंस्थातील पारंपरिक चित्रणापेक्षा ती सामाजिक संरचनेतील मूल्यभ्रष्टतेला, विषमतेला खूप गांभीर्याने समजून घेण्याचा प्रयत्न करते. 'बाई' ते 'विवेकी माणूस' हा तिच्या अभिव्यक्तीचा सुंदर प्रवास आहे. विविध स्तरातल्या जीवनानुभवाची ही कविता समकालीन वास्तवाचाही उभा आडवा छेद घेताना दिसते.

काही निवडक कवयित्रींच्या काव्यजाणिवांचा विचार करून या काळातील कविता समजून घेत असताना रजनी परुळेकर हे एक महत्त्वाचे नाव समोर येते. अर्थात अलीकडच्या काळात त्यांचा संग्रह आलेला नसला तरी मराठी कवितेतील त्यांचे योगदान विसरता येण्यासारखे नाही. 'दीर्घ कविता' ते 'पुन्हा दीर्घ कविता' असा पाच संग्रहाचा त्यांचा प्रवास आहे. त्यांच्या पहिल्या संग्रहाविषयी शिरीष पै यांनी लिहिलेय, रजनी परुळेकरांची प्रत्येक कविता म्हणजे एक जिवंत विचार असतो. आपल्या कवितांमधून त्यांनी मानवी मनाचे एक वेगळेच चित्तथरारक दर्शन घडवले आहे. माणसां- माणसांमधील परस्परसंबंध हा रजनी परुळेकरांच्या चिंतनाचा आणखी एक विषय. आशय आणि आविष्कार या दोन्ही दृष्टींनी रजनी परुळेकरांच्या कवितेचा आवाका बराच मोठा, स्फुट कवितेपेक्षा खंडकाव्याला अधिक जवळचा वाटतो.' परुळेकरांचे २००० पूर्वी सुमारे पाच कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. तर नंतरच्या काळात विविध नियतकालिकात त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. कविता-रतीच्या (मार्च -एप्रिल २००९) अंकात त्यांची 'भविष्यात' नावाची एक कविता प्रसिद्ध झालेली आहे. *भविष्यात पायाखाली कोणती जमीन असेल? / जमीन असेल तरी का? / आकाशाची निळी सावली असेल / की ते धाडकन माथ्यावर*

*कोसळेल? भुकेने व्याकूळ झाल्याने / छिद्र पडतील आतड्याला? / राज्याचा अर्थ संकल्प राहो / वैयक्तिक अर्थ संकल्पात / औषधांची तरतूद होईल नाही?'* (पृ. १०) भविष्यकालीन जगण्याचा वेध घेतानाच एका कठोर वास्तवाकडे कवयित्री लक्ष वेधून घेते. कोणत्या तरी विनाशाची चाहूल मनाला लागली तरी आपले जगणे किमान अबाधित राहो, ही भावनाही त्यात आहेच. परुळेकरांच्या कवितेत थोडा उपहास असला तरी वर्तमान वास्तव आणि भविष्यकालीन संभाव्य घटितांची जाणीव करून देणारी ही कविता अंतर्मुख व्हायला भाग पाडते.

परुळेकरांच्या समकालीन असणाऱ्या प्रभा गणोरकर यांचे 'व्यतीत', 'विवर्त' आणि 'व्यामोह' हे तीन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. व्यामोह' हा संग्रह २०१५ साली प्रसिद्ध झाला आहे. 'जगण्याच्या प्रवासात स्त्री म्हणून वाट्याला येणारी दु:खे आणि पुरुषी पर्यावरणाने होणारी छिन्नमानसता या संग्रहात अधिक गहन व प्रभावी होते. या संग्रहातील सगळ्या कविता एका विशाल स्वगताचे रूप घेतात. कारण स्त्रियांचे यातनामय आयुष्य व्यक्त करण्यासाठी स्वगत हे जणू सगळ्यात योग्य असे माध्यम आहे.' असे या कवितेच्या संदर्भात चंद्रकांत पाटील यांनी म्हटलेय. पाटील यांचे हे विधान पुष्कळच प्रातिनिधिक म्हणायला हवे. कारण प्रारंभिक काळात निसर्ग, प्रियकर आणि तत्सम पानाफुलांच्या भावकविता लिहिणाऱ्या कवयित्री नंतरच्या काळात – संग्रहात मात्र भावकवितेचा रूढ परीघ ओलांडून एका व्यापक जीवनदर्शनाकडे वळतात. नातेसंबंधाचा, भाषेचा आणि जगण्याच्या सार्वत्रिक कोलाहलाचा त्या शोध घेतात. निसर्गसंवेदनेत किंवा 'मी -तू' च्या भावनिक उत्कटतेत गुंतलेल्या कवयित्री नंतर मात्र स्वत:च्याच अंत:सृष्टीचा शोध घेताना दिसतात. सौंदर्याचा साक्षात्कार घडवणारी प्रतिभा आपोआपच मागे पडते आणि चिंतनाचा, जाणिवांचा, अभिव्यक्तीचा आयाम बदलत जातो. स्त्रीविशिष्ट अनुभवांसह बदललेल्या जीवनजाणिवा, कृषिसंवेदना, जातीधर्माचे सांस्कृतिक राजकारण आणि एकूणच स्वाभिमानाने जगण्याच्या अर्थपूर्णतेचा शोध त्या घेवू पाहतात.

अनुराधा पाटील या मराठीतील महत्त्वाच्या कवयित्री आहेत. 'दिगंत', 'तरीही' 'दिवसेंदिवस', 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' आणि 'कदाचित अजूनही' हे त्यांचे महत्त्वाचे पाच कवितासंग्रह. 'कदाचित अजुनही' या संग्रहाला

२०१९ या वर्षाचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. प्रतिभासंपन्न कवयित्री ही त्यांची ओळख आहे.' अनुराधाबाईंची कविता मुख्यत्वे स्त्रीविषयक असूनही स्त्रीवादी कवितेशी तिचे फारसे नाते नाही. त्यामुळे स्त्रीवादाचा कमी अधिक आविष्कार करणाऱ्या प्रभा गणोरकर, मलिका अमरशेख, नीरजा, कविता महाजन, प्रज्ञा पवार प्रभृती कवयित्रींपेक्षा त्यांची कविता वेगळी ठरते' हे वसंत पाटणकरांचे (प्रतिष्ठान, जाने ते एप्रिल २०१४, पृ. १६) निरीक्षण मला महत्त्वाचे वाटते. अर्थात अनुराधा पाटील यांची कविता थेट स्त्रीवादी वगैरे नसली तरी स्त्री संवेदनेचा एक अत्यंत तरल आणि प्रभावी आवाज म्हणून त्यांच्या कवितेचा विचार करावा लागतो. माणूस म्हणून जगताना येणाऱ्या अनेक अनुभवांचे, भौतिक आणि मानसिक भावजीवनाचे, कृषीसंस्कृती आणि एकूणच निसर्ग यांच्यात गुंतलेल्या अनोख्या भावविश्वाचे आणि स्त्री म्हणून असलेल्या अनेक द्वैताचे हे उच्चारण आहे. मूल्यहीन काळाविषयीची विदीर्णता या कवितेत आहे. दु:ख हा त्यांच्या कवितेचा अंत:स्वर आहे. म्हणजे सुरूवातीच्या कवितेत जाणवणारी आत्ममग्नता पुढे पुढे बदलत जाऊन 'कदाचित अजुनही' पर्यंत ही कविता वास्तवाच्या अधिक जवळ जाताना दिसते.

अरुणा ढेरे यांचे सहा कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'निळ्या पारदर्शक अंधारात' (२००८) हा त्यांचा अलिकडचा संग्रह. कवितेसह अन्य संशोधनात्मक लेखनही ढेरे यांच्या नावावर आहे. *'हा असा घनदाट पाऊस / आणि खोलवर भिजत चाललेली माती.../ मी झोपावे इथे या खडकाच्या आडोशाने / माझ्या देहावर उगवून यावीत घनदाट अरण्ये / केसांमधून वाहत जाव्यात नद्या आणि श्वासांमधून वारे'* (पृ. १४, निळ्या पारदर्शक अंधारात) अशा चिंतनशील ओळींतून कवयित्री स्वत:च्या । भावस्थितीचे दर्शन घडवते. निसर्गाचे हे विस्तारशील, सृजनशील रूप असले तरी ही निसर्गकविता नाही. अबोध मनाची, रितेपणाची ही एक काव्यात्म संवेदना आहे. जी अनेक कवयित्रींच्या कवितेतही दिसते. अशी आशयसूत्रे आत्मशोधाचा अवकाश खुला करतात. शिवाय स्थळकाळाच्या नातेसंबंधाच्या आणि स्वत:च्या व्यक्तित्वापासून दूर जाऊन आपले अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करतात. अरुणा ढेरे यांच्या कवितेत आधुनिक जाणीव फारसी आढळत नाही. आंतरिक संवादावर त्यांच्या कवितेचा अधिक विश्वास आहे.

मलिका अमर शेख यांची कविता मात्र अत्यंत लक्षवेधी आहे. एका विशिष्ट भूमिकेतून ती लिहिली गेली आहे. 'मला उध्वस्त व्हायचंय' या त्यांच्या विस्फोटक आत्मकथनाने त्यांच्या व्यक्तित्वाची ओळख साहित्य विश्वाला झाली. आत्मकथनातल्या मलिका अमर शेख आणि कवितेतल्या मलिका अमर शेख अशी एक सहज तुलना वाचकमनात होऊ शकते. 'वाळुचा प्रियकर', 'महानगर', 'देहऋतू' आणि 'समग्राच्या डोळा भिडवून' (२००७) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. स्त्रीवादी जाणिवांची एक महत्त्वाची कवयित्री ही त्यांची ओळख आहे. अत्यंत भेदकतेने त्यांनी समाजजीवनाचा नवा अन्वयार्थ लावला. मलिका अमर शेख यांची कविता स्त्रीत्वाचे नवे भान व्यक्त करणारी महत्त्वाची बंडखोर कविता आहे. व्यवस्थानिर्मित स्त्रीप्रतिमांचाही त्यांची कविता विचार करते.

माया पंडित यांनी एका लेखात स्त्रीवादी समीक्षेपुढच्या काही महत्त्वाच्या पेचांचा उल्लेख केला आहे. त्यात त्यांनी म्हटलेय. 'स्त्री म्हणून जगताना येणारे आपल्या दुय्यम ठरवल्या गेलेल्या अस्तित्वाचे राजकीय, सांस्कृतिक स्वभान स्त्रिया आपल्या लेखनातून, भाषेतून कसे व्यक्त करतात? स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील लिंगभेदावर आधारलेल्या विषम चालीरीती, समाज, व्यवहार आणि विचारसरणी यांनी बनवलेली संस्कृती त्या आपल्या अनुभवांमधून कशा पद्धतींनी समजून घेतात, त्यामागचे एकूणच सांस्कृतिक सत्ताकारण त्यांच्या प्रत्ययाला कसे येते आणि त्यांच्या लेखनात त्या या अनुभवांची कोणती प्रतिरूपे मांडतात.' (प्रतिष्ठान, जाने-एप्रिल २०१४, पृ. २९, ३०) हे पेच समोर ठेवून जर आपण स्त्रीवादी दृष्टीने मराठीतील स्त्रीवादी कवितेचा विचार केला तर नीरजा, प्रज्ञा दया पवार आणि कविता महाजन ही तीन नावे ठळकपणे समोर येतात. एकूणच मराठी कवितेचा विचार करताना या तीनही कवयित्रींच्या कवितांचा विचार अपरिहार्य ठरतो, इतके त्यांचे योगदान मौलिक आहे. स्त्रीविषयक जाणिवांची कितीतरी रूपे या कवयित्रींच्या कवितेत दिसतात. लिंगभेदात्मक राजकारण किंवा पुरुष वर्तन व्यवहाराबरोबरच जातीय आणि धार्मिक विषमतेचेही चित्र या कवयित्रींनी साकारले आहे. स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेतानाच 'तिच्या' मनाची कितीतरी आंदोलने या कवयित्रींनी मांडली आहेत.

'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा', 'निरर्थकाचे पक्षी' 'मी माझ्या थारोळ्यात' इत्यादी नीरजा यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. तर 'अंत:स्थ', 'उत्कट जीवघेण्या

धगीवर', 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' 'आरपार लयीत प्राणांतिक', 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' हे प्रज्ञा दया पवार यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कविता महाजन या दिवंगत कवयित्रीने केलेले कवितालेखनही अत्यंत लक्षणीय आहे. 'तत्पुरुष', 'मृगजळीचा मासा', 'धुळीचा आवाज' आणि 'समुद्रच आहे एक विशाल जाळ' हे चार कवितासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. या तीनही कवयित्रींचे वैशिष्ट्य म्हणजे कवितेसह अन्य साहित्यप्रकारात आणि संशोधनातही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. स्त्री केंद्री नवे जग हा त्यांच्या कवितेचा आस्थाविषय आहे. पुरुषरचित मिथकांना नाकारून स्त्रीनिष्ठ जगण्याचा अन्वयार्थ त्या लाऊ पाहतात. या तीनही कवयित्रींची २००० नंतर जी कविता प्रकाशित झाली ती खऱ्या अर्थाने स्त्रीजातीच्या दु:खाला उजागर करणारी आहे. कोणतेही लेखन करताना लेखकाला, कवीला स्वत:चा परिप्रेक्ष्य सापडायला हवा. हा परीप्रेक्ष्य या कवयित्रींना सापडला आहे असे निर्विवाद म्हणता येते. 'स्त्रीशरीराच्या प्रतिमेतून स्त्रीत्वाचा शोध' हा नीरजाच्या कवितेतील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे प्रतिभा कणेकर यांनी (कविता-रती, मार्च, एप्रिल २०१५, पृ. १६) म्हटलेय. *'गर्भाशय समूळ उखडून / भिरकावलं उकिरड्यावर / योनिमार्ग प्रदुषणमुक्त'* ही नीरजांची कविता स्त्रीच्या शरीरभाषेला अधोरेखित तर करतेच पण त्याचवेळी पुरुषसत्ताक सांस्कृतिक परिमाणांनाही झिडकारून लावते. नीरजा यांच्या कवितेत नव्या काळातील अनेक प्रतिमा येतात.

प्रज्ञा पवार यांची कविता पुरुषी अहंकाराचे कोश फाडते. वैयक्तिकतेच्या पलीकडे जाऊन स्त्रीचे जगणे समजून घेणे आणि तिला आंतर्बाह्य बदलू पाहणे हा त्यांच्या कवितेचा विशेष आहे. समष्टीचा विचार त्यांच्या कवितेत सामावलेला आहे. स्वत:च्या कवितेविषयी त्या म्हणतात, 'माझ्या कवितेचा विषय जरी बव्हंशी स्त्रीशी जोडलेला असला तरी असं मला वाटत नाही की मी बाईची कविता लिहिते. स्त्री हे विषम व्यवस्थेचं प्रतिरूप म्हणून माझ्या कवितेत येतं. ते? करेज असतं असं म्हणता येईल. बाईच्या अनुषंगाने येणाऱ्या तिच्या जगण्याचा, स्त्री-पुरुष नातेसंबंधाचा व एकूण मानवी नातेसंबंधाचा उभा आडवा पट पाहत असताना त्यातली मानुषता मात्र हरवलेली, ठायी ठायी विरूप झालेली दिसते. या विरूपतेमध्ये लिंगभेदजन्य विषमतेबरोबरच जात- वर्ग वास्तव, त्याबरोबरच जागतिकीकरणातून येणारे कंगालीकरण बाजारशरणता

आणि व्यक्तीशिवायची बाकीची सर्व मानवी एककं दुय्यम ठरवत जाणं या बाबी कळीची भूमिका बजावत असतात. या भूमिकांचा शोध घेणं, अर्थनिर्णय करणं आणि त्यांच्या विरोधात हस्तक्षेप करणं हे कवितेचं काम आहे असं मी मानते.' लिहित्या माणसाची अशी भूमिका समजून घेतली की, त्यांची कविताही समजून घेता येते. अशी भूमिका घेऊन लिहिणाऱ्या कवयित्रींची संख्या मात्र फार नाही. चारदोन नावे अपवाद असू शकतील.

कविता महाजन या अकाली गेलेल्या कवयित्रीचे चारही कवितासंग्रह २००० नंतरच प्रकाशित झालेले आहेत. 'तत्पुरुष' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. पुरुषांनी निर्माण केलेल्या सांस्कृतिक वर्चस्ववादाला तत्पुरुषमधील कविता आव्हान देते. परंपरा नाकारणारी आणि पुरुषी आधाराच्या कुबड्या फेकून देणाऱ्या स्वाभिमानी स्त्रीचे दर्शन कविता महाजन यांच्या कवितेत घडते. 'धुळीचा आवाज' आणि 'मृगजळीचा मासा' हे त्यांचे संग्रहही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तथापि 'समुद्रच आहे एक विशाल जाळ' ही दीर्घकविता मात्र प्रत्ययकारी अनुभव देणारे चिंतनकाव्यच आहे. सुमारे एक्केचाळीस तकड्यात विभागलेली ही कविता मत्स्यजीवनाचे आणि माणसाच्या जगण्याचेही चित्रण करते. *'मी घुसमटत राहिले विसरून / की स्वप्नांच्या बाहेर एक / स्वच्छ मोकळं वास्तव असतं'* (पृ. ८१) ही केवळ मासोळीची भावना नाही, तर या ओळीला स्त्रियांच्या जगण्याचाही मोठा संदर्भ आहे.

अश्विनी धोंगडे यांचे 'स्त्रीसुक्त', 'अन्वय', 'अपौरुषेय' आणि 'बाई डॉट कॉम' आणि अंजली कुलकर्णी यांचे 'मी एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा', 'संबद्ध', 'बदलत गेलेली सही', 'रात्र दुःख आणि कविता' हे कवितासंग्रह उल्लेखनीय आहेत. *'मी सांगू बघते तुला तळमळून / माझं चरित्र म्हणजे नाही / केवळ माझं शरीर / किंवा त्याचं कथित पावित्र्यही / त्याच्या पलीकडे मी पुष्कळ जगू बघतेय / ते बघ ना जरा'* (बदलत गेलेली सही, पृ. २३) या सांगण्याला अर्थाच्या अनेक मिती आहेत. 'मी जगातली' आणि 'मी माझ्या मनातली' यातून स्त्री दुःखाचा कुलकर्णी यांनी केलेला विचार खूप वेगळा आहे. तर सुजाता महाजन (स्वत:तल्या परस्त्रीच्या शोधात) यांच्या कविता स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेतात. महाजन यांच्या कवितेविषयी नीलकंठ कदम यांनी म्हटलेय, 'कुटुंबसंस्था, त्यातील नाती आणि त्यांची अर्थपूर्णता, महानगरीय

व्यक्तीच्या जगण्यातील संघर्ष, मृत्यूविषयक मूलभूत प्रश्न असे अनेक आशयघटक या कवितांतून आलेले आहेत. वस्तूमात्र भोवतालचा निसर्ग यामधील घटकांना एकमेकांविषयी असलेली आपुलकी आणि माणसामाणसांमधील दुरावा, अंतर अशा विरोधात्मक ताणातून मानवी पराभवाची जाणीव यात व्यक्त झाली आहे. बाईला सर्जनातले पराभव पेलावे लागत असताना तिचे सगळेच एका अपरिहार्य मौनात सामावून जाते. तिचे बघणे आणि तिचे बोलणे निरर्थक बनत जाते. कुठल्याही प्रकारची स्त्रीवादी भूमिका न घेताही या कविता बाईच्या अवस्थांतराचा, दु:खाचा भेदक प्रत्यय देतात.' (लोकसत्ता: २९ मे २०१६) अनेक विरोधात्मक ताणाला ही कविता अंकित करते. तर माया पंडित यांचा तल्खली हा कवितासंग्रह स्त्रियांच्या डोळ्यातल्या कारुण्याच्या डोहाला शब्दबद्ध मीनाक्षी पाटील (इज इट इन युवर डीएनए) यांची कविता महानगरी संवेदन प्रकट करते. आधुनिक वास्तव आणि त्यातून निर्माण झालेले पेच या कवितेत दिसतात. *'फेकता फेकता / सलत राहतं आत आत या साऱ्या पसाऱ्यात कोणत्याही काळात कायमच जाणवणारं / स्वत:चं आऊटडेटेडपण'* (पृ. १५) व्यक्तीची बदललेली जीवनशैली आणि त्यातून आकाराला आलेले 'युज अंड थ्रो'चे समीकरण हाही या काळाचा एक स्वभाव आहे. वस्तूंची निरुपयोगिता आपण समजू शकतो, पण माणसांचेही आऊटडेटेड होत जाणे ही घटना जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात घडत आहे.

गाव आणि महानगरातले आणि या दोन्हींच्या सीमारेषेवरचे विखुरलेले असंख्य अनुभव या काळात लिहिणाऱ्या कवयित्रींच्या कवितेत दिसतात. स्त्री म्हणून असलेली एक अस्वस्थता, असुरक्षितताही जशी या कवयित्रींच्या कवितेत दिसते तशी पारंपरिक वळणाची रोमँटिक वृत्तीही ठळकपणे दिसते. नव्या काळातील स्थित्यंतरे किंवा संपर्कक्रांतीमुळे एकूणच जगण्यात झालेल्या बदलांपर्यंत ही कविता मात्र पूर्णांशाने पोहचलेली नाही. आधीच्या कवयित्रींनी आखून दिलेल्या रस्त्यावरूनच या कवयित्रींचा प्रवास सुरू आहे. भाषेचे, अनुभवाचे वेगळे मानदंड सिद्ध करणारी कविता लिहिली गेलेली नाही. अंजली कुलकर्णी यांचे या संदर्भातील एक निरीक्षण असे आहे. स्त्रियांची कविता ही त्याच त्या स्वदु:खाच्या रिंगणात फिरताना दिसते आहे. आशयदृष्ट्या ही कविता फार पुढे सरकलेली नाही. स्त्रियांच्या जगण्याचा परीघच अजून हवा तितका विस्तारलेला

नसल्याने त्यांच्या अभिव्यक्तिचा परीघही अजून आक्रसलेला, संकुचित आणि सांकेतिकतेला कवटाळून बसलेला आहे.' (अक्षरयात्रा २०१२-१३, पृ. ६८) हे निरीक्षण साधारण सात – आठ वर्षापूर्वीचे आहे. आज काळ बदललेला असला तरी आणि स्त्रियांच्या कवितेला नवे धुमारे फुटत आहेत, असे मान्य केले तरी या निरिक्षणात फार बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. मात्र तरीही ज्यांच्या लेखनाचाच प्रारंभ एकविसाव्या शतकाच्याच आगे मागे झालेला आहे. अशा अनेक नव्या कवयित्रींनी मराठी कवितेला अधिक विस्तृत केले आहे. मागच्या दशक दीड दशकात प्रकाशित झालेली स्त्रियांची कविता ही जीवनानुभवाला शब्दबद्ध करणारी आश्वासक कविता आहे. अर्थात ही संख्या पुष्कळच कमी असली तरी ते गृहीतच आहे. जगभरातल्या सांस्कृतिक घुसळणीचे, कृषिकेंद्रित जगण्याचे, सामाजिक अवहेलनेचे, महानगरी ताण तणावाचे, कार्पोरेट भांडवलशाहीचे, व्हर्चूअल जगण्याचे, समकालीन वास्तवाचे संदर्भ स्त्रियांच्या कवितेत यायला लागले आहेत. मानवी वृत्ती-प्रवृत्तीकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलत आहे.

'सिझर कर म्हणतेय माती' आणि 'धग असेतच आसपास' हे कल्पना दुधाळ यांचे दोन कवितासंग्रह. ग्रामसंस्कृतीच्या गाभ्याशी जोडल्या गेलेल्या शेतकऱ्याचे – स्त्रीचे कष्टप्रद संवेदन अत्यंत प्रभावीपणे कल्पना दुधाळ यांनी साकारले आहे. 'ग्रामीण' म्हणता येईल अशी ही एकमेव कवयित्री आहे. ग्रामीण कवितेतल्या आवर्तनाला दूर सारून नव्या जीवनानुभवांचा आविष्कार ही कविता करते. 'सऱ्या- वरंबे ओढलेल्या रानात दिसायचे आणि माती ग्लोबल झाली असं वाटायचं. असंच एकदा आम्ही हरबरा पेरला आणि त्या रात्री मुसळधार पाऊस पडला. काही हरबरा वाहून गेला... काही मातीत दबल्याने लवकर उगवला नाही. तेव्हा प्रचंड अस्वस्थ वाटू लागलं' ही कवयित्रीच्या निर्मितीची प्रेरणा आहे. या अस्वस्थतेतून या कवितांचा जन्म झाला. केवळ शेती मातीची 'करुण' वर्णने करून ही कविता सहानुभूती मिळवत नाही, तर शेतकऱ्यांचे दु:ख मांडतानाच मुक्त अर्थव्यवस्थेचे परिणाम, बाजारपेठांनी केलेले परकीय वस्तुंचे स्वागत, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शिरकाव – अशा अनेक बदलाची ही कविता नोंद होते. 'सिझर कर म्हणतेच माती' ही एक नवी प्रतिमा आहे. या कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे अकृत्रिम अशी उत्स्फूर्त अभिव्यक्ती. *'चरायला सोडलेल्या*

*गुरांनी / कचऱ्यात घुटमाळणं / आणि गोठ्याला बांधलेलं / गवताचं तोरण डावलून / प्लास्टीकच्या पिशव्यात /काही नवखं खरमरीत शोधणं / म्हणजेच असतं जनावरांचं आधुनिक होणं?'* (धग असतेच आसपास, पृ. ६५) कवयित्रीची विचार करण्याची पद्धती ही अशी वेगळी आहे. तिचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. या प्रश्नाचे ठोस विश्लेषण करायचे म्हटले तर आपल्या गतिमान आणि विनाशी वाटचालीचे वास्तव लक्षात घ्यावे लागेल. गरजेतून आधुनिकता निर्माण होते हे खरे असले तरी ही आधुनिकता आपल्या देशी जगण्याला प्रदूषित करणारी आहे. कल्पना दुधाळ या सगळ्या घटितांकडे खूप गांभीर्याने बघतात. म्हणून त्यांची कविता शेत शिवाराचे सौंदर्य उलगडून दाखवत नाही तर ती तिथल्या कष्टप्रद जगण्याकडे आपले लक्ष वेधून घेते. दुधाळ यांच्याशिवाय अन्य कवयित्रींनी अशा प्रकारे ग्रामीण जगण्याचे मर्म जाणलेले नाही. 'कवितारती'च्या मे, जून २०१८ च्या अंकात प्रसिद्ध झालेली मंगल देसाई यांची 'पळवाट' ही कविता अस्सल ग्रामीण बोलीचा आणि कृषिनिष्ठ संवेदनेचा आविष्कार आहे. तथापि या कवयित्रीचे अन्य लेखन माझ्या वाचनात नाही.

एकीकडे नव्या संवेदनेची कविता लिहिली जात असताना किंवा कवितेचे समकालीन पर्यावरण वेगाने बदलत असताना अभिव्यक्तीच्या आंतरिक गरजेतून निर्माण झालेली चांगली कविताही या काळात लिहिली गेली आहे. कविता मुरुमकर, प्रिया धारूरकर या कवयित्रींचा यासंदर्भात उल्लेख करता येईल. आत्मनिष्ठ असूनही त्यांच्या कवितेचे क्षेत्र आशयाच्या दृष्टीने अत्यंत विस्तृत आहे. म्हणजे भोवतालात स्त्री हक्काच्या जाणिवेची, सर्वंकष शोषणाचा निषेध करणारी, सामाजिक संरचनेची चिकित्सा करणारी, स्त्रीमुक्तीचा उद्घोष करणारी, राजकीय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करू पाहणारी, स्वातंत्र्य आणि समतेची आग्रही मागणी करणारी, पुरुषी व्यवस्थेवर बोलणारी कविता लिहिली जात असताना या कवयित्री मात्र स्वत:च्याच जगण्याचे उत्खनन करू पाहतात. म्हणजे शोषण, स्वातंत्र्य, समता हा विचार त्यांच्याही कवितेत आहेच; पण शरीर, भावनांच्या पलीकडे जावून त्या आपल्या जगण्याचा नवा अन्वयार्थ लावू पाहतात. नात्यांची पुनर्बांधणी करू पाहतात. आधुनिक स्त्रियांचा पेच त्यांच्याही कवितेत आहेच; पण तो प्रतिकात्मक. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या कवयित्री स्त्रीच्या अथांग, विराट अनुभवाला स्पर्श करतात आणि वाचकाला नवी अनुभूती देतात.

'मीराधा' हा मुरुमकर यांचा संग्रह प्रसिद्ध आहे. तर 'उसवायचाय तुझा पाषाण' हा संग्रह प्रकाशनाधीन आहे. 'विदेही' आणि 'अंग भरून वाहणाऱ्या पान्ह्यातून' हे धारूरकर यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. या दोन्ही कवयित्रींच्या कवितेत कितीतरी भावावस्थांची चित्रे आपल्याला पाहावयाला मिळतात. कोणत्याही चांगल्या कवितेसाठी अनुभव संपन्नतेची आणि आपल्याला जे सांगायचे आहे, त्याविषयीच्या चिंतनाची, भूमिकेची गरज असते. ही भूमिका, हे चिंतन या कवयित्रींच्या लेखनातून जाणवते. *'पाषाणपुरुषा / ये तुझ्या पंढरीचे सगळे पाश सोडून / जिवंत हाडामासांच्या माणसासारखा / ये दुःखाचा जरीटोप घालून / पहा हे मांडून ठेवलेलं प्रश्नोपनिषद / वाच, मनन कर नि जा सामोरा'* (उसवायचाय तुझा पाषाण) हा मुरुमकारांच्या कवितेतला विठ्ठलाशी असलेला आत्मसंवाद असो किंवा *'बाईनं म्हणावीच का दरवेळी / बाईपणाचीच कविता / गाव्यात का तिनं / दुःखाच्या ओव्या- विरहाचं गाणं?'* हा धारूरकर यांनी व्यवस्थेला विचारलेला प्रश्न असो- बाईपणाच्या समाजरचित संकल्पनांचाच विचार या कवितेतून येतो. स्त्री संवेदनेची, समाजजीवनाची अनेक अंगे या कवितेत आहेत. येथे ईश्वरीय आस्था आहे. श्रद्धा आहे. त्याविषयी उत्कट घालमेल आहे. संस्कारी मन आहे. हे मन आपल्या आंतरिक अवकाशातल्या अस्वस्थतेने ढवळून निघाले आहे.

परंपरा आणि आधुनिकतेच्या सीमारेषेवरील स्त्रियांचे जे जगणे असते त्या जगण्याचा उच्चार करणारी कविता 'कोरड्या मातीचे ओलेपण' या माधवी गोरे-मुठाळ यांच्या संग्रहात भेटते. माधवी यांची ही कविता वरवर आत्मनिष्ठ वाटत असली तरी तिला खूप सारे सामाजिक संदर्भ व्यापून आहेत. ही कविता कोणतेही संसारिक तत्त्वज्ञान सांगत नाही किंवा स्त्रीची दुबळी व्यक्तिरेखाही साकार करीत नाही; मात्र इतिहास, पुराणापासून स्त्रियांविषयीचा जो एक परंपरागत दृष्टिकोन समाजात रूढ आहे, त्याला काहीअंशी छेद देण्याचा प्रयत्न ही कविता करते. आधुनिक स्त्रीची बहुस्तरीय कुचंबना मांडणारी ही कविता म्हणूनच मला अधिक महत्त्वाची वाटते.

समाजसंस्कृतीच्या न दिसणाऱ्या आचारसंहितेचा संयत उच्चार या काळातल्या अनेक कवयित्रीच्या कवितेत पहावयास मिळतो. संजीवनी तडेगावकर (फुटवे, संदर्भासहित), वंदना महाजन (वादळवाट), आश्लेषा महाजन (स्वसंवेद्य, रक्तचंदन), उर्मिला राघवेंद्र (चांदणचुरा, पर्णपाचू, पर्जन्यास्त्र, विठोबा इ.) प्रतिभा सराफ

(मात्र एक नाही, मातीत पूर्णत्वानं रुजण्यापूर्वी), रंजन कंधारकर (स्वधा), माधवी (कोरड्या मातीचे ओलेपण), माधुरी मरकड (रिंगण), वर्षा ढोके-सय्यद (अनागोंदीच्या नोंदी) इ. कवयित्रींनी स्पष्ट- अस्पष्टपणे आपल्या आंतरिक चरित्राचाच पट उभा केला आहे. यात प्रेमभावना आहे. जगण्याचे हळवे आणि खिन्न क्षण आहेत. मिथकांच्या रूढ प्रतिमा आहेत. तपशिलांची लयबद्ध मांडणी आहे. समुद्र, निसर्ग आणि पाऊस पाण्यासह सृष्टीची अनंत रूपे त्यांच्या कवितेत आहेत.

एकीकडे अशी उत्कट भावनाप्रधान कविता लिहिली जात असतानाच उषाकिरण आत्राम (म्होरकी, लेखणीच्या तलवारी), कुसुम आलाम (रान आसवांचे तळे, रानपाखरांची माय) या कवयित्रींनी आदिवासी समाज आणि संस्कृतीचे वास्तव समोर ठेवले आहे. आदिवासींचे नैसर्गिक हक्क आणि एकूणच पर्यावरणाविषयी त्या बोलतात. जल, जंगल आणि जमीन हे त्यांच्या चिंतनाचे क्षेत्र आहे. तर ज्योती लांजेवार, प्रज्ञा दया पवार, प्रतिभा राजानंद, संध्या रंगारी, श्यामल गरुड, छाया कोरेगावकर यांच्या कवितेला आंबेडकरी विचाराचा एक मोठा वारसा आहे. त्यामुळे त्यांची कविता वेगळेपणाचा प्रत्यय वाचकाला देते. ही कविता नाजूक, हळवा किंवा भावनात्मक अनुभव देत नाही तर या कविता सामाजिक, राजकीय घटीतावरही प्रखर भाष्य करतात. स्त्रीवादी कवितेचे चिंतनशील रूप या कवयित्रींच्या कवितेतून पाहायला मिळते. ‘आभाळ पेलताना’ या शीर्षकाचा एक प्रातिनिधिक कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. हिरा बनसोडे, उषा अंभोरे, उर्मिला पवार, कुसुम गांगुर्डे, हिरा पवार, संजीवनी राजगुरू, आशालता कांबळे, छाया कोरगावकर, शारदा नवले, लता इंगळे, प्रज्ञा दया पवार, श्यामल गरुड, अभिनया रोकडे, दीपा राजवर्धन, वर्षा मारुती भिसे आणि कविता मोरवणकर या कवयित्रींच्या कविता या संग्रहात समाविष्ट आहेत. या सर्व कवयित्री आंबेडकरी प्रेरणेतन लेखन करणाऱ्या आहेत. शिवाय अपर्णा लांजेवार-बोस यांनी ज्योती लांजेवार यांच्या ‘वादळ उठणार आहे’ या संग्रहाचे केलेले संपादनही वैशिष्ट्यपूर्ण आहे. बुद्ध, फुले, मार्क्स, आंबेडकर हा त्यांच्या कवितेचा गाभा आहे. स्वातंत्र्य आणि बंधूतेच्या वैचारिक प्रवाहाचे संगोपन करणारी त्यांची कविता आहे. त्यांच्या पश्चात हा संग्रह प्रसिद्ध झाला आहे.

वेदिका कुमारस्वामी यांची ‘गावनवरी’ ही एक दीर्घकविताच आहे. या

कवितेत बाह्य आणि आंतरिक जगातला संघर्ष आहे. काळ बदलला. खुलेपणा आला. वगैरे चर्चेत छान वाटत असले तरी या संग्रहाच्या मनोगतात कवयित्रीने लिहिलेय, 'पुस्तक छापावं की नाही, असा मनात संभ्रम होता. अखेर टोपण नावाने छापायचं ठरवलं. कारण माझं व्यक्तिगत आयुष्य आणि माझं लिहिणं मला वेगवेगळं ठेवायचं आहे.' स्वत:ची ओळख दूर ठेवून कवयीत्रीने केलेला हा संवाद किंवा या कवितेतले अनुभवविश्व यापूर्वी क्वचितच मराठी कवितेत आले असावे. वेदिकाची कविता ही खरेतर आत्मचरित्रात्मक काव्यच आहे. पण इथे कवयित्रीने टोपणनाव धारण केल्यामुळे आपली अडचण होते. 'देवदासीची मुलगी असलेल्या वेदिकाच्या आयुष्यातला मानसिक कोलाहल या कवितेत भेटतो. ती लैंगिक हिंसेची बळी ठरते पण ते नाकारण्याचं धाडसही करते. आयुष्यातल्या दोन टप्प्यांचा तिने घेतलेला आत्मशोध मराठी कवितेत सर्वार्थाने नवीन आहे. स्वत:चं, स्वत:च्या गोतावळ्याचं, नात्याचं, स्त्री-पुरुष संबंध व त्यातील लैंगिकतेच्या पायाचं, परिसराचं, धर्मसंस्थेच्या व समाजाच्या वर्तमानाचं आकलन ती करून घेते आहे. घर, कुटुंब, उच्च जात, उच्च वर्ग अशा चौकटींमधल्या स्त्रिया आणि या चौकटीबाहेरच्या स्त्रिया यांचं जगणं, समस्या, विचार यांच्यातला प्रचंड तफावतीचं दर्शन या काव्यातून घडतं'. असं अश्विनी दासेगौडा- देशपांडे यांनी म्हटलेय ते खरेच आहे. लैंगिक हिंसाचारावर फारसे लिहिले जात नाही. त्या पार्श्वभूमीवर या कवितेचे वेगळेपण लक्षात घ्यायला हवे.

अनुजा जोशी यांचे 'उत्सव' आणि 'उन्हाचे घुमट खांद्यावर' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. वैयक्तिकतेच्या परिघात न अडकता एक व्यापक अनुभवविश्व साकारणारी प्रगल्भ कविता म्हणून आपल्याला अनुजा जोशी यांच्या कवितेचा विचार करावा लागतो. उन्हाचे घुमट खांद्यावर' हे एक प्रतिकात्मक शीर्षक आहे. ज्यात स्त्रियांचा कष्टप्रद, वेदनादायी चेहरा दडलेला आहे. या संग्रहातल्या बहुतेक कविता या आपल्या रूढ सांस्कृतिक जगण्याला अधोरेखित करतात. कवयित्री अशा असंख्य आवाजहीन, चेहराहीन अस्तित्वाचा स्त्री संवेदनेच्या व्यापक परिप्रेक्ष्यातून विचार करते. वैयक्तिकतेला ओलांडून अत्यंत परिणामकारक आशय व्यक्त करणारी ही कविता खूप आस्थेने स्त्रीविशिष्ट अनुभवांना, पुरुषी परंपरांच्या पारंपरिक दृष्टिकोनाला समजून घेते. प्रचलित सामाजिक व्यवहारातल्या स्त्रीच्या लिंगभेदात्मक दमनाचाही विचार करते. भाषेतल्या पारंपरिक अर्थाची

सजग जाणीव असलेली अनुजा जोशी यांची कविता प्रत्ययकारी असा स्त्रीसंवेदनेचा समूहनिष्ठ उच्चार आहे. पद्मरेखा धनकर यांचा 'फक्त सैल झालाय दोर' हा संग्रह म्हणजे स्त्रीच्या आत्मशोधाचा एक विस्तृत पटच आहे. समाज, संस्कृती आणि पुरुषरचित संरचनेचा मोठा अवकाश यात सामावलेला आहे. प्रस्थापित सांस्कृतिक व्यवहारावरची ही जशी प्रतिक्रिया आहे तशीच तिच्यात स्त्रीच्या मानसिक, भावनिक अनुभूतीची अनेक स्पंदनेही अंतर्भूत आहेत. योजना यादव यांचा 'मरी मरी जाय सरीर' हा संग्रह देहशुचित्वासंदर्भातल्या अनेक रूढ संकेतांना बदलू पाहणारा आणि स्त्रीच्या जीवनावकाशाचे अत्यंत भेदक चित्रण करणारा आहे. स्त्रीच्या आंतरिक आणि मानसिक पातळीशी निगडीत असणाऱ्या अनेक आत्मीय बाबींवर ही कविता बोलते. पुरुषप्रतिमेचा नवा अन्वयार्थ लावणारी ही एक महत्त्वाची कविता आहे. योगिनी राऊळ यांच्या 'मुखवटा उतरवल्यावर...' आणि 'बाई पणातून बाहेर पडताना' या संग्रहातील कविता स्त्रीपुरुष नातेसंबंधातला एक वेगळाच अनुभव देतात. बालिका ज्ञानदेव यांची कविता वर्दीतील स्त्रियांची वेदना मांडणारी कविता आहे. 'मॅगझीनीतून सुटलेली गोळी' हा त्यांचा कवितासंग्रह आहे.

याशिवाय गेल्या दोन दशकात ज्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत, अशा अनेक कवयित्री आहेत. छाया कोरेगावकर (एक अवकाश माझंही), संध्या रंगारी (संध्यारंग, वाताहतीची कैफियत), प्रतिभा अहिरे (मला हवी असणारी पहाट), मनीषा अतुल (धुक्याच्या पलीकडे, मावळत का नाहीस?, प्रहर, सटवाई, मुक्त मी इ.) सारिका उबाळे (शिर:स्नाता), रामकली पावसकर (पावळण), सुचिता खल्लाळ (पायपोळ, तहहयात, प्रलयानंतरची तळटीप), योगिनी सातारकर- पांडे (जाणिवांचे हिरवे कोंभ), संघमित्रा खंडारे (थ्रीशोल्ड फ्रिक्वेन्शी घेऊन), अर्चना डावखर –शिंदे, (अधांतरीचे प्रश्न), स्वाती शिंदे – पवार (स्त्रीकोष, वाटेवरती काचा गं इ.), प्रिया जामकर (बिंदूत खूप जागा आहे), सुप्रिया आवारे (न बांधल्या जाणाऱ्या घरात), आशा डांगे (परिघाबाहेर), विशाखा विशाखा (तुमुल अंतरीचे), शर्मिला रानडे (टू द ब्रिम व काही उरलेले), शरयू असोलकर (तुटलेपण पुन्हा बांधून घेताना), चैताली आहेर (विंझोळ), भाग्यश्री केसकर (उन्हाने बांधलं सावलीचं घर), माधुरी चौधरी (आयुष्याच्या कॅनव्हॉसवरील रेघोट्या), आशा पैठणे (उघडमिट), माया धुप्पड,

सुनंदा भोसेकर, शोभा रोकडे, श्यामल गरुड, सावित्री जगदाळे, सुनिता झाडे, संगीता अरबुने, विद्या बयास- ठाकूर, मीरा, गार्गी कुलकर्णी, अलका गांधी असेरकर, उषा हिंगोणेकर, कविता मोरवणकर, वृषाली विनायक, नीलिमा कुलकर्णी, शर्मिष्ठा भोसले, सीमा ढगे, मनीषा पाटील, प्रज्ञा भोसले, मेनका धुमाळे, रेषा अकोटकर, हर्षदा सुंठणकर इ. कवयित्रींनी समकाळातल्या स्त्री पुरुषांच्या सर्वव्यापी जगण्याचा उच्चार केला आहे. लिंगभावासह त्यांच्या कवितांना विशिष्ट असा सांस्कृतिक पट लाभला आहे. या कवयित्री समकाळातल्या आपल्या जगण्याचे पुनर्मूल्यांकन करत आहेत. नव्या भाषेतून, स्त्री प्रतिमेतून त्या स्वत:च्या अस्तित्त्वाचा शोध घेऊ पाहत आहेत. (अर्थात वरील निरीक्षण सर्वच कवयित्रींना सरसकट लागू होत नाही. निसर्ग, मातृत्व, प्रेमबंध आणि भावनिक आसक्तीच्या हळव्या कविताही खूप लिहिल्या गेल्या आहेत.)

भाषेचे, शैलीचे काही अनोखे प्रयोगही या कवितेत पाहायला मिळतात. विशेषत: आजच्या काळाची भाषा अनेक कवयित्रींच्या कवितेतून येते. उदा. मार्केटिंग, स्लॉट, फ्लुरोसंट, फोकस, ग्रॅनाईट, बाईक, लिव इन, बेडरूम, स्काईप, मेट्रो, ओव्हन, ब्युटीपार्लर, स्पा, रिज्यूविनेटिंग सेंटर्स, रेड कार्पेट, कॅटवॉक, मिनिस्कर्ट, लोकल, एक्स्पायार्ड, प्लांटेशन, मॉल, बोन्साय, लोडेड अन्‌लोडेड, कॅनव्हास, केअर टेकर, स्पिडब्रेकर, युनिफॉर्म, शेड्युल, कॉल, लायसन्स, मेसेज, केयॉस, कॅलिडीओस्कोप, अमेझॉन, इमेल, अल्झायमर, सुपरवुमन, युनिसेक्स, मेकओव्हर, वॅक्सिंग, ब्लॅक हेडस, ब्लिचिंग, फेशियल, स्टीम, स्टेपकट, ब्लण्कट, फ्लिक्स, लिपस्टिक, चीअरगर्ल असे कितीतरी नवे शब्द कवयित्रींच्या अभिव्यक्तीचा भाग झाले आहेत. म्हणजे एकीकडे आजची कविता वैशिष्ट्यपूर्ण असे भाषिक वळण घेत असतानाच आपल्या मूळ जगण्याशीही तिची नाळ कायम आहे.

संत परंपरेने केलेल्या मोठ्या सांस्कृतिक कार्याची जाणीवही अनेक कवयित्रींच्या कवितेतून दिसते. विठ्ठल, ज्ञानेश्वर, तुकाराम आणि एकूणच या परंपरेविषयीचा आदरभाव प्रकटताना दिसतो. त्यांच्या भक्तीतील उत्कटता, तळमळ कवयित्रींना अधिक जवळची वाटते. 'ज्ञाना समतेची माऊली' किंवा 'विठोबा' अशा कवितांमधून अशी अनेक रूपे पाहायला मिळतात. याशिवाय बुद्ध, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाई यांच्यापासून ते थेट इरोम शर्मिला यांच्यापर्यंत अनेक कवयित्रींनी

आत्मीय संवाद साधल्याचेही दिसते. लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन परिवर्तनाचा विचार मांडताना आपल्या वैचारिक पूर्वजांबद्दल आस्था प्रकट करणारी कविताही या काळात लिहिली गेली आहे.

या काळातील कविता संमिश्र स्वरूपाची आहे. नियतकालिके, दिवाळी अंक आणि समाजमाध्यमामुळेही कवितेचे क्षेत्र अधिक विस्तारले आहे. सोशलमीडिया हे सर्वसामान्य माणसांच्या हातातील एक प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक कवयित्रीची सुरुवातीची निर्मिती आणि नंतरचे त्यांचे लेखन यांचा विचार केला तर अनुभव, जाणीव आणि प्रवृत्तीचे वैविध्यपूर्ण बदल स्पष्टपणे जाणवतात. प्रस्थापित समाजव्यवहार आणि राजकारण यावर स्त्रिया फार बोलत नाहीत, हे खरे असले तरी त्या बोलतच नाहीत असे नाही. तथाकथित नैतिकतेचे परंपराधिष्ठीत मानदंड झुगारून देण्याचे सामर्थ्य या कवयित्रींनी दाखवून दिले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि 'माणूस' या मूल्याला त्या प्राधान्य देतात. प्रसंगी काही कवयित्री विद्रोह आणि तीव्र संताप व्यक्त करतात. समकालीन संवेदनेचा परिणाम कवयित्रींच्या व्यक्तिमत्वावरही होत असल्यामुळे त्यांचे 'कविताविषय' अधिकाधिक सामाजिक होत आहेत. किंवा ते मर्यादित तरी नाहीत. लिंगभावासह सामाजिक आणि राजकीय वास्तवाकडेही ही कविता लक्ष वेधून घेते. आयुष्याच्या अर्थपूर्णतेचा तळशोध घेतानाच ही कविता हिंसेचे मानसशास्त्रही समजून घेते. आजच्या अनपेक्षित आणि अविश्वसनीय अशा कोरोना काळात आपल्या भोवती अनेक विभ्रम तयार झाले आहेत. नवी व्यवस्था प्रस्थापित होऊ पाहत आहे. जगण्या-वागण्याचे एक नवे मॉडेल आकाराला आले आहे. अस्थिरता, असुरक्षितता आणि मानसिक स्वास्थ्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थलांतर, ताणताणाव आणि अपेक्षाभंगाच्या कितीतरी कहाण्या आपण या काळात अनुभवल्या आहेत. कोरोनामुळे आपले समग्र वर्तमान गढूळ झाले आहे. आपल्या चर्चाविश्वात या काळाने खूप गोष्टी आणून टाकल्या आहेत. या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या कवितेचे पुढचे वळण कसे असेल? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

इ-मेल : p.vitthal75@gmail.com

* * * * *

# २००० नंतरची स्त्री लिखित कविता

- डॉ. कविता मुरुमकर

२००० नंतरच्या कालपटावरील स्त्री लिखित कवितेच्या स्वरूपाचा, अंतरंगाचा परामर्श घेण्यासाठी पूर्वसूरी कवितेचा विचार करता लक्षात येते की, मराठी कवितेच्या परिप्रेक्ष्यात 'स्त्री' अभिव्यक्तीची परंपरा थेट मौखिक काव्यपरंपरेतून सुरू होते. मौखिक परंपरेतल्या साहित्यात स्त्रियांनी रचलेली गीते, विविध उत्सवाच्या, सणांच्या, रूढी-चालिरीतींच्या अनुषंगाने गायलेली गीते हा लोकगीतांमधला एक समृद्ध असा ऐवज आहे. या गीतरचना केवळ ओवी स्वरूप कविताच नव्हत्या तर तत्कालीन स्त्रियांच्या भावविश्वाचं, तीव्र संवेदनशीलतेचं, तिच्या अंतरीच्या कोलाहलाचं ते रचलेलं एक आख्यानही होतं. रामायण-महाभारत काळातही स्त्रीगीतांचे उल्लेख सापडतात. महदंबेच्या धवळे निर्मितीमागे हीच स्त्रीगीतांची परंपरा उभी असावी. मध्ययुगीन संत कवयित्रींच्या काव्यनिर्मितीची बीजे लोकपरंपरेतील, लोकसंस्कृतीतील स्त्रीगीतांत असल्याचे दिसून येते. नवकाव्याच्या पूर्वकाळात इंदिरा संत, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता शेळके या कवयित्रीनी मराठी कवितेला महत्त्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते. १९७० च्या दशकात प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील, मलिका अमर शेख या महत्त्वाच्या कवयित्रींनी काव्यलेखन केले. साठोत्तर काळातील या कवयित्रींची ही पहिली पिढी होय. या कवयित्रींनी पूर्वसूरींपेक्षा नवी दिशा, नवी अभिव्यक्ती शोधली. मध्यमवर्गीय स्त्री जाणिवांची लक्ष्मणरेषा ओलांडून जीवनानुभवाच्या नव्या क्षमता आत्मसात करून त्या अनुभूतींना काव्याविष्कार देवून मराठी कवितेचा परीघ विस्तारला. प्रभा गणोरकर यांनी अस्तित्ववादी जाणिवांच्या कविता लिहिल्या. रजनी परुळेकर यांनीही अस्तित्ववादी जीवनभान व्यक्त करत 'दीर्घ कविता' या पद्य बंधातून स्त्री-पुरुष संबंधातील पारदर्शीपणा धाडसाने शब्दबद्ध केला. बहुस्तरीय आशयाचा प्रत्यय रजनी परुळेकर यांची कविता वाचताना येतो. अनुराधा पाटील यांनी स्त्री दु:खाचा सखोल संयत आविष्कार करत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावरचा जगण्याचा कोलाहल आणि त्याची अनेक रूपं आपल्या कवितेतून मांडत वारकरी परंपरेचा खोलवर प्रभाव असलेली, जीवनातल्या परात्मतेची जाणीव व्यक्त करणारी, स्वगतात बोलणारी

संयत कविता लिहिली. स्त्रीवादी विचारधारा व महानगरीय संवेदन व्यक्त करणाऱ्या मलिका अमर शेख यांनी 'स्त्री'च्या पारंपरिक संकल्पनेला छेद देत वास्तववादी जाणिवेतून टोकदारपणे स्त्रीसंवेदन व्यक्त करत 'स्त्री' समजून घेण्याच्या बुरसटलेल्या व गुळगुळीत जाणिवांना लख्ख केले. १९८० नंतर स्त्रीलिखित कवितेने पारंपरिक लेखनाची पुरुष केंद्री चौकट मोडून टाकली. या काळातील कवितेत स्त्रीकेंद्री जाणिवांना प्राधान्य येऊ लागले. १९८० नंतरची स्त्रीवादी कविता काव्याभिरूची जपण्यापेक्षा स्त्रीला तिच्या अस्मितेची जाणीव करून देऊन स्त्रियांनी भोगलेल्या अनुभवाचे चित्रण करण्यात सर्वाधिक यश मिळवत गेली. या कालखंडात अरुणा ढेरे, नीरजा, प्रज्ञा दया पवार या कवयित्रींनी कवितेला महत्त्वपूर्ण योगदान दिले. अरुणा ढेरे यांनी स्त्री असण्याच्या व्यापक भानातून आलेल्या जीवनानुभवाला काव्यरूप दिले. लोकसाहित्याशी नाळ जोडत लोकगीताच्या अभिजात आविष्काराचा प्रत्यय देणाऱ्या कविता लिहिल्या. नीरजा यांनी आपल्या कवितेतून आत्मसन्मान जाग्या झालेल्या स्त्रीच्या नव्या परिप्रेक्ष्यातून समग्र स्त्रीत्वाच्या अस्तित्वाचा अन्वयार्थ लावणारी कविता लिहिली. परंपरेचे आदर्श डोळे बंद करून गिरवत बसण्यापेक्षा परंपरांना सजगपणे तपासून घेऊनच स्वीकारले पाहिजे हे त्यांनी आपल्या कवितेतून सूचित केले. समाजातील सर्व वंचित, शोषित, उपेक्षित घटकांना न्याय मिळावा म्हणून तळमळणाऱ्या प्रज्ञा दया पवार यांनी माणसाच्या अस्सलपणाचा शोध घेत समाज परिवर्तनाची आस बाळगून असलेल्या कविता लिहिल्या. दु:खाचा मनस्वीपणे स्वीकार आणि एकटेपणाचा समंजसपणे स्वीकार हे आशयतत्त्व असलेल्या सुमती लांडे यांची कविता अल्पाक्षरी रूपबंधातून अर्थाची खोली प्राप्त करून देत कवितेला एका उंचीवर घेऊन जाते. दु:खाचा कुठलाही आकांत न करता, दु:ख पचवूनही जीवनाला नकारात्मक ओरखडा न लावता संयतपणे, परिपक्वतेने दु:ख भोगण्याची नजाकत सुमती लांडे यांच्या अनेक कवितांतून प्रकट होते. नव्वदोत्तर कालखंडात कविता महाजन, मीनाक्षी पाटील या कवयित्रींनी कवितेला महत्त्वपूर्ण योगदान दिले. कविता महाजन यांच्या कवितेत पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत 'तत्पुरुष' असलेल्या स्त्रीच्या स्थानाविषयीची अस्वस्थता दिसून येते. समाजव्यवस्थेतील या दाहक वास्तवात स्त्री पुरुष संबंधातील द्वंद्व समास सर्जनशील न होता तत्पुरुषी होतो. पुरुष या दुसऱ्या पदाने आपले वर्चस्व इतके अबाधित ठेवले आहे की, तिथे स्त्रीचा संदर्भ ठसठशीतपणे दिसूनही येत नाही की जाणवत नाही. ही अस्वस्थ

जाणीव कविता महाजन यांच्या कवितेत ठळकपणे दिसून येते. स्त्री पुरुष नात्यातील द्वंद्व, स्त्री पुरुष नात्यातील व्यामिश्र अनुबंधाच्या विविध छटा आणि त्यातील स्त्रीचे असणारे दुय्यम स्थान कविता महाजन यांच्या कवितेत अतिव संवेदनशीलतेने अधोरेखित होते. मीनाक्षी पाटील यांच्या कवितेत 'स्व' चा शोध, उत्तराधुनिक कालखंडातून अपरिहार्यतेने आलेले विखंडीकरण, हतबलतेची जाणीव, 'स्त्रीत्वा' विषयीचे सनातन प्रश्न, जगण्याची वाढत जाणारी कृत्रिमता, महानगर आणि गाव यात दुभंगलेलं मन, अस्तित्वाचे प्रश्न, महानगरीय जीवन जगणाऱ्या संवेदनशील आधुनिक स्त्रीच्या भावविश्वाचे विविध कंगोरे, स्त्री म्हणून जगताना येणारे पेच आणि जगण्याच्या कोलाहलातून येणारी अस्वस्थता दिसून येते. साठोत्तर ते नव्वदोत्तर कालखंडात लेखन करणाऱ्या कवयित्री २००० नंतरही लेखन करत असल्याचे दिसून येतात.

नव्वदोत्तर कालखंडात लेखन करणाऱ्या नीरजा यांचे 'निरन्वय' (१९८७), 'वेणा' (१९९४), 'स्त्रीगणेशा' (२००३), 'निरर्थकाचे पक्षी' (२०१०), 'मी माझ्या थारोळ्यात' (२०१५) हे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. नीरजा यांच्या कविता स्त्रीकेंद्री आहेत. स्त्रीच्या जगण्याचा वेदनादायी प्रवास शब्दांकित करताना त्या अस्वस्थ व अंतर्मुख होतात. स्त्रीची विविध रूपे आपल्या कवितेतून त्या साकार करतात. नीरजा यांनी मराठी स्त्री लिखित कवितेत मिथकीय उपयोजन विपुल प्रमाणात केल्याचे दिसून येते.

*'निघून गेलास एकटाच*
*सत्याच्या शोधात*
*शोधत राहिलास अर्थ वर्षानुवर्षे*
*दया, करुणा, शांती या शब्दांचे*
*आपल्या आतच असतात हे शब्द*
*त्यांतील अर्थासकट*
*हे कळलचं नाही तुला.*
*धगधगत ठेवलीस माझ्या आत*
*एकटेपणाची ठसठसती वेदना*
*तेव्हा कुठं हरवली होती तुझी करुणा?'*

(मी माझ्या थारोळ्यात, पृ. ११)

कवितागत 'ती' गौतम बुद्धांना प्रश्न विचारते. सत्याच्या शोधात पत्नीला घरी एकटं सोडून जाणं योग्य आहे का? सत्यशोध हा पुरुषाचाच प्रांत आहे का? गौतम बुद्धाची व्यक्तिरेखा या कवितेत त्यांचा नामोल्लेख नसतानाही ठसठशीतपणे वाचकांच्या मनात उभी राहते. 'मी माझ्या थारोळ्यात' (२०१५) या कवितासंग्रहातील काही कवितांतून नीरजा यांनी मिथकीय उपयोजन केले

आहे. या मिथकीय उपयोजनाचा विशेष म्हणजे यात व्यक्तिरेखांची नावे नाहीत. तरीही त्यातून होणारा अन्वयार्थ वाचकाला अधिक नेमकेपणाने जाणवतो. नीरजा यांच्या अनेक कवितांतून पौराणिक व्यक्तिरेखा येतात मात्र त्या स्त्री-पुरुष नात्याचे वेगवेगळे बंध, त्यातले ताण हे दर्शविण्यासाठी येतात. एकार्थाने हे मिथकांचे नव्याने केलेले सर्जन आहे आणि ते कवितेला, काव्यार्थाला सौष्ठव देणारे जसे आहे तसेच ते मिथकीय संवेदनेची व्याप्ती किती खोलवर पोहचू शकते हे ही दर्शवणारे आहे.

प्रज्ञा पवार यांचे 'अंतस्थ' (१९९३), 'उत्कट जीवघेण्या धगीवर' (२००२), 'मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा' (२००७), 'आरपार लयीत प्राणांतिक' (२००९), 'दृश्यांच्या ढोबळ समुद्र' (२०१३) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. समाज व्यवस्थेतील असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान, लिंगभेदाची विषमता, विषमतावादी व शोषित प्रवृत्तीचा निषेध तसेच भूतकालीन जीवनाचे दर्शन घडविताना सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील प्रस्थापित व्यवस्थेने लादलेल्या गुलामी विषयीची अस्वस्थता प्रज्ञा पवार यांच्या कवितेत दिसून येते.

*'पुरा माझ्यातलं बाईपण,*
*जे मरूनही राहणार आहे*
*जिवंत सतत लवथवत...*
*कधी यशोधरा बनून, कधी द्रौपदी*
*कधी बिल्किस, कधी निऱ्हत्ती*
*कधी गट्र्यूड, कधी तेरेसा*
*बांध घातले मला तरी मी झिरपले,*
*पृथ्वीच्या शेवटच्या रिकाम्या जागेपर्यंत.*
*खाजगीकरण केलं माझं,*
*तरी मी झाले विश्वाचे आर्त.'*

(दृश्यांचा ढोबळ समुद्र, पृ. ६२)

वरील काव्यपंक्तीतून कवयित्रीची स्त्रीच्या परिप्रेक्ष्यातील जगण्याचा आकलनातून आलेले आत्मभान, नवीन जीवनदृष्टी अधोरेखित होते. स्त्री म्हणून असलेला दुर्दम्य आशावाद येथे प्रकर्षाने जाणवतो. हे आत्मभान वैयक्तिक नसून ते समष्टीचे आहे.

सुमती लांडे यांचे 'कमळकाचा' (१९९३) व 'वाहते अंतर' (२००२) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. कमीतकमी शब्दांत आशयाची व्यापकता हे सुमती लांडे यांच्या कवितांचे वैशिष्ट्य आहे.

*'तू*
*मला समुद्र दिलेस*
*आणि*

*न शमलेली तहान'*

(कमळकाचा पृ. १०७)

अल्पाअक्षरी कवितेमध्ये असलेली अर्थाची खोली कवितेला एका उंचीवर घेऊन जाते. स्त्री संवेदनेचे अस्सल भावविश्व या कवितेत प्रकट झाले आहे. दु:खाचा कुठलाही आकांत न करता, दु:ख पचवूनही जीवनाला नकारात्मक ओरखड न लावता संयतपणे, परिपक्वतेने दु:ख भोगण्याची कवयित्रीची नजाकत अनेक कवितांतून प्रकट होते. एकाचवेळी कवयित्रीचे भावनावेगी उत्कट असणे आणि त्याचवेळी तिचे सोशिक संयमी असणे या तरल द्वंद्वातून अनेक कविता भावनिक पीळ शब्दबद्ध करतात. इतक्या आशयघन लिहिणाऱ्या या कवयित्रीच्या कवितेचे वेगळेपण उठून दिसणारे आहे.

कविता महाजन यांचे 'तत्पुरुष' (२००५), 'धुळीचा आवाज' (२००६), 'मृगजळीचा मासा' (२००८), 'समुद्र आहे एक विशाल जाळं' (२०१६) हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

*'आभाळाची अभिलाषा मनात धरताना*
*ध्यानात नव्हतं आलं*
*आपल्याला आभाळासह*
*स्वीकारण्याइतकी जागा*
*कुठल्याच घरात नसते...'*

(धुळीचा आवाज, पृ. १४)

संवेदनशील स्त्री मनाची अगतिकता, तगमग, तळमळ, तडफड, भीती, आतुरता, ओढ, भय, प्रेमाची आस, एकटेपण अशा विविध भावभावनांची वीण कविता महाजन यांच्या कवितेत दिसून येते.

मीनाक्षी पाटील यांचा 'इज इट इन युवर डीएनए' (२००९) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. महानगरीय संवेदन साठोत्तर कालखंडातच मराठी कवितेत रुजले. त्याचा विस्तार पुढे नव्वदोत्तर कालखंडात झाला. या उत्तराधुनिक काळातील महानगरी जीवनाचे चित्रण स्त्री लिखित नव्वदोत्तर कवितेत दुसऱ्या टप्प्यावर ठळकपणे झाले ते मीनाक्षी पाटील यांच्या 'इज इट इन युवर डीएनए' या कवितासंग्रहातून. वर वर पाहता हे संवेदन महानगरीय स्वरूपाचे वाटते असले तरी या संवेदनाचे स्वरूप अनाहूतपणे कोसळलेल्या महानगरीय जीवन जाणिवेशी असणाऱ्या संघर्षाचे आहे. या कोलाहलात एका 'स्त्री'चे व्यक्तीचे

महानगराशी जुळलेल्या, न जुळलेल्या नात्याचे संवेदन आहे. 'स्त्री' ही अबला आहे, तिचा परिवार, संसार हेच तिचे भावविश्व आहे ही परंपरागत धारणा नाकारणारी ही कविता आहे. हरवलेपण, जडावलेपण, संभ्रमीतता, विसंवाद, हतबलता आणि 'स्व'चे विखंडीकरण अशा खास उत्तराधुनिक युगाचे निरुपण करणारी ही कविता आहे. महानगरात माणसाचं शकलीकरण झालं, जगण्यातील सहजता संपली, सगळं कसं खोटंखोटं कृत्रिम, बेगडी होत जाणारी भोवतालची माणसं, कमकुवत नातेसंबंध, नात्यातील गृहीत धरणं, हा भवताल, त्यातून वाट्याला येणारी तगमग, तडफड, अगतिक होत जाणं या कवितांमधून अनुभवता येते.

*'सकाळी सकाळी या शहराच्या अंगावर पडतात*
*ट्रेनमध्ये गुदमरलेले हे लोंढे*
*फुटलेल्या उंबरात वळवळणाऱ्या किड्यासारखे*
*सजवतात स्वतःला रंगरंगोटी करून*
*अन् पुसू पाहतात फसाफसा स्प्रे व पावडरींनी*
*या शहराच्या वाऱ्याला लागलेला*
*ओशट दमट कष्टाचा खरा वास'*

('इज इट इन युवर डीएनए', पृ. २०)

महानगरातला एक दिवस - त्यात माणसांच रूपांतर एका क्षुद्र वस्तूत किटकात होत जाणं काफ्काच्या अस्तित्ववादी जाणिवेतून हे पहिल्यांदा साहित्यातून उमटले. माणसांचं अस्तित्वच क्षुद्र आहे, निरर्थक आहे हे संवेदन खास उत्तराधुनिक काळात ठळकपणे वाढत गेलेलं आहे. या सगळ्यातून जी अगतिकता वाट्याला येते, जी ओढाताण होते, ती या महानगरीय जीवनाची एक अटळ अशी घटना ठरते.

कवयित्री मीरा तारळेकर यांचे 'पुनर्जन्म' (१९९९), 'वारा आणि कमळ' (२०००), 'आदिमाया' (२००२), 'सरहद्द' (२००६), 'उन्हं पेटलीत तरीही' (२००८), 'शुभ्र नव्या संधिप्रकाशात' (२००९) हे कवितासंग्रह तसेच 'मुक्ता' (२००३), 'ऐक द्रौपदी' (२००६), 'यशोधरा' (२०१०) ही खंडकाव्ये प्रकाशित आहेत. मानवी जीवनातील एकाकीपण, सुखदुःख, निराशा, भय, मृत्यू या आशयसूत्रातून मीरा यांची कविता प्रकट होते. जीवन चिंतनातून येणाऱ्या अनुभवांना त्या शब्दबद्ध करत कवितेच्या रूपाने आत्मशोध घेतात.

*'बाई नुसतीच आग नाही*

*ती आहे नदी*
*वाहता वाहता आवाजाशिवायच रडणारी*
*आसवांची कमळ फुलवत जाणारी'*

(सरहद्द, पृ. ९, १०)

रोजच्या जगण्यातील साधे व सहज असलेले क्षण त्यांच्या कवितेत महत्त्वपूर्ण आशय होवून प्रकटतात. कवयित्रीच्या आत्ममग्न जीवनचिंतनाच्या परिघातून विस्तारित जाणारी त्यांची कविता अनेक भावकल्लोळ घेवून येते. 'ती आहे नदी' या ओळीतून बाईचं नदीसारख सर्व समावेशक व जीवनदायिनी असणे सूचित होते. नदी ही आदिबंधात्मक प्रतिमा आहे जी बाईशी जोडली आहे. 'आवाजाशिवाय रडणारी', 'आसवांची कमळं फुलवत जाणारी' या प्रतिमा अर्थपूर्ण आहेत.

नीलिमा गुंडी यांचे 'प्रकाशाचे अंग' (२००५) आणि 'जगण्याच्या कोलाहलात' (२०१२) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. पुरुष देवतांनी स्त्रियांचा उद्धार करून तिला दुर्दैवाच्या कचाट्यातून मुक्त केल्याच्या अनेक पौराणिक कथा आपण ऐकतो, वाचतो. ईश्वराने अवतार घेताना पुरुष या भूमिकेतूनच अवतार घेतले. कधीतरी ईश्वराने अवतार घेताना स्त्रीचा जन्म घेऊन तिच्या दुःख भोगाची, सहनशीलतेची अनुभूती घ्यायला हवी होती असे कवयित्रीला वाटते.

*पुन्हा पुन्हा अवतार घेताना*
*एकदाही तू स्त्रीचा जन्म*
*कसा नाही घेतलास?*
*तिच्या दुर्दैवाचे दशावतार*
*भोगायला का कचरलास?*
*सोपे होते रे तुझे*
*कुब्जेला सुंदर करणे!*
*नि द्रौपदीला वस्त्रे पुरवणे!*
*जगून पहायचे तरी*
*त्यांचे अपमानित जगणे!*
*मोरपिसाच्या स्पर्शाने*
*बुजतात का क्षणात*
*साऱ्या जखमांचे व्रण?*
*नि शिळा जिवंत होताच*
*सरते का रे*
*तिचे अपराधीपण?*
*हे सर्वज्ञा*
*जन्माचे रहस्य तूच*
*जिच्याकडे सोपविलेस!*
*तिच्या मनाचा थांग*
*तुला कसा नाही लागला?*

(जगण्याच्या कोलाहलात, पृ. १५)

समाज संस्कृतीत व धार्मिक संकल्पनांच्या प्रस्थापित धारणांना उपहासात्मकतेचे छेद देणारी ही कविता आहे. कवयित्रीच्या चिंतनाला व्यापक असे सांस्कृतिक व

सामाजिक संदर्भ आहेत. नीलिमा गुंडी यांची ही कविता पारंपरिक धारणांची मूल्यात्मक चिकित्सा करते.

माया पंडित यांचा 'तल्खली' (२०१८) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. स्त्री म्हणून जगताना आलेल्या अनुभूतींची 'तल्खली' हे या काव्यसंग्रहातील कवितांचे आशयसूत्र आहे. सर्वांग होरपळून काढणारी ही तल्खली जगण्याच्या व भोगण्याच्या दाहातून आलेली आहे. स्त्रीच्या संवदेन विश्वाचे विविध कंगोरे प्रस्तुत कवितासंग्रहातील अनेक कवितेतून शब्दांकित होतात. स्त्री सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, स्वयंभू असो वा निराधार असो, तिच्या स्त्रीत्वाच्या वेदनेच्या तळाशी दु:खच असते. स्त्रीच्या जगण्याच्या असंख्य मिती माया पंडित यांच्या अनेक कवितांतून शब्दांकित होतात. त्यांच्या कवितेतील स्त्री संयतपणे दु:ख भोगते.

*'...बाई होते गडग्यातून सांडलेली*
*तांदळाची कणी नाहीतर*
*तुटलेल्या माळेतून गळलेला मणी'*

(तल्खली, पृ. ६१)

स्त्रीच्या जगण्याचे कारुण्य अस्वस्थ करणारे असते. व्यवस्थेत स्त्री म्हणून जगण्याच्या तल्खलीने ती ज्या दाहकतेने होरपळते तितक्याच उत्कटतेने फुलून येते.

नव्वदोत्तर मराठी कवितेचा दुसरा कालखंड स्त्री लिखित मराठी कवितेसाठी महत्त्वाचा आहे. यासाठी की, ८० च्या दशकात स्त्रीवादाने जागी झालेली, आत्मभान आलेली कविता पुढची दोन दशके स्त्री स्वातंत्र्याचा यल्गार करत परंपरागत पुरुषसत्ताक परंपरेचा विरोध करत ठळक होत गेली. मात्र २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर आल्यावर ही कविता अधिक परिपक्व झाली. विशेषत: फेसबुक सारख्या सार्वजनिक व्यासपीठावरून ज्या वेगाने समोर आली. यामुळे स्त्री लिखित कवितेचा चेहरामोहरा या दशकात बराच बदलत गेलेला दिसतो. अर्थात जशी चांगली, वेगळी कविता इथे काही प्रमाणात समोर आली तशी सामान्य दर्जाची ही कविता मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली, जात आहे. संस्कृतीसंकर आणि भाषासंकर हे वैशिष्ट्य असलेल्या कालखंडात काही कवयित्रींनी लक्ष वेधून घेतले.

२००० नंतरच्या कालखंडात राही डहाके, कल्पना दुधाळ, वेदिका

कुमारस्वामी, सुचिता खल्लाळ, प्रिया धारूरकर, माधवी गोरे-मुठाळ, सारिका उबाळे परळकर, संजीवनी तडेगावकर, पद्मरेखा धनकर, प्रिया जामकर, कविता मुरुमकर, विशाखा विशाखा, सुप्रिया आवारे, रेणुका खोत, योजना यादव, अर्चना डावखर, मनिषा पाटील इ. समकालीन कवयित्रींनी स्त्री लिखित मराठी कवितेला महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. २००० नंतरच्या कालखंडात लिहिली गेलेली ही कविता आजचे बदलते समाजजीवन व या समाजातील स्त्रीजीवन शब्दांकित करत असताना आजची स्त्रीवादी जाणिवांनी सजग झालेली स्त्री पारंपरिक, सामाजिक व धार्मिक जीवनाच्या चौकटीतून, स्त्रीकोषातून बाहेर पडून मुक्त श्वास घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचे व या वाटचालीतील त्यांच्या अनुभवाचे चित्रण करीत असल्याचे दिसून येते. या कालखंडातील कवयित्रींच्या काव्यातील स्त्रीविषयक नव्या जाणिवा दिसून येतात. सामाजिक परिवर्तनाच्या भूमिकेतून पारंपरिक चौकट भेदून अभिव्यक्त झालेली कविता या कालखंडात विशेषतत्त्वाने दिसून येते. विशेष म्हणजे स्त्रियांनी लिहिलेली कविता पुरुषकेंद्री मूल्याबद्दल विरोधात्मक जाणीव प्रकट करून त्याविरुद्ध बंड करण्याची हिंमत करताना दिसून येते. याच काळात समाज परिवर्तनाचा व स्त्रियांना आलेल्या आत्मभानाचा फार मोठा परिणाम कवितेवर होऊ लागला. एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित कविता राजकारण, अर्थकारण, धार्मिक भेद, स्त्री-पुरुष भेद, योनिशुचिता, कुटुंब व्यवस्था, विवाह, हुंडा, मालकी हक्क, नातेसंबंध या आशयसूत्रांतून व्यक्त होताना दिसू लागली. या कालखंडातील कविता एकार्थाने स्त्रीवादी असूनही स्त्रीवादी कविता नाही. कारण 'स्त्री'पेक्षा 'व्यक्ती' म्हणून 'स्व'चा विचार या कालखंडातील कवयित्रींच्या अभिव्यक्तीच्या केंद्रस्थानी आहे.

कल्पना दुधाळ यांचे 'सिझर कर म्हणतेय माती' (२०१०) आणि 'धग असतेच आसपास' (२०१६) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. मातीत राबणाऱ्या माणसांविषयीच्या आस्थेतून या कविता आकार घेतात. भूमी आणि निसर्ग हे त्यांच्या कवितेचे केंद्रबिंदू आहेत. कृषिनिष्ठ संवेदनेतून निर्माण झालेली यांची कविता सध्याच्या दाहक वास्तवतेत, कृषिजीवनाला तोंड द्यावे लागणाऱ्या आस्मानी सुलतानी संकटांच्या दाहकतेत सकारात्मकतेने तग धरून राहण्याचे तत्वज्ञान सांगते. आत्महत्येला कारणीभूत ठराणारी परिस्थिती नाकारण्याची धमक ही कविता देते. कृषिजीवनाचा संघर्षमय प्रवास नोंदवणारी कल्पना दुधाळ यांची कविता कृषिनिष्ठ जीवनाच्या भौतिक आणि मानसिक परिवर्तनाला सामोरी

जात त्या परिवर्तनाचे निरीक्षण करत ते बदल सूक्ष्मतेने शब्दबद्ध करते.

योजना यादव यांचा 'मरी मरी जाय सरीर' (२०१७) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. 'स्व'चा शोध, स्त्री-पुरुष नात्याचा शोध, वास्तववादी दृष्टीकोनातून जीवनाचे चिंतन, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील सांकेतिक बाईपणाच्या धारणेला छेद, परंपरेला नकार, स्त्रीत्वाचे पारदर्शी आकलन ही योजना यादव यांच्या कवितेतील आशयसूत्रे आहेत. योजना यादव यांच्या कविता स्त्रीवादी संवेदन खोलवर रिचवलेल्या, एकार्थाने जेंन्डर इक्वलिटीच्या कविता आहेत असे म्हणता येईल. अर्थातच ही कविता त्याही पुढे जाऊन स्त्री शरीर हेच एक व्यक्तित्त्व आहे या धारणेपर्यत पोहचताना दिसते. घर, कुटुंब, कलह, पती वियोग, दु:ख, सामाजिक मर्यादा या आशयाच्या चौकटीतून ८० व्या दशकात स्त्री लिखित कविता अधिक खुली झाली. स्त्री स्वातंत्र्य हे तिच्या अभिव्यक्तीचे केंद्र झाले. नव्वदोत्तर कालखंडात ती व्यक्तिवादाकडे झुकत गेली. त्यानंतर गेल्या दशकभरात व्यक्तीवादाकडून स्त्री शरीर हेच एक व्यक्तित्त्व आहे या टप्प्यापर्यंत आलेली दिसते. हे 'व्यक्तित्त्व' केवळ जेंडर इक्वलिटीविषयीच बोलत नाही तर त्याहीपुढे जाऊन पारंपरिक 'चारित्र्य' या धारणाही नाकारताना दिसते.

योजना यादव यांची कविता पूर्वसूरींच्या कवितेपेक्षा अधिक धीट आहे. जे काही सांगायचे ते थेट, कुठलाही आडपडदा न ठेवता व्यक्ती म्हणून अभिव्यक्त होणारी ही कविता आहे.

*'तू एकटा नाहीस*
*ज्याच्या ओंजळीत चेहरा लपवून*
*भविष्याचे नकाशे शोधलेत मी*
*माणूस बदलला की*
*बहराच्या तऱ्हा बदलतात फक्त*
*सृष्टीच्या नियमांना मोडून तोडून*
*उभं राहत नाही कुठलंच नातं*
*पोसलं जात नाही*
*निव्वळ फॅण्टसीच्या वासानं'*

(मरी मरी जाय सरीर, पृ. ३४)

योजना यादव यांच्या कवितांमधला रोमॅन्टीसिझम हा वास्तववादी आहे. निव्वळ फॅण्टसीच्या जगातली तरलता आणि स्वप्निलता या कवयित्रीला मान्य नाही.

याच कालखंडातील एक महत्त्वाची कवयित्री म्हणून राही डहाके यांच्या कवितेचा विचार करता येईल. राही डहाके यांचा 'हजार रक्तवर्णी सूर्य' हा कवितासंग्रह २०१८ मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या काही कविता नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या तरीही फारशी चर्चेत नसलेली कवयित्री या एकमेव संग्रहातून

आपले लक्ष वेधून घेते. त्या त्यांच्या अनवट वाटाव्या अशा अभिव्यक्तीमुळे. या संग्रहाचा सर्वात महत्त्वाचा विशेष म्हणजे अपवादानेही (‘स्त्री’ ने लिहिलेली कविता असूनही) स्त्री असल्याचं शोषण, दु:ख, त्रागा, नकार, स्वीकार येत नाही तर एक व्यक्ती म्हणून जे काही भागदेय वाट्याला आले आहे याचा ताळमेळ मांडणारी ही कविता आहे. तिचे संवेदन खास एका विशिष्ट काळातील नसून ही कविता अगदी ७०-८० च्या दशकातील असू शकते किंवा कधी आताच्या काळातीलही. आधुनिक, उत्तराधुनिक जाणीव, स्त्रीवादी प्रखर अभिव्यक्ती असे कोणतेही गुणविशेष या कवितेत आढळत नाहीत. तरीही ही कविता आपले लक्ष वेधून घेते. ती तिच्यातील उदासीनं, भयव्याकूळ होण्यानं, भूतकाळाकडे संशयी होऊन पाहण्यानं. संपूर्ण कविता वाचून झाल्यावर एक वाचक म्हणून लक्षात येते की, या कवितेचं जग गूढ, धुसर, भयव्याकूळ भूतकाळाखाली अडकून पडलेलं, भयाचं सूचन करणारं, सतत जगण्याची उमेद बांधत नकारात्मक जगण्याला सामोरं जाणारं असे हे जग आहे. या प्रकारचं जग स्त्री लिखित मराठी कवितेत अभावानेच पाहता येते.

*‘अनंतता गवसावी म्हणून*
*तू स्वीकारतेस कृष्णविवर.*
*तुला वाटते, ते घेऊन जाईल तुला*
*शब्दांच्या पलीकडे*
*अर्थांच्या आणि संघर्षांच्या*
*अशा एका वर्तमानाकडे*
*जो आकार देईल*
*गाभ्यातच गोठलेल्या*
*तुझ्या चैतन्याला’*

(हजार रक्तवर्णी सूर्य, पृ. ६१)

मराठी स्त्री लिखित कवितेच्या परंपेरत फार थोड्या कवयित्रींनी एक स्त्री असूनही एक व्यक्ती म्हणून अभिव्यक्त होण्यावर भर दिला आहे. त्यामुळे ही कविता पूर्णत: कवितागत ‘ती’ कुणीतरी एक आहे. तिचे ‘स्त्री’ असणे सुद्धा बऱ्याचअंशी धुसर वाटावे इतकी ती व्यक्तिवादी कविता आहे. त्यामुळे या संग्रहातील कवितागत ‘ती’ भूतकाळाकडे स्वत:च्या जगण्याकडे, पुन्हा पुन्हा वळून पाहते आहे. ‘ती’ ला कुणाची प्रतिक्षा आहे, कुणाचा शोध आहे तर कधी जीवन किती निरर्थक झाले आहे याची आत्मग्लानीही आहे. एक अज्ञात असे भयसूचन या कवितेच्या मागे वावरताना दिसते. भूतकाळाचा ससेमिरा चुकवण्याचा केविलवाणा प्रयत्न करणारी, कधी निश्चयी होऊन ते सगळं मागे सोडून नव्याचा शोध घेणारी तर कधी नियतीशरण होणारी क्वचित बंड करू पाहणारी ही कविता आहे.

वेदिका कुमारस्वामी लिखित 'गावनवरी' (२०१८) अनेक केंद्री कथानक असलेला जाणिवांचा परीघ अधिकाधिक विस्तृत करणारा एक महत्त्वपूर्ण कवितासंग्रह आहे. या कवितेचा रूपबंध दीर्घकवितेला छेद देवून काव्यात्म कादंबरीजवळ जाणारा आहे. 'वेदिका' ही या कवितेची प्रमुख नायिका. वेदिकाचा जीवनप्रवास उलगडत नेणाऱ्या या कवितेत वेदिकाची आजी, वेदिकाची अम्मा, हेगडे, सदाशिवप्पा, लता मॅडम, भीमक्का, कुमारस्वामी ही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा आहेत. कवितेतील या व्यक्तिरेखा वेदिकाची कहाणी उलगडवायला मदत करतात. ही कविता वेदिकाची जीवनकहाणी आहे. देवदासीसारखं उपेक्षित जीवन जगणाऱ्या मनस्वी स्त्रीच्या दु:खाचा आत्मशोधाच्या पातळीवर झालेला प्रवास हे या कवितेचे आशयसूत्र आहे. लोभ, मोह, हाताशा, अगतिकता, परावलंबन, नियतीशरणता, भावनिक कल्लोळ, विद्रोही भूमिका, प्रगल्भ प्रेम जाणिवा या स्थित्यंतरातून आत्मशोधापर्यंत आलेला वेदिकाचा जीवनप्रवास हे या कवितांचे प्रमुख आशयसूत्र आहे.

*'आज्जीला इच्चरलं, इत्का भंडारा कशाला*
*आपल्याच नशिबाला?*
*आज्जी म्हणतेली, आपल्याइत्क्या जखमा*
*दुसऱ्या कोण्हाकडे हईत?*
*जखमांची हाक आसती हाळदीला!'*

(गावनवरी, पृ. २७)

समाजव्यवस्थेमध्ये स्त्री हा दुय्यम दर्जाचा मानला गेलेला व शोषित असा घटक आहे. या स्त्रियांच्या दु:खाची अनेक रूपे आढळतात. आजवर ग्रामीण आणि शहरी हे प्रादेशिक भिन्नत्व दाखवून तर अभिजन आणि दलित हे जातीय व वर्गीय भिन्नत्व दाखवून स्त्रियांची दु:खे मराठी साहित्यात शब्दबद्ध झालेली दिसून येतात. देवदासीचे दु:ख राजन गवस यांच्या 'भंडार भोग' व 'चौंडक' या कादंबरी या साहित्य प्रकारातून दिसून येते असले तरी कवितेच्या पटावर देवदासीच्या दु:खाची प्रथमत:च अशा पद्धतीने नोंद झाल्याचे दिसून येते. कर्मकांडाच्या वेदीवर समाजव्यवस्थेने स्वत:च्या स्वार्थासाठी स्त्रियांना देवाला वाहिले व गावनवरी बनविले.

अशा अनेक स्त्रियांचे दु:खानुभव या कवितेत प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येतात. वेदिका कुमारस्वामी ही लोभ, मोह, माया, हाताशा, आगतिकता, मत्सर, संताप या विविध भावभावनांना सामोरे जात आत्मशोधाच्या टप्प्यावर

येऊन पोहोचते. स्त्रीशक्तीचा शोध घेऊन या अंतर्मुख होते.

नव्वदोत्तर कालखंडाच्या दुसऱ्या टप्प्यातील बहुतांशी स्त्री लिखित मराठी कविता या स्त्रीवादी जाणीवेतून अभावानेच व्यक्त होताना दिसतात. कदाचित ७०-८० दशकात स्त्रियांसाठी अपेक्षित असलेला स्वातंत्र्याचा संकोच आणि २१ व्या शतकातील पहिल्या-दुसऱ्या दशकातील स्वातंत्र्याची पुरेशी स्पेस यामुळे कवितेसारख्या वाङ्मय प्रकारात स्त्रीवादी जाणिवेचा अभाव जाणवत असावा. मीनाक्षी पाटील, राही डहाके, प्रिया जामकर या कवयित्रींच्या कविता व्यक्तिवादी जाणिवेतून अभिव्यक्त होताना दिसतात. प्रिया जामकर यांचा 'बिंदूत खूप जागा आहे' (२०१९) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे.

*'मला द्रौपदीचं नवलं वाटतं*
*तिने वस्त्रांसाठी धावा का केला*
*नंतर मिळालेल्या त्या वस्त्रांनी*
*नेमकं काय झाकलं*
*एकदा नग्नतेला भिडल्यानंतर परत*
*वस्त्रांत कसं लपता येतं*
*एकदा रस्त्यावर ही रानवट हवा*
*हुंगल्यावर परत घरात कसं जाता येतं'*

(बिंदूत खूप जागा आहे, पृ. १८३)

ही कविता एकूणच स्त्रीचे संवेदन प्रत्ययकारी पद्धतीने सांगणारी कविता आहे. 'स्त्री'च्या स्त्रीत्वाचा, पारंपरिक 'स्त्री'त्वाच्या चौकटीचा रूपबंध नाकारणारी कविता आहे. अतिशय वास्तववादी आशय देणारी, रोखठोक प्रश्न विचारणारी ही कविता आहे.

प्रिया धारूरकर यांचे 'विदेही' (२००७), व 'अंग भरून वाहणाऱ्या पान्ह्यातून' (२०१२) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. व्यामिश्र जीवनानुभवाच्या विविध छटा प्रिया धारूरकर यांच्या कवितेमध्ये दिसून येतात. अमूर्तता, कल्पकता, चिंतनशीलता आणि वास्तवता यांच्या अर्थपूर्ण संमिश्रतेतून त्यांच्या कवितेतून साकार होते.

*'तो असतो कुंभार*
*ती असते त्याची गाढवी*
*त्यानी लादलेलं ओझं निमूट वाहते*
*गळ्यातल्या काळ्या मण्यांशी इमान राखते*
*न पेलणारं ओझं लीलया पेलते*
*कुंकवाची टिकली एवढी ताकद देते?'*

(विदेही, पृ. १६)

समाजव्यवस्थेतील स्त्रीचे सनातन दु:ख कवयित्री शब्दांकित करतात. व्यवस्थेत 'तो' कुंभार असतो तर 'ती' त्याची गाढवी असते. सर्जनशीलतेचं स्वामित्व आणि तिची मालकी कुंभार या शब्दातून सूचकतेने सांगितली आहे. व्यवस्थेत

स्त्रीला दिलेलं दुय्यमत्व, संसाराचं भारवाहूपण, आहोरात्र निमूटपणे राबणे आणि या शिवाय मालकाच्या अखत्यारीत जगणे हे गाढवीच्या नशिबी असते. स्त्रीचं जीवन या रूपकातून कवयित्रीने सूचित केले आहे. गळ्यातल्या काळ्या मण्याशी इमान राखत या स्त्रिया न पेलणारी ओझी लीलया पेलतात ते ही केवळ कुंकवाच्या टिकलीच्या बदल्यात.

सारिका उबाळे परळकर 'कूस' (२००९), व 'शिर:स्नाता (२०१६) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. कवयित्रीला पुरुषसत्ताक व्यवस्थेत बाईचे नाकारले जाणे, तिच्या वाटेला आलेली दया, सहानुभूती, लाचारी अस्वस्थ करते. यातूनच त्यांच्या कविता साकार झाल्याचे दिसून येतात.

*'मी खाली सही करणार*
*असेही लिहून देते की,*
*फक्त 'स्त्री' म्हणून*
*वाट्याला येणाऱ्या*
*भोगांची जबाबदारी*
*मी एकटी स्वीकारणार नाही'*

(शिर:स्नाता, पृ. ६८)

ही कविता अस्मितेची जाणीव झालेल्या स्वयंभू स्त्रीचे प्रतिज्ञापत्र आहे असे वाटते. या कवितेतील कवितागत स्त्री कुठल्याही विभूतींच्या उपसना करण्यास बांधील राहणार नाही. त्याचा चांगल्या वाईट परिणामास ती स्वत: जबाबदार राहणार आहे. ती लिहून देणार आहे की ती कुठलेही व्रतवैकल्ये, उपासतापास करण्यास बांधील राहणार नाही. तसेच ती कुठलीही संस्कृती, रीतीभाती, जातपात मानणार नाही. आशीर्वाद, दुवा, शाप इत्यादी तत्सम नफ्यातोट्याची ती मिंधी राहणार नाही. ती कधीच तिचे मन इच्छा, वासना, तहान, भूक, स्वप्न मारणार नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ती येणाऱ्या पिढीस कुठल्याही प्रकारचे आस्तिक, नास्तिक, स्वास्तिकत्व स्वीकारण्यास बंधन घालणार नाही. हीच गोष्ट आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्त्री म्हणून वाट्याला येणाऱ्या भोगांची जबाबदारी ती एकटी स्वीकारणार नाही.

संघमित्रा खंदारे यांचा 'थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन' (२०१९) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. या कवितासंग्रहातील कविता वैचारिक व वैज्ञानिक अधिष्ठान घेऊन जगणाऱ्या स्वयंप्रेरित व स्वयंभू स्त्रीच्या भावविश्वाचे प्रतिनिधित्व करतात.

*'मी कधीची फिरतेय*
*जीवाच्या आकांतानं*
*तुझ्याभोवती... उपग्रहाप्रमाणे*
*आपल्या कक्षेच्या मर्यादेत राहून*
*तू*
*सूर्याकडे तोंड करून*

*स्वत:भोवती गिरक्या घेण्यात मग्न!*
*तुझा चंद्र म्हणवून घेण्यात*
*धन्यता वाटेनाशी झालीय आताशा*
*माझ्या विस्तीर्ण अवकाशात*
*झेपावण्यासाठी*
*निघालं आता माझं मन*
*तुझी गुरुत्वाकर्षण शक्ती लांघवू जाण्याइतकी*
*थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन'*

(थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन, पृ. १९)

आत्मभान आलेली कवयित्री आणि आजची समस्त स्त्री ही स्वयंप्रकाशी आहे. 'थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन' या कवितेत कवयित्रीने शास्त्रीय संकल्पनेचे रूपक घेऊन समकालीन स्त्रीचं आत्मभान व्यक्त केले आहे. थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी ही अशी महत्तम उर्जा आहे जी Metal Body मधील इलेक्ट्रॉन स्वत:च मिळवतो व त्या अणूला किंवा त्या धातू पदार्थालाच सोडून जातो. ही संज्ञा समजावून घ्यायची तर अणूची संरचना समजून घ्यावी लागेल. प्रत्येक पदार्थ हा अणूचा बनलेला असतो. अणूची संरचना पुढीलप्रमाणे असते. केंद्रक क्रिकेटच्या मैदानावरील चेंडू एवढा असेल तर इलेक्ट्रॉन हा मैदानावरील मुंगीएवढा असतो. केंद्रक असते ज्यामध्ये प्रोटॉन्स आणि न्युट्रॉन्स असतात. पैकी प्रोटॉन्स धन्नभारित कण असतात. न्युट्रॉन्स न्युटल म्हणजेच प्रभाररहित असतो. केंद्रकाभोवती इलेक्ट्रॉन्स (ऋणप्रभारित कण) आपापल्या कक्षेत फिरत असतात. कारण केंद्रातील धनप्रभारित प्रोटॉन्स आणि ऋणप्रभारित इलेक्ट्रॉन्समध्ये विरुद्ध प्रभारामुळे आकर्षण बल असते. जसे ग्रह गुरुत्वीय बलामुळे सूर्याभोवती आपापल्या कक्षेत परिभ्रमण करतात वा चंद्र म्हणजेच उपग्रह हे ग्रहाभोवती फिरतात. अणूच्या केंद्रकाभोवती परिभ्रमण करणारा इलेक्ट्रॉन सूर्यापासून उर्जा मिळवतो. जेव्हा ही उर्जा महत्तम असते (थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी) तेव्हा ते विरुद्ध आकर्षण बल तोडून आपली कक्षा लांघून तो इवलुसा इलेक्ट्रॉन निघून जातो. स्वत:च स्वत:चं अवकाश शोधायला. त्या पदार्थामधूनही...कवितेतील पुरुषकेंद्री व्यवस्थेतील 'ती' एखाद्या उपग्रहाप्रमाणे 'त्याच्या भोवती फिरत असते. म्हणजे तो म्हणेल तसं, त्याच्या मर्जीनं, त्याच्या आवडीचं जीणं जगत असते. 'तो' मात्र चंद्राला / उपग्रहाला गृहीत धरतो. त्याच्या प्रदक्षिणा मात्र सूर्याभोवती सुरू असतात. तो बांधलेला आहे. 'तो' कुटुंबातील प्रमुखाशी बांधलेला असेल किंवा 'त्याचा' सूर्य म्हणजे प्राण दुसराच कोणी असेल...स्वभान आलेली ती आता त्याच्याभोवती फिरण्यात धन्यता मानत नाही. आता ती ते आकर्षण बल तोडण्याइतकी उर्जा स्वत:च मिळवून म्हणजेच थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन (दुसऱ्या कोणाच्या आधाराने नव्हे), परंपरेच्या

बुरसटलेल्या कक्षा तोडून स्वत:चं अवकाश शोधायला निघालीय.

पद्मरेखा धनकर यांचा 'फक्त सैल झालाय दोर' (२०१९) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. समाजव्यवस्थेमध्ये स्त्री म्हणून जगताना आलेल्या अनुभवातून व्यवस्थेशी लढायला कणखर झालेली स्त्री व तिचे भावविश्व हे या कवितासंग्रहातील कवितांचे आशयसूत्र आहे.

*'कोणत्या अदृश्य शृंखला*
*अडकून आहेत पायात?*
*की शृंखला*
*तुटल्याच नाहीत कधी*
*फक्त सैल झालाय दोर*
*पावलोपावली नव्या*
*संदर्भाचे खुंट*
*मुक्तीचा आभास की सत्य'*

(फक्त सैल झालाय दोर, पृ. ६९)

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी अंधारात खितपत पडलेल्या स्त्रियांच्या पदरात अक्षरांचे दान टाकले. त्यांच्या हातात पाटी पेन्सील देवून परंपरांची ओझी झुगारून उंबरठ्याबाहेर पाऊल टाकण्याचे बळ दिले. शिक्षणास वंचित असलेल्या स्त्रीला शिक्षण मिळाले. ती आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाली. सतीच्या चालीत आगीत होरपळणाऱ्या स्त्रियांना अनेक समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नातून जीवनदान मिळाले. पती निधनानंतर स्त्रियांच्या संदर्भात होणारी ही शारिरीक अमानुष हिंसा कायद्यानुसार बंद करण्यात आली. हे सारे १९ व्या शतकात घडले असले तरी आज आजची २१ व्या शतकातील स्त्री ही सारी दु:खे नव्याने भोगतेच आहे. सुशिक्षित व स्वावलंबी स्त्रीही पुरुषी सत्ताकारणाला आजही बळी जात आहे. आधी ती सतीच्या नावाने आगीत होरपळत होती आता तिला ॲसिड टाकून जाळले जात आहे. विकृत पुरुषी मनोवृत्तीला ती शतकानुशतके बळी पडत आहेत. स्त्रियांच्या पायातल्या १९ व्या शतकातल्या साखळदंडी बेड्या २१व्या शतकात 'अदृश्य शृंखला' म्हणून आजही आहेतच की! त्या कधीच तुटल्या नाहीत 'फक्त सैल झालाय दोर...

बालिका ज्ञानदेव यांचा 'मॅगझिनीतून सूटतेय गोळी' (२०१४) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. मराठी कवितेत प्रथमच पोलिस जीवनाची पार्श्वभूमी असलेल्या कविता लिहिल्या गेल्या. पोलिसाची वर्दी घालून अनुभवलेले जग आणि स्त्री म्हणून घेतलेला जीवनानुभवर या दुहेरी भुमिकेतून बालिका ज्ञानदेव यांच्या कविता साकारतात. या कवितेला दाहक वास्तवाची जाणीव करून देतात. वर्दीच्या आत असणाऱ्या एका संवेदन स्त्रीचे भावविश्व त्यांच्या कवितेतून

साकार होत जाते. समाजामध्ये स्त्रीचे होणारे शोषण, तिची अवहेलना आणि वर्दीमधल्या बाईची होणारी कुचंबना हे या कवितांचे दुहेरी आशयसूत्र आहे.

*'बुलेटप्रूफ जाकीट आहे ना सोबत...सावधान!*
*मॅगझिनमधून गोळी सुटते आहे...*
*जशी या पुस्तकातून माझी कविता...'*

(मॅगझिनीतून सूटतेय गोळी, पृ. ७०)

शस्त्राच्या सामर्थ्यापेक्षा शब्दांचे सामर्थ्य अधिक असते. मॅगझिनमधून सूटणाऱ्या अवेगी व जीवनघेण्या गोळीप्रमाणे बालिकाची कविता आहे जी व्यवस्थेचा बुरखा फाडणार आहे. म्हणून ती शोषकांना सावधानतेचा इशारा देत आहे. बालिका ज्ञानदेव यांनी पोलिस खात्यातील अनेक अनुभवांना कवितेत शब्दबद्ध करून वर्दीतल्या जगण्यातली घालमेल कवितेत व्यक्त केली आहे. कवयित्रीचे जगणे, लढणे, घुसमटणे, भोगणे, सोसणे या कवितेत पारदर्शीपणे प्रतिबिंबित झाले आहे. एका पोलिस कॉन्स्टेबलच्या जगण्यातल्या घालमेली, ताणतणाव व्यक्त होताना समग्र पोलिस स्त्रियांच्या दु:खाची नोंद ही कविता घेते. महिला पोलिसांचे भावविश्व, त्यांच्या जगण्याची उलाघाल, त्यांची घुसमट आणि त्यांच्या जगण्यातले द्वंद्व बालिका ज्ञानदेव यांनी समर्थपणे 'मॅगझिनीतून सुटतेय गोळी' या कविता संग्रहातील कवितेतून व्यक्त केले आहे.

संजीवनी तडेगांवकर यांचे 'फुटवे' (२००७), 'अरुंद दारातून बाहेर पडताना' (२०११), 'संदर्भासहित' (२०१८) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. ग्रामीण जीवनातील स्त्रीचे भावविश्व संजीवनी तडेगांवकर यांच्या कवितेतून दिसून येते. समाजव्यवस्थेतील स्त्रीचे असलेले दुय्यम स्थान तसेच कुटुंबव्यवस्थेतही तिची होणारी अवहेलना संजीवनी तडेगांवकर यांना अस्वस्थ करते.

*'बाई उरते फक्त आगटीत भाजलेल्या*
*हुरड्याचे चवदार कणीस चोळून*
*फेकलेल्या खाकरीगत'*

(अरुंद दारातून बाहेर पडताना, पृ. ६४)

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या व कुटुंबव्यवस्थेच्या 'आगटीत' होरपळली जाणारी बाई तिच्या आयुष्याचे समर्पण देत सर्वांसाठी जगते पण तिची उपयुक्तता संपल्यावर तिची अवस्था हुरड्याचे कणीस चोळून फेकलेल्या खाकरी सारखे असते. बाईच्या जगण्याचं दाहक वास्तव कवयित्रीने मोजक्या तीन काव्यओळीत

मांडले आहे.

वृषाली किन्हाळकर यांचे 'वेदन' (१९९८) व 'तारी (२००४) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. स्त्री अर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व स्वयंभू असली तरी पुरुषसत्ताक वर्चस्वाने तिला गृहीत धरल्यामुळे तिला ज्या वेदनांना सामोरे जावे लागते त्या वेदनांचे विविध आयाम त्यांची कविता अधोरेखित करते.

*'तुमच्या तमाम इच्छांची ओझी वाहताना*
*मी विसरलेच होते*
*माझ्या पाठीला सुद्धा*
*ताठ होता येतं!'*

(वेदन, पृ. ३८)

स्त्री कितीही समर्पणाने आपलं आयुष्य पणाला लावत असली तरी ती भाबडी नक्कीच नसते. तिला तिच्या अस्तित्वाविषयी, क्षमतेविषयी सुजाण असते. जेव्हा तिला तिच्या समर्पणाला काहीच मोल नाही ही जाणीव होते तेव्हा तिच्या अस्तित्वशोधाची जाणीव अधिक तीव्र होते.

अर्चना डावखर यांचा 'अधांतरीचे प्रश्न' (२०१९) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेतील जैविक-सामाजिक-सांस्कृतिक संरचनेत स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. या स्थानातून निर्माण होणारे स्त्रीचे सनातन दुःख अनेक प्रश्न निर्माण करते. हे सारे अधांतरीचे प्रश्न असतात. प्रस्तुत कविता संग्रहात अर्चना डावखर यांनी समाजव्यवस्थेतून निर्माण झालेले स्त्रियांचे प्रश्न तर मांडलेलेच आहेत परंतु भारतीय संस्कृतीतील समाजव्यवस्थेत विधवा म्हणून जगताना जे भयावह प्रश्न सामोरे येतात त्या प्रश्नांतून निर्माण झालेली अस्वस्थता व दुःख मांडले आहे.

*'...आई म्हणायची*
*आईनं मुंड्या हातानं अन्*
*रिकाम्या कपाळानं करू नाही*
*स्वयंपाकपाणी*
*पारोश्या अंगानं वावरू नाही घरभर*
*हीच सांगीवांगी पुढे नेत मी ही*
*घालते आता*
*माझ्या पोरींच्या हातात बांगड्या अन्*
*रेखते कपाळावर*
*लाल रंग*
*शेताच्या बांधावरून जाताना हात*
*जोडून म्हणते*
*सतीआसरांना*
*येऊ नाही आपल्या वाट्याचं*
*लिखित लेकीबाळीच्या वाट्याला...'*

(अधांतरीचे प्रश्न, पृ. ९६)

कवितागत ‘मी’ आपल्यासारखं दु:ख लेकीबाळींच्या नशिबी येवू नये म्हणून बांधावरच्या साती आसरांना प्रार्थना करते. प्रस्तुत कवितेत बाई म्हणून जीवन जगताना व वैधव्याचे दु:ख भोगताना कवितागत ‘मी’चे बाई म्हणून असलेले दु:ख आणि आई म्हणून असलेले भय व्यक्त होते. संस्कृतीच्या पटावर बाईचं सौभाग्य तिच्या माणूस असण्याहूनही श्रेष्ठ समजले गेले आहे. राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले यांनी सतीची चाल, बालविवाह बंद करून स्त्रीच्या सामाजिक पटावरच्या स्थानाला माणूस म्हणून तिला पुरुषाच्या समान स्थान दिले असले तरी संस्कृतीच्या पटावर सामाजिक रूढीपंरपरा स्त्रीची अजूनही अवहेलना करीत आहेत. नागरी संस्कृतीपेक्षा ग्रामीण संस्कृतीत विधवांची अवस्था दयनीय असते. समाज एकविसाव्या शतकात असला तरीसुद्धा स्त्रीच्या अवहेलनेची नेमकी सल कवयित्रीने प्रस्तुत कवितेत अधिक नेमकेपणाने मांडली आहे.

मनिषा पाटील यांचे ‘पायवाटेवरील दिवे’ (२००२), ‘मातीविश्व’ (२०१५) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. स्त्री म्हणून जगताना आलेल्या जीवनजाणिवांचे विविध कंगोरे त्यांच्या कवितेतून आढळतात. आत्मशोध घेताघेता ही कविता समग्र स्त्रियांचे दु:ख व्यक्त करते.

*‘नसतेच सुंदर बाईपण*
*जाहिरातीत दाखवतात तसे*
*रापलेली बोट, टाचेच्या भेगा*
*साक्षीलाच असतात*
*तिच्या उन्हाळ्यांच्या*
*मनावर शिवेवर*
*अभावानेच सजतो*
*तिच्या स्वप्नांचा घरोबा*
*ॠतू पकडता आले नाही*
*तरी ती धावतच राहते*
*जगण्यामागे’*
(शब्ददीप, दिवाळी अंक, २०१९, पृ. ४७)

आयुष्यभर जगण्याचे उन्हाळे सोसलेल्या बाईचे सौंदर्य जाहिरातील्या बाईसारखे कृत्रिम व फसवे सौंदर्य असूच शकत नाही. तिची रापलेली बोटे आणि टाचेच्या भेगा यातून तिचे कुटुंबासाठीचे अपार कष्ट दिसून येतात. स्वत:कडे लक्ष द्यायला वेळ नसलेली ही बाई कुटुंबासाठी सर्वस्व अर्पण करते. अपार कष्ट करताना तिचं असोशीनं जगणं हेच बाईचं खरं सौंदर्य असतं.

सुचिता खल्लाळ यांचे ‘पायपोळ’ (२००७), ‘तहहयात’ (२०१५), ‘प्रलयानंतरची तळटीप’ (२०१८) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. सुचिता खल्लाळ यांच्या कवितांतून प्रकट होणारा कोलाहल जेवढा ‘स्व’ केंद्रित आहे तेवढाच ‘स्वेतर’ विश्वाशी, आपल्या भवतालाशी आहे. आजच्या काळात

स्त्रीला 'स्व'चे व्यक्तिकरण साधायचे आहे. 'अर्धनारीत्वा'च्या मर्यादित संकल्पनांचा व्यूह तिला तोडायचा आहे. संस्कृतीतील शोषित स्त्री प्रतिमेच्या मिथकीय धारणांना छेद देत आजच्या काळातील स्वभान जपणाऱ्या आधुनिक स्त्रीमनाचे स्पंदन या कवयित्रीच्या कवितेतून जाणवते.

*'तू शक्ती कोण्या शिवाची*
*तू प्रकृती कोण्या पुरुषाची*
*कोण म्हणे मस्तकावर धारण केली*
*कोणी म्हणे डाव्या बरगडीतून निर्मिली*

*त्यांनी पसरवल्या कहाण्या*
*सोयीस्कर आणि सुनियोजित*
*तू*
*न धरलेल्या*
*सफरचंदाच्या हट्टाच्या*
*तुझ्या*
*उडत्या पदाराच्या*
*ओठांवरच्या*
*विस्कटल्या सुरकुतीपासून*
*हुकलेल्या*
*ॠतुचक्राच्याही...*
*आदिमाये*
*तू एक योनी*
*चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या फेऱ्यातली*
*निघालेली प्रवासाला*
*योनिशुचितेकडून*
*योनिस्वातंत्र्याकडे*
*मोक्षधामाच्या'*

(प्रलयानंतरची तळटीप, पृ. ५६)

धर्मसत्तेचे व त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या तत्वज्ञान व संस्कृतीचे रचिते पुरुष होते. त्यामुळे पुरुषी वर्चस्व अबाधित ठेवणाऱ्या धर्म, संस्कृती, तत्वज्ञान याची निर्मिती त्यांनी केली. स्त्रीला दुय्यमत्व दिले गेले. विश्वनिर्मितीचा निर्माता पुरुषच आहे असे बिंबवले गेले. स्त्री केवळ मनोरंजनात्मक ठरवली गेली. स्त्रीचे निर्माण स्वतंत्र झाले हेसुद्धा त्यांनी दर्शविले नाही. हिंदू धर्माच्या मिथकात श्री नारायण ऋषीच्या मांडीतून उर्वशी येते तर खिस्ती धर्माच्या मिथकात ॲडमच्या बरगडीतून ईव्ह निर्माण होते. या मिथक रचने मागचे कटकारस्थान हेच की, स्त्री स्वतंत्रपणे निर्माण झाली नाही. पुरुषाच्या शरीराच्या अमुक तमूक अवयवातून ती निर्माण झाली. पुरुषाचे मनोरंजन करणे या हेतूस्तव तिला निर्माण केले गेले.

आत्मभान आलेली आधुनिक स्त्री आता या शोषित मिथकांना व त्यामागील डावपेचांना पुरते जाणून आहे. पारंपरिक धारणांना छेद देत योनिशुचितेकडून योनी स्वातंत्र्याकडे निघालेल्या या 'आदिमायेचा' अर्थातच स्त्रीत्वाचा प्रवास अस्मिता व आत्मभान जपणारा आहे.

माधवी यांचा 'कोरड्या मातीचे ओलेपण' हा कवितासंग्रह २०१८ साली प्रकाशित झाला. उत्कट, समर्पणशील व समजूतदार स्त्रीसंवेदन त्यांच्या कवितांतून ध्वनीत होते. व्यवस्थेत स्त्री म्हणून जन्माला आल्यानंतर जगण्याच्या दाहक वास्तवतेतून तावून सुलाखून बाहेर पडताना, स्वत:चा शोध घेताना एकूणच स्त्री असण्याच्या अस्तित्वाचा कवयित्रीने अर्थ शोधला आहे. आपल्या जीवनानुभवाचा तळ गाठीत स्त्री असण्याच्या जीवन प्रेरणांचे विश्लेषण या कवितांतून केले आहे.

*'वारंवार उद्‌भवणाऱ्या संसर्गाला औषधाची*
*काय गरज? शरीरच ॲन्टिबायोटिक्स तयार करतंय*
*तशीच... झालीय ती,*
*मानापमान, उणीदुणी, बोलणी*
*गृहीत धरलेल्या पण न झालेल्या चुका*
*आपल्याकडून परकेपणाची भावना*
*यादीतून कट*
*गुदमरणं रडणं कुढणं आऊट*
*अधिकच कणखर immune मन*
*भात तांदळाचा बनवायचाय, खड्यांचा नाही.'*

(कोरड्या मातीचे ओलेपण, पृ. १४)

स्त्री असण्याच्या जगण्यातून व घडण्यातून ध्वनीत झालेली विविध भावांदोलने माधवी यांच्या कवितेतून व्यक्त होतात. एका व्यापक सहसंवेदनेतून स्त्रीच्या जगण्यातील दु:खात्मकता या कवितेतून व्यक्त होते. परंपरागत स्त्रीत्वाच्या कोषातून स्त्री बाहेर आली असली तरीसुद्धा नव्या जाणिवेने, नव्या संवेदनांनी, नव्या संघर्षाला ती सामोरे जात आहे. जगण्याचा वेग इतका वाढला आहे की, बाईपणातून आलेल्या विविध भूमिका निभवताना तिच्या संघर्षाची धार इतकी वाढते की स्त्री स्वत:शी संघर्ष करत आपल्या अस्तित्वाचा अर्थ शोधते. स्त्री म्हणून जगतानाची घालमेल, अगतिकता, समंजसपणा, तिचे आशादायी मन, समजूतदारपणे स्वीकारलेले जगणे व त्यातूनही तिचे आत्मभान जपणे या कवितेतून अधोरेखित होते. अंतर्मुख होऊन वास्तवाचा समंजसपणे स्वीकार करणारे स्त्रीमन या कवितेत दिसून येते.

वृषाली विनायक यांचा कवितासंग्रह प्रकाशित नसला तरी त्यांनी विविध

नियतकालिकांतून काव्यलेखन केले आहे. स्त्री संवेदनेचे अंतर्मुख करणारे अनेक प्रश्न त्या आपल्या कवितेतून नकळतपणे उपस्थित करतात. त्यांची कविता स्त्री जीवनाचे आणि त्याला व्यापून असणाऱ्या अनेक भावावस्थांचे शब्दांकन करते. आपल्या कवितेतून अत्यंत संवेदनशीलतेने या कवयित्रीने जगण्यातल्या अनेक विभ्रमांना साक्षात केले आहे.

*'दोन पुरुषांच्या निवडीत*
*बाई अडकतेच कधीतरी*
*तेव्हा*
*व्यभिचार वगैरे*
*शिवतही नाही*
*तिच्या पारदर्शी जगण्याला.*
*आळीपाळीने दोघांशीही*
*ती करते संसार*
*मनातल्या मनात*
*कसलीच तारांबळ होत नाही*
*पांगळ्या स्वप्नांच्या शर्यतीत*
*ती हिंडते दोघांसोबत*
*मोर्चा, संमेलने, दवाखाना, फुटपाथ*
*चारित्र्याचा सनातन इतिहास*
*रिमूव्ह करत*
*मोकळी करते स्पेस*
*स्वत:च्या श्वासांसाठी*
*बाई शोधते स्वत:ला*
*दोघांच्या मैफिलीत*
*एकाचवेळी*
*पण*
*सांडत नाही*
*एकही अश्रू*
*आतल्या घालमेलीचा...*
*हरेक क्षण*
*बाई जगून घेते*
*ओबडधोबड*
*आतल्या आत*
*कारण वास्तवात*
*ती जाणून असते*
*दोन्ही किनाऱ्यांचा*
*कोरडेपणा !!!*

स्त्री भावविश्वाची विविध स्पंदने वृषाली विनायक यांच्या कवितेत प्रतिध्वनित होतात. 'दोन्ही' किनाऱ्यांच कोरडेपण अनुभवणारी बाई स्वत:च्या बाईपणाच्या कणखरतेला कुठेही ढासळू देत नाही. नात्याच्या दाहक वास्तवतेला ती समंजसपणे सामोरी जाते.

विशाखा विशाखा यांचा 'तुमुल अंतरीचे' हा कवितासंग्रह (२०१९) प्रकाशित आहे. अंतर्मनाचा कोलाहल, स्त्री-पुरुष नात्यातील तरल संवेदन, जगण्याचे वास्तव भान त्यांच्या कवितेतून दिसून येते.

*'मी ऑलिम्पिया*
*अन् तू अपोलो*

*नव्हतोच कधी.*
*सौंदर्याच्या इमानी व्याख्या तकलादू ठरवत*
*एकमेकांचं मनोपनिषद, देहोपनिषद अवगत केलंच आपण*
*मुठीतला निसर्ग एकमेकांना देऊ केला,*
*अट एवढीच की अटीशिवाय असावं अवकाश'*

(तुमुल अंतरीचे, प. ३५)

स्त्री-पुरुष नात्याचे तरल संवेदन उपरोक्त काव्यातून प्रतिबिंबित होते. सौंदर्याच्या इमानी व्याख्या तकलादू ठरवणारं प्रेमच चिरंतन असतं. स्त्री-पुरुषाच्या नात्याचे अनुबंध हे त्यांनी एकमेकांना दिलेल्या अवकाशावर टिकतात. नव्या पिढीची प्रेमविषयक जाणीव आणि एकमेकांचे अस्मिता जपणारी नातेसंबंधाची अपेक्षा उपरोक्त काव्यओळीतून प्रतिबिंबित होते.

सुप्रिया आवारे यांचा 'न बांधलेल्या घरात' (२०१९) हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. निर्भिडपणे अभिव्यक्त होणं हे नव्वदोत्तर कवयित्रींच्या कवितेत प्रकर्षाने जाणवते. नव्वदनंतर ते आजतागायत अभिव्यक्त होणाऱ्या कवयित्रींच्या प्रेमसंवेदनेत भाबडेपणा आढळून येत नाही.

*'पण कंटाळलं की दुसऱ्याच्या पोराला जीव लावावा तसं*
*प्रेम उडून जातं ट्विटरवरच्या पक्षाच्या पंखावर बसून*
*कबूतर जा जा जा म्हणत आपण बसून राहतो*
*रोमँटिक पोझ घेऊन*
*प्रेम असतो एक लोगो*
*उद्दीपित करणारा*
*अभावांना गोळा करत भावाचे डोंगर रचायला लावणारा'*

('न बांधल्या जाणाऱ्या घरात', पृ. १२०)

२००० नंतरच्या कवितेमध्ये जागतिकीकरण व माध्यम क्रांतीचा परिणाम अभिव्यक्तीवर झालेला दिसून येतो. मानवी नातेसंबंधातील व्यावहारिकता, दुरावा या कालखंडातील कवयित्रींनी अधिक नेमकेपणाने सूचित केला आहे याचे उपरोक्त कविता महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.

अनुपमा उजगरे, सुनिता झाडे, ललिता गादगे, योगिनी राऊळ, अस्मिता जोगदंड चांदणे, योगिनी सातारकर-पांडे, शोभा रोकडे, अनुजा जोशी, मनीषा साधू, स्वाती शिंदे-पवार, नीलम माणगावे, उर्मिला चाकूरकर, चैताली आहेर,

रचना, संध्या रंगारी, कविता मुरुमकर इत्यादी कवयित्री या कालखंडात लिहीत असल्याचे दिसून येतात.

'स्त्रीवाद' विचारप्रणालीच्या छटा २१ व्या शतकातील स्त्री लिखित कवितेच्या आशयाभिव्यक्तीत दिसून येतात. स्त्रीवाद हे तत्वचिंतन केवळ पाश्चात्त्य संदर्भ असलेले तत्वचिंतन नाही तर या तत्वचिंतनाला वैश्विक संदर्भ आहेत. या स्त्रीवादाने अनेक देशातील स्त्रियांच्या जगण्याची दखल घेऊन त्या जगत असलेल्या सामाजिक व सांस्कृतिक प्रतिमानांमध्ये असणारी विषमता, हिंसा, अन्याय याचे निर्मूलन करून परिवर्तनवादी विचारविश्वाशी या स्त्रीवादी सिद्धांतनाला जोडले आणि स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवाद हे जसे तत्त्वचिंतन आहे तशी ही विचारप्रणालीही आहे. एक निश्चित की, या सगळ्यांचा परिणाम साहित्य-कलांच्या अभिव्यक्तीवरही मोठ्या प्रमाणावर झाला. रूढीपरंपरेच्या जोखडात बंदिस्त असलेली स्त्री अधिक मुक्तपणे व्यक्त होऊ लागली. स्त्रीवादी कविता आणि स्त्रीकेंद्री कविता ही सीमारेषा धूसर असली तरी स्त्रीकेंद्री कवितेने स्त्रीच्या जगण्याचे, सोसण्याचे, भोगण्याचे चित्र मोठ्या प्रमाणात शब्दांकित केल्याचे दिसून येते. स्त्रीवादी जाणिवेच्या कवितेने पारंपरिक मूल्यकल्पनांना विरोध केल्याचे दिसून येते. जातीय व वर्गीय भान या कवितेत अधिक टोकदारपणे दिसून येते. स्त्री परिप्रेक्ष्यातील समकालीन वास्तव या कवितेने पारदर्शीपणे मांडले. याचा प्रत्यय २१ व्या शतकातील स्त्री लिखित कवितेत येतो.

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे समाजव्यवस्थेत फार मोठे स्थित्यंतर घडून आले. या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि संस्कृतिकदृष्ट्या घडून आलेल्या स्थित्यंतरामुळे समाज मोठ्या प्रमाणात ढवळून निघाला. या संपूर्ण घडामोडीचा परिणाम २००० नंतरच्या मराठी कवितेवर झालेला दिसून येतो. या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवी-कवयित्रींनी कवितेतील प्रतिमासृष्टीच्या उपयोजनाकरीता जागतिकीकरणातील बोलीभाषेचा मोठ्या कुशलतेने वापर केला आहे. जागतिकीकरणाची कविता ही माध्यमक्रांतीच्या परिणामांचा वेध घेणारी कविता ठरली आहे. मानवी मूल्यांची घसरण व नाते संबंधातील दुरावा याचे वेधक चित्रण या कवितेतील प्रतिमासृष्टीद्वारे घडविले गेले आहे. जागतिकीकरणाची समकालीन कविता आशय, विषय व रचनाशैलीच्या दृष्टीने निराळेपण सिद्ध करणारी आहे. मराठी कवितेची रुळलेली भाषा जाणीवपूर्वक उल्लंघून या कवितेने उपरोध व उपहासाच्या साहाय्याने बदलत्या वर्तमानाचा

आलेख रेखांकित केला आहे. २१ व्या शतकातील स्त्री लिखित मराठी कवितेत जागतिकीकरणाचे संवेदन दिसून येते.

संस्कृतीच्या पटावरचा स्त्री दु:खाचा, शोषणाचा व दमनाचा आलेख चढताच आहे. पूर्वी सतीच्या चालीत भाजली जाणारी स्त्री आता ॲसिड हल्ला करून भाजली जात आहे. जागतिकीरणाच्या काळातही जुनीच दु:खं व शोषणाचे व्यूह नव्या रूपात येऊन स्त्रियांचे शोषण आजही सुरू आहे. पूर्वी अप्सरेच्या (मेनका) रूपात केलेले हनी ट्रॅपिंग आताच्या युगाचे दुधारी शस्त्र होत आहे. पोर्नोग्राफी व ड्रग्जच्या जाळ्यात स्त्रियांना अडकविले जात आहे. सनातन काळापासून स्त्री ही सत्तेच्या हातातील बाहुली आहे. जिचा वापर अमिष दाखविण्यासाठी व कटकारस्थांने रचण्यासाठी पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत लीलया केला जात आला आहे.

तमाशाच्या फडात नाचवली जाणारी स्त्री डान्सबार मध्ये नाचवली जात आहे. जागतिकीरणाची पार्श्वभूमी असलेल्या समकालीन सांस्कृतिक पर्यावरणात नव्या प्रश्नांचे जळवे बाईपणाचे सत्व शोषू पाहत आहेत. अशा दाहक वास्तवातून या समकालीन कवयित्री समवेदनेतून लिहित आहेत. हे जितके कठीण आहे तितके कौतुकास्पदही.

इ-मेल : kavitaneel17@gmail.com
मो. ९८२२०२९३१८

* * * * *

# २१ व्या शतकातील स्त्रियांचे कथालेखन

**- डॉ. अनिरुद्ध मोरे**

मानवी स्वभाव हा मुळात गोष्टीवेल्हाळ आहे. गोष्टींचा संबंध अगदी भाषेच्या जन्मासोबत आपल्याला जोडता येतो. लोकजीवनात रुजलेल्या मौखिक परंपरेतील कहाणी, गोष्ट, दृष्टांत, आख्यान, कीर्तन या रूपात गोष्ट दिसते. भाषिक माध्यमांच्या निर्मितीपासूनच आई/आजी बाळाला गोष्टीरूपाने संवाद साधत आली आहे. याचा अर्थ गोष्टीची सुरुवात प्रत्येकाच्या आयुष्यात स्त्री कथन परंपरेतून झालेली दिसते.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. असं आपण ढोबळ विधान करतो. मग या समाजामध्ये स्त्री आणि पुरुष दोघेही अनुस्यूत आहेत. असं असतानाही स्त्रियांचे साहित्य आणि पुरुषांचे साहित्य असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा हा भेद लिंगाधिष्ठित (Gender) असतो. साहित्य हे साहित्य असते, मग ते स्त्रियांचे असो किंवा पुरुषांचे, पण असे होताना दिसत नाही. याची कारणं सामाजिक आणि सांस्कृतिकतेत आहेत. याविषयी आपलं मत नोंदविताना ज्येष्ठ साहित्यिका व समीक्षक नवनीता देव सेन म्हणतात, 'इन ऑर्डर टू मेक द फुलेंस्ट युज ऑफ अवर टॅलेंटस...वूई वुमन रायटर्स नीड टू बी अँड्रॉगायनस इन अवर हार्टस. वुई नीड टू फॉलो हर गौरी इमेज अॅज य अवर मोटो. ग्रेट आर्टस डिमांड अँड्रॉगायनी. इट्स वन थिंग टू बी जेंडर कॉन्शस, अनादर टू बी जेंडर बाऊंड.' (उद्‌धृत - संजय आर्वीकर) स्त्री आणि पुरुष यांच्या साहित्याकडे एकाच व निखळ दृष्टिकोनातून न बघता स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाशी तिचे साहित्य जोडले जाते, तर पुरुषांच्या बाबतीत मात्र असे होत नाही. यामुळेच पुरुषांच्या साहित्यातून जो एक मुक्तपणा दिसतो तो स्त्रियांच्यात फारसा दिसत नाही. स्त्रीवादाने मात्र या परंपरेला काहीसा छेद देत 'स्त्री' अनुभवाच्या अभिव्यक्तीचा स्वतंत्रपणे विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

'स्त्री'ची माणूस म्हणून जगण्याच्या हक्कासाठीची धडपड मराठी साहित्यात उमटू लागली ती प्रामुख्यानं १९६० पासून. या संदर्भाने १९८० ते १९९० हा काळ खास कथेचा होता. कमल देसाई, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष यांनी लेखिका म्हणून स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या अवहेलनेच्या संदर्भात

साहित्यकृतीतून हे भान व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर पुढील स्त्रीवादाची रुजवणूक करणे सोपे झाले. यानंतरच्या पिढीतील गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, उर्मिला पवार यांनी स्त्री मनाची स्वतंत्र 'व्यक्ती' म्हणून नोंद घेतली.

एकविसाव्या शतकाला सुरुवात होऊन आता वीस वर्ष झाली आहेत. या वीस वर्षातील स्त्री लेखिकांच्या कथांचा विचार करताना जागतिकीकरणामुळे झपाट्याने बदलणाऱ्या सभोवतालचा या लेखिका कसा विचार करतात? कोणते संदर्भ त्याची कथा आत्मसात करते? मागील पिढीतील स्त्रीवादी व स्त्रीकेंद्री साहित्याने स्त्री स्वातंत्र्याच्या संदर्भाने मांडलेला काहीएक विचार किती आत्मसात करते? तो कशा पदधतीने मांडते? कथेच्या संदर्भात मागील पिढी पेक्षा एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न झाला आहे का? या संदर्भाने थोडक्यात आढावा आणि काही निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

काळ ही मोठी गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. कॅलेंडर बदलले म्हणजे वर्ष बदलत नाही तद्वतच एकविसाव्या शतकातील स्त्री कथाकार यांचा विचार करताना बदललेला काळ लगेच साहित्यामध्ये उमटतो किंवा नवीन कथाकार अवतरतात असे नाही. तर आधीच्या कथालेखिकांचेही लेखन सुरूच असते. याही काळात ते आहे. २१व्या शतकातील स्त्री लेखिकांच्या कथा लेखनाचा विचात करतांना आधीच्या लेखिकांनी निर्माण केलेले मानदंड महत्त्वाचे आहेत. हे गृहीत धरून या काळात आलेल्या त्यांच्या कथांचा थोडक्यात विचार केलेला आहे.

एकविसाव्या शतकाच्या काळाला जोडणाऱ्या गौरी देशपांडे यांनी स्त्रीला व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले व उच्चमध्यमवर्गीय जीवन कथांमधून रेखाटले. गौरी देशपांडे यांची पार्श्वभूमी या अर्थाने जाणून घेणे गरजेचे आहे. थोर समाजशास्त्रज्ञ इरावती कर्वे या गौरी देशपांडे यांच्या आई आहेत, स्त्री स्वातंत्र्याचे उदगाते महर्षी धोंडो केशव कर्वे हे गौरी देशपांडे यांचे आजोबा आहेत, तर 'समाजस्वास्थ्य' या लैंगिक शिक्षण देणाऱ्या मासिकाचे संपादक र. धों. कर्वे हे त्यांचे चुलते आहेत. आजोबा आणि चुलते यांच्या पुरोगामी विचारांची एक पार्श्वभूमी असल्यामुळे स्त्रियांची व्यक्ती म्हणून होणारी घुसमट त्यांनी ताकदीने मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नायिकाप्रधान कथेने स्त्री भोवतीची सांकेतिकता दूर करून माणूस म्हणून तिची ओळख करून दिली.

स्वत:च्या अस्तित्वाचे भान व्यक्त करणारी स्त्री त्यांनी रेखाटली. स्त्री-पुरुष संबंधातील संपूर्णपणे अपारंपरिक विचार त्या आपल्या कथेमधून मांडतात.

विजया राजाध्यक्ष या मध्यमवर्गीय सामाजिक व सांस्कृतिक स्त्री जीवनातील विविध स्थित्यंतरे कथेच्या माध्यमातून दाखवितात. कोणत्याही विचारप्रणालीच्या चौकटीत बंदिस्त न होता त्यांनी स्वतंत्र कथालेखन केलेले आहे. त्यांच्या कथेमधून स्त्रीचे सामाजिक, सांस्कृतिक अनुभव, वयाच्या विविध टप्प्यावरील तिची भूमिका, नात्यातील चढ-उतार त्या दाखवितात. निसर्गाने स्त्रीला दिलेल्या निर्मितीशिलतेचे त्यांना विशेष आकर्षण आहे. जन्म, मृत्यू, वृद्धावस्था, एकाकीपण यांचा शोध त्या सतत घेत राहतात. या शतकामध्ये त्यांचे दोन कथासंग्रह आलेले आहेत. 'समांतर' (२०००), आणि 'आधी...नंतर' (२००१), या कथासंग्रहामधून त्या आत्ममग्नतेकडून सामाजिक प्रश्नांकडे अधिक सजगतेने बघताना दिसतात.

उर्मिला पवार या आंबेडकरी चळवळीतल्या सक्रिय कार्यकर्त्या आहेत. अलीकडेच आलेल्या 'आयदान' या आत्मचरित्राने त्या विशेष ओळखल्या जातात. या शतकात आलेला 'हाताचा एक' हा कथासंग्रह २००४ मध्ये प्रकाशित झाला. उर्मिला पवार या विचार प्रकटिकरणासाठीचे माध्यम म्हणून कथेचा वापर करतात. वर्तमान दलित संवेदना आणि कष्टकरी स्त्रियांचे आयुष्य हे त्यांच्या कथांचे विषय होतात. असे असले तरी त्यांच्या कथा कलात्मक तटस्थतेने स्त्रियांच्या दु:खांना सामोरे जातात.

अतिशय धीट आणि धारदार असं लेखन करणाऱ्या मेघना पेठे यांचा मागील शतकातील 'हंस अकेला' (१९९७) आणि या काळातील 'आंधळयाच्या गाई' (२०००) हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. स्त्रीकेंद्री आशयसंपन्न कथा त्यांनी लिहिली. एकूण समाज व्यवस्थेकडे त्यांचा बघण्याचा दृष्टिकोन न-नैतिक स्वरूपाचा आहे. मानवी संबंधांच्या गाभ्याकडे घेऊन जाण्याची त्यांची धडपड आहे. स्त्री-पुरुष संबंधाच्या तळाशी साचून राहिलेली अगतिकता, एकटेपणा, दु:ख, हताश, कोंडमारा त्या कथेमधून टिपतात. वैचारिक भूमिकेतून प्रसृत करताना उपहास आणि नर्मविनोद त्यांच्या कथेमध्ये असतो. 'आंधळयाच्या गाई' हा पाच कथांचा संग्रह 'एक न-नैतिक बघ्या' मधून बालपण हरवलेला एक प्रौढ व्यक्ती कुत्र्याबरोबरच्या संवादातून उभा केला आहे. वर्तमानात माणसांची निष्ठा कमी झाल्याचे हे उपरोधिक भाष्य आहे. प्राणी माणसांपेक्षा जवळचे वाटू

लागले आहेत, ही वर्तमान वास्तवता आहे. 'आये कुछ अभ' मधून एकीकडे स्वत:तच रमणारा, मौजमजा करणारा नवरा, तर दुसरीकडे संसाराचा गाडा ओढून मानसिक कोंडमारा झालेली बायको, तर तिसरीकडे नवऱ्यासोबत पूर्वी लिव इनमध्ये असणारी, आता स्वत:च्या टर्मवर आयुष्य जगणारी, कॅपेबल व मुक्त जगणारी प्रेयशी या सगळ्यांची कथा आहे. पारंपरिक लग्नापेक्षा लिव इन मध्ये राहणारी, माणूस म्हणून नैसर्गिक स्वातंत्र्य घेऊन जगणारी स्त्री दिसते. पारंपरिक चौकटीत अपारंपरिक पात्रांची निर्मिती हे मेघना पेठे यांच्या कथेचे वैशिष्ट्ये आहे. पेठे यांची पात्रं भावभावना, इच्छा-आकांक्षा, शरीरमनातील उर्मी, स्पंदनं, कामप्रेरणा या नैसर्गिक भावनांना बेधडकपणे सामोरी जातात.

प्रिया तेंडुलकर यांनी चित्रपटाची मोहमयी दुनिया, पंचतारांकित हॉटेल आणि मध्यमवर्गीय महानगरीय स्त्री जीवन कथेतून टिपले आहे. तेंडुलकरांच्या कथेत कुटुंब, लग्न, संसार, प्रेम, आईबाप, सामाजिक प्रतिष्ठा या साऱ्याच बाबतीत भ्रमनिरास झालेली स्त्री भेटते. 'ज्याचा त्याचा प्रश्न' मधून ज्याने त्याने, त्याचे त्याचे प्रश्न सोडवायचे असतात, हे दाखविले आहे. 'जन्मलेल्या प्रत्येकाला' (२००१) या संग्रहातील 'वारे' या कथेमधून कॉर्पोरेट जगतात स्थान निर्माण करणारी रेणुका पाटील भेटते, तर 'जावे तिच्या वंशा' (२०००) मधील 'अनुची आई' कथेतील प्रौढत्वाकडे झुकणारी आई आणि तारुण्यात पदार्पण करणारी मुलगी यांचे चित्रण आले आहे, तर अगदी अलीकडे २०१५ साली प्रिया तेंडुलकर यांच्या असंग्रहित कथांचा ललित प्रकाशनने प्रसिद्ध केलेला 'तिहार' या कथासंग्रहात वेगवेगळ्या पातळीवर जगणाऱ्या व आपल्या क्षेत्रात नावाजलेल्या स्त्रियांच्या कथा आहेत, यातील कोणी वकील, राजकारणी, सामाजिक बंधने न पाळणाऱ्या अशा असूनही त्या प्रथम स्त्री आहे, नंतर आई, पत्नी, मुलगी आहे. स्त्रियांचे अंतरंग उलगडून दाखवणारा हा कथासंग्रह आहे.

आशा बगे यांच्या 'भूमी' कादंबरीला २००६ चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेला आहे. परंपरा आणि नवता यातील सूक्ष्म गुंत्याचे भान बगे यांना आहे. कुटुंब, कुटुंबातील नातेसंबंध याविषयी त्यांना कुतूहल आहे. याबरोबरच संस्कृती, रूढी, परंपरा, सामाजिक, धार्मिक चालीरीती यांचेही चित्रण त्या करतात. जीवनातील अनुभवापलीकडील अज्ञात, अनपेक्षित असे काहीतरी त्यांच्या कथेमधून बघायला मिळते. आपल्या शैलीदार लेखनाने त्या स्वत:चे विश्व उभे करतात. स्त्री जीवनाचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून व वेगवेगळ्या

अंगांनी विचार करण्णे हा त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. कथेतील अनुभवविश्व मध्यमवर्गीय कुटुंबाभोवती फिरणारे असले तरी त्यातील मांडणी वेधक, वेचक व विचार करायला लावणारी असते. त्यांना असलेल्या संगीताच्या आवडीमधून निवेदनातील त्याचे संदर्भ सातत्याने येत राहतात. संवेदनशीलता आणि चिंतनशीलता हा त्यांच्या कथेचा विशेष म्हणून नोंदवता येईल.

अरुणा ढेरे यांचा या काळातील 'मन केले ग्वाही' हा कथासंग्रह २००१ साली प्रकाशित झाला. साहित्य जगतामधील व्यक्तींचे परस्पर संबंध, सृजनजनांचे पेच त्या कथेमधून मांडतात.

प्रतिमा जोशी या सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय असल्यामुळे त्यांच्या कथेतील अनुभवविश्व सामाजिक अंगाने येते. समाजाच्या परिघावर वावरणाऱ्या माणसांचा त्या विचार करतात. विशेषत: वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांकडे तुच्छतेने न बघता त्या व्यक्ती म्हणून त्यांच्या जगण्याची परवड कलात्मक तटस्थतेने रेखाटतात. याबरोबरच कष्टकरी, दलित, वास्तवासंबंधीची त्यांची जाण तीव्र व सहानुभूतीपूर्वक आहे. कथेतील निवेदक न-नैतिक असून तो परंपरेतील नैतिकतेपेक्षा माणसामाणसातील नैतिकता महत्त्वाची मानतो.

२१व्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रियांचे कथालेखन काहीसे मंदावलेले दिसते. जागतिकीकरणाचे म्हणावे तसे पडसाद किंवा सभोवताल समजून घेण्यापेक्षा मागील एक दोन दशकांचेच पडसाद पुढे उमटताना दिसतात. या दशकाच्या वीस वर्षांमध्ये तीन-चार नावे मात्र आश्वासकता निर्माण करणारी आहेत. त्यामध्ये नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा दया पवार आणि मनस्विनी लता रवींद्र यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

यातील नीरजा आणि प्रज्ञा पवार या मुळात कवयित्री आहेत, मोनिका गजेंद्रगडकर यांनीही कविता लिहिली परंतु त्या विशेष अभिव्यक्त झाल्या कथांमधून. आणखीही एक साम्य या तीनही कथा लेखिकांमध्ये आहे. ते म्हणजे त्यांची वाङ्मयीन पार्श्वभूमी. या तिघींनाही लेखनाचा वारसा घरातूनच मिळालेला आहे. ज्येष्ठ समीक्षक म. सु. पाटील यांची नीरजा या कन्या आहेत, प्रसिद्ध लेखक विद्याधर पुंडलिक यांच्या मोनिका या कन्या आहेत, तर प्रसिद्ध कवी दया पवार यांच्या प्रज्ञा या कन्या आहेत. एक गोष्ट मात्र नमूद करावी लागेल ती म्हणजे, वरील लेखिकांना समृद्ध लेखनाचा वारसा जरी मिळालेला

असला तरी त्यांनी स्वकर्तृत्वाने साहित्यामध्ये स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.

नीरजा यांचे आजपर्यंत 'जे दर्पणी बिंबले' (२००१) 'ओल हरवलेली माती' (२००६), 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' (२०१२) आणि 'अस्वस्थ मी अशांत मी' (२०१८) हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. नीरजा यांनी स्त्रीवादाचा सांकेतिक स्वीकार न करता त्या स्त्रीलक्षी भूमिकेतून लेखन करतात. याविषयी त्यांची स्वत:ची स्वतंत्र विचारसरणी आहे. एका मुलाखतीमध्ये त्या म्हणतात, 'मला स्वत:ला पुरुष नाकारणारा स्त्रीवाद मान्य नाही. मी ज्या स्त्रीवादाविषयी बोलत असते त्याविषयी मी म्हणेन की, आपण एक स्वतंत्र व्यक्ती आहोत, आपले स्वत:चे असे एक व्यक्तिमत्त्व आहे, स्वत्व आहे. याची जाणीव होणे यालाच स्त्रीवाद म्हणता येईल का? आपल्यावर जे अन्याय झाले आहेत, स्त्री म्हणून दुसऱ्या स्थानावर फेकले गेल्यावर आपलं शोषण होत आहे याची जाणीव होणं, त्या विरोधात आवाज उठवण्याचं बळ येणं, आपल्या रतिप्रेरणांविषयी मोकळेपणानं बोलणं आणि स्वत:चा आदर करतांना तो दुसऱ्यांनीही करायला हवा याची त्याला जाणीव करून देणारी व्यक्ती म्हणून सन्मान मिळवणं.... माझ्या स्त्रीवादाच्या संकल्पनेत स्त्री-पुरुषांनी एकमेकांच्या विचारांचा, भावनांचा, निर्णयांचा, स्वातंत्र्याचा आदर करणे यावर प्रामुख्याने भर असतो'. (स्त्री. लि. म. क, पृष्ठ-५१०) स्त्री पुरुषांविषयी समान व संवादी भूमिका त्यांची आहे. अतिशय निर्भय आणि खुली जीवनदृष्टी ठेवून त्या अनुभवाला भिडतात.

नीरजा यांच्या कथेतील स्त्रिया स्वत्व शोधाच्या प्रवासाला निघालेल्या आहेत, त्यामध्ये 'जवळ तरी दूर' कथेतील माई असो, 'सावर रे' मधली मानसी असो, 'ओल हरवलेली..' मधली माई असो, पाच महिने तेवीस दिवस' मधली वंदना असो किंवा 'पार्टी' मधली रंजना असो यातील प्रत्येक स्त्रीचं आयुष्य वेगळं आहे, आत्मसन्मान व स्वसंरक्षणाची जाणीव असणारी कृतिशील व खंबीर मनाची स्त्री त्यांच्या कथांमधून त्या दाखवितात.

समाजामध्ये दिसणारे वेगवेगळ्या प्रकारचे क्रौर्य नीरजा यांच्या कथेमधून येते. 'विटाळ' कथेत वेड्या रमाशी रोज केलेल्या शरीरसंबंधामुळे ती गर्भवती राहते. काय करावं हे न कळल्यामुळे तीन चार महिन्याच्या गर्भारपणात सदानंद तिच्यावर रोज बलात्कार करून तिचा गर्भ पडतो, तर 'जवळ तरी दूर' मध्ये अण्णा माईंना मारत नाहीत, पण वर्षानुवर्ष अबोला धरतात हे भीषण असं

मानसिक क्रौर्य येतं. त्यांच्या कथेतील स्त्रिया रतिभावनेविषयी मोकळेपणाने बोलतात. 'ओल हरवलेली माती', 'माय लॉर्ड', 'उशीर होताना', 'रत्नप्रभा जाधव..' या सारखा कथांचा उल्लेख यासंदर्भात करता येईल. गृहीत धरणाऱ्या पुरुषांना कथेतील स्त्रिया नीट करतात, 'उशिर'मधली नायिका यादव सारखा पुरुष तिची लैंगिक गरज भागवतो म्हणून त्याला तोडायलाही कमी करत नाही, तर 'पुनरपि मरणं' मधली नायिका सडेकर, 'दोघी' मधली सावित्री आणि मीरा स्वत:मध्ये वैचारिक बदलही घडवून आणतात.

नीरजा यांच्या कथेतील स्त्रिया परंपरेने स्त्रीवर लादलेल्या किंवा गृहीत धरलेल्या त्याग, समर्पण, वात्सल्य, ममता, प्रेम अशा भावनांच्या आहारी जात नाहीत. उलट अशा परिस्थितीत त्या त्यांच्या मनासारखंच वागतात. 'महिषासुरमर्दिनी' मधली सती, साधी पोळ्या लाटणारी बाई पण आपला नवरा एक्सचेंज ऑफर मध्ये काढता येईल का? आणि हवा तसा मिळेल का? असा विचार करून त्यांचा मन:पातळीवर आनंद घेते. नीरजा यांच्या कथेतल्या स्त्रिया

आत्मभान आलेल्या आहेत. त्या स्वसंवाद साधतात, जगण्याविषयी, स्वत:च्या स्थानाविषयी, य्यमत्वाविषयी विचार करतात, व्यथित होतात, जमेल तसं परिस्थितीशी लढतात, 'पुनरपि मरणं' मधली नायिका सडेकर मूल जन्माला न घालण्याचा निर्णय घेते. ओल हरवलेली माती मधली। फातिमाबी पुरुषाशिवाय उभी राहते.

मानवी संबंधातील खोल जाणीव नीरजा यांना आहे. स्त्री-पुरुष नात्यातील अनेकविधता, गुंतागुंत, त्यातील संदिग्धता यांचा वेध त्या घेऊ बघतात. विवाहसंबंधाच्या चौकटीपलीकडील स्त्री-पुरुष संबंधांचे वास्तव त्या टिपतात. अतिशय संवेदनशीलपणे, सहानुभूतीने व समतोल दृष्टी ठेऊन त्यांनी जीवन दर्शन घडविले आहे. प्रयोगिकतेपेक्षा कथेच्या गरजेमधून कथानक घडत जाते. कथेतील निवेदक तृतीय किंवा प्रथमपुरुषी असला तरी तो अनेक वेळा तटस्थ पद्धतीने भाष्य करतो. नीरजा यांची लेखनशैली अतिशय धीट आणि तीक्ष्ण स्वरूपाची असून माणसं आणि त्यांची प्रवृत्ती त्यामध्ये केंद्रीभूत असते.

मोनिका गजेंद्रगडकर यांची या काळातील सशक्त कथाकार म्हणून नोंद घेता येईल. त्यांचे 'भूप' (२००४) 'आर्त' (२००८) आणि 'शिल्प' असे तीन कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. (त्या मौजच्या सहाय्यक संपादक पदी कार्यरत आहेत) साहित्याकडे पाहण्याचा त्यांचा खोल आणि समंजस दृष्टिकोण आहे. यामुळेच कुठल्याही वादाच्या (इझमच्या) चौकटीत न अडकता त्या

लेखनात स्वत:ची स्वतंत्र वाट निर्माण करतात. स्त्री केंद्रित कथा लिहन त्यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. घटना आणि पात्रांचे केवळ काळे-पांढरे चित्रण न करता त्या तटस्थपणे कथालेखन करतात. त्यांच्या बहुतांश कथांमध्ये विलक्षण असा हळवा कोपरा सापडतो. यामागे भावाच्या अकाली जाण्याची एक भळभळती जखम त्यांच्या काळजात खोलपर्यंत रुतलेली आहे. असे त्या आपल्या मुलाखतीत म्हणतात. हा हळवा कप्पा त्यांच्या 'भूप, आणि 'आर्त' या दोन्हीही कथासंग्रहामधून दिसून येतो.

व्यक्तीचे सक्ष्म अवलोकन, मन:पातळीवर घडणाऱ्या अनेक प्रसंगांची नेमकी जान यामळे त्यांच्या कथेतील पात्र शारीरिकतेपेक्षा अंत:संवाद साधणारी असतात. आपल्या चुकांचा, स्वभावाचा ठाव घेणारी असतात. स्वत:च स्वत:ची तपासणी करत जाणारी असतात. 'व्रण' कथेतील गायत्री बलात्कारासारखी घृणास्पद घटना घडूनही त्रागा करत नाही, अभिनिवेशाने ओरडत नाही, आपली घुसमट जगासमोर मांडत नाही, तर त्या व्रणाचा आधार घेत उभं राहते. या कथेतील रेवा, रेवाची आई यांनाही आत्मभानाची जाणीव आहेच. गायत्री स्त्रियांचे प्रश्न सोडवणारी, त्यांच्या अवघड जगण्याची उत्तर शोधणारी आजची स्त्री आहे. स्त्रीचं जात्याचं चिवट व जगण्याची कणखरता असलेलं व्यक्तिमत्व त्या कथेमधून दाखवितात.

त्यांच्या कथेतील स्त्री आणि पुरुष दोघांच्याही वाट्याला समान दु:ख येते. पुरुष पात्रांमध्ये गायक, लेखक, चित्रकार, शिल्पकार असे कलावंत व सर्वसामान्यही भेटतात. अहंपणा, मनस्वीपणा, दांभिकपणा यामधून पुरुषत्वाचा पीळ त्या दाखवितात. त्यांच्या पात्रांच्या दु:खाची मूळं त्यांच्या स्वभावात असतात. 'भूप' मधील अवधूतपंत गायन कलेशी मुलाने बांधून घ्यावे या स्वत:च्या हट्टापायी स्वत:ची शोकात्मिका करून घेतात. कलावंत आणि माणूस या एकाच व्यक्तिमत्वात अंतर्भूत असलेल्या दोन व्यक्तिमत्त्वाचे द्वंद्व त्या दाखवतात.

वेगवेगळ्या अनुभवांना गोचर करणारी गजेंद्रगडकर यांची कथा खोल जाणिवांच्या अरूपातून कथेला रूप देते. 'शरीर', 'धर्म' आणि 'श्रद्धा' या मुस्लिम धर्मीय वातावरणातल्या कथा आहेत. 'श्रद्धा' मधली यशोदा हिंदू आहे पण ती पुरोगामी मुस्लिमाशी लग्न करते, तिच्या दोन मुलांपैकी एक कट्टर धर्मवादी होतो आणि घरात भिंती निर्माण करतो. 'शरीर' कथेतून स्त्रियांच्या दु:खाची जातकुळी एकच असल्याचे त्या दाखवितात. धर्म बदलला तरीही पुरुष

व्यवस्थेचे शोषण बदलत नाही. 'शरीर' ही कथा एका मुस्लीम पुरुषाच्या आयुष्यातील या तीन बायका व एक मुलगी अशा चार स्त्रियांच्या संदर्भातील आहे. श्रद्धेभोवती धर्म एकवटून नवरा वाटून घ्यायला धर्माची मान्यता मिळते हे स्त्रीच्या स्त्रीत्वाला गृहीत धरण्यासारखे आहे. याचे चित्रण या कथेमधून येते.

गजेंद्रगडकर यांच्या कथेमधून काही मतिमंद मुलांच्या आयुष्यावरील कथा येतात. 'आधार' मधील मतिमंद देवेन आपल्या चित्रकार मामाच्या सृजनशीलतेला शारीरिक आधार देत कलेसाठी प्रेरणा देत राहतो. 'अर्थ' मधला गणेश मरता मरता मुलीचे दुःख सोसत जगणाऱ्या वीणाला खऱ्या जगण्याचा अर्थ सांगून जातो, 'जाणीव' मधली मतिमंद ऋचा वडिलांकडून आईवर होणाऱ्या शारीरिक-मानसिक शोषणाविरुद्ध जगण्यासाठी आईला आतला आवाज मिळवून देते, तर 'अमलताश' मधील नकुलला त्याच्या बुद्धीच्या बदल्यात गाणं मिळाल्याचं त्याची आजी समजते. समाजामध्ये असणारी मतिमंद मुलं आणि त्यांचं भावविश्व यावर या कथा प्रकाश टाकतात.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा तोंडवळा काहीसा जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेसारखा वाटतो. मात्र आधीच्या व समकालीन कथालेखिकांपेक्षा त्यांनी स्वत:ची वेगळी वाट निर्माण केलेली दिसते. मोनिका गजेंद्रगडकर यांना असलेल्या संगीताची आवड व विविध कलावंतांचे आकर्षण कथांमधून सतत पाझरत राहाते.

प्रज्ञा दया पवार यांचा 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रह २०१० मध्ये प्रकाशित झाला. कवयित्री म्हणून त्या विशेष परिचित आहेत. याशिवाय वर्तमान ज्वलंत विषयावर त्यांचं 'धादांत खैरलांजी' सारखं नाटकही लिहिलं आहे. 'अफवा खरी ठरावी म्हणून' या पहिल्याच कथासंग्रहाने कथाकार म्हणून त्यांच्याविषयी अपेक्षा वाढविल्या आहेत. दलित जाणिवेच्या गावपातळीवरील वास्तवापासून ते महानगरीय पातळीवरील स्त्रियांच्या जगण्याची घुसमट त्या मुखर करतात. आपला भोवताल कथेमध्ये आणू पाहतात, व्यापक जाणीव असलेली त्यांची कथा आहे. त्यांच्या कथेची संरचना पारंपरिकतेपेक्षा वेगळी आहे. वर्तमान सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा वापर त्या कथेसाठी करतात. महानगरीय बदलातील जगण्याला त्यांची कथा भिडते. 'एक्झिट-१' कथेमधली मीता अभिनेत्री आहे, तिच्या कर्तृत्वानं ती भरारी घेते, परंतु तिच्या आयुष्यात आलेले शिवराज, जॉन, मोहन, पद्माकर, वाहिद आणि कुबेर हे

पुरुष तिला समजून न घेता तिची असूया करतात. लग्न या गोष्टीत न अडकता ती मनाप्रमाणे लिव इन मध्ये पुरुषांसोबत राहते. 'एक्झिट-२' ही कथा एक्झिट एक ची दुसरी बाजू आहे. कथेतून आलेली स्त्री लेखिकेची निर्मिती असते. तिला उभं करण्याचं काम लेखिका करते, परंतु जेव्हा कथेतील नायिका खरी आहे का? असा प्रश्न विचारला जातो, तेव्हा आपण उभं केलेलं पात्र आपल्याशी प्रश्न करू लागतं, यातून निर्माण झालेली ही फँटसी प्रज्ञा पवार लिहितात. सभोवतालचं भान लेखकानं तपासून पाहिलं पाहिजे ही सुचकता त्यामागे दिसून येते. 'पेडिक्युअर' मधली माया पुरोहित दलित स्त्रीच्या पायाजवळ बसून पेडिक्युअर करते, पण त्यांच्या घरात चहा घेत नाही, मिरिंडा वगैरे मात्र घेते. शिकलेल्या समाजात छुपा जातिभेद कसा आतपर्यंत रुतलेला असतो याची ही कथा प्रतिनिधित्व करते. 'तिघाडा' मध्ये बायकोला लग्नापूर्वीच्या प्रियकरासोबत संबंध ठेवायला राजी करणारा तपण सारखा पुरुष दिसतो. (आजपर्यंत पुरुषसत्ताक पद्धतीने धर्माच्या आडून एका पुरुषाबरोबर अनेक स्त्रियांशी संबंध ठेवण्याची परवानगी दिली) पण इथे स्त्री-पुरुष नात्याचा त्रिकोण प्रज्ञा पवार यांनी अत्यंत संयमाने हाताळला आहे. 'संवाद' कथेतील विशाल सत्य पचनी न पडणाऱ्या समाजात अबोला धरून चित्रकलेला जवळ करतो. आधुनिक जगण्याची अनेक रंग- रूप घेऊन त्यांची कथा अवतरते. काही विषय तर अत्यंत क्षुल्लक वाटतात जसे 'गाऊन गाऱ्हाणं' 'पडलेल्या चमच्याची कथा' पण त्यामागील त्यांची चिंतनशीलता महत्त्वाची आहे

दलित कथेत प्रज्ञा पवार यांच्या कथेने पुढचं पाऊल टाकलं असं म्हणता येईल. माणसाचा अस्सलपणा आणि व्यवस्थेतील रचितपणा यांच्यातील परस्पर संबंधांचा शोध त्या घेतात. प्रज्ञा पवार यांचा मूळ पिंड कवयित्रीचा असल्यामुळे त्यांच्या कथेतील निवेदनाला बऱ्याचवेळा काव्यात्मकता आणि प्रतीकात्मकता प्राप्त होते. स्त्रीत्वाच्या नैसर्गिक देणगीला तिचा दुबळेपणा समजून पारंपरिकतेच्या चौकटीत बसवणाऱ्या व्यवस्थेला नकार देताना त्यांची लेखणी धारदार होते. 'अफवा....' मधील 'एक्झिट?' या कथेचे निवेदन यासंदर्भात बघू, 'काठावर मीता बसलेली, तिनं स्वत:च्या हाताने योनितून आपलं गर्भाशय खेचून बाहेर काढलं आणि नदीच्या पात्रात सोडून दिलं. क्षणार्धात नदीच्या पाण्याचा रंग बदलला. रक्तासारखा लाल लाल भडक. ती अचंबित झाली. पलीकडच्या काठाला लक्ष गेलं तिचं तर तिथं दुसरी बाई बसलेली. तीही तिच्या हातानं तिचं

गर्भाशय नदीत सोडत होती. मीतानं चमकून आजूबाजूला जरा नीट पाहिलं तर तिला नदीच्या दोन्ही काठांना अशा कितीतरी बायका दिसल्या, आपापली गर्भाशय पाण्यात सोडून देणाऱ्या. आता समुद्र काय करेल? सामावून घेईल अशा नदीला?'. (एक्झिट-१, पृष्ठ १४) स्वप्नाच्या रूपाने मांडलेली प्रतीकात्मकता अत्यंत बोलकी अशी आहे.

मनस्विनी लता रवींद्र यांचा 'ब्लॉगच्या आरशा पल्याड' हा कथासंग्रह २०१४ ला प्रकाशित झाला. या कथासंग्रहाला २०१६ चा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळालेला आहे. संग्रहाच्या नावावरूनच त्याची वर्तमान प्रासंगिकता लक्षात येते. नाटककार, अभिनेत्री, दिग्दर्शिका, कथा- पटकथा व संवाद लेखन अशा विविध प्रांतात मनस्विनी लता रवींद्र यांची मुशाफिरी सुरू असते. आधुनिक पिढीचं त्या प्रतिनिधित्व करतात. दोन दशकांमध्ये जी माध्यम क्रांती झाली. या संदर्भाने नव्या पिढीच्या भाषेमध्ये त्या लिहितात.

भोवतालातील व्यामिश्रता समजून घेऊन धीटपणे बघण्याची व अनुभवाच्या छटांना नेमकेपणाने शब्दातून मांडण्याची त्यांची शैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्त्री-पुरुष नात्यातल्या लैंगिकतेची, लिंगभावाची, राजकारणाची, सामाजिक ताण्याबाण्याची, जातीयतेची नेमकी जाणही त्यांच्या ठिकाणी आहे. या कथासंग्रहाच्या मलपृष्ठावर जयंत पवार वर्तमान पिढीच्या व्यामिश्रता समजून न घेण्याच्या स्थायीभावाकडे निर्देश करून मनस्विनी यांची सजगता दाखवितांना म्हणतात, 'कारण ती या व्यामिश्रतेला केवळ समजून घेत नाही तर, तिच्या पोटातला धाग्यांचा गुंता सोडवण्याचा प्रयत्न करते. सुटलेले धागे उकलून बघते. या प्रयत्नात तिला मानवी नातेसंबंधातली विदीर्णता आणि तिच्या तळाशी असलेलं माणसाचं एकटेपण दिसतं. जगण्याला नव्याने झटण्याची, नवी सुरुवात करण्याची जशी उमेद दिसते तशीच कशाशीही जोडले न जाण्यातून, तुटलेपणातून येणारी हतबलताही दिसते. या सगळ्यातून होणारा आनंद, येणारं दुःख वा कोणतीही भावना धडपडणे व्यक्त न होण्याचा अनुभव येणं यामागे महानगरी जीवनशैलीने लादलेली एक अपरिहार्यता आहे. ती कोणत्याही अनुभवापाशी फार रेंगाळू न देता माणसांना पुढच्या क्षणांकडे खेचत नेते. यातला वेग आणि आवेग मनस्विनीच्या कथांमध्ये उतरताना दिसतो'. (ब्लॉ. आ. प., मलपृष्ठ- जयंत पवार) हा वेगच वर्तमान स्थायीभाव आहे, तो त्या पकडू बघतात.

या कथासंग्रहात बारा कथा असून त्या मुळापासून बघण्यासारख्या आहेत. 'मळक्या पायाची मुलगी' मध्ये तारुण्यातील मुलाच्या लैंगिक भावनांचा मन:पातळीवरील मुक्ताविष्कार, त्यातले अनेकपदरीपण, मन भावनांचा गुंता, बोध-अबोध मनातील भावनांची सरमिसळ नेटक्या शब्दात मांडलेली आहे. ' हातात सुकान घेऊन भूर' मधून शिकलेल्या समाजातील जातिभेदाच्या आणि कट्टर धार्मिकतेचा परिचय त्या करून देतात, '...आणि तो नायक झाला' मधला नायकही असाच पुरोगामित्वाचा बुरखा ओढून आपली कट्टरता सिद्ध करतो. उपहास आणि उपरोधाच्या नर्म शैलीतून कथा घडविली आहे. या कथेतला नायक म्हणतो, 'धर्म आणि चारित्र्य आपलं कवच-कुंडल आहे. जातीव्यवस्था आपलं शस्त्र. ती निघालीय दोन्ही टाकून.... लढायला धाडून समस्त जनतेला. आपण फक्त बघायचा खेळ'. (ब्लॉगच्या आरशा पल्याड, पृष्ठ ५०) ही धर्माच्या आडून सुरू असलेली पारंपरिक व्यवस्था त्या उघडी करतात. 'तुझ्याविना' मधून ग्रामीण भागातील दु:ख, दारिद्रय येतं, तसंच तेथील स्त्रीची वेदना प्रकट करताना तिचं सनातन दु:ख त्या सहज व्यक्त करतात. ग्रामीण स्त्रीच्या एकटेपणाविषयी निवेदिका म्हणते, 'आपण म्हणतो खरं एकटी स्त्री राहात असेल तर जगाला मान्य नसतं, पण विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता स्त्रियांना कायम एकटच इमॅजीन केलं जातं. पण पुरुषांचं असं नसतं. जगाला पुरुष एकटा राहतो याची जास्त काळजी असते. त्याच्या सगळ्या भूका भागवल्या जाण्याची, बिचारा उपाशी राहत असेल. पोटाने पण आणि शरीराने पण. मग त्यांच्यासाठी एक बाई शोधून आणा. लवकरात लवकर त्यांची भूक भागवा. मग शहर असो की गाव सगळीकडे असंच असतं.' (ब्लॉ. आ. प. पृष्ठ-६३) स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक भेदभावाचं दर्शन त्या घडवितात. 'काळ्याकुट्ट वेळी' मधला आर्य पुरुष म्हणून परंपरा सांगणारा व स्वत:च्याच मुलीशी कुकर्म करणारा कर्नल साहेब, 'बाईकविना हिरो' मध्ये आजची जनरेशन आणि सोशल माध्यमांचा मुक्त सुळसुळाट याचं चित्रण येतं. या नव्या माध्यमांविषयी कथेमध्ये त्या म्हणतात, 'इथे कोण माणूस नाही. फक्त जनावर आहेत ओरबाडून घेणारी आणि इथे येऊन हवं तेवढं व्हर्चुअली समोरच्याला ओरबाडून घ्या. स्वत:च्या चिथळ्या होऊ द्या. कारण सगळ्यांचे चेहरे झाकलेले आहेत. कोण कोणाशी संभोग करतोय कळत नाहीये. आणि संभोगही कसला तर कल्पनेतला. मनातला. मनाची ओकारी करायचं बेसिन आहे हे असंच म्हणायला हवं. अ ग्लोबल

सायबर बेसिन.' (ब्लॉग. आ. प. पृष्ठ ८९) ही सोशल मीडियाच्या विकृत मानसिकतेची वास्तवता त्या दाखवितात. 'सुसाईडवाला लव' मधून आत्महत्या करायला गेलेले दोघेजण प्रेमात पडतात आणि जगणं नव्यानं सुरुवात करतात. माध्यमातल्या आभासी जगामध्ये वावरणाऱ्या मनस्विनी या कथेमधून मात्र वास्तवाचा वेध घेतात. माध्यमातली व्यवसायिक बाजू आणि कथेतील लेखननिष्ठा या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या दोन स्वतंत्र बाजू आहेत. कथेतील नेटकी निवेदन शैली, संवादातील नाट्यत्मकता, चित्रदर्शी वातावरण, उपहास उपरोधाची मधून मधून दिलेली फोडणी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

आधीच्या दोन तीन पिढ्यांपासूनचा मराठी स्त्री लेखिकांच्या कथेचा बाज पाहिला तर बहुतेक लेखिका स्त्रियांच्या दु:खाविषयी, त्यांच्या जगण्याविषयी, हक्काविषयी, कुटुंबाविषयी आपले जीवन केंद्रस्थानी ठेवून कधी आवेशाने, तर कधी संयतपणे लिहिताना दिसतात. बेधडक वा बंडखोरपणे किंवा स्त्रीवादाने दिलेल्या विशिष्ट भूमिका जरी त्यांनी स्वीकारल्या नसल्या तरी आपापल्या अनुभवाने मराठी कथेचे क्षितिज त्यांनी रुंदावले आहे.

सिसिलिया कार्डालो या मुळात कवयित्री आहेत. त्यांचा 'काठ' (१९९५) आणि 'परीस' (२००३) हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. स्त्रियांचं दु:ख, त्यांच व्यक्तिमत्व आणि भोतालचा निसर्ग त्यांच्या कथेत असतो. अनुभवाच्या अनेक छटा त्यांच्या कथांमध्ये असतात. 'अभिमन्यू' कथेतील वैद्यकीय पेशातील व्यवहार्यता 'रक्त पाऊले' मधील पतीच्या लैंगिक सुखाला आणि संततीप्राप्तीला आसुसलेली सेरा दिसते. वसई ही त्यांची कर्मभूमी आहे. यामुळे तिथला निसर्ग त्यांच्या कथेमधून मुक्तपणे आलेला दिसतो.

छाया महाजन या मराठीतील महत्त्वाच्या लेखिका आहेत. 'एकादश कथा', 'ओढ', 'स्पर्श' यानंतर नुकताच आलेला त्यांचा 'अज्ञात' हा कथासंग्रह. नावातूनच एका वेगळ्या आशयाला सामावून घेताना दिसतो. स्त्री वेदनेचे भळभळणारे दु:ख त्यांनी कथेतून मांडले आहे. बाई, आई आणि पत्नी या आवरणाखाली जगणाऱ्या स्त्रीचे दु:ख त्या मांडतात. भोगवस्तू ते स्त्री अस्मिता याचे भान त्या कथेतून व्यक्त करतात.

मराठी स्त्री लेखिकांमध्ये रेखा बैजल या विज्ञान कथाकार म्हणून अधिक परिचित आहेत. आजपर्यंत त्यांचे तेरा कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. २०११मध्ये परभणी येथे झालेल्या मसापच्या दुसऱ्या लेखिका साहित्य संमेलनाचे

अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. पांढरपेशा वर्गापासून ते भटक्या, विमुक्त, कष्टकरी, वंचित समाजापर्यंत त्यांच्या कथेची आशयात्मक झेप आहे. स्त्री जीवनाचे दु:ख व अनुभूती त्यांच्या कथेतून प्रकट होते. अज्ञाताची, कल्पकतेची ओढ यातून त्यांच्या विज्ञान कथा निर्माण झालेल्या आहेत. एक संवेदनशील व तरल मनाची लेखिका म्हणून त्यांचा विशेष उल्लेख करता येईल. याबरोबरच जैन-बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो.

सुनंदा गोरे यांचा मूळ पिंड शिक्षिकेचा आहे. त्यांचे 'उन्हातलं चांदणं' (२००३) 'कोरांटीची फुलं' (२००८) आणि 'मोकळे आकाश' असे तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्यांनी प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रणात्मक लेखन व काही एकांकिकाही लिहिल्या आहेत. 'नवी प्रतिज्ञा' हे बालनाट्य त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या कथा कौटुंबिक स्वरूपाच्या असून वर्तमान काळात निर्माण झालेल्या प्रश्नांची नेमकी जाण त्यांच्या ठिकाणी आहे. 'पर्याय' कथेतील सुमित्राबाई सासू होऊन सुनेला त्रास देते, पण सत्ताकेंद्र सुनेच्या हाती गेल्यावर मात्र तिची परवड होते. 'सावधान' कथेतील सुधा मैत्रीण विद्याची बरोबरी करून नवऱ्याच्या तुटपुंजा पगारावर भागवतांना तिच्या मनाची होणारी अवस्था आणि आंतरिक तान उत्तम रेखाटली आहे. 'कोरांटीची फुलं' मधून प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलांचे भावविश्व, त्यांच्याविषयीची शिक्षिकेची तळमळ अत्यंत हृद्य अशी उमटली आहे. सुनंदा गोरे या हाडाच्या शिक्षिका आहेत याची जाणीव वारंवार हा कथासंग्रह वाचताना होते. 'मोकळे आकाश' मधून येणाऱ्या काही कथा स्त्रियांचे व्यक्तिगत प्रश्न, समस्या, मानसिकता यांचे उत्कृष्ट चित्रण करतात.

या काळात ग्रामीण भागातील स्त्री जाणिवांच्या कथालेखनाचे प्रमाण अत्यल्प आहे. आधीच्या काळात लिहिणाऱ्या प्रतिमा इंगोले, ललिता गादगे, मथू सावंत यांचे कथालेखन या अनुषंगाने सुरूच आहे, तर या काळातल्या मेनका धुमाळे या ग्रामीण भागातील स्त्रियांविषयी लिहिताना दिसतात.

प्रतिमा इंगोले या वऱ्हाडी बोलीतील ग्रामीण लेखिका म्हणून परिचित आहेत. कथेबरोबरच कादंबरी, कविता, ललित लेख व बालसाहित्य त्यांनी लिहिले. 'हजारी बेलपान' (१९८४) ते 'अंधारपर्व' (१९९९) पर्यंत अनेक कथांमधून ग्रामीण स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी कथालेखन केले आहे. स्त्रीवादाच्या रूपाने महानगरातील मध्यम व उच्च मध्यम वर्गातील स्त्री आली,

पण ग्रामीण भागातील स्त्री दुर्लक्षित राहिली. इंगोले यांची कथा मात्र ग्रामीण स्त्री जीवनाला अधोरेखित करते.

ललिता गादगे यांचा 'प्राजक्ताची फुलं' हा कथासंग्रह २००२ ला प्रकाशित झाला. स्त्री दु:खाचे, समस्यांचे भोवतालातील कथाबीज घेऊन त्यांची कथा घडते. विविध वृत्ती-प्रवृत्तींच्या स्त्रिया त्यांच्या कथेमधून भेटत जातात.

मेनका धुमाळे यांचा 'कोरडा पाऊस' हा कथासंग्रह २०१५ ला प्रकाशित झाला. समाजभान आणि स्त्री भान याविषयी त्यांची नवीन दृष्टी दिसून येते. ग्रामीण कृषी जीवन, समूह प्रियता, स्त्रीजीवन आशयसंपन्नपने त्यांनी रेखाटले आहे.

अनुराधा चिन्मुळगुंद यांचे या काळात 'सत्याग्रही', 'विचारधारा' दिवाळी अंकातून 'पिंकी आणि बंटी' (२००१) 'उत्क्रांती' (२००३) या दोन कथा प्रकाशित झाल्या आहेत. स्त्रीवादी जाणिवेतून सामाजिक व कौटुंबिक अनुभव त्या मांडतात.

माधुरी शानभाग या लोकप्रिय पद्धतीचे कथालेखन करतात. मात्र स्त्रीवादाच्या प्रभावानंतर 'माहेर', 'मानिनी', 'अनुराधा' या महिलांच्या मासिकातून आलेल्या त्यांच्या कथा वास्तवाकडे अधिक झुकलेल्या दिसतात. 'चकवा' (२००३), 'साठा उत्तराची कहाणी' हे त्यांचे कथासंग्रह अलीकडेच प्रकाशित झालेले आहेत.

नीलम माणगावे यांचे 'साक्षीदार' (२००१), 'शांते तू जिंकलीस' (२००२) आणि 'तिच माती तेच आकाश' (२००२) हे तीन कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यांची कथा घटनात्मक स्वरूपाची असल्याने ती मनाचा वेध घेत नाही.

आशा कर्दळे यांचा 'कालही आणि आजही' हा कथासंग्रह २००३ साली प्रकाशित झाला. या आधी त्यांचे चार कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. परस्पर नात्यातील पैलू त्या उलगडतात. नयना राजमाने यांचा 'रुंदावणाऱ्या कक्षा' हा संग्रह लक्ष वेधताना दिसतो.

नॅशनल बुक ट्रस्टने काढलेला व राजन गवस यांनी संपादित केलेला 'नवलेखन मराठी कथा' (२०१६) या संग्रहात सुजाता कोळेकर यांची 'दुरपा', अस्मिता कुंभार यांची 'मंगळसूत्र', अनिता यलमारे यांची 'काकण चोळी' या कथा आहेत. याशिवाय अनेक नवोदित लेखिका आपल्या अनुभवांना कथेमधून

मांडण्याचा प्रयत्न करत आहेत. सगळ्यांचाच नामोल्लेख करणे इथे शक्य नाही.

विनोदी कथा हे दालन अलीकडे कालबाह्य झाल्यासारखे वाटते. वेगाने बदलणारा भोवताल आणि सर्वत्र झालेली पडझड यामुळे एक प्रकारची विषण्णता सर्वत्र भरून राहिली आहे. स्त्री लेखिकांचा यामध्ये आधीही नगण्य सहभाग होता. याची कारणे इथल्या सामाजिक आणि सांस्कृतिकतेमध्ये आहे. मंगला गोडबोले, इंद्रायणी सावकार, अनुराधा वैद्य आणि काही प्रमाणात प्रतिमा इंगोले यांनी विनोदी कथा लिहिली. मंगला गोडबोले यांची पन्नासेक पुस्तके प्रकाशित आहेत. अलिकडेच आलेल्या 'मुरली' (२०१९), 'सहवास हा सुखाचा', 'सात आठ ते सातावर आठ', 'सुखी स्त्रीची साडी', 'हे करून पाहू नका' असे काही पुस्तके आलेली दिसतात.

समाजकारणाएवढाच राजकारण हा महत्त्वाचा घटक आहे. परंतु स्त्री लेखिकांच्या कथांमधून राजकारण अलिप्तता दिसून येते. कुटुंब, संसार, नोकरी, जबाबदाऱ्या यामध्येच स्त्री आजही अडकून पडलेली आहे. उपरोल्लेखित सामाजिक व सांस्कृतिकताही त्याला कारणीभूत आहे. मथू सावंत या वीस-बावीस वर्षापासून समाजकारणात आणि राजकारणात असल्यामुळे त्यांनी राजकीय आशयाची कथा लिहिली तद्वतच मराठवाड्यातील ग्रामीण जाणिवाही कथेत आणल्या. या कालखंडात त्यांचे 'तिची वाट वेगळी' (२०००), 'पाणी बळी' (२००६) हे दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपण यामुळे एका वेगळ्याच दुष्टचक्रात अडकलेली स्त्री त्या रेखाटतात. 'तिची वाटच वेगळी' कथेतली चंद्रकला पुरुषप्रधान राजकीय मानसिकतेची बळी ठरते, पण ती गप्प बसत नाही, तर दुःखावर मात करून बंड करण्याची प्रेरणा देते. 'कानमंत्र' मधून पुरुषप्रधान राजकारणात स्त्रीची होणारी घुसमट त्या समर्थपणे व्यक्त करतात. 'तिची वाटच वेगळी' मधील कथांमधून वेगवेगळ्या स्त्रियांचे भावदर्शन त्या घडवतात, विशेषतः राजकीय जीवनात वावरणाऱ्या स्त्रियांचे दुःख या कथासंग्रहामध्ये ठळकपणे त्यांनी मांडले आहे. प्रतिभा कणेकर यांच्या 'आत्मखूण शोधतांना' या कथेतून सुहास ताई कल्पकतेने राजकीय आधारांवर समाजासाठी राजकीय पक्ष पुढे चालवितात. कणेकर यांच्या कथेतील नायिका तरुण, प्रौढ व वृद्ध आशा विविध वयोगटातील असून त्या शिक्षित आहेत, आर्थिकदृष्ट्या त्या सक्षम असून स्वतः जबाबदारी व निर्णय घेणाऱ्या आहेत.

विज्ञान कथेच्या संदर्भात रेखा बैजल यांच्या व्यतिरिक्त दुसरे नाव दिसत नाही. ज्ञान-विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रसार होऊनही स्त्रिया विज्ञान कथेकडे फारशा वळल्या नाहीत हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

२१ व्या शतकातील या दोन दशकांमध्ये तीन पिढ्यांच्या लेखिकांचे कथालेखन सुरू आहे, तरीही लेखन काहीसे मंदावलेले आहे. स्त्रीवादाच्या प्रभावाने विसाव्या शतकात आत्मनिष्ठेतून लेखन करणाऱ्या लेखिका जशा सामाजिकतेकडे झुकलेल्या दिसतात, तद्वतच या कालखंडातील नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा दया पवार, मनस्विनी लता रवींद्र सारख्या लेखिका स्त्रीवादाची किंवा कुठल्याही वादाच्या (इझम) चौकटीशी सीमित न होता स्वतंत्रपणे वाट चोखाळताना दिसतात. तरीही स्त्रीवादाने दिलेले आत्मभान, आत्मसन्मान, रचित व्यवस्था, स्त्रीला गृहीत धरण्याची समाज मानसिकता याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संस्कार घेऊन त्या स्त्रीकेंद्री व संवादी भूमिका घेतात. सभोवताल त्यांना चांगला अवगत असून तो त्या कथेमध्ये आणू बघतात. आधीच्या काळातील पण याही काळात लिहिणाऱ्या उर्मिला पवार, प्रतिमा इंगोले, प्रतिमा जोशी, जाई निंबाळकर, आशा कर्दळे, या काळातील सिसिलिया कार्डालो, प्रतिभा कणेकर, वृन्दा भार्गवे, छाया महाजन, मथू सावंत, सुनंदा गोरे अशा अनेक लेखिका कथा लिहित आहेत. यातील काहींनी आपली ओळख साहित्यक्षेत्रात निर्माण केली, तर काही त्या वाटेवर आहेत. याशिवाय काही लेखिका आपल्या अनुभवाच्या अवकाशाचा शोध कथेतून घेऊ पाहत आहेत, परंतु त्यांना व्यासपीठ मिळत नाही. याची काही कारणे नोंदवता येतील, आधीची कथा ज्या मासिकांच्या साह्याने वाढली ती आज नाहीत, तर नवीन मासिकांची उदासीनता आणि भूमिका वेगळ्या आहेत. दिवाळी अंकांमधून नवीन लिहिणारांची फारशी दखल घेतली जात नाही. कथासंग्रह काढण्यासंदर्भात प्रकाशक तयार नसतात, टेलिव्हिजन बरोबरच आता संगणक, मोबाईल, व्हॉट्सअप, फेसबूक, टेलिग्रामसारख्या माध्यमक्रांतीने व्यक्त होण्याचा हव्यास वाढवून क्षणभंगुर केले आहे. वाचनसंस्कृतीपासून वाचक दूर गेले आहेत. ई-बुक, ई-कथा, ई-पेपर यामुळे पुस्तकाची जागा आभासी माध्यमाने घेतली आहे.

२१ व्या शतकाच्या या वीस वर्षामध्ये स्त्रियांचे कथा लेखन मंदावलेले असले तरी कथेत आशयात्मक वैविध्यता दिसून येते. काही कथा लेखिकांनी समकालाला समजून घेत अभिव्यक्त केले आहे. स्त्रीवादाचा स्वीकार जरी जशास

तसा या काळातील लेखिकांनी केला नसला तरी, मशागत केलेली भूमी मात्र तीच आहे. स्त्री लिखित कथासाहित्यातून खास स्त्रीकेंद्री भावना व्यक्त होताना दिसतात. यामध्ये मातृत्व, पौगंडावस्था, कामभाव, भगिनीभाव, मैत्रभाव, स्वत्व शोध, सहजीवन अशा स्त्रीकेंद्री भावनांचे दर्शन होते. स्त्रीवादातील तोचतोपणापेक्षा आजची कथा अल्प प्रमाणात पुढे सरकलेली दिसते.

या काळातील कथेच्या मर्यादा आधीच्या काळासारख्याच आहेत. कथेतून स्त्रियांनी मांडलेले प्रश्न मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय व महानगरीय समाज जीवनातील आहेत. त्यातही वर्तमान मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय जीवनातील स्त्रिया आता अनेक क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. अगदी कार्पोरेटपासून ते उद्योजिकांपर्यंत आणि बँकिंगपासून ते आय.ए.एस., आय.पी.एस. ऑफिसरपर्यंत परंतु याचे चित्रण कथांमधून येत नाही. परिघाबाहेरचे जग तर आजही कोसो मैल दूर आहे. ग्रामीण, दलित, भटके-विमुक्त, वंचित यातील स्त्रियांचे जगणे, त्यांचे प्रश्न, समस्या या वेगळ्या आहेत. काही प्रमाणात ते आले असले तरी अजून मोठे अवकाश शिल्लक आहे. समकालीन स्त्रियांच्या कथेविषयी डॉ. अंजली सोमन म्हणतात, ‘मानवी प्रवृत्तींची वळणे आणि मनाचे सूक्ष्म कंगोरे या कथा लेखिकांनी खोलात जाऊन तपासलेले आहेत. आत्मकेंद्री अनुभवांकडून सामाजिक अनुभव आणि सामाजिक अनुभवातून वैश्विक अनुभव असा सार्थ लेखनाचा प्रवास व्हायला हवा. लेखनातील ‘मी’ गळून पडला पाहिजे, इतरांची वेदना ‘स्व’ वेदना वाटायला पाहिजे. पण तसे अजून घडतांना दिसत नाही. स्त्री कथाकारांना जसजसा मोकळा अवकाश मिळत जाईल, कुटुंबाची मर्यादा ओलांडून त्यांचे सामाजिक अभिसरण वाढत जाईल, तेव्हा मराठी कथा लेखिकांचे भावविश्व या दिशेने निश्चित झेप घेईल.’ हा आशावाद त्या व्यक्त करतात. स्त्रियांच्या कथालेखनाला आता शंभर वर्षे पूर्ण झालीत, परंतु स्त्रियांचे जीवन आजही त्याच परंपरेतील चाकोरीबद्धतेतून सुरू आहे. शिक्षणाचा प्रसार गावोगावी झाला. शाळा महाविद्यालयांचे प्रमाण वाढले परंतु मुलींच्या शिक्षणाचा टक्का फारसा वाढला नाही. यामुळे एकविसाव्या शतकातही स्त्री आणि तिचे प्रश्न मागील पानावरून पुढे असेच आहेत. उलट माध्यमक्रांतीने तिच्या शोषणामध्ये वाढ केली. लेखिका म्हणून वर्तमान गतिशील जीवनाला आणि आव्हानांना सामोरं जाण्यासाठी डॉ. अंजली सोमण म्हणतात तसं कुटुंबाची मर्यादा ओलांडून सामाजिक अभिसरण होणे गरजेचे आहे.

## संदर्भ

१. स्त्री लिखित मराठी कथा १९५० ते २०१० संपा. अरुणा ढेरे, पद्मगंधा - प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४
२. स्त्री-लिखित मराठी साहित्य, संदर्भ आणि चिकित्सा, संपा. आशुतोष पाटील, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०१५
३. अफवा खरी ठरावी म्हणून, प्रज्ञा दया पवार, शब्द पब्लिकेशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०१०
४. ब्लॉगच्या आरशा पल्याड, मनस्विनी लता रवींद्र, शब्द पब्लिकेशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०१७
५. लेकीचे कर्तृत्व, संपा. विमलाबाई कुकडे, लेखिका पुस्तक प्रकाशन प्रकल्प, दर्यापूर, प्रथमावृत्ती २००२
६. स्त्री विकासाचे नवे क्षितीज, संपा. स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००८
७. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९५
८. मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८०
९. स्त्रियांचे कथालेखन : नवी दृष्टी, नवी शैली, मंगला वरखेडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००५
१०. स्त्रीमिती, संपा. नीलिमा गुंडी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती २०१०
११. नव्वदोत्तर मराठी कथा रंग आणि अंतरंग, संपा. गजानन हेरोळे, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१८
१२. नवलेखन मराठी कथा, संपा. राजन गवस, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, प्रथम प्रकाशन २०१६
१३. प्रतिष्ठान, संपा. श्रीधर नांदेडकर, मसाप, औरंगाबाद, सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३
१४. भाषाभान (स्त्री साहित्य विशेषांक) संपा. राजश्री पवार, मराठी भाषा अध्यापक परिषद, जुलै-सप्टेंबर २०११

मराठी विभागप्रमुख,
इंद्रराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिल्लोड, जि. औरंगाबाद

* * * * *

# एकविसाव्या शतकातील महत्त्वाच्या कथा लेखिकांचे भावविश्व

**- डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे**

मराठी कथा साहित्याला दीर्घ अशी परंपरा असल्यामुळे तिच्यातून व्यक्त होणारा मूल्यात्मक आशयाने निश्चित असा तिचा वाचकवर्ग तयार झाला आहे. या कथा साहित्याचे मूळ सांगण्यातून अथवा बोधपर, मनोरंजनपर अशा सहेतुक रूपातून झाले. प्रत्यक्षात मात्र स्त्रियांच्या कथेतील विश्व रोजच्या जगण्यातील जीवन जाणिवा सांगणारे आहेत. अनादिकाळापासून स्त्रीच्या जडणघडणीचा आलेख डोळसपणे पाहिला तर तिच्याकडे भोगवस्तू, मादी, अपार कष्ट सहन करणारी, शोषित, पीडित किंवा नियती मधून वाट्याला आलेले दु:ख उपभोगणारी अशा केविलवाण्या दृष्टिकोनातून तिच्याकडे पाहिले जाते. त्या त्या काळात तिने आपल्या शोधलेल्या वाटा हा तिच्या कथा साहित्याचा विषय देखील होतो. या प्रश्नातून तिची प्रतिमा आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. या सर्व पडद्यामागे तिची अनुभूती हा मात्र तिच्या जीवन चिंतनाचा विषय ठरतो. स्त्रीच्या जगण्यातून तिच्या जीवनाच्या असंख्य पैलूचा परिचय आपल्याला तिच्या कथेतून देखील घडत असतो. याही पलीकडे जाऊन आपण अतिशय व्यापक अंगाने चिंतन केल्यास या विषयातील असंख्य कंगोरे आपल्या हाती येतात. त्यामध्ये नैसर्गिकरीत्या मातृत्वाची जबाबदारी तिच्या खांद्यावर पडलेली असताना या घटनेशी एकनिष्ठ राहून ती लढत असते. यातून आपल्या जाणीव आणि नेणिवेच्या वेदनेतून तिच्या आयुष्याचा पूर्व इतिहासदेखील लक्षात घ्यावा लागतो. कदाचित या अनुभवातून कथा विस्तारते असा अंदाज आपणास बांधता येतो.

मूलत: कथा ही एखाद्या विशिष्ट प्रसंगाचे अथवा घटनेचे कथन करण्याच्या उद्देशातून कथा विस्तारली जाते. या साहित्याला बोधकथा, मनोरंजनपर अशा वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण अंगाने पाहिले तर कथा साहित्याने वाचकांच्या मनावर अधिराज्य केले असते. यात पार्श्वभूमीतून प्रस्तुत लेखामध्ये एकविसाव्या शतकातील महत्त्वाच्या कथा लेखिकांच्या स्त्रियांचे कथाविश्व उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या स्त्रियांच्या कथाविश्वाने मराठी साहित्य इतिहासामध्ये मोलाची भर घातलेली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण स्त्रीत्वाच्या

बद्दलची भूमिका आणि तिचे भावविश्व याची साक्ष त्यांच्या कथेमधून अभिव्यक्त होताना दिसते.

एकविसाव्या शतकातील ठळक स्त्रियांच्या कथा लेखनाचा अभ्यास या प्रस्तुत लेखात केला आहे. स्त्रीकेंद्री जीवनानुभव मांडणाऱ्या आघाडीच्या ठळक कथा लेखिकांच्या कथांचा विचार प्रस्तुत लेखामध्ये केला आहे. त्यामध्ये सानिया, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा, प्रज्ञा दया पवार, अलीकडे लेखन करणारी मनस्विनी लता रविंद्र अशा मोजक्या आणि ठळक कथा लेखिकांच्या लेखनातील विषय उलगडून त्या विषयातील मर्मस्थळचा शोध घेणे महत्त्वाचे वाटले. यातून हाती आलेलं निष्कर्ष शेवटी नोंदविले आहेत.

मराठी साहित्यविश्वातील आघाडीच्या कथालेखिका म्हणून सानिया यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांचे २००० नंतर आलेले 'त्यानंतर' (२००२) 'आपले आपण' (२००३), 'अमियागे' (२००५), 'अशी वेळ' (२०१०), 'पुन्हा एकदा' (२०१५), इत्यादी त्यांचे गाजलेले कथासंग्रह. सानियाच्या कथेतील पात्रे संवाद साधणारी, आजारपणातून वाट्याला आलेले एकाकीपण, विवाहसंस्था, कुटुंबसंस्थेतील पुरुषांचे स्थान, मातृत्त्वाच्या जबाबदारीमुळे स्त्री कशी मोडकळीस येते याचे यथार्थ चित्रण त्यांच्या कथेतून अभिव्यक्त होते. स्वत:च्या वाटा शोधण्यासाठी खाल्लेल्या खस्ता आणि आपण ज्या भवतालामध्ये वावरत असून अनुभवतो, त्या विश्वातून स्त्रीमनाचा तळ शोधण्यात त्या यशस्वी ठरतात. सानियांच्या कथालेखनाचा अभ्यास करताना त्यांच्या कथेतील विषयामध्ये कुठेही सारखेपणा दिसत नाही. मात्र त्यांच्या लेखनाची भूमिका स्त्रीवादी नसून स्त्रीकेंद्री, स्त्रीलक्ष्यी, स्त्रीजीवनाचे अनुभवविश्व अधोरेखित करणारी आहे. तात्पर्य, मानवी मनाचे कंगोरे आपण ज्याप्रमाणे पिंजून काढतो तशाच स्वरूपात त्यांनी स्त्रियांच्या कथेतील विषयामध्ये अनेक विषयांना बोलके केले आहे. एकंदरीत सानियाच्या कथा वाचताना वाचकाला विचार करायला प्रवृत्त करतात. आजतागायत त्यांच्या चाळीस वर्षात दिडशेहून कथा लिहिल्या आहेत या कथांनी मराठी साहित्य विश्वामध्ये मोठी भर घातली आहे.

एकविसाव्या शतकामध्ये महत्त्वाच्या कथालेखिका म्हणून मोनिका गजेंद्रगडकर याचा विचार करणे अगत्याचे वाटते. आजतागायत तीन कथासंग्रह प्रकाशित झाले आहे. 'भूप' (२००४), 'आर्त' (२००८), 'शिल्प' (२०११) हे त्यांचे प्रकाशित झालेले तीन कथासंग्रह. या तिन्ही कथासंग्रहामध्ये एकूण १८ कथा

प्रकाशित झाल्या आहेत. या कथेतील विषय मध्यमवर्गीय परिघातील छोट्या कुटुंबामध्ये वावरणाऱ्या स्त्रियांचे अनुभवविश्व हे अतिशय चौकटीतले असून त्यांचे जीवन चित्रण त्यांच्या कथेमधून चित्रित होताना आपल्याला दिसते. श्रद्धा या कथेत भिन्न धर्मीय विवाहित जोडप्याची कथा व्यक्त झाली आहे. माणसाच्या जगण्यातील आकलन समृद्ध करणारी सहाय्यभूत गुणसंपन्न त्यांच्या कथांमध्ये मध्यवर्ती दिसून येते. आपल्या कथेच्या संदर्भात मोनिका गजेंद्रगडकर यांनी आपल्या एका मुलाखातीत त्या म्हणतात, 'कथा म्हणजे नुसती गोष्ट नव्हे, तर ती लेखकाची सर्जनात्मक दृष्टी असते''. आर्त या कथासंग्रहातील संक्रमण बाबा ची आई, आणि तिच्यातील कौटुंबिक आशयातील ताणेबाणे या कथांमधून अभिव्यक्त झाले आहे. आई आणि मुलीच्या दोन पिढ्यांमधील असलेली विचारसरणी कशी बदलत जाते. याचे मार्मिक चित्रण लेखिका करतात. 'आर्त' (२००८), या संग्रहातील जन्म या कथेमध्ये स्त्री-पुरुषांच्या संबंधाचे वेगळेपण याविषयीचा धागा पाहायला मिळतो.

एकंदरींतच मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथालेखन अतिशय दीर्घ अशा स्वरूपाचे लेखन असल्यामुळे त्यामधील घटनाप्रसंग अत्यंत विस्ताराने येतात. स्वत:च्या अनुभवविश्वातून लेखिका प्रत्येक घटनेकडे अतिशय व्यासंगपूर्ण वृत्तीने पाहताना दिसतात. थोडक्यात त्यांच्या कथेतील असणारे स्त्रियांचे आयुष्य जीवन व्यापकणारे आहे. पुरुष व्यवस्थेकडून स्त्रियांवर होणारा अन्याय, माणसे समजून घेताना त्यांच्या या व्यक्तिमत्वातील वेगळेपण शोधण्याचा नवा ध्यास लेखिका घेताना आपल्याला दिसतात. उदाहरणात वर्ण याह्या कथेतील गायत्री, या कथेतील गायत्री आत्मसन्मानाने जगते. भूप या कथेतील नायक आणि वडिलांचा असलेला संघर्ष लेखिका अतिशय ताकदीने मांडतात. या संघर्षामध्ये दोन पिढ्यातील असलेली विचार भिन्नतादेखील केंद्रस्थानी असलेली दिसते.

नीरजा यांचा कवितेसारखा कथेमध्येही वेगळा असा ठसा उमटला आहे. 'जे दर्पणी बिंबले' (२००१), 'ओल हरवलेली माती' (२००६), 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' (२०१०), 'अस्वस्थ मी अशांत मी' (२०१८), या चारही कथासंग्रहातून एक वैचारिक प्रकल्पाची जाणीव व्यक्त झालेली दिसते. अलीकडे प्रकाशित झालेला 'अस्वस्थ मी अशांत मी' (२०१८) या कथासंग्रहातून एक वैचारिक प्रगल्भ विचारांची जाणीव व्यक्त करणाऱ्या ह्या कथा वाचकांना भारावून टाकतात. मानवी नातेसंबंधांचा जटील गुंता, सामाजिक प्रश्न,

आत्मसंरक्षणासाठी लढा देणारी पात्रे, स्त्री मनाच्या दु:खाचे विविध पदर या विषयाची साक्ष देतात. या कथासंग्रहामध्ये एकूण बारा कथा समाविष्ट झाल्या असून २०१८ मध्ये हा प्रकाशित झाला. पहिल्या कथासंग्रहापासून म्हणजे 'जे दर्पणी बिंबले' (२००१), ते 'अस्वस्थ मी अशांत मी' (२०१८) या अलीकडच्या कथासंग्रहातील विषय या पहिल्या कथांपेक्षा अतिशय बंडखोरीचा वाटतो. 'ओल हरवलेली माती' (२००६) या संग्रहातील देखील वैचारिक दृष्ट्या सक्षम आहेत. पुनरपि मरणम् ही ('जे दर्पणी बिंबले') या कथासंग्रहातील. या कथेतील नायिका नवऱ्याच्या मारहाण, जाचाला कंटाळून पुनर्विवाह करण्याचा निर्णय घेते.

अशाच विषयाला साधर्म्य साधणारी सावरे या कथेतील मानसी बाईच्या प्रस्थापित चौकटीतून बाहेर पडून स्त्री-पुरुष नात्यांमधील ओल शोधत असते. थोडक्यात पुरुषाबद्दल असलेल्या चीड किंवा आक्रोश हा त्यांच्या कथेतून कधीही व्यक्त झालेला नाही. याउलट हाच विषय अतिशय संयमाने; समाज व्यवस्थेतील जटील प्रश्न म्हणून त्या विषयाकडे बघतात. सामान्य मध्यमवर्गीय माणूस कसा अर्थव्यवस्थेच्या जाळ्यात कसा अडकतो. गरिबीतून म्हणून सोसाव्या लागणाऱ्या भाव-भावना, कथेतील पात्रांच्या आयुष्यात विवाहातून असंख्य प्रश्न उपस्थित होतात. खरे पाहता हा एकविसाव्या शतकातील माणसाच्या वाट्याला आलेला भोग, जागतिकीकरण करण्यातून आणि तांत्रिक तंत्रज्ञानातून उद्‌भवलेल्या प्रश्नांचा ऊहापोह करणारी गुंता हा नीरजा यांनी पहिल्याच कथा कथासंग्रहात सक्षमपणे मांडला आहे. या संग्रहातील सर्व म्हणजे दहा कथांतून हे विश्व उलगडले आहे. या संग्रहातील पुनरपि मरणम्, विटाळ, काकस्पर्श या कथांतील विषय आशय अतिशय वाचनीय वाटतो.

नीरजा यांचा अलीकडे प्रकाशित झालेल्या 'अस्वस्थ मी अशांत मी' (२०१८) या कथासंग्रहामध्ये एकूण बारा कथा असून त्या मध्यमवर्गीयांचे भावविश्व, स्त्री-पुरुषांच्या अस्वस्थ समस्या, कौटुंबिक विवंचनेत गुंतलेले पात्र आणि त्यांचे भावविश्व अतिशय ताकदीने नीरजा यांनी या कथेतून साकारले आहे. मात्र या कथासंग्रह मध्ये एकही कथासंग्रहाच्या शीर्षकाची कथा प्रकाशित झालेली नाही. श्रीकांत विनायकची गोष्ट, पाच महिने वीस दिवस, पार्टी, चेहरा (मधील राजीव हा नायक), सत्तेची काठी (ही कथा अतिशय बोल्ड कथा आहे), मनात माझ्या (या कथेतील नायिका व्रत वैकल्याची पाईक आहे.), नवी

कथा, आणि हॅपी मन, (ह्या दोन्ही कथा विलक्षण वाचनीय भासतात.), नियोग, सत्तेची काठी अशा या बारा कथा या संग्रहामध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. एकंदरीतच नीरजा यांच्या आजतागायत प्रकाशित झालेल्या चार ही कथासंग्रहातून नीरजा यांच्या कथा लेखनातील विषयामध्ये खूप वेगळे पणा दिसून येतो. म्हणून आज पर्यंत प्रकाशित झालेल्या चारही कथासंग्रहातील कथांचा अभ्यासकांना हे सर्व विषय नव्याने अंत:करणातील, भावभावनांना अतिशय संवेदनशीलपणे स्पर्श करतात. स्त्री जाणिवेतून माणसाचा घेतलेला हा आत्मशोध त्या नायिकांचे आत्मबल शोधणारा वाटतो. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरुषांची नातेसंबंध आणि मानवी मनातील पुरुषसत्ताक रूपाचा घेतलेला वेध आणि स्त्रीच्या दु:खाचे विविध पदर हे त्यांच्या कथेचे विशेष आहे. नीरजा यांच्या विचारसरणीवर प्लेटो आणि सिमॉन यांच्या विचारसरणीतील अनेक साधर्म्य साधणारी मते व्यक्त होतात. पुरोगामी विचारसरणीचा वारसा नीरजा यांना जन्मजात लाभल्याने त्यांच्या कथांचा अवकाश अधिक व्यापक अशा अंगातून वाचकासमोर व्यक्त होतो. सारांश एकविसाव्या शतकातील महत्त्वाच्या कथाकार म्हणून नीरजा यांचा उल्लेख करावा लागतो. या सर्व कथा लेखनामध्ये मानवी नातेसंबंधांचा अतिशय जटिल सामाजिक प्रश्न आणि सातत्याने आत्मसंरक्षणासाठी चालणारा लढा, पात्रांची कुटुंब विश्वातील असलेली चढाओढ, व्यक्तीची मानसिकता आणि भावविश्व, स्त्री म्हणून जगताना आपल्या परिसरातील पाहिलेले भावविश्व हे त्यांच्या कथांचे विशेष म्हणून नोंदविता येईल.

'अफवा खरी ठरावी म्हणून' (२०१०) हा प्रज्ञा दया पवार यांचा पहिला कथासंग्रह. या संग्रहातील बारा कथा ह्या महानगरीय जीवन वास्तवातील संघर्ष आणि सुशिक्षित माणसाच्या मनातील खोलवर जाऊन रुतून बसलेले जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या कथा आहेत. या कथेतील रचनेमध्ये इंग्रजी भाषेतील संवाद आणि आधुनिक वातावरणाचा लेखिकेच्या मनावर असलेला प्रभाव, मानवी मन काळानुरूप कसे बदलते; हे परिवर्तनशील चित्र त्यांच्या कथांतून चित्रित होते. मात्र या कथासंग्रहाच्या कथा संग्रहाच्या शीर्षकाची एकही कथा या संग्रहामध्ये समाविष्ट झालेली दिसत नाही.

अफवा म्हणजे अलीकडेच समाजामध्ये निर्माण झालेली भयभीतता, दहशद, मानवी स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणारे भावनाचित्र आणि त्यातून माणसाच्या मनामध्ये निर्माण झालेली नकारात्मक विचारसारणी लेखिकेला सातत्याने अस्वस्थ

करताना दिसत आहे. तरी तग धरून जगण्याचा अवकाश पेलण्यासाठीचा आशावाद हा प्रज्ञा दया पवार यांच्या कथांचा वाङ्मयीन विशेष म्हणावे लागेल. स्वत:च्या आयुष्यामध्ये एका वेगळ्या आदर्शाचा लुकलुकतात तारा शोधण्यासाठी लेखिकेचा असला अव्याहत प्रवास अतिशय सक्षमपणे घडताना दिसतो. थोडक्यात या कथांचा अभ्यास करत असताना त्यातील आशयसूत्रांवर प्रकाश टाकल्यास महानगरात जाणवणारे असलेले सर्वश्रेष्ठ बारकाव्ये, वेळेअभावी मानवी मनामध्ये निर्माण होणारे तुटलेले अस्वस्थ मन आणि त्यामध्ये झालेला झपाट्याने बदल हे या कथेचे बलस्थाने मानवी लागेल. एकूणच प्रज्ञा दया पवार यांचा पहिला पहिल्या कथासंग्रहाचे म्हणजे 'अफवा खरी ठरावी म्हणून' (२०१०) या संग्रहाचा अनुवाद इंग्रजी (माया पंडित) आणि कन्नड भाषेतही झाला आहे. माणूस म्हणून वाट्याला आलेल्या दलित कळा मनामध्ये सारख्या सलत असतात. हा स्त्रीमनातील दीर्घ अवकाश कथेतून मांडण्याचा प्रयत्न प्रज्ञा दया पवार यांचा हा अनुभव अतिशय गौरवास्पद वाटतो. ते यासाठी या सर्व कथांतून कमालीचा स्थायीभाव व्यक्त होतो. त्यामुळे 'अफवा खरी ठरावी म्हणून' मधील सर्व कथा पुन्हा पुन्हा वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त होतात.

मनस्विनी लता रवींद्र यांचा 'ब्लॉगच्या आरश्यापल्याड' हा संग्रह २०१४ मध्ये प्रकाशित झाला. त्यांचा हा पहिलाच कथासंग्रह एका वेगळ्या अनुभवविश्वाचं चित्रण करणारा आहे. याअगोदर लेखिका नाटककार म्हणून आपणास सर्वांना परिचित आहेत. नाट्यक्षेत्रातील जोडलेला अनुभव; त्यांच्या कथा वाचतानादेखील आपल्याला जाणवतो. लहानपणापासूनच वेगळ्या वैचारिक जडणघडणीमध्ये मनस्विनी यांची यांचे बालपण, आईच्या विचारांचा लाभलेला वारसा यातून देखील वेगळे अनुभव हे त्यांच्या कथेची बलस्थाने मानले पाहिजे. कारण आपल्या नावातून घडवलेली क्रांती हे पण त्यांचे एक विशेष मानावे लागेल. जागतिकीकरण आणि एकविसाव्या शतकाच्या आरंभी तरुण पिढीमध्ये निर्माण झालेली भयभीतता, वाट्याला आलेला एकटेपणाचा, माणसाच्या मनातील एकांगीपणाचा कोपरा, त्यातून व्यक्तिगत कथेचे एक भावविश्व उपस्थित होते. या साऱ्या प्रश्नांनी मन उद्विग्न होते. इतके महानगर भयभीत वाटायला लागते. एका वेगळ्या आशय विश्वात आभाशी जग निर्माण होते. या सर्व बारा कथांतून सटीक भाषाशैली; आधुनिक विचारांची बेधडक मांडणी करणारी, स्त्री-पुरुष नात्यातील लैंगिकतेच्या आणि लिंगभावाच्या अनुभवात जगण्यातील वास्तव

मांडणारी मनस्विनी लता रविंद्र यांची कथा विशेष भावते. विसाव्या शतकात नव्या एका वेगळ्या पार्श्वभूमीवर लिहू पाहणारी मनस्विनी लता रवींद्र यांची कथा वाचकांना एका वेगळ्या अनुभव विश्वामध्ये घेऊन जातात. कथेचा शेवटदेखील वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करतात. हे त्यांच्या कथांच्या संदर्भातील निरीक्षण नोंदविता येते.

**समारोप :**

दोन पिढ्यांच्या सांध्यावर येईल बदल नोंदविणारी कथा ही ब्राम्हणवादी आणि बहुजन समाजातील स्त्रियांच्या कथेतील बदल अभ्यासून कथेचा मर्म शोधताना लेखन प्रेरणेत झालेला निरीक्षणातून मांडण्याचा प्रयत्न हा या लेखात केला आहे. मुख्यत: परिवर्तनवादी विचारसरणीतून निर्माण झालेली आत्मकेंद्रित, भावभावनांचा शोध घेऊन घेतलेला स्त्रीकेंद्री जीवन जाणिवांचा शोध घेणे हे कथा एकविसाव्या शतकातील कथा लेखिकांचे लेखन विषयक विशेष म्हणावे लागेल. बदल हा व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग समजला जातो. या सूत्राचा अवलंब करून नव्या प्रयोगशील तंत्राचा वापर हेदेखील या कालखंडातील कथा लेखिकांचे वेगळेपण नोंदविता येईल. आपापल्या परिसरातील अनुभवविश्वातील प्रश्न, त्यांचे स्थलकालानुसार अवशेष व्यक्त होणं हे मुळातच अपरिहार्य असतं. त्याहीपेक्षा आवाहन स्वीकारून स्वत: पाहिलेलं कल्पित विश्वाला वास्तवाची जोड देऊन लेखन करणं हे जोखमीचे काम असते. अशाच पार्श्वभूमीतून आपला अनुभव क्षेत्र स्वीकारून प्रत्येक कथा लेखिकांच्या कथालेखनात विविधता आढळते. प्रत्येक लेखिकेचे भावविश्व त्यांना अधिक महत्त्वाचे आणि आपुलकीचे भासत असते. कारण तो रोजच्या जगण्याचा भाग असल्याने त्याला नाकारता येणं अथवा विसरता येणं हे पाहिजे तितके शक्य नसते. त्यामुळे एकविसाव्या शतकातील स्त्रीकेंद्री जीवनानुभव मांडण्याच्या मांडणाऱ्या आघाडीच्या ठळक कथालेखिकांच्या कथांचा विचार प्रस्तुत लेखामध्ये केला आहे. त्यामध्ये सानिया, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा, प्रज्ञा दया पवार, अलीकडे लेखन करणारी मनस्विनी लता रविंद्र या ठळक लेखिकांच्या लेखनातील विषयावर प्रकाश टाकला आहे. या संदर्भातील काही निरीक्षणे नोंदविण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे. ब्राह्मणी वर्गाकडून बहुजन समाजापर्यंत कथा कशी बदलत जाते. त्या समाजातून एक स्त्री म्हणून वाट्याला आलेल्या अनुभवांची गाथा सांगून,

लेखिकांची जीवन जाणीवही कशी बदलत जाते? या विषयावरदेखील प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

एकंदरीत मराठी कथा लेखकांची पूर्ववत पूर्वपरंपरा तपासून पाहिली तर अनादि काळापासून स्त्रीच्या जडणघडणीचा आलेख डोळसपणे पहावा लागतो. स्त्री म्हणजे मादी, उपभोगाची वस्तू व अपार कष्ट सहन करणारी, नेहमीच कुचंबणा स्वीकारून जगणारी, दु:खी कष्टी, शोषित पीडित अशा कितीतरी दृष्टिकोनातून तिच्याकडे पाहिले जाते. पण खऱ्या अर्थाने तिच्या अस्तित्वाचा आपण विचार करतो का? तिच्यावर नैसर्गिक रित्या सोपवलेल्या मातृत्वाचा इतिहास पाहिला तर आपणास तिचे अस्तित्त्व असे केविलवाणे रूप वाटू लागते. या जाणिवेतून तिला आत्मभान, आत्म जाणीव निर्माण होऊन, आपलं जगणं तिच्या साहित्य लेखनाचा विषय ठरतो आणि हेच विश्व स्त्रियांच्या कथा लेखनामध्ये विशेष वाटते. अनुभवलेलं बाह्य जग तिच्या जाणिवेतून प्रकटलेले चिंतन, मग ते त्या त्या काळाची अपत्ये मानावे लागेल. इतकी ताकत त्या स्त्रीशक्तीत असते. हे त्रिकालाबाधित सत्य आपणास नाकारता येणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :**


१. कर्वे स्वाती संपा., 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३.
२. गणोरकर प्रभा संपा., 'संज्ञा संकल्पना कोश', भटकळ प्रकाशन, मुंबई २००१.
३. ढेरे अरुणा संपा., 'स्त्रीलिखित मराठी कथा (१९५० ते २०१०)', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४.
४. भागवत श्री. पु. संपा., 'साहित्य अध्यापन आणि प्रकार', पॉप्युलर प्रकाशन आणि मौज प्रकाशन, मुंबई १९८७.
५. राजाध्यक्ष विजया संपा., 'मराठी वाङ्मय कोश खंड : ४', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
६. सोमण अंजली, 'लोकप्रिय आणि सीमावर्ती कथा, मराठी कथेची स्थितीगती', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती. १९९५.



क. जे. सोमैया केन्द्रीय संस्कृत विश्वविद्यालय,
मुंबई - ७७.
मो. ८८५०३८९६४१


* * * * *

# स्त्री समीक्षकांचे एकविसाव्या शतकातील योगदान

**- डॉ. कैलास अंभुरे**

गत दीडशे वर्षातील मराठी समीक्षेच्या वृद्धी व विकासामध्ये साहित्यिक, वाचक, समीक्षक, अभ्यासक, नियतकालिके, चर्चा, संमेलने, परिषदा, विद्यापीठीय विभाग, अभ्यासक, संशोधक, प्रकाशन संस्था व साहित्य संस्था इत्यादींचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिलेला आहे. प्रारंभ काळात प्रचलित असलेली 'टीका' कालांतराने पाश्चात्त्य वळणाच्या समीक्षेत बदलली. कधी काळी केवळ भावार्थ सांगणे, भाष्य करणे यापर्यंत मर्यादित असलेला हा प्रकार ग्रंथपरिचय/ग्रंथ परीक्षणव तात्त्विक मांडणीच्या स्वरूपात बदलला. 'वाङ्मयाविषयीचे वाङ्मय' या विचारातील मतितार्थ लक्षात न घेतल्याने 'समीक्षा हा साहित्यावलंबी प्रकार आहे.' याप्रकारचे ग्रह आजही रुजलेले आहेत. मात्र 'समीक्षकांनी आपल्या साहित्याची दखल घ्यावी' अशी महाकवींपासून ते नवकवींपर्यंत सर्वांची अपेक्षा असल्याचे लख्खपणे जाणवते. याचाच अर्थ समीक्षा ही साहित्याइतकीच महत्त्वाची आहे. याविषयी आज तरी दुमत असण्याचे कारण नाही.

'स्त्री समीक्षकांचे एकविसाव्या शतकातील योगदान' विचारात घेताना एकतर समीक्षकनिहाय मांडणी करणे किंवा ग्रंथनिहाय परामर्श घेत काही निरीक्षणे नोंदवता येतील. यापैकी कोणत्याही पद्धतीचा अवलंब केला तरीही रिक्त जागा राहण्याची शक्यता आहे. येथे स्त्री समीक्षकांचे समीक्षेतील ग्रंथनिहाय कालक्रमिक कार्य लक्षात घेतले आहे. यामध्येही दोन हजार नंतरच्या काळात स्त्री समीक्षकांनी सैद्धांतिकदिलेले योगदान आणि दोन हजार नंतरच्या स्त्रीसाहित्याची स्त्री समीक्षकांनी केलेली समीक्षा अशी वर्गवारी केली आहे. वर्तमान शतकातील दोन दशकांमध्ये नियतकालिके, उपयोजित समीक्षेतील वृद्धी, वाङ्मय प्रवाह व प्रकारनिष्ठ समीक्षा, विद्यापीठीय विभाग/साहित्य संस्था आणि समीक्षा, स्त्री समीक्षेचे वेगळेपण व स्त्री समीक्षकांकडून अलक्षित राहिलेली क्षेत्रे असा विचार करीत आहे. या मांडणीला काही प्रमाणात परिचयाचे. आढाव्याचे स्वरूपदेखील या वीस वर्षाच्या काळात विपुल मुद्रण तंत्रज्ञान आणि संशोधक-अभ्यासक यांचे प्रमाणदेखील पुष्कळच वाढलेले आहे. वाढीव ग्रंथांचा दर्जा हा नंतरचा भाग आहे परंतु यापैकी अनेक ग्रंथ उपलब्ध न झाल्यामुळे या मांडणीला निश्चितच मर्यादा

आहेत, याची मला जाणीव आहे.

मराठी साहित्याप्रमाणेच पुरुषांच्यानंतर स्त्रियांचा समीक्षा क्षेत्रात प्रवेश झालेला आहे. अगदी १९५० पर्यंत स्त्रियांच्या समीक्षेचे केवळ चार ग्रंथ प्रकशित असल्याची नोंद दाते सूचीमध्ये आहे. याउलट पुरुष समीक्षकांच्या समीक्षेची स्थिती आहे. विसाव्या शतकात यामध्ये बदल झाला आणि स्त्री समीक्षकांनी मराठी समीक्षेत भरीव योगदान दिले आहे. यामुळे एकविसाव्या शतकातील स्त्री समीक्षकांचा विचार करण्यापूर्वी २० व्या शतकातील समीक्षकांनी केलेल्या पायाभरणीची नोंद करणे अपरिहार्य वाटते. गोदावरी केतकर, कुसुमावती देशपांडे उषा देशमुख, दुर्गा भागवत विजया राजाध्यक्ष, सरोजिनी वैद्य, इंदुमती शेवड़े माया सरदेसाई, उषा हस्तक, रेखा साने-इनामदार, सुहासिनी इलेकर, सुषमा करोगल, प्रभा गणोरकर, सुधा जोशी, अरुणा ढेरे, जया दडकर, उमा दादेगावकर, अश्विनी धोंगडे, तारा भवाळकर, पुष्पलता राजापुरे-तापस, मंगला वरखेडे, अंजली सोमण इ. यापैकी काही स्त्री ञ्ञ समीक्षकांचे लेखनकार्य एकविसाव्या शतकातदेखील सुरू आहे.

**सैद्धांतिक समीक्षा :**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये विज्ञान-तंत्रज्ञानासह समाजाच्या सर्वच क्षेत्रात विस्मयकारक प्रगती झाली. माहिती तंत्रज्ञान व प्रसार माध्यमांच्या जाळ्याने अवघे विश्व कवेत घेतले. साठोत्तरी काळात मराठी साहित्यात विविध वाङ्मयीन प्रवाहांचा उदय झाला. या प्रवाहातील साहित्याच्या विश्लेषण व मूल्यमापनासंदर्भात स्वतंत्र विचारव्यूहांची चर्चा सुरू झाली. सोबतच सत्तरच्या आसपास विविध समीक्षा दृष्टिकोनांच्या परिचयास प्रारंभ झाला. पाठोपाठ जागतिकीकरणाचा बोलबाला सुरू झाला आणि थॉमस फ्रिडमन म्हणतो त्याप्रमाणे जगाची वाटचाल सपाटीकरणाच्या दिशेने सुरू झाली. विविध देशांमध्ये अंतर निर्माण करणाऱ्या भिंती अस्तंगत झाल्या. मायक्रोसॉफ्टने 'विंडोज' ही कार्यप्रणाली (ऑपरेटिंग सिस्टिम) सुरू केली. यामध्येच इंटरनेट सुविधेची भर पडलीआणि अवघे विश्व एका खिडकीतून डोकावून पाहता येऊ लागले गूगल या सर्च इंजिनचा उदय झाला. पाठोपाठ मोबाईल नावाच्या वस्तूने क्रांती केली. या सर्व ऐतिहासिक, अभूतपूर्व घटनांचे पडसादसामान्य माणसांसह समाज, साहित्य, संस्कृती व कलांवरदेखील पडले. मानवी जीवनातील वाढत्या व्यामिश्रतेचा परिणाम साहित्यादी कलांवरदेखील झाला. यामुळे साहित्यादी कलांचा यथायोग्य आस्वाद, आकलन,

विश्लेषण, अर्थनिणऱ्यन व मूल्यमापन होण्यासाठी साहित्याबरोबरच समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, धर्म, भाषाशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, पर्यावरण, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, साहित्येतर कला अशा अनेकविध ज्ञानशाखांचा अभ्यास आवश्यक झाला. कधी काळी प्रचलित असणारी साहित्य मूल्यमापनाची तत्त्वे, कसोट्यांमध्ये बदल स्वीकारणे अपरिहार्य झाले. परिणामी आपल्याकडे पाश्चात्त्य सिद्धांत, वाद, विचारप्रणालींचा अवलंब वाढला. यामध्ये इंग्रजी जाणणारे प्राध्यापक, अभ्यासक हे आघाडीवर होते, आहेत. विसाव्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात अशा सर्व प्रणालींचे आयातीकरण वाढले. (रा. रा. भालचंद्र नेमांड्यांच्याभाषेत 'स्मगलिंग' वाढले.) प्रभाव वाढला. उसणवारी वाढली. काळानुरूप मराठी साहित्यातील व्यापक अवकाश समजून घेऊन कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी मराठी समीक्षेने संदर्भलक्ष्यी होणे अपरिहार्य झाले. 'मराठी समीक्षेत पाश्चात्त्य विचारांचा आणि साहित्य सिद्धांतांचा प्रभाव आहेच परंतु संदर्भ सोडून त्यांचा सर्रास वापरही केला जातो. म्हणून या काळात मानसशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय इत्यादी ज्ञानक्षेत्रांचा आधार घेऊन निर्माण झालेले सिद्धांत कुठलाही विचार न करता आयात केले गेले.' (किंबहुने). पाश्चात्त्य सिद्धांत, वाद वा उपपत्तींचा परिचय, त्यांचे भाषांतर वा अनुवाद आयातीकरण हे साहित्य व सांस्कृतिक व्यवहार समृद्धतेसाठी योग्य आहे; परंतु आपल्या देशातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, भाषिक व नैसर्गिक पर्यावरण/परिस्थितीसापेक्ष यामध्ये बदल करणे आवश्यक होते. या आयातीकरणामध्ये पुरुष समीक्षक आघाडीवर असल्याचे स्पष्टपणे जाणवते. विशेष म्हणजे मराठी समीक्षेतील या उसणवारीविषयी ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ, हरिश्चंद्र थोरात, रवींद्र किंबहुने, भालचंद्र नेमाडे, आनंद पाटील प्रभृतींनी बोट ठेवलेले आहे.

साधारणतः सत्तरच्या आसपास सुरू झालेल्या पाश्चात्त्य विचारव्यूहांनी विसाव्या शतकाची शेवटची दशके प्रभावीत केली. विविध दष्टिकोन व विचारव्यहांचे मराठी समीक्षेत अधिकाधिक उपयोजन होऊ लागले. सोबतच विवि व समीक्षकांकडून समीक्षा ग्रंथाद्वारे सैद्धांतिक समीक्षा समृद्ध करण्यचा प्रयत्न झाला. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला सैद्धांतिक समीक्षेच्या संदर्भातील दोन महत्त्वाचे कोश प्रसिद्ध झाले. या दोन्ही कोशांच्या संपादनामध्ये मराठीतील ख्यातनाम स्त्री समीक्षकांचा सहभाग आहे, हे विशेष. 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश' हा ग. रा. भटकळ फाउण्डेशनद्वारे डिसेंबर २००१ मध्ये प्रकाशित झालेला आहे. या

कोशाच्या संपादनात समीक्षक वसंत आबाजी डहाके, सदानंद भटकळ व रमेश वरखेडे यांच्यासमवेत प्रभा गणोरकर, जया दडकर व आशा राजवाडे या स्त्री समीक्षक/अभ्यासकांचा सहभाग आहे. या कोशाच्या संपादक नामावलीमध्ये समीक्षक प्रभा गणोरकर यांचे नाव अग्रभागी आहे. नोव्हेंबर २००२ मध्ये 'मराठी वाङ्मयकोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा' या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत सिद्ध झालेल्या कोशाच्या समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष आहेत. या दोन्ही ग्रंथांमध्येसमीक्षेतील तात्त्विक संकल्पनांची नोंद आहे. शिवाय पाश्चात्त्य अभ्यासक, समीक्षकांच्या संदर्भातील नोंदी आहेत. परंतु मराठीमध्येवाङ्मयीन वादांच्या संदर्भातील दोन महत्त्वाच्या ग्रंथांच्यासंपादनात स्त्रियांचा सहभाग नाही. यापैकी वाङ्मयीन वाद : संकल्पना व स्वरूप' हा प्रा. गो. म. कुलकर्णी गौरवग्रंथ नोव्हेंबर १९९० मध्ये प्रकाशित झालेला आहे. या ग्रंथाच्या संपादनामध्ये स्त्रीचा सहभाग नसला तरी प्रस्तुत निबंध लेखनात शोभा पवार या केवळ एकमेव स्त्री समीक्षकांचा सहभाग आहे. (यामध्ये एकूण अठरा लेख आहेत.) शोभा पवार यांनी 'फॉमलिझम'विषयी लेखन केलेले आहे. हा ग्रंथ विसाव्या शतकातील असला तरी मराठीमध्येवादां विषयीचे जे निवडक ग्रंथ उपलब्ध आहेत त्यापैकी हा एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ आहे. 'समीक्षेतील नव्या संकल्पना' हा याच मालिकेतील एक ग्रंथ. या ग्रंथाचे संपादन मनोहर जाधव यांनी केलेले आहे. यामध्ये भारतीय व पाश्चात्त्य वादांविषयी असलेल्या चौदा लेखांपैकी प्रा. मंगला वरखेडे व प्रा. अरुणा दु भाषीया केवळ दोन स्त्री समीक्षकांच्या लेखांचा अंतर्भाव आहे. हे दोन्ही लेख स्त्रीवादाच्या संदर्भातील आहेत. यापूर्वी १९९९ मध्ये निवडक मराठी समीक्षा' हा साहित्य अकादेमी, नवी दिल्ली यांनी प्रकाशित केलेला एक महत्त्वपूर्ण ग्रंथ. या ग्रंथाचे संपादन गो. मा. पवार व म. द. हातकणंगलेकर या समीक्षकद्वयांनी केलेले आहे. या ग्रंथात १८७२ ते १९९० या साधारणत: शंभर वर्षातील मराठी समीक्षेच्या वाटचालीत महत्त्वाच्या असलेल्या प्रातिनिधिक निबंधांची निवड करण्यात आलेली आहे. या ग्रंथातील २९ निबंधपैकी केवळ एका स्त्री निबंधकारांचा कुसुमावती देशपांडेयांचा इंग्रजी काव्य आणि मराठी मनोवृत्ती' हा निबंध समाविष्ट आहे. पुढे डिसेंबर २००४ मध्ये 'विसाव्या शतकातील मराठी समीक्षा' (संपा.विलास खोले) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथात प्रस्तावना व सूचीसह नऊ लेख आहेत. सहा निबंधांपैकी काव्यसमीक्षा' (नीलिमा गुंडी), 'नाट्यसमीक्षा' (शुभदा शेळके) व

'कथासमीक्षा' (भारती निरगुडकर) हे तीन निबंध स्त्री समीक्षकांचे आहेत. हे प्रमाण पुरुष समीक्षकांच्या बरोबरीचे आहे. अर्थात ही बरोबरी केवळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मकदेखील आहे. या सर्व कोश-ग्रंथांचा उल्लेख करण्यामागील हेतू मराठी समीक्षा क्षेत्रातील स्त्री-पुरुष समीक्षकांच्या वास्तव-व्यवहाराकडे लक्ष वेधणे हा आहे.

आतापर्यंत ९३ अखिल भारतीय मराठी साहित्यं संमेलने संपन्न झाली आहेत. या संमेलनाच्याण ९३ अध्यक्षांपैकी केवळ ५ स्त्री साहित्यिकांना अध्ययक्षपदी विराजमान होण्याचा सन्मान मिळालेला आहे. यापैकी कुसमावती देशपांडे, दुर्गा भागवत, विजया राजाध्याक्ष व अरुणा ढेरे यांचे समीक्षा क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे.

समीक्षा या प्रकारात अंतर्भूत नसलेले परंतु स्त्री साहित्याचा मागोवा घेण्याचे कार्य भारती विद्यापीठ अभिमत विश्वमविद्यालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांनी 'स्त्री साहित्याचा मागोवा' खंड १ ते ४ द्वारे केले. या चार खंडांच्या संपादनात डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरुणा ढेरे, विनया खडपेकर, मंजिरी ताम्हणकर, डॉ. नीलिमा गुंडी व डॉ. ज्योत्स्ना आफळे यांनी डॉ. सरोजिनी वैद्य यांच्याा मार्गदर्शनाखाली ऐतिहासिक योगदान दिले आहे. हा इ.स. १८५० ते २०१० असा १६० वर्षातील स्त्री साहित्यिकांच्या योगदानाचा आढावा आहे.

२१ व्या शतकातील दोन दशकांमध्ये मराठी सैद्धांतिक समीक्षेमध्ये योगदान देणाऱ्या स्त्री समीक्षकांचे प्रमाण मात्र अल्प आहे. पुरुष समीक्षकांप्रमाणे पूर्णवेळ समीक्षेला वाहून घेणे सातत्याने वाचन-चिंतन-मनन-लेखन ही प्रक्रिया काही अपवाद वगळता नव्या पिढीतील स्त्री-पुरुष लेखक/समीक्षकांकडून होताना दिसत नाही. सध्याच्या गतिमानी काळात चालण्यापेक्षा पळण्याला अधिक गती आहे. त्यामुळे एखाद्या विषयाला/क्षेत्रात निष्ठेने वाहून घेणे आणि आयुष्यभर ते क्षेत्र समृद्ध करत राहणे, यासारख्या गोष्टी घडत नाहीत. शिवाय आज २१व्या शतकात वावरत असताना कितीही नाही म्हटले तरी स्त्रियांच्या मागे घर-संसार-कुटुंब-मुलं-नोकरी-व्यवसाय या जबाबदाऱ्या असल्याचाही परिणाम त्यांच्या निर्मितीवर होतो. या पार्श्वभूमीवर स्त्रीसमीक्षकांच्या सैद्धांतिक समीक्षेतील कामगिरीकडे पाहावे लागते.

मराठी साहित्यामध्ये म. मो. कुंट्यांपासून ते अगदी वर्तमान काळातील ज्येष्ठ समीक्षकांनी मराठीच्या स्वतंत्र साहित्यशास्त्राची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. संत कवींच्या कवितेतून आलेले स्वतंत्र काव्यशास्त्र असेल वा केशवसुतांनी कवितेद्वारे याविषयी मांडलेली भूमिका असेल या भूमिकेला पुढे घेऊन जाण्याचे, तिला भक्कम सैद्धांतिक आधार देण्याचे कार्य मा. गो. देशमुखांसारखे काही अपवाद वगळता सक्षमपणे झालेले नाही. आजची आपली समीक्षा ही 'मधल्या स्थितीत आहे. तिची अवस्था मराठी भाषेसारखी झालेली आहे. संस्कृत साहित्यशास्त्राचा आजच्या आधुनिक दृष्टीने अन्वयार्थ न लावणे आणि इंग्रजीसारख्या परकीय भाषेचे नीटपणे आकलन नसताना समीक्षा सिद्धांतांचे उपयोजन करणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे मराठी समीक्षेचे पर्यायाने साहित्याचेदेखील नुकसानच झाले आहे. ही स्थिती केवळ अलीकडच्या दोन दशकातील नाही, तर 'गेल्या पन्नासएक वर्षापासून मराठी समीक्षेचा निर्वाह केवळ पाश्चात्त्य साहित्यविचारांवर होत आहे. परंतु इंग्रजीसारख्या परकीय भाषेतील सैद्धांतिक समीक्षेचे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना नीटपणे आकलन करता येणे शक्य होत नाही.' (रसाळ). अशा स्थितीत काही स्त्री अभ्यासक-समीक्षकांनी संस्कृत साहित्यविचारांची कालसुसंगत मांडणी केली आहेडॉ. लीला गोविलकर यांनी भारतीय साहित्यविचार' (२००३) या ग्रंथात प्रथमत: काव्यस्वरूपाची चर्चा करून अलंकार, वक्रोक्ती, रीति, ध्वनी, रस व औचित्य विचारांची आधुनिक मीमांसा केलीआहे. तर शेक्सपियर, इब्सेन, ब्रेख्त इ. पाश्चात्त्य मीमांसकांच्या विचारांइतकाच भरतमुनींचा नाट्यविचार आजही महत्त्वाचा आहे. त्याची अभिनयकेंद्री मांडणी डॉ. सरोज देशपांडे यांनी 'भरतमुनींचे नाट्यशास्त्र अभिनयकेंद्री' (२००८) या ग्रंथात केली आहे. या विवेचनाचे वेगळे सूत्र म्हणजे 'अभिनय' या नाटकातील महत्त्वाच्या घटकाला त्यांनी केंद्रवर्ती ठेवले आहे. याप्रमाणेच छंदशास्त्र हा महत्त्वाचा; पण आधुनिक काळातील मुक्तछंद कवितेमुळे काहीसा बाजूला असलेला विचार. छंदशास्त्राच्या अभ्यासक, समीक्षक डॉ. शुभांगी पातुरकर यांनी 'छंदोमीमांसा' (जून २०१७) या ग्रंथाद्वारे छंदाची परंपरा, प्रयोग, चिकित्सा, रसग्रहण व आढावा अशी सैद्धांतिक व तात्त्विक मीमांसा केली आहे. यापूर्वीदेखील त्यांनी 'मराठी मुक्तछंद' व 'छंद : शास्त्रीय समीक्षा' या दोन ग्रंथाद्वारे छंद व मुक्तछंदाचे विस्तृत विवेचन करून कालसापेक्ष अन्वयार्थ लावला आहे.

आजपर्यंत पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या परिप्रेक्ष्यातून मराठी साहित्याची वैविध्यपूर्ण समीक्षा झाली आहे. विविध पाश्चात्त्य इझमचा (भारतीय - अभावात्मक) उपयोग करून साहित्यकृतींचे आकलन-विश्लेषण-अन्वयार्थ व मूल्यमापनात्मक समीक्षेचे प्रयत्न झाले आहेत. पण अशा तत्त्वज्ञानाचे उपयोजन करण्याचे प्रमाण स्त्री समीक्षकांमध्ये अल्प आहे (अपवाद स्त्रीवाद). डॉ. रेखा साने-इनामदार यांनी अस्तित्ववादी विचारप्रणालीचा अवलंब करून मराठी कादंबरीचाअभ्यास केला आहे. मराठी साहित्यविश्वात ७५ ते ८५ हे दशक महिलांच्या दृष्टीने जसे महत्त्वाचे होते, तसेच अस्तित्ववादीची चर्चादेखील या काळात झाली. मराठी साहित्य व समीक्षेवरील अस्तित्ववादाचा असलेला प्रभाव लक्षात घेऊन रेखा साने-इनामदार यांच्या प्रबंधाचा सिद्ध झालेला ग्रंथ म्हणजे 'अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी' (ऑगस्ट २००४) होय. पाश्चात्त्य अस्तित्ववादी तत्त्वज्ञानात कीर्केगार्ड, नीत्शे, यास्पर्स, मार्सेल, हायडेगर, काम्यूव सात्र यांनी क्रांतीपूर्ण भूमिका निभावली. या वादाचा अनेक देशातील साहित्य, कला व समीक्षेवर प्रभाव पडला. या सर्व अस्तित्ववादी जडणघडणीचा डॉ. रेखा यांनी परामर्श घेत 'अस्तित्ववाद' ही संकल्पना स्पष्ट करून आस्तिकता नास्तिकता, स्वातंत्र्य परात्मता, असंगतता, जीवनप्रणाली इ. अस्तित्ववादी आशयसूत्रे विशद केली आहेत. सोबतच तत्त्वज्ञान आणि साहित्य यातील परस्परसंबंधाची तात्त्विक मीमांसा कात काही पुरुषलेखकांच्या मराठी कादंबऱ्यांचे अस्तित्ववादी अंगाने विश्लेषण केले आहे. हा किंवा असे काही अपवाद वगळता स्त्री समीक्षकांनी वादाचे उपयोजन व मीमांसा असे प्रयत्न केल्याचे दिसत नाही.

वैश्विक स्तरावर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या प्रारंभी स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षेची मीमांसा सुरू झाली. आपल्याकडे मात्र आंतरराष्ट्रीय महिला वर्ष (१९७५) व आंतरराष्ट्रीय महिला दशका (१९८५) नंतर स्त्रीवादी साहित्य व समीक्षा विचारास आरंभ झाला. 'अनुष्टुभ'च्या सप्टें.-ऑक्टो.१९८७ च्या अंकात शिरीन कुडचेकर यांचा 'स्त्रीवादी साहित्यसमीक्षा' हा लेख प्रसिद्ध झाला. तद्नंतर अश्विनी धोंगडे, मंगला वरखेडे यांचे स्त्रीवादी साहित्य व समीक्षेचे तात्त्विक विवेचन करणारे ग्रंथ सिद्ध झाले. यानंतर स्त्री अभ्यासकांनी स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास करण्याची पद्धती प्रचलित झाली. अलीकडे दोन हजार नंतरच्या काळातदेखील स्त्रीवादी तत्त्वप्रणालीचा पाश्चात्त्य तसेच भारतीय मराठी समाज-संस्कृती-धर्म-राजकारण-अर्थकारण-पर्यावरणभाषा-लिंगभाव-प्रदेश-

प्रवाह-प्रवृत्ती संदर्भाने विस्तार वाढत जाऊन स्त्रीवाद केंद्रवर्ती असलेल्या समीक्षाग्रंथांची अधिक निर्मिती झाली.

'स्त्रीवादी विचार आणि स्त्री समीक्षेचा मागोवा' (२००७) हा स्त्रीवादी समीक्षक डॉ. शोभा पाटील यांचा मराठी साहित्य व्यवहारातील स्त्रीवादाची वेगळी मांडणी करणारा ग्रंथ. तत्पूर्वी त्यांनी स्त्रियांच्या आत्मचरित्रांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून प्रबंधग्रंथ सिद्ध केला आहे. स्त्रीवादी विचार हा पाश्चात्त्य देशातून आपल्याकडे आला. यामुळे त्यांनी पाश्चात्त्य स्त्रीवाद मराठीतील स्त्रीवाद वाङ्मय क्षेत्रातील स्त्रीवाद अशी विस्तृत मांडणी केली आहे. पती-पत्नी, लैंगिकता, उत्पादनक्षमता, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या घटकानुसार विवेचन करून वाङ्मय क्षेत्रामध्ये कशा प्रकारे गायनोसेंट्रिक आणि अँड्रोसेंट्रिक पद्धतीने व्यवहार होतो, हे त्या मांडतात. प्रकाशक सुमती लांडे व श्रुती तांबे यमी संपादित केलेल्या 'स्त्रीवाद' (२००७) या ग्रंथात स्त्रीवादाची तात्त्विक मांडणी आहे. हा ग्रंथ सहा विभागात विभागलेला असून पहिला भाग - स्त्रीवाद : संकल्पना आणि सिद्धांत, दुसरा-स्त्रीवाद : विविध भूमिका (कार्यकर्त्या स्त्रियांच्या मुलाखती), तिसरा-स्त्रीवाद : काही दृष्टिकोन, चौथा- स्त्रीवादी दृष्टिकोनातून काही प्रश्नांचा मागोवा, पाचस्त्रीवाद- जगताना/समजून घेताना, सहा- स्त्रीविषयक काही विचार, सात-संस्था परिचय/स्त्रीविषयक पुस्तकांची सूची अशी स्त्रीवादाची वेगळी व अनुभूतीपूर्ण वास्तव मांडणी या ग्रंथातयेते. तद्नंतर 'सांस्कृतिक प्रवाहांची स्त्रीवादी समीक्षा'-डॉ. वंदना महाजन (एप्रिल २०११) या ग्रंथात स्त्रीवादी चळवळीसोबतच स्त्रीवादातील विविध प्रवाह, धर्मपरंपरा, ग्रामीण संस्कृती, वर्ग-वर्णजातव्यवस्था, प्रसारमाध्यमे, राजकारण आदींची स्त्रीवादी दृष्टीने समीक्षा आहे. स्त्रीवादी मांडणीच्या मालिकेतील 'संदर्भासहित स्त्रीवाद : स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व'-जाने.२०१४ (संपा. वंदना भागवत, अनिल सपकाळ, गीतांजली वि. म.) हा वेगळी चर्चा करून दिशा देणारा समीक्षा ग्रंथ आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांच्या कार्यगौरवानिमित्त निर्माण केलेल्या ५७९ पृष्ठाच्या या ग्रंथात विविध अभ्यासकांनी केलेली स्त्रीवादी तत्त्वज्ञान, लिंगभाव, जागतिकीकरण, विविध धर्म व स्त्री, स्त्रीवादी जाणिवा आणि साहित्यप्रकार इ. संदर्भात विस्तृत मांडणी आहे. 'स्त्रीवाद, साहित्य आणि समीक्षा'-वंदना भागवत (डिसें.२०१८) या ग्रंथातदेखील स्त्रीवादाची तात्त्विक मांडणी आहे. 'स्त्रीवाद' या संकल्पनेचा उहापोह करून पाश्चात्त्य व भारतीय स्त्रीवादाचा आढावा आहे. तसेच स्त्रीवादी साहित्य

व समीक्षेच्या मांडणीसह ग्रंथाच्या दुसऱ्या भागात स्त्रीवादी समीक्षेचे उपयोजन आहे.

विविध वादांप्रमाणेच समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, मार्क्सवादी, आदिबंधात्मक, ऐतिहासिक, चरित्रात्मक, रूपवादी, मूल्यविवेकनिष्ठ, सौंदर्यवादी, शैलीवैज्ञानिक, स्त्रीवादी, संभाषणात्मक यांसारख्या समीक्षा दृष्टिकोन प्रमाणकांचा अवलंब करून विविध साहित्यकृतींची समीक्षा करण्याचे प्रकारही वाढले आहेत. एका अर्थाने नवीन पिढीकडून अशा प्रकारचे साचे तयार करून कलाकृतीकडे पाहिले जाते. येथे मला ज्येष्ठ समीक्षक हरिश्चंद्र थोरात यांचे विधान उद्धृत करणे आवश्यक वाटते. या साच्यांविषयी थोरात म्हणतात, 'आपल्याकडे विविध पाश्चात्त्य सिद्धान्तव्यूहाचे जे उपयोजन केले जाते ते पाहिले की मला माझ्या खेड्याकडच्या सायकल दुरुस्तीच्या दुकानाची आठवण येते. या दुकानदाराकडे एक पेटी होती. तिच्यम वेगवेगळे पान्हे, साधने होती. एक पान्हा काढायचा, लावून पाहायचा, लागला नाही तर दुसरा काढायचाअसा व्यवहार असे. मराठी समीक्षेमध्ये याच प्रकारचे पाश्चात्त्य पान्हे वापरले जातात. सायकलचा दुकानदार ते बसतात की नाही हे पाहत असे. आम्ही आमच्या बौद्धिक हत्यारांची तेवढीही काळजी घेत नाही.' (थोरात). परंतु बौद्धिक व्यवहार करणारे स्त्री समीक्षक मराठी साहित्यात आहेत. यापैकीच एक डॉ. मनीषा खैरे होत. डॉ. मनीषा यांनी स्त्रीवाद आणि मार्क्सवाद या दोन विचारप्रणालींचा समन्वय साधून नावीन्यपूर्ण दृष्टी देणारा 'मार्क्सवादी समीक्षेचे स्त्रीवादी वाचन' (ऑक्टो.२०१९) हा ग्रंथ सिद्ध केला आहे. यामध्ये भारतातील मार्क्सवाद, मार्क्सवादी चळवळ, पाश्चात्त्य मार्क्सवाद-साहित्य-समीक्षा आदींचे वाचन-आकलन-विश्लेषण-उपयोजन आहे. तसेच मराठीतील प्रसिद्ध मार्क्सवादी समीक्षक दि. के. बेडेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध शरद पाटील, के. रं. शिरवाडकर, लालजी पेंडसे, गं. बा. सरदार, दिगंबर पाध्ये यांच्या समीक्षाविचाराचे स्त्रीवादी वाचन हा एक वेगळा दृष्टिकोन समोर येतो. मार्क्सवाद असेल वा स्त्रीवाद असेल या व अन्य तत्त्वप्रणालींमध्ये समाजिक व सांस्कृतिक तत्त्व महत्त्वाचे आहे. या पलीकडे जाऊन साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अंगाने विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्याचे सातत्याने प्रयत्न झाले, होत आहेत. या सामाजिक मालिकेतील 'आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता' (मार्च २००७) हा समीक्षाग्रंथ होय. डॉ. मृणालिनी शहा व डॉ. विद्यागौरी टिळक यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. साहित्य व सामाजिक

अनुबंध संदर्भाने महाराष्ट्रातील प्रबोधनाची वाटचाल, साहित्याचे समाजशास्त्र, मराठी माणसांची ऐतिहासिक जडणघडण, नवे संहितालक्ष्यी सिद्धान्तव्यूह व सामाजिकता, संदर्भलक्ष्यी साहित्यसिद्धान्त व सामाजिकता, स्त्रियांच्या साहित्यातील सामाजिकता, महानगरी आधुनिक साहित्यातील सामाजिकता इत्यादीसोबतच ग्रामीण कादंबरी, लोकप्रिय साहित्य, मराठी नाटक, दलित साहित्य इ. तात्त्विक चर्चा करणारे निबंध मराठी साहित्याच्या सामाजिक अभ्यासाला नवे आयाम प्रदान करतात. अशीच सैद्धांतिक संकल्पनांची चर्चा असणारा 'समीक्षासंहिता' (मार्च २०१२) हा एक ग्रंथ होय. डॉ. भारती निरगुडकर यांनी विविध चर्चासत्रात सादर केलेल्या शोधनिबंधांचाहा संग्रह आहे. हे शोधनिबंध चर्चासत्रातील असले तरी यामध्ये स्त्रीवाद, कथनमीमासा, लेखकाभ्यास, मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय समीक्षा असे अत:सूत्र आहे.

विद्यार्थी व नव अभ्यासकांना काहीशी क्लिष्ट वाटणारे समीक्षाशास्त्र सुलभ परचियात्मक पद्धतीने मांडण्याचे प्रयत्न प्रत्येक काळात होतात. असेच विद्यार्थीसापेक्ष प्रयत्न प्रा. नीला पांढरे यांनी केले आहेत 'समीक्षा आणि समीक्षा पद्धती' (जाने. २०१४) व 'मराठी समीक्षेची वाटचाल' (जुलै २०१६) या पुस्तकात समीक्षेचा तात्त्विक परिचय आहे. दोन्ही ग्रंथात समीक्षा म्हणजे काय? समीक्षकाची साधना, मराठी समीक्षेची वाटचाल, स्वातंत्र्योत्तर काळातील समीक्षाप्रवाह आणि मराठीतील उल्लेखनीय सत्तर समीक्षकांचा परिचय आहे.

मराठी साहित्यात समीक्षेची समीक्षा करण्याचे फारसे प्रयत्न होत नाहीत. यामागे विविध कारणे आहेत. पण सध्याच्या काळात जे काही वेगळे प्रयत्न केले आहेत त्यामध्ये 'गाडगीळांची समीक्षारूपे' - प्रा. भारती निरगुडकर व 'प्रादेशिक ग्रामीण साहित्य : समीक्षेची समीक्षा' - डॉ. रेखा जगनाळे (मार्च २००७) या ग्रंथांची आवर्जून दखल घ्यावी लागते. अर्थात या दोन्ही ग्रंथात समीक्षकांच्या समीक्षेची समीक्षा केलेली आहे. नवकथाकार गंगाधर गाडगीळ यांचे मराठी समीक्षेतील योगदान लक्षणीय आहे. त्यांच्या समीक्षेविषयी प्रा. भारती निरगुडकर यांनी गंगाधर गाडगीळांची समीक्षा आणि समीक्षाविचार हा विषय घेऊन पीएच.डी.चा अभ्यास केला. या प्रबंधाचे 'गाडगीळांची समीक्षारूपे' हे ग्रंथरूप आहे. गाडगीळांनी कविता कथा, नाटक, अन्य साहित्यप्रकार व लेखकलक्ष्यी इ. संदर्भाने समीक्षालेखन केले आहे. त्यांच्या या समीक्षेसह नवसाहित्य, त्यांचे स्वत:चे साहित्य, त्यांची साहित्यसमीक्षादृष्टी आणि समीक्षेची

समीक्षा अशी व्यापक मीमांसा निरगुडकरांनी केली आहे साहित्यिकांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व असा अभ्यास मराठी साहित्यात मुबलक प्रमाणात आहे; पण समीक्षकाचे व्यक्तिमत्त्व आणि समीक्षा असा अभ्यास नगण्य आहे. प्रस्तुत अभ्यास हा उपयोजित जरी असला तरी मराठी समीक्षेत अत्यंत महत्त्वाचा आहे. साठोत्तरी काळातील प्रादेशिक-ग्रामीण साहित्याच्या समीक्षेचे पुनर्वाचन करून नवी मांडणी डॉ. रेखा यांनी नवी मांडणी केली आहे. नाट्यतंत्राच्या संदर्भातील 'तंत्र नाट्यदिग्दर्शनाचे' (जाने. २००७) हा पुष्पा काणे यांचा समीक्षाग्रंथ. या ग्रंथातनाट्यसंहितेचा प्रयोगात्म विचार आहे. प्रयोग सादर होत असताना दिग्दर्शक-कलावंतांपासूनसंगीत-प्रकाश-रंगमंचवेशभूषा या सर्वांचे मिळून एक प्रयोगरूप आकारत असते. यामध्ये या सर्वांची असलेली सर्जनशीलता आणि त्यांचे उत्तरदायित्व, त्यातील प्रश्न आदींची सखोल चर्चा येते. येथे

## नियतकालिके व समीक्षा

प्रारंभ काळातील नियतकालिके असोत वा साठच्या काळातील अभिरूची, युगवाणी, हंस, नवभारत, साहित्य, प्रतिष्ठान, मराठी संशोधन पत्रिका, छंद, पंचधारा, आलोचना, समाज प्रबोधन पत्रिका, ललित, अस्मितादर्श, महाराष्ट्र साहित्य पत्रिका इत्यादी नियतकालिके असोत, या नियतकालिकांनी सातत्याने समीक्षेला, स्त्री समीक्षकांनाजोपासण्याचे/संवर्धनाचे कार्य केले आहे. यापैकी 'आलोचना' हे निव्वळ समीक्षेला वाहिलेले मासिक १९६२ मध्ये सुरू झाले ते अर्थकारणाच्या ओढग्रस्तीमुळे १९९१ मध्ये बंद पडले. कमीअधिक प्रमाणात हीच स्थिती अनेक नियतकालिकांची आहे. काही नियतकालिके ही अनितकालिकांसारखी निघत आहेत. अशा कठीण काळात 'मुक्त शब्द', 'खेळ', 'कवितारती', 'ललित', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'नव अनुष्टुभ', 'प्रतिष्ठान' सारखी नियतकालिके सातत्य राखून आहेत. अलीकडील काळात 'मुक्त शब्द' : संपादकीय, 'भारतीय स्त्रीवाद : स्वरूप व आव्हाने' - वंदना भागवत (मार्च २०१७), 'खेळ' : मिथक विशेषांक, 'ललित' : समीक्षा विशेषांक (एप्रिल २०१३), 'प्रतिष्ठान' : 'अनुराधा पाटील यांची कविता : एक स्त्रीवादी आकलन'- माया पंडित, 'अनुराधा पाटील यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी' - सुषमा करोगल (जा-ए. १४), 'समीक्षा विशेष अंक' (मे-जू १५), 'मराठी संत कवयित्रींची बंडखोरी-संगीता मोरे (जा-ए. २०), 'नव अनुष्टुभ': 'देशीवाद : राष्ट्रवादाला आणि एकूणच अस्मितावादी राजकारणाला समर्थ पर्याय'-प्राची

गुर्जरपाध्ये (मे-जू. १८); 'अस्मितादर्श' : 'लिंगभाव आणि भारतातील सांस्कृतिक राजकारण'-डॉ.वंदना महाजन (वार्षिक विशेषांक १५) 'अक्षरगाथा' : मराठी साहित्यविचार विशेषांक (एप्रि. १४); 'आमची श्रीवाणी' : 'भारतीय स्त्रीवाद : बदलते आयाम' विशेषांक-भाग १ (ऑ.१६ ते जाने. १७), भाग २ (फे.-मे १७) तसेच अलीकडे संपादक सतीश तांबे गणेश कनाटे यांनी 'सजग' या त्रैमासिकाद्वारे 'समीक्षा 'सजग' व्हावी म्हणून...' नव्याने पावलं टाकायला सुरूवात केली आहे हेही विशेष.

**उपयोजित समीक्षा**

समीक्षा आणि साहित्य यांचा सहसंबंध असतो. उत्तम साक्षेपी समीक्षा जशी उत्तम दर्जाच्यासाहित्य निर्मितीला कारणभूत ञञञ असते, तशीच उत्तम साहित्य निर्मितीदेखील समीक्षा सिद्धांतनासाठी बळ देत असते. आपल्याकडे उत्तमोत्तम नवनवीन सिद्धांत आकार घेत नाहीत, याचा अर्थ आपल्या साहित्याकडून असे बळ मिळत नाही का? असा प्रश्न पडतो. अगदी मुंबई विद्यापीठात मराठी विभाग सुरू झाल्यापासून प्रारंभी विद्यार्थ्यांकरिता ग्रंथांवर लिहिणे तद्नंतर नियतकालिकांची गरज म्हणून लिहिणे असे येनकेन प्रकारेन ग्रंथावर लिहिले जाते. कालसापेक्ष साहित्य व समीक्षेत झालेल्या बदलांमुळे आस्वाद, विश्लेषण, मूल्यमापन, रूप, लेखनतंत्र/शैली, विविध दृष्टिकोन/सिद्धांत, तुलना इत्यादीचा अवलंब करून कलाकृतीकडे पाहिले जाते. तसेच विशिष्ट कालखंड समाज व संस्कृती अध्याहृत धरूनही समीक्षा केल्याने यामध्ये भर पडत गेली. शिवाय विविध विद्यापीठांमधून झालेले एम.फिल./पीएच.डी./पोस्ट डॉक्टरेट/डी.लिट. चे संशोधन प्रबंध ग्रंथरूपात आल्यमेही या समीक्षेत वृद्धी दिसते. यासोबतच कलाकृतींचा आस्वाद घेणे आणि आपल्याला जसे आकलन हाईल वा मांडता येईल तसे ग्रंथाविषयी आपले आकलन मांडणे यामाध्यमातून मराठी साहित्यात आस्वादात्मक समीक्षा हा प्रकार अधिक वाढलेला आहे. खरे तर हा प्रकार साहित्य आणि समीक्षा या दोहोंच्या सीमारेषेवरील आहे. यामध्ये धड समीक्षाशास्त्रही नसते आणि धड ललित लेखनदेखील नसते. यामध्येच पुस्तक परिचय या प्रकाराने अधिक भर घातलेली आहे. मूलतः ग्रंथांची केलेली समीक्षा, प्रबंधग्रंथ आस्वादात्मक समीक्षा व पुस्तक परिचय या सर्व प्रकारामुळे मराठीमध्ये उपयोजित समीक्षेची भरभराट आहे. परंतु येथे केवळ दोन हजार नंतरच्या काळात आलेल्या स्त्री साहित्य समीक्षेचा विचार ('अक्षरयात्रा'करिता) अपेक्षित आहे. एकतर दोन

हजार नंतरच्या काळात आलेल्या स्त्री साहित्याची झालेली समीक्षा ही विविध नियतकालिकांमधून त्या-त्या वेळी प्रसिद्ध होते; परंतु ही समीक्षा ग्रंथरूपाने येण्यास काही अवधी जातो. यामुळे या समीक्षेचे प्रमाण अतिशय नगण्य असल्याचे जाणवते. शिवाय अनेक प्रबंधग्रंथ हे २१ व्या शतकात प्रकाशित झालेले असले तरी त्यांचे लेखन-सादरीकरण मागील शतकात झालेले आहे.

२१ व्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यास व संशोधनाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. जो अभ्यास होतो आहे, तो भटके समुदाय, प्रदेश, आदिवासी, विविध बोलीतील लोकसाहित्य संदर्भाने. परंतु हा अभ्यप्त ग्रंथाद्वारे येण्याचे प्रमाण अल्प आहे. अलीकडील काळात विविध प्रदेश विभाग जिल्हा तालुकनगाव पातळीवर मुद्रण व प्रकाशनाच्या सुविधा सुरू झाल्याने अशा खेड्यापाड्यातून प्रकाशित झालेली पुस्तके सर्वत्र पोहोचत नाहीत. नामांकित प्रकाशकदेखील अशा नवख्या अभ्यासकांचे ग्रंथ सहजासहजी प्रकाशित करत नाहीत. शिवाय अलीकडे वृत्ती मिळाली तरच सर्वेक्षण-संकलनाचे काम करायचे, नसता टेबल वर्क करायचे हा प्रकारही अधिक आहे. यामुळे लोकसाहित्य, बोलीभाषांच्या अभ्यास-संशोधनाकडे दुर्लक्ष होत आहे. खरे तर नवनवीन दृष्टिकोनांचा/ तत्त्वप्रणालींचा अभ्यास करून प्रस्तुत विषयांची नावीन्यपूर्ण मांडणी करता येणे शक्य आहे. लोकसाहित्य व ग्रामीण साहित्याचा समन्वय साधत डॉ. नलिनी महाडिक यांनी 'लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य यांचे स्वरूप' (२०१६) हा अभ्यासग्रंथ सिद्ध केला आहे. यामध्ये लोकगीते, लोककला, ग्रामीण साहित्याचा मूलाधार प्राकृत प्राच्यभाषा, ग्रामीण कथा, स्त्रीदर्शन, स्त्रीप्रतिमा अशी अनुबंधात्मक मांडणी आहे.

मराठीमध्ये कथा-कादंबरीचे विपुल लेखन झालेले आहे. यामध्ये स्त्री लेखिकांचे प्रमाण कमी आहे. यातही सर्वच प्रकारच्या साहित्यप्रकारांचा आशयात्मक विवेचन अधिक प्रमाणात होते. विशेषत: प्रबंध हे आशयसंपृक्तअसतात. अशा स्थितीत आलेली समीक्षा याप्रमाणे- डॉ. आशा सावदेकर यांच्या 'काव्यगंगेच्या तटावर'( ऑक्टो. २००५) या ग्रंथात मराठीतील नामवंत कवींसह प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे यांच्या निवडक कवितासंग्रहांची समीक्षा आहे. तसेच 'कवितेपासून कवितेकडे' (ऑगस्ट २०१२) यामध्ये डॉ. विजयाबाई नी१९४० ते २०१० पर्यंतच्या निवडक कवींच्या कवितांसोबतच समकाळातील मलिका अमर शेख, प्रज्ञा लोखंडे पवार या कवयित्रींनी निर्माण केलेली समर्थ परंपरा, त्यांचे योगदान

आदींची विवेचक, साक्षेपी मीमांसा आहे. नाट्यसमीक्षक डॉ. मधुरा कोरान्ने यांच्या स्त्री समस्या आणि आजचे नाटक', व 'स्त्री नाटककारांची नाटके' या ग्रंथांच्या नंतर 'नाट्याक्षरे' (२००६) हा नाट्यसमीक्षाविषयक महत्त्वाचा ग्रंथ. 'स्त्री समस्या आणि आजचे नाटक' मध्ये डॉ. मधुरा यांनी गत शतकातील निवडक नाटकांसमवेत सई परांजपे यांच्या 'माझा खेळ मांडू दे' नाटकांची स्त्रीला केंद्रवर्ती ठेवून समीक्षा केली आहे. यामध्ये स्त्री प्रतिमा, हुंडा समस्या कुटुंब प्रेम, माहेर, मैत्री आणि अपत्यहीन स्त्री अशा घटकतत्त्वांनुसार आधुनिक मराठी नाटकांची मीमांसा येते.

दलित आत्मकथनांनी मराठी साहित्याची दशा आणि दिशा बदलली. दलित आत्मकथनांपैकी स्त्रियांच्या आत्मकथनांचा अभ्यास कवयित्री श्यामल गरुड यांनी 'दलित स्त्री आत्मकथने' (डिसें. २०१०) या ग्रंथात मांडला आहे. यामध्ये विसाव्या शतकातील काही स्त्री आत्मकथनांसह 'आयदान'-उर्मिला पवार, 'माझी मी'-यशोधरा गायकवाड, 'मी नंदा', 'मास्तरांची सावली' इ. दलित जाणिवेच्या काठावरच्या काही आत्मचरित्रांचे आशय, स्वरूप व भाषिक अंगाने विश्लेषण केले आहे. ग्रामीण व दलित साहित्य प्रवाहांच्या पाठोपाठ आदिवासी साहित्य प्रवाहास प्रारंभ झाला. आदिवासी समाज, संस्कृती आणि त्यांचे जीवन हे आदिवसेतर समूहाच्या कायमच आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिलेले आहे. साधारणत: सत्तच्या आसपास आदिवासींचे साहित्य मराठी निर्माण होऊ लागले. या साहित्याचे अध्ययन-संशोधनदेखील सुरू झाले. यातून डॉ माहेश्वरी गावित यांनी आदिवासी लोकपरंपरा' (२००९) या ग्रंथात डॉ. गावित यांनी आदिवासी बोलीतील लोकसाहित्य, लोकनृत्य, आख्यायिका, दैवतकथा आणि मावची व डांगाण परिसरातील आदिवसींच्या गीत व सांस्कृतिक परंपरांचे विवेचन केले आहे. शिवाय 'आदिवासी साहित्य : विविधांगी आयाम' या ग्रंथात स्वातंत्र्य चळवळीपासून आदिवासी साहित्याचा वेध घेतला आहे. तसेच आदिवासी कथा, कादंबरी, कविता, नाटक, लोकसाहित्य व ललित साहित्याचे विश्लेषण करत त्यांनी आदिवासी स्त्री लेखिका व लेखकांच्या साहित्याची जागतिकीकरणाच्या संदर्भात समीक्षा केली आहे. स्त्री समीक्षकांनी आंतरिकअनुबंधअसलेल्या स्त्रीसाहित्य वा अन्य साहित्याची स्त्रीवादी दृष्टीने अधिक प्रमाणात समीक्षा केलेली आहे. पैकी बहुताश ग्रंथात तात्त्विक चर्चा अधिक असल्याने त्यांचा विचार वर सैद्धांतिक समीक्षेत केला आहे.

बालसाहित्य हा तसा अभ्यासक व संशोधकांकडून दुर्लक्षित राहिलेला प्रांत. बालसाहित्यची समीक्षा करणे आणि ती बालकांसाठी उपयुक्त ठरावी या हेतूने प्रा. विद्या सुर्वे बोरसे यांनी 'बालसाहित्य : आकलन आणि समीक्षा' (ऑक्टो. २०१५) हा आस्वादात्मक समीक्षा ग्रंथ सिद्ध केला आहे. मुलांनी काय वाचावे? नव्हे तर पालकांनीदेखील मुलांसाठी काय वाचावे असे सूत्र ठेवून विद्या सुर्वे यांनीमाधुरी पुरंदरे ज्योती कपिले, स्वाती राजे, मालविका देखणे, स्वाती काटे, नीती उपासनी, तृप्ती अंधारे, प्रतिमा इंगोले इ. स्त्री बालसाहित्यिकांच्या कलाकृतींची आस्वादात्मक मांडणी केली आहे. याच प्रकारचा अगदी परिचयात्मक असलेला 'आबा गोविंदा महाजन यांचे बालसाहित्य : आकलन आणि परिचय' (डिसें.२०१८) हा एक ग्रंथ. मैत्री लांजेवार या सहाव्या इयत्तेमध्ये शिक्षण घेणाऱ्या चिमुरडीने या ग्रंथाचेसंपादन केले आहे. मुलांनी मुलांसाठी लिहिलेली बालसाहित्यसमीक्षा असा मराठी साहित्यातील हा अभिनव समीक्षा ग्रंथ आहे. एका शालेय मुलीने मैत्रिणींना सोबत घेऊन आपल्याला जमेल त्या पद्धतीने आबा महाजन यांच्या बालसाहित्याविषयीचे आकलन मांडले आहे. मैत्रीसह ऋचा पुराणिक उत्तरा गवई, विशाखा नरवाडे, दिशा कोलते, ऋचा टाकळकर, समीक्षा गवते, श्रेया भुसारी, अलविना शेख, जान्हवी गोरे, तनया कुळकर्णी, श्रेया खर्चे, मुक्ताई उचाडे, प्रीती तवर, यशश्री जवरे, वैष्णवी चव्हाण, अबोली भोकरे या सर्व चिमुरड्या वाचकांनी बालसाहित्यिक आबा गोविंदा महाजन यांच्या बालसाहित्याचा आपला प्राथमिक उद्‌गर व्यक्त केला आहे. या मुलींना समीक्षा वगैरे भानगडी कळत नसल्या तरी आम्हा मुलांना वाचनासाठी काय हवे आहे? याची एक उत्तम जाण आहे, हे विशेष. डॉ. प्राची जोशी यांनी साहित्य आस्वाद' व 'कादंबरी आस्वाद' (२०१४) या दोन ग्रंथात विविध ग्रंथाविषयीची परीक्षणे आस्वादात्मक समीक्षा केलेली आहे.

गत २० वर्षातील उपलब्ध झालेल्या उपयोजित समीक्षा ग्रंथांची येथे प्रातिनिधिक दखल घेतली असली तरी या काळातील स्त्री लेखिकांच्या साहित्याची समीक्षा यादृष्टीने हे प्रमाण फारच अल्प आहे. या ग्रंथांमध्ये प्रबंध ग्रंथांचे प्रमाण अधिक आहे प्रबंधांमध्ये संकलन व आशयात्मक मांडणी-कथानक सांगणे हा भाग अधिक असतो. यामुळे आशयवृद्धी होते पण सैद्धांतिक/नवा विचार मात्र दिला जात नाही. बहुसंख्य प्रबंध ग्रंथांचा एक आकृतिबंध ठरलेला असतो त्या आकृतिबंधाला मोडीत काढून ठरावीक अभ्यासक स्त्रियांनी वेगळी, नावीन्यपूर्ण,

नव अभ्यासकांना दिशा देणारी मांडणी केल्याचे स्पष्टपणे जाणवते. परंतु स्त्री अभ्यासकसमीक्षकांनी स्त्री लेखिकांच्या साहित्य व व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासाकडे/ समीक्षेकडे दुर्लक्ष केल्याचेही स्पष्टपणे लक्षात येते. उपयोजित समीक्षा म्हणजे मुक्तपणे केलेली समीक्षा नव्हे, तर या समीक्षेचेदेखील काही निकष ठरलेले असतात. तिची उभारणीदेखील सैद्धांतिक पायावरच असते. समग्र मराठी साहित्यात या उपयोजित समीक्षेचे प्रमाण वाढल्याने आणि सैद्धांतिकचे प्रमाण कमी असल्याने यापासून उलटा पिरॅमिड तयार झाला आहे. जो काळानुसार अधिक विस्तारत आहे. मात्र उपयोजित समीक्षा होऊच नये असा याचा अर्थ नाही.

विद्यापीठीय मराठी विभाग व साहित्य संस्थांचे कार्य १८५७ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. मराठी विभाग सुरू झाला. तत्काळात या विभागात अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या कलाकृतींविषयी मराठीत समीक्षा उपलब्ध नव्हती. तेव्हा विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ व्हावे या हेतूने प्राध्यापकांनी कलाकृतीविषयी लिहायला सुरुवात केली. यामाध्यमातून मराठीत समीक्षा ग्रंथ निर्माण झाले. मुंबई पुणे कोल्हापूर या विद्यापीठाच्या मराठी विभागांनी विविध चर्चासत्र, परिषदा व ठरवून लिहिणे या पद्धतीने २० व्या शतकापर्यंत मराठी समीक्षेत मोलाचे योगदान दिले आहे. तद्वतच तेथे कार्यरत अध्यापकांचीदेखील समीक्षेत महत्त्वाची कामगिरी राहिलेली आहे. आजघडीला महाराष्ट्रात ११ विद्यापीठे व १ मुक्त विद्यापीठ आहे; पण अलीकडील काळात बोटावर मोजण्याइतपत अपवाद (समीक्षेतील नव्या संकल्पना, मराठवाड्यातील साहित्य, समीक्षापद्धती : सिद्धांत आणि उपयोजन, तपोनिधी इ.) वगळता विद्यापीठांच्या मराठी विभागातून असे प्रयत्न होताना दिसत नाहीत. पूर्वी विद्यापीठे वा त्यांचे विभाग स्वत: ग्रंथ प्रकाशित करीत असत आता या प्रकारच्या प्रकाशनांचा अभाव आहे. सद्य:स्थितीत विविध विद्यापीठांमध्ये कार्यरत असणाऱ्या अध्यापकांपैकी वंदना महाजन श्यामल बनसोड (मुंबई) अरुणा दुभाषी (एसएनडीटी), विद्यागौरी टिळक (पुणे), मोना चिमोटे (अमरावती) इ. स्त्रियांचे समीक्षा लेखन प्रकाशित आहे. (खरे तर कार्यरत स्त्रियांचे प्रमाण खूप अल्प आहे.) यापैकी काहींनी आपली क्षमता सिद्ध केली आहे तर काहीजणी स्वत:ला सिद्ध करण्यासाठी धडपडत आहेत. काही सन्माननीय अपवाद वगळता सैद्धान्तिक/उपयोजित समीक्षेत भरीव योगदानाचा मात्र अभाव जाणवतो.

राज्य शासनाच्या भाषा विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था इ. संस्था कार्यरत आहेत. त्यांचे कार्य सुरू आहे. असे म्हणता येते. भाषा संचालनालय व अंतर्गत संस्थांचे कार्य आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व घटक संस्थांचे स्त्री साहित्य व समीक्षेतील योगदान हा स्वतंत्र विषय आहे. तरीही येथे काही महत्त्वपूर्ण नोंदी करणे आवश्यक वाटते. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या मराठी साहित्य संघ (मुंबई), महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), मराठवाडा साहित्य परिषद (औरंगाबाद) व विदर्भ साहित्य संघ (नागपूर) या मूळ घटक संस्था आहेत. या व अन्य संस्थांची मुखपत्रे आहेत. त्यांचे आलेले विशेषांक ऐतिहासिक आहेतच. त्याशिवाय महाराष्ट्र साहित्य परिषदेने 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्याच प्रकारचा इतिहासात्मक ग्रंथ म्हणजे 'भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य' - संपादन डॉ. अश्विनी धोंगडे (जाने. २०१६) होय. हा समीक्षा ग्रंथ नसला तरी स्त्री साहित्य, समीक्षा व स्त्री समीक्षक म्हणून महत्त्वाचा आहे. मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद या संस्थेने 'मराठवाडा लेखिका साहित्य संमेलना'द्वारे स्त्री साहित्य व समीक्षाविषयक घडामोडींना बळ पुरवण्याचे कार्य केले आहे. करीत आहेत.

## पुस्तक परीक्षण

ज्येष्ठ लेखक प्रा. रंगनाथ पठारे म्हणतात त्याप्रमाणे आजच्या समीक्षकांचे तीन वर्ग आहेत. एक म्हणजे परीक्षणवजा लिहिणारा, दुसरा समीक्षेला काही देणारा आणि तिसरा भाषिक समाजाची अभिरूची घडविणारा. पहिला वर्ग वगळता दुस्या दोन वर्गांची कामगिरी 'चांगली' आणि 'बरीच' म्हणावी लागते. पहिल्या वर्गासोबतच विविध नियतकालिके व वर्तमानपत्रांनी या समीक्षेत मोठी भर घातलेली आहे. परंतु वृत्तपत्रीय पुरवण्यतील समीक्षेला गांभीर्याने घेण्याची गरज नसल्याचे मत दिगंबर पाध्ये यांचे आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनीदेखील वृत्तपत्रीय समीक्षेला रंजनाच्या पलीकडे स्थान नसल्याचे म्हटले आहे. पुस्तक परीक्षणांमुळे कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य या प्रकारांचा विकासक्रम आणि त्यामधील सत्त्व शोधण्याचाही प्रयत्न होतो. तसेच लेखकलक्ष्यी, संहितालक्ष्यी, संदर्भलक्ष्यी यांच्यासोबतच जातलक्ष्यी, धर्मलक्ष्यी, प्रांतलक्ष्यी, वर्तुळलक्ष्यी, पुरस्कारलक्ष्यी, प्रसिद्धीलक्ष्यी इ. प्रयोजनांमुळे

उपयोजित समीक्षेचा सुकाळ आहे. खरे तर एखाद्या विषयाच्या मुळाशी जाऊन विचार करणे, चर्चेमध्ये सहभागी होणे, वाद-प्रतिवाद, युक्तिवाद होणे आवश्यक असते. त्यातूनच उत्तम समीक्षा व समीक्षक समोर येऊ शकतात. अलीकडे विद्यापीठ अनुदान आयोगाने आणलेली स्थाननिश्‍चिती पद्धत, इम्पॅक्ट फॅक्टर, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्र व शोधनिबंधांच्या चक्रव्यूहात समग्र प्राध्यापक वर्ग अडकला आहे. तद्वतच वृत्तपत्रातील पुस्तक परिचय शंभर-दोनशेतीनशे शब्दांत अडकले आहे. शब्द मर्यादेतील परीक्षण पद्धतीची चौकट मोडीत काढून तिला अधिकाधिक नियतकालिकांकडे घेऊन गेल्यास आस्वादक/उपयोजित समीक्षेत एक सकारात्मक चित्र दिसू शकते.

थोडक्यात, २० व्या शतकातील समीक्षा ही साहित्याचे स्वरूप, प्रयोजने, साहित्याचे कार्य, कलावाद-जीवनवाद या प्रश्नांशी संबंधित होती. आज २१ व्या शतकात तिचे स्वरूप बदलले आहे. स्त्री समीक्षकांचे योगदान लक्षवेधक आहे. परंतु स्त्री समीक्षकांनी स्त्रीवादाच्या पलीकडे जाऊन विविध दृष्टिकोन, तत्त्वप्रणालीचा मराठी पर्यावरणीय दृष्टीने स्वीकार करण्याची आवश्यकता आहे. ज्या स्त्रीवादी समीक्षेचा अवलंब अधिक प्रमाणात केला जातो, तीमध्ये कलाकृतीचे पुनर्वाचन, पुनकलन, पुनर्विश्लेषण व पुनर्मूल्यमापनाची अपेक्षा व्यक्त केलेली आहे, तिचा स्वीकार करून समग्र मराठी साहित्याकडे पाहता येऊ शकते. त्यातून नावीन्यपूर्ण विचार समोर येईल. आजही साहित्याची अनेक क्षेत्रे स्त्री समीक्षकांपासून अलक्षित राहिलेली आहेत. मराठी साहित्यात प्रचलित असणारे विविध वाद/सिद्धांताची आपल्या परिप्रेक्ष्यातून समीक्षा होणे आवश्यक आहे. विविध वाङ्मयीन प्रवाह, त्यांची विचारप्रणाली, आणि साहित्य यांचीदेखील सुयोग्य समीक्षा झाली नाही. या प्रवाहांच्या तत्त्वप्रणालीनुसार नवे समीक्षा दृष्टिकोन शोधणे, त्यांची मांडणी करणे ही समीक्षकांची जबाबदारी आहे सांस्कृतिक, पर्यावरणीय, भाषासंरचना, शैली, मनोविश्लेषणात्मक, आदिबंधात्मक, चरित्रात्मक, ऐतिहासिक, देशीवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद इ. बरोबरच बालसाहित्य, ललित गद्य, स्फुट लेखन इत्यादींचे समीक्षेला वावडे असू नये. समकाळातील भाषा व समकाळातील स्त्री साहित्यिकांच्या साहित्य व व्यक्तित्वाकडेदेखील स्त्री समीक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. समीक्षा व्यवहार हा साहित्यिक-प्रकाशक-वाचक-समीक्षक इ. सर्वांनी मिळून पूर्ण होतो. आपल्याकडे सृजनशील साहित्यिकांकडून समीक्षेची उपेक्षा केली जाते. प्रकाशक बाजारपेठेचे

कारण देत समीक्षाग्रंथ प्रकाशित करीत नाहीत. कलेकडे कला म्हणून पाहण्याचा, तिचा आस्वाद घेण्याचा दृष्टिकोन विकसित न झाल्याने लेखक/कवींनी माफी मागणे, अभ्यासक्रमातून कलाकृती वगळणे, कलाकृती नष्ट करणे अशा कृती सतत घडतात. याचाच अर्थ समीक्षकांकडून वाचकांची अभिरूची अद्यापही समृद्ध होऊ शकलेली नाही की मराठी साहित्यदेखील वाचकांच्या जाणिवा समृद्ध करू शकलेले नाही?

## संदर्भ


१. किंबहुने, रवींद्र. 'सैद्धांतिक समीक्षा.' खोले, विलास. विसाव्या शतकातील मराठी समीक्षा. पुणे : प्रतिमा प्रकाशन, १३ डिसेंबर २००४ : २२५.

२. थोरात, हरिश्चंद्र. 'साहित्य क्षेत्रातील बदल.' मुक्त शब्द वर्ष सातवे, अंक नववा जाने. २०१७ : ९.

३. पठारे, रंगनाथ. 'समीक्षा साहित्यनिर्मितीस साहाय्यभूत ठरते का?' ललित एप्रिल २०१३ : १४.

४. पाध्ये, दिगंबर. 'पुस्तक परीक्षणांचे फलित.' ललित एप्रिल २०१३ : १३५.

५. रसाळ, सुधीर. 'चंद्रकान्त पाटील यांनी घेतलेली मुलाखत.' प्रतिष्ठान वर्ष ५७, अंक दुसरा डिसेंबर २००९ : ७५.

६. रसाळ, सुधीर. 'मराठी समीक्षा : आजची अवस्था.' सजग ऑक्टो.-नोव्हें. २०१९ : १३.



मराठी विभाग, डॉ.बा.आं.म. विद्यापीठ,
औरंगाबाद-४३१००४.
मो. ७५८८१६५२२१
इ-मेल : dr.kailas.ambhure@gmail.com


* * * * *

# २१ व्या शतकातील स्त्रियांचे समीक्षा लेखन

- डॉ. सुजाता शेणई

साहित्य हा जीवनाचा एक भाग असून लेखकाला आलेल्या अनुभवाचा त्याने, त्याच्या पद्धतीने मांडलेला पट असतो. एकदा हा पट सार्वत्रिक झाला की, त्याचे लेखकासह वाचक व समीक्षकाशी नाते जोडले जाते. वाचक हा आस्वादक भूमिकेवरून त्याचे अवलोकन करेल, तर समीक्षक शोधकाच्या, जिज्ञासूच्या भूमिकेतून त्या साहित्यकृतीची बलस्थाने व मर्यादा दाखवून देईल. लेखकाने साहित्यातून जी प्रतिसृष्टी निर्माण केली आहे, त्याला साकार करणाऱ्या घटकांकडे समीक्षक वाचकांचे लक्ष वेधून घेत असतो. प्रत्येक साहित्यकृती काही साहित्यविषयक प्रश्न उपस्थित करीत असते. ही साहित्यकृती काय व्यक्त करू पाहत आहे? ती जे व्यक्त करू पाहत आहे ते यथार्थपणे व्यक्त झाले आहे का? या साहित्यकृतीने एकूण वाङ्मयाच्या प्रवाहात मोलाचे योगदान दिले आहे का? किंवा त्या लेखकाकडून नवीन संकल्पनांची मांडणी झाली आहे का? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे समीक्षेतून गवसत असतात, म्हणून समीक्षा लेखन फार गरजेचे असते. वृत्तपत्रांतून किंवा नियतकालिकांमधून प्रसिद्ध होणारी ग्रंथपरीक्षणेही जर तटस्थ भूमिकेतून, डोळस वृत्तीने आणि भलावण न करता लिहिली तर तीही समीक्षेची उत्तम उदाहरणे ठरू शकतात.

साहित्यावर आधारित समीक्षा असते, त्यामुळे साहित्याने कालानुरुप कसे वळण घेतले यावर समीक्षेची रूपे अवलंबून असतात. समीक्षेमुळे साहित्यविश्वाबद्दलचे कुतूहल वाढीला लागते व साहित्यविचाराला चालना मिळते. साहित्याच्या अंतर्बाह्य स्वरूपात जेव्हा जेव्हा बदल होतो, तेव्हा तेव्हा साहित्यसमीक्षेला आव्हान मिळते. एकविसाव्या शतकात जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा विस्फोट, स्त्रियांना गवसलेली स्वत:ची ओळख (जागतिक महिला वर्ष उलटून २५ वर्ष झाल्याने दिसून येणारे परिणाम), सामाजिक संपर्कांचा वाढता प्रभाव, सोपी झालेली परदेश वारी, महाविद्यालयांची व पीएच. डी. धारकांची वाढती संख्या, प्रकाशन संस्थांकडून प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांच्या संख्येत लक्षणीय वाढ या व अशा अनेक कारणांमुळे साहित्यनिर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. नवे साहित्य नवा जीवनानुभव घेऊन येते म्हणूनच त्या साहित्याचे स्वरूप समजून घेऊन

त्याची उकल करता येणे, त्यातील उत्तम, मध्यम आणि गौण अशी निरपेक्ष प्रतवारी ठरविणे, वाचकाची आकलन पातळी उन्नत करणे आणि साहित्यविचारात भर घालणे हे त्या काळातील समीक्षेचे कार्य म्हणता येईल. हे कार्य २१व्या शतकात स्त्रियांनी किती पेलले हे या लेखातून मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

**कविताकेंद्रित समीक्षालेखन**

स्त्रीलिखित साहित्याचा विचार केला तर कविता हा साहित्यप्रकार स्त्रियांकडून सगळ्यात जास्त लिहिला जातो (२१ व्या शतकातील पहिल्या दोन दशकात कवयित्रींची कवितासंग्रहांची संख्या इतर साहित्यप्रकारांपेक्षा अधिक आहे.) आणि नाटक कमी लिहिले जाते, असे लक्षात येते. समीक्षालेखन करतानाही कवितांवर आधारित समीक्षा अधिक लिहिली गेली असे आढळून येते. ज्येष्ठ समीक्षक आणि साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी मर्ढेकरांच्या काव्याचा विसाव्या शतकाच्या अखेरीस केलेला अभ्यास वेगळ्या दृष्टिकोनातून एकविसाव्या शतकात 'पुन्हा मर्ढेकर' (२००८) आणि 'शोध मर्ढेकरांचा' (२००९) या दोन समीक्षाग्रंथांतून मांडला. मर्ढेकरांइतकाच आव्हान देणारा कवी व लेखक म्हणून विंदा करंदीकरांचे नाव घ्यावे लागेल. विजयाबाईंनी हे आव्हान पेलत करंदीकरांच्या समग्र साहित्याचे परिशीलन करणारा मराठीतील पहिलाच द्विखंडात्मक समीक्षाग्रंथ 'बहुपेडी विंदा' (२००५) सिद्ध केला. पहिल्या खंडात त्यांनी करंदीकरांची घेतलेली प्रदीर्घ वाङ्मयीन मुलाखत (तब्बल ८८ पृष्ठे) आहे. दुसऱ्या भागात करंदीकरांच्या समीक्षेतील मूलभूत प्रश्न मांडणारे लेख, त्यांचे संकल्पनात्मक स्वरूपाचे इंग्रजी लेख, कवितेसंबंधीचे तात्त्विक लेख इत्यादींबरोबरच उपसंहारात करंदीकरी समीक्षेचे योगदान आणि त्यांच्या समीक्षाविचारातील अंतर्विरोध मांडून विजयाबाईंनी समीक्षेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. विजयाबाईंना कविता हा साहित्यप्रकार समीक्षेसाठी अधिक खुणावत असावा म्हणून, नवकाव्याचे प्रवर्तक मर्ढेकर ते स्त्रीवादी कवितेचा उच्च रव ज्यांच्या कवितेतून येतो त्या मलिका अमर शेख आणि प्रज्ञा लोखंडे-पवार यांच्या कवितेपर्यंत त्या कवितेचा अभ्यास सतत करत राहतात. हा अभ्यास 'कवितेपासून कवितेकडे' (२०१२) या समीक्षात्मक ग्रंथात आढळतो. डॉ. वेदश्री थिगळे यांच्या 'मराठी काव्यातील स्त्रीचित्रण' (२००४) या पुस्तकात प्राचीन मराठी काव्यापासून आरंभ करीत तीन कालखंडातील मराठी कवितेमध्ये दिसणारे स्त्रीचित्रण यावर समीक्षात्मक लेखन केले आहे.

प्राचीन, अर्वाचीन आणि आधुनिक कालखंडातील कवयित्रींच्या कवितेत स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेणे ही प्रेरणा प्रमुख असल्याचे त्यांनी नोंदवले आहे. डॉ. अलका चिडगोपकर यांनी १८५० ते १९४० या कालखंडातील स्त्रीकवितेची समीक्षा 'अर्वाचीन मराठी कवयित्री 'या ग्रंथात मांडली तर आस्वादक समीक्षेच्या अंगाने डॉ. आशा सावदेकर यांचे 'काव्यगंगेच्या तटावर', सरोज जोशी यांचे 'झपाटलेली झाडे', डॉ. उषा माधव देशमुख यांचे 'चाफा ते फुलवात' या पुस्तकांचा उल्लेख करता येईल. चार्वाक-बुद्धापासून सुरू झालेल्या मूर्तिभंजनाच्या वैचारिक परंपरेला बळ देणारी कविता मराठीत लिहिली जाऊ लागली. महात्मा फुले यांनी निर्मिक संकल्पना आणली, केशवसुतांनी मूर्तिभंजनाची 'तुतारी' फुंकली तर गोविंदाग्रजांनी त्याचा विस्तार केला. कुसुमाग्रज, मर्ढेकर व पुढे आंबेडकरी विचारधारेतून फुललेली दलित कविता या परिवर्तनाला पूरक ठरली. या साऱ्याचा विचार 'मराठी कवितेतील मूर्तिभंजन' (२०११) या पुस्तकात डॉ. वीणा नाखले यांनी केला आहे. हे पुस्तक वैचारिक वाङ्मयातही भर घालते. साठोत्तरी कालखंडात मराठी कवितेत ग्रेस यांच्या कवितेने काव्यरसिकांवर गारुड केले. दुर्बोध, गूढ, अनाकलनीय असे म्हणत ती कविता समजून घेण्याचा प्रयत्न होत होते. हाती किती लागले यापेक्षा ग्रेस वाचतोय यात धन्यता म्हणणारा वर्ग होता व आजही आहे. ग्रेसच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा हा तर गहन विषय आहे. या विषयाला स्पर्श करीत त्यावर भाष्य करणारा ग्रंथ डॉ. माधवी देसाई यांनी लिहिला. 'ग्रेस : कविता आणि स्त्रीप्रतिमा' (२०१४) या पुस्तकात ग्रेस यांची कविता प्राय: भावकाव्याच्या स्वरूपाची असून ती दु:खजाणिवांवर प्रेम करणाऱ्या सौंदर्यवादी कवितेच्या परंपरेत बसते, हा देसाई यांचा निष्कर्ष आहे. अतिवास्तववादाशी जवळीक साधणारी ग्रेसची कविता शब्दांच्या व प्रतिमांच्या मोहात अडकल्याने काही वेळा काव्यानुभूतीचा पिसारा न ठरता शब्दांचा पसारा मांडून ठेवते हे देसाई यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. परखड आणि तर्कशुद्ध विवेचनाचा समीक्षेचा नमुना यातून पाहावयास मिळतो. डॉ. सुनंदा रेवसे यांनी 'आस्वाद आणि आकलन - निवडक कवितासंग्रह आणि कविता' (२०१९) या पुस्तकात सुमती लांडे, मधुकर वाकोडे, वसंत आबाजी डहाके या कवींच्या कवितांचा व काही कवितासंग्रहांचा समीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार केला आहे. एकूणच कविताकेंद्रित समीक्षेत कवितेचा विस्तीर्ण पट अभ्यासला आहे, असे लक्षात येते. प्रबंधाची पुस्तके करून आपले संशोधन अभ्यासकांपर्यंत

पोहोचवण्याची तयारी आहे, हे लक्षात येते. प्रबंधाचे पुस्तक झाल्यानंतर मात्र दुसऱ्या ग्रंथाची अभ्यासपूर्ण मांडणी करून लेखन करावे, ही उर्मी कमी प्रमाणात आढळते.

## कवयित्री-समीक्षक दुहेरी वीण

कवयित्री म्हणून स्वत:चा ठसा उमटवलेल्या व टीकाकार म्हणूनही परिचित असलेल्या डॉ. प्रभा गणोरकर यांनी 'मराठीतील स्त्रियांची कविता' (२०१५) हा अभ्यासपूर्ण समीक्षाग्रंथ लिहिला आहे. सातशे वर्षांच्या काळातल्या स्त्रियांचे सारे जग, त्यांच्या भोवतीचे वास्तव, त्यांचे पुरुषाशी व इतर स्त्रियांशी असणारे नाते, त्यांचे संघर्ष आणि त्यांच्या प्रेरणा यांचा वेध घेणे ही या पुस्तकामागची गणोरकरांची भूमिका होती. महंदाइसा ते सुचिता खल्लाळपर्यंतच्या कवितेचा पट यात मांडला आहे. महत्त्वाचे समीक्षात्मक पुस्तक म्हणून याची नोंद घ्यावी लागते.

सुहासिनी इर्लेकर यांची 'संत साहित्य : एक रूपवेध', 'गुरूशिष्यसंवाद', 'समाधीसंकल्पना', 'संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध', 'नरेंद्रकृत आद्य मराठी महाकाव्य' (२००७), 'साहित्यसंवाद' (२००७) ही पुस्तके या कालखंडातील आहेत.

कवितेचा बहुआयामी पट हा समीक्षेच्या अंगाने मांडताना लेखिका जेव्हा कवयित्रीही असते, तेव्हा त्याचे पदर अधिक सूक्ष्मपणे वाचकांसमोर येतात. आस्वाद आणि समीक्षा या दोन्ही बाजू उलगडत जातात. डॉ. नीलिमा गुंडी हे या दोन दशकातील महत्त्वाचे नाव आहे. समीक्षेची एकूण पाच पुस्तके त्यांच्या नावावर जमा आहेत. 'लाटांचे मनोगत' (२००८) व 'स्त्रीलिपी' (२०१६) या पुस्तकांत स्त्री साहित्यातील बदलांचा वेध घेतला आहे. स्त्री साहित्यातील प्रेरणांची सांस्कतिक अंगाने केलेली मीमांसा यात असून, समकालीन स्त्री साहित्याचा चिकित्सक आस्वाद आहे. स्त्री साहित्यानेही कालपरत्वे कात टाकलेली आहे, या परिवर्तनाचा वेध, चोखाळलेल्या नव्या वाटांचा परामर्शही यातून दिसतो. लेखनाचा रियाज सतत ठेवणाऱ्या नीलिमा गुंडी यांचे 'समीक्षेचा रियाज' (निवडक ५० पुस्तक परीक्षणे) (२०१६) हे पुस्तक म्हणजे पुस्तकपरीक्षणे आहेत. अगदी अलीकडे त्यांचे प्रकाशित झालेले 'काव्याचा भावार्थ' (२०२०) हे पुस्तक म्हणजे समीक्षेतील सर्जनशीलतेचा प्रत्यय देणारे आहे. भावार्थ ही संकल्पना काव्याशी जोडलेली आहे. भावार्थ जाणवल्यावरच काव्याच्या सखोल आशयविश्वात प्रवेश मिळू शकतो. या पुस्तकात आधुनिक भावकाव्य, नवकाव्य,

दलित काव्य, स्त्रीवादी काव्य, विडंबन काव्य अशा काव्यप्रवाहांची समीक्षा आहे. समीक्षा म्हणजे अनाकलनीयता हे समीकरण सामान्य वाचकांच्या मनात असते, ते थोड्या अंशानेतरी कमी होण्यास या पुस्तकाने मदत होईल. समीक्षा हे शास्त्रही आहे. त्याचे उपयोजन करताना योग्य ती परिमाणे योग्य त्या ठिकाणी वापरावी लागतात, हे यातून समजते. मराठी साहित्यविश्वात स्त्रियांच्या आत्मकथनाचे दालन मुळातच समृद्ध आहे. रमाबाई रानडे यांच्या 'माझ्या आयुष्यातील काही आठवणी' (१९१०) या मराठीतल्या पहिल्या आत्मचरित्राला एकशे दहा वर्ष पूर्ण झाली. यानिमित्ताने स्त्रीलिखित आत्मकथांच्या आधारे महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराची प्रक्रिया समजून घेऊन, स्त्रीचे शिक्षण, स्त्रीचे आत्मभान, स्त्रीची भाषा, स्त्रीचा राजकीय प्रवास, स्त्रीलिखित आत्मकथनांवरील नियंत्रणे इ. सूत्रे समोर ठेवून नीलिमा गुंडी यांनी 'गतकाळाची गाज' (२०१९) हे समीक्षात्मक पुस्तक लिहिले. अतिशय अभ्यासपूर्ण आणि समीक्षेच्या विविध कसोट्यावर परिपूर्ण ठरावा असा हा दस्तऐवज आहे. स्त्री आत्मकथनांद्वारे सामाजिक संक्रमणाचे दर्शन यातून अधोरेखित होते.

कवयित्री म्हणून स्वत:चा ठसा एकविसाव्या शतकात उमटवणाऱ्या सुचिता खल्लाळ यांचा 'स्त्री कवितेचं भान : काल आणि आज' (२०१५) हे समीक्षात्मक पुस्तक प्रकाशित झाले आहे. या लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना त्या लिहितात, 'कवितेत जे जे बदल होत गेले, मग ते आशयसूत्रात असो वा भाषाशास्त्रीय रचनासूत्रात असो, तो प्रत्येक बदल स्त्री-कवितेतंही अपरिहार्यपणे तितक्याच सक्षमतेने नव्या प्रयोगशील शक्यतेच्या स्वरूपात उमटत राहिला. म्हणूनच काव्यक्षेत्रातल्या एकंदरच परिवर्तनाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीकवितेच्या संदर्भाने ह्या प्रत्येक प्रयोगशील काव्यवैशिष्ट्यांसह स्त्री कवितेचा प्रवास उलगडण्याचा हा प्रयत्न आहे. असे करताना पूर्वासूरींनी स्त्री-कवितेकडे बघताना कोणकोणत्या स्वरूपात अन्यायकारी व डावा दृष्टिकोन अवलंबिला आहे, तो कसा साफ चुकीचा आहे याचेही सोदाहरण विवेचन मांडण्याचा प्रयत्न केला आहे.' हा प्रयत्न मध्ययुगीन संतकवयित्री ते नव्वदोत्तरी कविता एवढा मोठा कालखंड लक्षात घेऊन मांडला आहे. काहीतरी स्फोटक काव्य रचून स्त्रीदेहाच्या ऐंद्रिय विवेचनाद्वारे 'बोल्ड-बंडखोर' बिरुदावली मिळवण्याच्या सवंग हव्यासापायी स्त्रीवादाचा आत्माच गहाण ठेवला जाऊ नये आणि व्यक्तिगतता जपण्यातून सार्वत्रिक दु:खाची नाडी अचूक हेरणारी तादात्म्य संवेद्यता स्त्रीवादाचे पोषकमूल्य म्हणून

समांतर यावी, ही अपेक्षा यातून लेखिकेने व्यक्त केली आहे. माया पंडित यांचा 'तल्खली' (२०१८) हा कवितासंग्रह अगदी अलीकडचा आहे. इंग्रजीतून प्रामुख्याने लेखन करणाऱ्या माया पंडित यांनी 'मुक्त शब्द' या नियतकालिकातून स्त्री कादंबरीकारांच्या साहित्यकृतींना जी विविधसांस्कृतिक, साहित्यिक आणि रूपबंधात्मक परिमाणे लाभलेली आहेत त्यांचे विश्लेषण केले आहे. '२००० नंतरच्या स्त्री कादंबरीकार' ही त्यांची लेखमाला सुरू असून नजुबाई गावित यांच्या 'तृष्णा' (१९९९) या कादंबरीपासून तेसानिया यांच्या 'सुरवातीचे दिवस' (२०२०) या कादंबरीपर्यंत माया पंडित यांनी उत्तम समीक्षात्मक लेखन केले आहे. कादंबरीचा विचार आणि वेध किती अंगांनी घेता येतो, ते यातून स्पष्ट होते. या लेखमालेचे लवकरच पुस्तकही येणार आहे. एकूणच कवयित्रीजवळ असणारी तरल संवेदनक्षमता आणि समीक्षकापाशी आवश्यक असणारा तटस्थ पण विश्लेषक दृष्टिभाव या दोन दशकातील कवयित्री-समीक्षक या दुहेरी वीणेने सांभाळला असून, त्यात त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे, असे म्हणावे लागेल.

## 'एक' अभ्यासविषयकेंद्री समीक्षा

काही लेखिकांनी स्वत:चा अभ्यासविषय निश्चित करून त्या एकाच अभ्यासविषयावर लक्ष केंद्रित केले. एका अभ्यासविषयावर चिंतन करून, त्यात सातत्याने भर घालून स्वत:चा विषय अभ्यासकांपर्यंत अधिकाधिक परिपूर्ण स्वरूपात जावा म्हणून प्रयत्न केला. डॉ. मधुरा कोरान्ने यांनी नाटक या साहित्यप्रकारावर आधारित समीक्षात्मक लेखन केले. नाट्यक्षेत्राशी संबंधित त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'स्त्री नाटककारांची नाटके' (२००२) या पुस्तकात सोनाबाई केरकर या पहिल्या नाटककार आहेत याचे ससंदर्भ विवेचन आहे. स्त्री नाटककारांची संख्या कमी का, या नेहमी उद्‍भवणाऱ्या प्रश्नाची चर्चाही यात केली आहे. तर 'नाट्याक्षरे' (२००५) या ग्रंथात स्त्रीचे समाजातील स्थान, तिचे कुटुंबातील स्थान, तिची मानसिकता या संदर्भात मराठी नाटक कसा विचार करते यावर प्रकाश टाकला आहे. नाटकाच्या सादरीकरणात काळानुसार परिवर्तन होत गेले. अनेक पात्रे असणारे व बराच वेळ चालणारे नाटक मागे पडत मोजक्या पात्रांना घेऊन कमी कालावधीत सादर होणारे नाटक रंगमंचावर येऊ लागले. त्यातही बदल होत एकपात्री प्रयोग होऊ लागले. प्रेक्षकांनी त्यालाही पसंती दिली. नाटकाच्या या बदलत जाणाऱ्या

तंत्राचा आणि आशयाचा विचार मधुरा कोरान्ने यांनी ‘एकपात्री प्रयोग : स्वरूप आणि कलारूप’ (२००८) या पुस्तकात मांडला आहे. लेखिकेच्या मते एकपात्री प्रयोगात मनोरंजन करताना समाजाला अंतर्मुख होऊन विचारप्रवृत्त करणे याला प्राधान्य दिले जाते. मधुरा कोरान्ने यांनी ‘न्यायालय आणि मराठी नाटक’ (२०१९) असा वेगळा विषय घेऊन समीक्षालेखन केले आहे. न्यायदर्शन, न्यायनिर्णय, न्याय आणि जीवनमूल्ये या संकल्पनांबरोबरच नाटकांतून येणारे न्यायालयदर्शनही मांडले आहे. ‘तो मी नव्हेच’, ‘शांतता, कोर्ट चालू आहे’ ते ‘पुरुष’, ‘कर्ता करविता’, ‘चारचौघी’ या नाटकांतून दिसणारे न्यायालय व संबंधित घटकांचाही विचार केला आहे. नाटक हा केवळ आवडीचा विषय न ठेवता तो चिंतनाचा, अभ्यासाचा विषय करून त्याला विश्लेषणाची जोड दिली आहे.

मराठी समीक्षेत साहित्यविचार आणि साहित्यप्रकारनिष्ठ समीक्षा यांच्या तुलनेत छंदोविषयक विचार तुलनेने कमी झाला आहे. छंदशास्त्राच्या संवेदनशील अभ्यासक म्हणून परिचित असलेल्या डॉ. शुभांगी पातुरकर यांची छंद या विषयावर आधारित तीन समीक्षात्मक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ‘मराठी मुक्तछंद’ (१९९९), ‘छंद : शास्त्रीय समीक्षा’ (२००८) आणि ‘छंदोमीमांसा’ (२०१९) ही ती पुस्तके होत. काव्याचा छंदासहित आस्वाद-आकलन-समीक्षा या दिशेने जाणारा व लयीच्या अंगाने हळूहळू उलगडत गेलेला रसमय परामर्श यात येतो. छंद शास्त्रीय समीक्षा म्हणजे विशिष्ट कवितेतील आशय व छंद यांच्यातील अनुबंधाचा शोध होय, जो लेखिकेने सोदाहरण पटवून दिला आहे. छंद:शास्त्राच्या तात्विक विवेचनाच्या जोडीने कवितेतील प्रयोगशील स्थित्यंतराचा चिकित्सक व रसाकर्षक मागोवा त्यांनी घेतला आहे.

वऱ्हाडी भाषा आणि वऱ्हाडी साहित्य यावर लक्ष केंद्रित करून डॉ. शोभा नाफडे यांनी ‘स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य’ (२००६) आणि ‘वऱ्हाडी मराठी : उद्‌गम आणि विकास’ (२००७) या पुस्तकांची निर्मिती केली. बोलींची संकल्पना, तिच्या निर्मितीची कारणे, वैशिष्ट्ये, प्रमाणभाषा आणि बोली यांच्या परस्परसंबंधांची चर्चा केवळ वऱ्हाडीपुरती सीमित न ठेवता अहिराणी, डांगी, कोकणी व निरनिराळ्या विभागात रूढ असलेल्या बोली याचीही चर्चा करतात. स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर आणि समकालीन अशा तीनही कालखंडातील वऱ्हाडी साहित्यिकांच्या मौलिक साहित्य कृतींची साधार मीमांसा आणि सूक्ष्म चिकित्सा

डॉ. शोभा नाफडे करतात. या विषयावरील हे वेगळे केलेले काम लक्षणीय म्हणावे लागेल.

स्त्री जाणिवा व्यक्त होण्याचे हक्काचे व्यासपीठ म्हणजे स्त्री-परिषदा व स्त्रीविषयक- नियतकालिके होत. या दोन विषयांना केंद्रिभूत मानून डॉ. स्वाती कर्वे यांनी लेखन केले आहे. 'स्त्री परिषदांचा इतिहास – इ. स. १८५० ते २००० महाराष्ट्राच्या मर्यादेत' (२०१५) यात स्त्रीपरिषदांचे समाजाला विशेषत: स्त्रीवर्गाला लाभलेले परिमाण विशद केले आहे.. १८५५ मध्ये प्रथमत: प्रकाशित झालेले 'सुमित्र' हे नियतकालिक ते आजची'मिळून साऱ्याजणी', 'माहेर', 'मानिनी', 'प्रपंच', 'बहिणा' असा प्रदीर्घ प्रवास त्या 'स्त्री नियतकालिकांचा इतिहास' (२०१७) या ग्रंथातून रेखाटतात. मनामध्ये थोपवून ठेवलेली अनेक स्पंदने, हुंकार व दडपलेल्या भावना यांना व्यक्त करण्यात व स्त्रीच्या विकासाची बिजे भवतालात रुजवण्यात नियतकालिकांनी मोलाची साथ दिली आहे, हा निष्कर्ष स्वाती कर्वे सोदाहरण मांडतात. अलक्षित विषयाला न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न मोलाचा आहे.

सातत्याने एका विषयाचा अभ्यास करणे हे आव्हानात्मक काम असते. आपणच मांडलेला विचार कालांतराने बदलला जाणे किंवा त्याला छेद देणारे नवीन संदर्भ हाताशी लागणे या शक्यता नाकारता येत नाहीत. या शक्यता विचारात घेऊनही त्याचा पाठपुरावा करणे व मौलिक भर घालत राहणे हे काम या लेखिकांनी केले आहे व ते उल्लेखनीय म्हणावे लागेल.

**लेखककेंद्री समीक्षा**

लेखकाने निर्माण केलेल्या साहित्यकृतींवर आधारित समीक्षा करताना त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा व तत्कालीन काळाचाही विचार करावा लागतो. त्याचे साहित्य कालातीत ठरते का, त्याच्या साहित्याचे एकूण वाङ्मयात योगदान किती, सामर्थ्याबरोबरच मर्यादाही कशा दिसतात, त्या लेखकाचा प्रभाव अन्य लेखकांवर किती झाला या व अशा अनेक अंगांने त्या साहित्यिकाचा अभ्यास करावा लागतो. (बऱ्याचदा अशी समीक्षात्मक पुस्तके ही प्रबंधावर आधारित असतात असे आढळून येते.) या दोन दशकांत ना. ह. आपटे, काशीबाई कानिटकर, वा. ब. पटवर्धन, डॉ. अरुणा ढेरे, त्र्यं. वि. सरदेशमुख, गणेश रंगनाथ दंडवते, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, प्रतिमा इंगोले, मुक्ताबाई इत्यादींच्या साहित्यावर आधारित समीक्षात्मक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

'काव्य आणि काव्योदय कर्वे वासुदेव बळवंत पटवर्धन जीवन आणि लेखन' (२००७) हे सरोजिनी वैद्य यांचे ५०० पृष्ठांचे समीक्षात्मक पुस्तक आहे. संदर्भपूर्ण ग्रंथ कसा असावा याचे प्रत्यंतर यातून येते. वा. ब. पटवर्धन यांच्यासारखे अजून एक अलक्षित वाङ्मयीन 'व्यक्तिमत्त्व म्हणजे गणेश रंगनाथ दंडवते होत. त्यांच्या वाङ्मयीन कार्यावर प्रकाश टाकतानाच दंडवते यांनी आधुनिक मराठी वाङ्मयाचा, कादंबरीचा, नाटक आणि रंगभूमीचा पहिला वाङ्मयेतिहास रचला हे 'एक अलक्षित वाङ्मयसेवक'या अभ्यासपूर्ण ग्रंथातून डॉ. मृणालिनी कामत यांनी सप्रमाण मांडून दाखवले आहे. अलक्षित परंतु महत्त्वपूर्ण वाङ्मयीन सेवकांची घेतलेली दखल निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे. अजूनही असे अलक्षित वाङ्मयीन सेवक उजेडात यावेत ही इच्छा आपोआपच वाचणाऱ्याच्या मनात येते, हेच या समीक्षा ग्रंथांचे योगदान आहे. 'दिवाकर कृष्ण : व्यक्ती व वाङ्मय' (२००७) या डॉ. वासंती दत्तात्रय देवधर यांच्या पुस्तकात दिवाकर कृष्णांच्या कथांमधील मनोविश्लेषण, काव्यात्मकता आणि सूचकता हे गुणविशेष कसे दिसतात याचे ससंदर्भ विवेचन केले आहे. डॉ. इरावती कर्वे आणि दुर्गा भागवत या मराठीतील दोन विदुषींच्या लेखनाचा अभ्यास 'इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाङ्मय' - डॉ. उषा कोटबागी (२००५), आणि 'वेध : दुर्गाबाईंच्या साहित्याचा' - डॉ. शकुंतला भावे यांनी घेतला आहे. संशोधनात्मकता हा दोघींच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष लेखनातून कसा प्रत्ययास येतो, हे प्रकर्षाने नमूद केले आहे. डॉ. लतिका जाधव यांचे 'श्रीमती काशीबाई कानिटकर : काळ आणि कर्तृत्व' (२०१५) हे समीक्षात्मक पुस्तक आहे. त्यांच्या लेखनाची समीक्षा करत लतिका जाधव यांनी काशीबाईंचे वाङ्मयीन योगदान नमूद केले आहे. डॉ. सौदामिनी चौधरी यांच्या 'ना. ह. आपटे : व्यक्ती आणि वाङ्मय' (२००८) या समीक्षा ग्रंथात त्यांच्या वैचारिक लेखनाबरोबरच ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक कादंबरी, संसारकथा, अद्भुतरम्य कादंबरी व इतर अन्य साहित्यसेवेचा परामर्श घेतला आहे. डॉ. अरुणा ढेरे यांनी मराठी साहित्यात स्वत:ची नाममुद्रा उमटवली आहे. कथा, कविता, ललित, वैचारिक आणि संशोधनात्मक अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी सकस लेखन केले. त्यांच्या समग्र साहित्याचा साक्षेपी दृष्टिकोनातून केलेला अभ्यास प्रथम प्रबंधातून व नंतर 'अरुणोदय' (२०१९) या पुस्तकरूपातून डॉ. स्वाती शिंदे-पवार यांनी मांडला आहे. संदर्भमूल्य असलेले हे पुस्तक वाचनीय झाले आहे. कादंबरीकार,

कवी, नाटककार, साहित्यविमर्शक व समीक्षक, अनुवादक अशा विविध साहित्यप्रकारात लेखन करून मराठी साहित्यात मौलिक भर घालणारे साहित्यिक म्हणजे त्र्यं. वि. सरदेशमुख होत. त्यांच्या समग्र साहित्याचा वेध डॉ. प्रिया निघोजकर यांनी 'त्र्यं. वि. सरदेशमुख : आत्मनिष्ठ लेखकाची बखर' (२०१९) यामधून घेतला आहे. सरदेशमुखांच्या समीक्षेची वैशिष्ट्ये लेखिकेनी नोंदवली आहेत. सरदेशमुख यांच्या कलामीमांसेने मराठी सौंदर्यशास्त्र समृद्ध केले आहे. कलेचे मानवी जीवनातील एकजिनसीपण, सत्याचा शोध, माणूसपणाचा शोध ह्या गोष्टींचा त्यांनी आपल्या मीमांसेतून साकल्याने वेध घेतला आहे. समीक्षा काव्यात्म असावी की नसावी हा विवाद्य विषय आहे, मात्र सरदेशमुख ह्यांच्या कविमनाचा प्रत्यय त्यांच्या समीक्षेतून येतो. डॉ. संजीवनी मोहोड-ठाकरे यांच्या 'डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या साहित्यातील सामाजिकता-एक अभ्यास' (२०१९) या पुस्तकात वऱ्हाडकन्या इंगोले यांच्या साहित्याचा व्यापक वेध घेतानाच ग्रामीण जीवनाच्या मानसिक गुंतागुंतीचीही चिकित्सा केली आहे. ग्रामीण स्त्री-जीवनाचा अत्यंत प्रगल्भतेने यात वेध घेतला आहे. मुक्ताबाईच्या व गोरक्षनाथाच्या भेटीचा प्रसंग हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय प्रसंग आहे. या भेटीचे गूढ व त्यामागील परामर्श, मुक्ताबाईच्या अभंगांचा अर्थ उलगडून दाखविणारे डॉ. केतकी मोडक यांचे 'कडकडोनी वीज निमाली ठायींचे ठायीं, संत मुक्ताबाई : व्यक्ती आणि वाङ्मय' (२००५) हे पुस्तक वाचायलाच हवे. याशिवाय काही लेखककेंद्री समीक्षात्मक पुस्तकांचा उल्लेख करायचा झाला तर, डॉ. नीलिमा निशाणदार यांचे 'कथाकार - पु. भा. भावे' (२०००), डॉ. अरुंधती वैद्य यांचे 'विद्याधर पुंडलिकांचे ललित साहित्य : स्वरूप व समीक्षा' (२००५), डॉ. भारती निरगुडकर यांचे 'गाडगीळांची समीक्षारूपे' यांचा उल्लेख करता येईल. एकूणच लेखकाची वाङ्मयीन जडणघडण ते त्याचे साहित्यकार्य याचा मागोवा या लेखककेंद्री समीक्षेतून घेतला जातो. तो घेत असताना त्याच्याबरोबरच समकालीन साहित्यिक, वाङ्मयीन वातावरण, साहित्यिक चळवळी, सामाजिक व सांस्कृतिक पट यांचे विश्लेषण व मराठी साहित्याबरोबरच इतर भाषिक साहित्यकृतींशी दिसणारी बांधिलकी एवढा विस्तृत विचार यायला हवा. तो प्रबंधात शक्य होणार नाही, परंतु प्रबंधातून पुस्तकाकडे वळल्यास त्याची दारे अधिक खुली करण्यात ही पुस्तके कमी पडतात, असे लक्षात येते.

## खंडात्मक समीक्षा कार्य व समीक्षात्मक प्रस्तावना

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाकडून 'स्त्री साहित्याचा मागोवा (इ. स. १८५० ते २०००)' हा त्रिखंडात्मक प्रकल्प (२००३) आणि 'भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा' हा द्विखंडात्मक प्रकल्प (२००७) व या द्विखंडात्मक प्रकल्पाचे इंग्रजी भाषांतर `Womens Literature in Indian Languages' यशस्वीरित्या पूर्ण केले. आजपर्यंत स्त्रियांच्या साहित्याला केंद्रस्थानी धरून त्याचा स्वतंत्र अभ्यास, त्यावरील संशोधन-समीक्षात्मक काम झाले नव्हते. ती उणीव साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने भरून काढली. 'स्त्री साहित्याचा मागोवा, खंड ४ (इ. स. २००१ ते २०१०)' प्रकाशन वर्ष (२०१५) प्रकाशित झाला असून खंड ५ चे काम वेगाने चालू आहे. स्त्री-लिखित १६ साहित्यप्रकारांवर स्त्रीसमीक्षकांनीच समीक्षात्मक दृष्टिक्षेप टाकला आहे. त्यातील संपादकीय मजकुरात नीलिमा गुंडी लिहितात, 'या ग्रंथातून आधुनिक गार्गींचे प्रश्न वाचकांसमोर येत आहेत. प्राचीन काळी गार्गीने विचारलेले प्रश्न परमार्थविषयक होते. आजच्या गार्गीला पडणारे प्रश्न वास्तवाबाबत आहेत. तिचे प्रश्न फक्त वैचारिक साहित्यातून नव्हे, तर कथा, कविता, नाटक, कादंबरी आणि ललित साहित्यातूनही ऐकू येत आहेत. तिच्या आत्मशोधाचा तो मार्ग आहे.' या आत्मशोधाचे समीक्षात्मक चिंतन या खंडांतून पाहावयास मिळते. फार मोठी भर यानिमित्ताने मराठीच्या समीक्षादालनात पडली आहे. साहित्यप्रेमीकडूनच कवयित्री पद्मा गोळे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'पद्माक्षरे' (२०१३) हा त्यांच्या कवितांचा अभ्यासपूर्ण शोध घेण्याचा संग्रह प्रकाशित केला. नीरजा, सिसिलिया कार्व्हालो, सुजाता शेणई, लीला दीक्षित, प्रभा गणोरकर इत्यादींनी पद्माताईंच्या काव्याचा विविध अंगाने घेतलेला शोध उल्लेखनीय आहे.

'इंदिरा संत यांची समग्र कविता' (२०१४) हे पुस्तक त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त काढले. त्यांच्या १० कवितासंग्रहातील कविता एकत्रित करतानाच त्याला लाभलेली अरुणा ढेरे यांची दीर्घ प्रस्तावना आस्वादक समीक्षेचा उत्तम नमुना आहे. 'स्त्री लिखित मराठी कविता, कथा आणि कादंबरी १९५० ते २०००' हे तीन खंड (२०१३) संपादन अरुणा ढेरे प्रकाशित झाले आहेत. यातील स्त्री-लिखित कादंबरीला रेखा इनामदार-साने यांची 'आत्मशोधाच्या स्वयंप्रकाशी वाटा' ही दीर्घ प्रस्तावना लाभली आहे. कादंबरी लेखिकांची संख्या कमी का, याचा शोध या निमित्ताने घेऊन त्याची कारणे देताना त्या लिहितात,

'बऱ्या-वाईट कोणत्याही अर्थाने स्वैर, स्वच्छंदी आणि आत्मनिर्भर जगण्याची मुभा व संधीच मिळत नसल्याने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना अनुभवांची उपलब्धी मर्यादित राहाते. त्यांचे अवकाश सीमित होते किंवा केले जाते. नानाविध दृश्य-अदृश्य, व्यक्त-अव्यक्त चौकटींमध्ये अडकल्याने कादंबरीकार लेखिकांचे प्रमाण आजही कमी आहे.' गेल्या वर्षी झालेल्या समीक्षा संमेलनाच्या (महाराष्ट्र साहित्य परिषद आयोजित, धुळे येथे झालेल्या) रेखा इनामदार-साने अध्यक्ष होत्या, हे आवर्जून नोंदवायला हवे.

'मराठी स्त्री आत्मकथनांची वाटचाल (१९१०-२०१०)' या ग्रंथात शतकभरातील एकूण ३५० आत्मकथनांचा परिचय व स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून आत्मकथनांची केलेली चिकित्सा आहे. याला प्रतिभा कणेकर यांची प्रदीर्घ अशी १५० पृष्ठांची प्रस्तावना लाभली आहे. या प्रस्तावनेत पुरुष समीक्षकांनी स्त्री आत्मकथनांचा केलेला अभ्यास व स्त्रीसमीक्षकांनी केलेला अभ्यास याचा तौलनिक विचार, स्त्रीआत्मकथनांमागील लेखनप्रेरणा, आकृतिबंध, देशकार्यातील योगदान, राजकीय प्रणाली या मुद्यांची सविस्तर चर्चा केली आहे. ही प्रदीर्घ प्रस्तावना म्हणजे प्रबंधिकाच ठरावी. (हा ग्रंथ मॅजेस्टिककडून लवकरच येत आहे.)

प्रस्तावना या केवळ हाती असलेल्या पुस्तकाच्या संदर्भात भाष्य करण्यापुरत्या मर्यादित न ठेवता, त्या अनुषंगाने समग्र साहित्यप्रकाराचा आढावा, लेखाजोखा व धांडोळा घ्यावयाचा असतो हे यातून चांगलेच दिसून येते. प्रस्तावनेतून वाचकाचा दृष्टिकोन विकसित करता येतो, अभ्यासकांना दिशा मिळत असते तर सामान्य वाचकांना अनाकलनीय भूमीचे आकलन होण्यास मदत करत असते. हे उद्देश या स्त्री लिखित प्रस्तावनेतून होतात, ही जमेची बाजू आहे. प्रस्तावना म्हणजे भलावण नसून मर्यादांचाही उल्लेख असतो, ज्यामुळे लेखकास त्याची मदतच होते. वाचक-लेखक यांना जोडणारा साकव म्हणजे प्रस्तावना असते, हे भान यातून दिसून येते.

**स्त्रीवादी समीक्षा**

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष, स्त्रीवादी चळवळ, स्त्रियांना आलेले आत्मभान आणि लेखनातून अभिव्यक्त होण्याची उर्मी या व अशा अनेक कारणांमुळे स्त्रीवादी साहित्याने जोर पकडला व त्याची समीक्षाही होऊ लागली. स्त्रीवादाविषयी बोलणे म्हणजे फक्त स्त्रियांनी स्त्रियांच्या प्रश्नांविषयी बोलणे नाही, तर स्त्री

आणि पुरुष दोघांनीही, ते प्रश्न निर्माण करणाऱ्या व्यवस्थविषयी बोलणे हे होय. या वादावर भाष्य करणारे 'स्त्रीवाद, साहित्य आणि समीक्षा' (२०१९) हे वंदना भागवत यांचे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. पाश्चात्त्य स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद, स्त्रीवादी साहित्य आणि साहित्याचा स्त्रीवादी अन्वय याविषयी लेखिकेने मांडणी केली आहे. मराठीत स्त्रियांच्या आत्मचरित्राचे दालन समृद्ध आहे. अलीकडच्या काळातील स्त्रीआत्मचरित्रात आधुनिक स्त्रीमनातील इच्छा-आकांक्षा व्यक्त झाल्या आहेत. पुरुषाने पारंपरिक चौकटी मोडून दिलदार, आश्वासक मित्र या नात्याने वावरावे, असे स्त्रीला वाटते. स्त्रीवादाचा खरा अर्थ दोघांनी समजून घेणे गरजेचे आहे, अशी स्पष्ट भूमिका डॉ. तारा भवाळकर यांनी 'तिसऱ्या बिंदूच्या शोधात' (२००१) या समीक्षा ग्रंथातून घेतली आहे. डॉ. शोभा पाटील यांनी त्यांच्या 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रीवादी शोध' (२००२) या समीक्षाग्रंथात १९७५ ते १९९५ या कालखंडातील स्त्री आत्मचरित्रांचा अभ्यास केला आहे. अन्यायाची जाणीव व बंडखोरी, आत्मशोधाचा ध्यास, समाजरचित स्त्रीत्वाचे खंडन, पौरुषासंबंधीच्या पारंपरिक प्रतिमांना छेद ही या आत्मकथनाची वैशिष्ट्ये आहेत. स्त्रीवादी जाणिवेतून या वैशिष्ट्यांचा वेध घेतला आहे. पाश्चात्त्य स्त्रीवादाच्या अनुषंगाने स्त्रीस्वातंत्र्याविषयीच्या जाणिवेचा विकास कसा झाला, याचा प्रवास डॉ. शोभा पाटील यांनी 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा' (२००७) या दुसऱ्या पुस्तकात घेतला आहे.

स्त्रीवाद हा फक्त मराठी साहित्यातूनच डोकावत होता असे नाही, त्याची व्याप्ती फार मोठी आहे. ही व्याप्ती लक्षात घेऊन डॉ. शोभा नाईक यांनी 'भारतीय संदर्भातून स्त्रीवाद : स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन' (२००७) या ग्रंथाची मांडणी केली. भारतीय संदर्भचौकटीत स्त्रीवादी समीक्षेचे निकष लावताना विविध सामाजिक स्तरांवर विभागलेले स्त्रीजीवन, भौगोलिक परिसर, सीमा, जात, लैंगिकता इत्यादींचाही विचार होण्याची गरज आहे, हे त्यांनी अधोरेखित केले आहे. स्त्रीवादी साहित्यावर सामाजिक अंगाने विचार करताना विद्युत भागवत यांचे 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' (२००४), 'स्त्रीवाद'– संपादन सुमती लांडे व श्रुती तांबे (२००७), आणि ज्योती लांजेवार यांचे 'भारतीय समाज आणि स्त्री' (२००८) यांचाही उल्लेख करायला हवा. 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य' हा सुजाता शिरवळकर-महाजन यांचा औरंगाबाद येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या 'भारुड' या स्मरणिकेतील (२००४) लेखही

अभ्यासपूर्ण आहे. एकूणच स्त्रीवाद हा स्त्रियांनी चांगला समजून घेतला आहे व त्यावरील समीक्षा लिहितानाही त्यावरची पकड कमी होऊ दिली नाही, हे यातून जाणवते.

## दलित व ग्रामीण साहित्य समीक्षा

'मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल' (२००४) हे डॉ. सुशीला ढगे यांचे समीक्षात्मक पुस्तक आहे. मराठी कादंबरीची परंपरा सांगून दलित कादंबरीची सुरुवात यात सांगितली आहे. दलित कादंबरीच्या प्रेरणा, स्वरूप, त्यातील टप्पे व वेगळेपण यात नमूद केले आहे. परिस्थितीवर मात करून स्वत:चे भविष्य घडवू पाहणारी पात्रे, विशेषत: स्त्री व्यक्तिरेखांचा मागोवा चांगल्या पद्धतीने घेतला आहे. डॉ. नंदा मेश्राम यांनी 'दलित कादंबरी : स्वरूप व समीक्षा' (२००६) या पुस्तकात कादंबरीचे आशयावरून होणारे वर्गीकरण व त्यातून होणारे तिचे विविध प्रकार यावर भर दिला आहे. दलित कादंबरीतील स्त्री चित्रण या पैलूचा स्वतंत्र विचार डॉ. ज्योती लांजेवार यांनी 'मराठी दलित कादंबरीतील स्त्री-चित्रण' (२००८) या ग्रंथासाठी केला. दलित कादंबरीतील स्त्री चित्रणामध्ये आंबेडकरी निष्ठेची जपणूक आणि स्त्रीचा दुर्दम्य आशावाद ही दोन मूल्ये व्यक्त झाल्याचे सांगतात. 'दलित कवयित्रींची कविता, स्वरूप आणि चिकित्सा' (२०१४) या डॉ. जया विश्वनाथ पाटीलयांच्या पुस्तकात स्त्रीत्वाची वेदना, विद्रोह आणि नकार, आत्मभान आणि स्व-समाजटीका, समकालीन समाजवास्तवाचे भान, दलित कवयित्रींच्या कवितेतील मिथके या सूत्रांना समोर ठेवून विवेचन केले आहे

ग्रामीण साहित्याच्या चळवळीपासून ते त्याच्या परिणतीपर्यंतची वाटचाल डॉ. कीर्ती मुळीक यांनी 'ग्रामीण साहित्याची चळवळ' (२०११) या ग्रंथातून विशद केली आहे. महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेले आधुनिक ग्रामीण साहित्य, रविकिरण मंडळातील ग्रामीण साहित्य, स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्य आणि नवआधुनिक काळातील ग्रामीण साहित्य यांचा सविस्तर आढावा यात घेण्यात आला आहे. स्वातंत्र्योत्तर मराठी कथेतील स्त्रीदर्शन, ग्रामीण कथेतील बहुआयामी स्त्रीचित्रण, ग्रामीण कथेतील बदलत जाणारी स्त्रीप्रतिमा यावर भाष्य करणारा कल्पना बोरकर यांचा 'स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कथा आणि स्त्री' हा ग्रंथ (२०१५) महत्त्वाचा आहे. श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यावरील विशेषांकात रूपाली शिंदे यांनी 'बोलावे ते तिने

आणि त्यांनीही' या लेखातून जागतिकीकरणाच्या नव्या अर्थकारणाचा गाव-गाड्यावर, कृषी-संस्कृतीवर आणि माणसांच्या श्रद्धा समजुतींवर होणारा परिणाम दाखवतानाच भालचंद्र नेमाडे यांच्या देशीपणावरही प्रकाश टाकतात. आजची महत्त्वाची ग्रामीण कवयित्री कल्पना दुधाळ यांच्यावर 'काव्याग्रह'ने जुलै २०२० मध्ये विशेषांक काढला होता, समीक्षक सरिता सोमाणी यांनी कल्पना दुधाळ यांची दीर्घमुलाखत घेतली आहे, ज्यातून ग्रामीण वास्तवावर प्रकाश पडतो. १९६० नंतर सुरू झालेली ग्रामीण व दलित साहित्याची चळवळ व साहित्यनिर्मिती याकडे आता तटस्थतेने पाहणे व त्यातील चढ-उतारांची, यशापयशाची परखड चिकित्सा करणे गरजेचे आहे, हे ओळखून ही समीक्षा आता त्या दिशेने पावले टाकत आहे.

## कथा-कादंबरी-नाटक-ललितगद्य यांवरील समीक्षा

विजया राजाध्यक्ष यांच्या कथालेखनातून व्यक्त झालेल्या अनुभवविश्वाचे त्याच्या वैशिष्ट्यपूर्णतेसह केलेले विवेचन डॉ. अलका भोपटकर यांच्या 'विजया राजाध्यक्ष यांचे कथाविश्व' (२००१) या ग्रंथात पाहावयास मिळते. ग्रामीण कथाकार भास्कर चंदनशिव यांची भूमीनिष्ठेशी जवळीक साधणारी व त्यातील जनजाणिवा शब्दबद्ध करणारी कथा असते. या कथांवर समीक्षात्मक लेखन मथु सावंत यांनी 'कथाकारभास्कर चंदनशिव' (२००४) या ग्रंथातून केले आहे. स्त्रीमुक्तीच्या नव्या वाटा शोधताना पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेतला दुटप्पीपणा उघड करण्याचे काम गेल्या अर्धशतकातील स्त्रियांनी केले आहे. मराठी कथालेखिकांच्या प्रयोगशील कथांमधील नवी जीवनदृष्टी आणि नवी सौंदर्यमूल्ये डॉ. मंगला वरखेडे यांनी 'स्त्रियांचे कथालेखन नवी दृष्टी नवी शैली' (२००५) यातून दाखवून दिली आहे. कादंबरीवरील समीक्षेत प्रमिला भरूड यांनी इ. स. १८५७ ते १९४७ या कालखंडातील स्त्रीलिखित कादंबरीचा विचार केला. 'मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान' या पुस्तकात त्या कालखंडातील मध्यमवर्गीय स्त्रियांच्या पारतंत्र्याचे दु:ख व्यक्त केले आहे. नलिनी महाडिक यांनी 'मराठी कादंबऱ्यांचे अंतरंग' यातून राजकीय कादंबऱ्यांचे विवेचन केले तर वंदना महाजन यांनी 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद' यातून वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांची स्त्रीवादी दृष्टिकोनातून मीमांसा केली. मराठी कादंबरीवरील साहित्यसमीक्षेत रेखा इनामदार-साने यांचा 'अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी' हा समीक्षाग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. मराठीतील काही निवडक कादंबऱ्यांमध्ये

अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा आविष्कार कसा झाला आहे याची अतिशय समतोल चिकित्सा या ग्रंथात वाचावयास मिळते. नाटक या साहित्यप्रकारावर त्यातही स्त्री नाटककारांनी मराठी नाटकाला काय दिले यावर आधारित डॉ. सुधा पेशकर यांचे'स्त्री नाटककारांचे योगदान' (२०१०) हे पुस्तक आहे. शोभा देशमुख यांचे'मराठी नाटकातील स्त्रीरूपे' (२००७) यात 'शारदा' ते 'चारचौघी' हा काळाचा पट उभा केला आहे. सुप्रिया पेंढारी यांनी विजय तेंडुलकर, चिं, त्र्यं. खानोलकर आणि महेश एलकुंचवार या तीन नाटककारांचा अभ्यास करून त्यांच्या नाटकातील विद्रोहाचे स्वरूप'नाट्यसृष्टीतील विद्रोह आणि नवता' या पुस्तकात उलगडून दाखवले आहे. आणखी काही समीक्षाग्रंथांचा उल्लेख करायचा तर, आरती कुलकर्णी यांचे 'वेध नाटकांचा' (२००१), उज्ज्वला जाधव यांचे 'मराठी शोकात्म नाटक' (२००५), संध्या टिळक यांचे 'मराठी नाटकातील शोकांतिकेचा नवा प्रवाह' (२००९) यांचा उल्लेख करावा लागेल. १८५० ते १९२० या कालखंडात स्त्रियांनी केलेल्या गद्यलेखनावर आधारित डॉ. मधुबाला खोपडे यांनी 'स्त्रियांचे गद्यलेखन' (२००५) हे पुस्तक प्रकाशित केले. गिरिजाबाई केळकर यांचा प्रौढविवाहावरील लेख ते काशीबाई गोखले यांचा चीनदेशातील स्त्री शिक्षणाचे प्रयत्न एवढा पट यात अंतर्भूत केला आहे. डॉ. लीला दीक्षित यांच्या 'रसमुद्रा' या ग्रंथात नामांकित पुस्तकांचा उदा. संधिकाल, झळाळ, आहे मनोहर तरी इत्यादींचा त्यांचे वाङ्मयप्रकाराचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन लेखन केले आहे.

## महानुभाव साहित्य, लोकसाहित्य व संतसाहित्य समीक्षा

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी यांचे आचरण, स्वभावविशेष व जीवनकार्य यांना समोर ठेवून सुमन बेलवलकर यांनी 'लीळाचरित्रातील समाजदर्शन' हा ग्रंथ लिहिला. महानुभावपंथीयांनी कृष्णभक्ती आणि संगीत यांचा मेळ घालून केलेल्या लोकसाहित्याचा अभ्यास डॉ. दीपा देशपांडे यांनी 'महानुभावीय लोकसाहित्य'या ग्रंथात केला आहे. महानुभाव पंथात 'लीळाचरित्र' हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. त्यावर विपुल लेखनही झाले. अनेक वादही निर्माण झाले. त्याची चिकित्सा करणारा 'लीळाचरित्र : वादस्थळे आणि संपादन' हा स्नेहा महांबरे यांचा समीक्षा ग्रंथ सापडतो. लोकसाहित्य हे जात्यावरच्या ओव्यांतून येत असल्याने स्त्रियांना ते जवळचे वाटते. त्यातील व्यावहारिक शहाणपण, नात्या-नात्यावरील भाष्य इतक्या वर्षांनंतरसुद्धा काळजाला भिडते. लोकपरंपरेतील

कला आणि स्त्रीजीवन यांचा परस्परसंबंध व परंपरेचे दर्शन घडवणारा लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांचा 'लोकांगण' (२००६) हा ग्रंथ आहे. त्यांचाच 'लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा' (२००९) हा दुसराग्रंथ लोकसाहित्याची व्याप्ती स्पष्ट करणारा आहे. डॉ. शोभा नाईक यांनी बेळगाव परिसरातील मराठी लोकगीतांचे संकलन करून त्यावरील संशोधन 'लोकसंचितातील स्त्री-चित्तवेध' (२०१०) यातून वाचकांसमोर आणले आहे. डॉ. अलका हिवाळे यांनी 'आदिवासी लोकगीतातील स्त्रीजीवन' यामधून आदिवासी स्त्रीजीवनाची मांडणी केली आहे. 'आगरी लोकगीते आणि परंपरा' यांचा अभ्यास सुनंदा मोरखेडकर यांनी अभ्यासरूपाने आणला आहे. वारकरी संतांनी अभंगवाङ्मयात वर्णन केलेल्या'नाममहिमा'या विषयावर डॉ. गौरी नामजोशी यांनी लेखन केले आहे. या पुस्तकात रामदासांच्या रामदासी संप्रदायाचाही विचार केला आहे. चोखोबांच्या अभंगावर डॉ. सरिता हरिदास जांभुळे यांचा 'चोखोबाची कविता' हा ग्रंथ तर जनाबाईंच्या काव्यावर आधारित डॉ. रेखा जगनाळे यांनी 'संत कवयित्री जनाबाई : काव्यदर्शन' हा ग्रंथ सिद्ध केला आहे. 'ज्ञानेश्वरीचे वाङ्मयीन वैभव' (२०१७) हा डॉ. लीला गोविलकरयांचा ग्रंथ म्हणजे मध्ययुगातल्या अजोड कलाकृतीची एक सौंदर्यमीमांसाच आहे. डॉ. कल्पलता नातू यांनी 'संतसाहित्यातील मिथकांचे रहस्य' (२०१४) सांगताना मिथक ही संकल्पनाच सर्वसमावेशक कशी आहे, मिथकांत मानवी आकांक्षांचे प्रतिबिंब कसे सामावलेले आहे याची मीमांसा केली आहे. लोकसाहित्य व संतसाहित्याचे काही शतकांनंतरही महत्त्व कायम आहे, यातच त्याचे अक्षरत्व दिसून येते. या अक्षरत्वाची ओढ एकविसाव्या शतकातील स्त्री समीक्षकांना लागते, व आतापर्यंत न उलगडलेल्या पैलूंचा मागोवा घेण्याचा प्रयत्न त्या करतात हे या प्रकारातील साहित्यसमीक्षेचे विशेष आहे.

## समारोप

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात प्रकाशित झालेल्या स्त्रीलिखित समीक्षाग्रंथांची संख्या विपुल आहे. संख्यात्मकेबरोबरच गुणात्मकतेतही त्यांचे स्थान उंचीवर आहे, हे अधोरेखित करण्यासारखे आहे. साहित्यप्रकाराधिष्ठित, लेखकाधिष्ठित, कालसापेक्ष व कालातीत साहित्यकृती यांचा विचार या दोन दशकात झाला. त्याची मांडणी करताना अर्थातच काही पारंपरिक सूत्रांचा वापर केला असला तरी नवीन मांडण्याची उर्मी, चाकोरी सोडून केलेली अभिव्यक्तीची

मांडणी उल्लेखनीय आहे. मराठीत समीक्षेची फार मोठी परंपरा असल्याने पूर्वसुरींचे संचित समोर होते, पण समीक्षा ही व्यापक अंगानी व विस्तृत पटावर मांडली पाहिजे हा विचार या समीक्षालेखनात दिसतो. समीक्षकाने स्वत:ला आकलन झालेले वाचकालाही आकनल करून देऊन त्याची दृष्टी विकसित केली तर त्या समीक्षेचे सामाजिक मूल्य वाढेल हा हेतू या लेखनात दिसतो. म्हणून समीक्षा बोजड न करता आकलनीय होईल व सामान्य वाचकांची भीती दूर होईल असे लेखन दिसून येते. कविता आणि आत्मचरित्र यावर आधारित अधिक समीक्षालेखन झाले आहे. हे दोन्ही साहित्यप्रकार स्त्रियांच्या भावविश्वाशी व मनोविश्वाशी जवळचे आहेत. केवळ ललित लेखन किंवा समीक्षा लेखन असा ठरावीक साचा न पकडता लेखिका अनेक साहित्यप्रकारात लेखन करत आहेत ही अभिमानास्पद बाब आहे.

आजच्या समीक्षेपुढे काही आव्हाने आहेत. सामाजिक संपर्क माध्यमातून आपले मत, विचार, परीक्षण, समीक्षण कोणाच्याही संपादकीय किंवा प्रकाशकीय संस्कारातून न जाता तडक मांडता येते. यात पुष्कळदा भलावणीचा भाग अधिक असतो, यामुळे सकस व निके वाचकांपर्यंत पोचत नाही. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना शोधनिबंध सादर करायचे असतात. त्यावर आधारित चर्चासत्रे होतात व पुढे त्याचेच पुस्तक येते. संशोधन व समीक्षा याची मात्र त्यात गल्लत किंवा वानवा दिसून येते. पुस्तक नावावर जमा व्हावे यासाठी पूर्वप्रसिद्ध लेख एकत्र करून ते काढले जाते. पण त्यावर नव्याने संस्कार करून त्याची कालसापेक्ष गरज नोंदवणे अधिक महत्त्वाचे असते याकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. प्रकाशकही फार जबाबदारीने ते काढतात असे वाटत नाही. ही परिस्थिती समीक्षेला पूरक व पोषक म्हणता येणार नाही. समीक्षेला आव्हान देणारे सकस साहित्य निर्माण झाले तर समीक्षकाचीही जबाबदारी वाढेल. बौद्धिक कस आणि तर्कशुद्धता या समीक्षेच्या कसोट्या आहेत. त्याचे महत्त्व राखणे व त्या अबाधित ठेवणे ही आपलीच जबाबदारी आहे.

मो. ९०११०१७९१६
ई-मेल : sujata.shenai@gmail.com

* * * * *

# २००० नंतरच्या स्त्री कादंबरीकारांच्या लेखनातील स्थित्यंतरे

- प्रा. विद्या कुलकर्णी

साहित्य आणि समाज यांचा अनोन्य संबंध असल्याने समाजातील अनेक घटकांचे चित्रण कादंबरीत येत असते. १९९० नंतरच्या भारतीय समाजात आमुलाग्र अशा प्रकारचे बदल होत गेले, आणि त्यातूनच मराठी साहित्यात कादंबरी या कथात्म वाङ्मय प्रकारात अनेक नवीन विषय तर आलेच शिवाय समाजातील वेगवगळ्या व्यवसायात काम करणाऱ्यांचे अनुभव साहित्यात यायला लागले. अभिजात साहित्य ते बहुजन साहित्य असा हा प्रवास मराठी साहित्यात नवी आशा निर्माण करणारा ठरला. दलित, ग्रामीण व स्त्रीवादी साहित्य या तीन प्रमुख प्रवाहांनी मराठी कादंबरीत वैविध्य तर आलेच पण या सर्वांत महत्त्वपूर्ण बदल स्त्रियांच्या कादंबरी लेखनात सन २००० नंतर झालेला दिसून येतो. कुठल्याही साहित्यात होणाऱ्या बदलास त्या त्या समाजातील तत्कालीन परिस्थिती, भाषा, संस्कृती, बदलते तंत्रज्ञान, हे घटक कारणीभूत ठरत असतात. काळ हा कधीच स्थिर राहत नसतो, त्यामध्ये सतत स्थित्यंतरे होत असतात. भौतिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, राजकीय, आर्थिक स्थित्यंतरांचा परिणाम प्रत्येक काळाच्या साहित्यावर होत असल्याने त्या काळातील साहित्याची भाषा, लेखकाची सामाजिक बांधिलकी, सामाजिक, कौटुंबिक प्रश्नांचा मागोवाच एक प्रकारे लेखक आपल्या लेखनातून घेत असतो.

सन २०००नंतरच्या स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमध्ये सामाजिक पर्यावरणातील बदलाचा संदर्भ असल्याचे लक्षात येते. भारताने गॅट करारावर सही करून मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. 'जागतिकीकरण' ही अर्थशास्त्रातील संकल्पना असली तरी समाजाच्या सर्वच क्षेत्रांवर तिचा मोठा परिणाम झालेला दिसतो. लोकांच्या जगण्याची व्याख्या ही पूर्णपणे जागतिकीकरणामुळे बदलून गेली. 'खाऊजा' धोरणाचा सामाजिक मूल्ये व सांस्कृतिक मूल्यांमध्ये बदल परिवर्तन दिसू लागले. त्यामुळे सर्वत्र नवी कार्यसंस्कृती आली. भारतीय समाजजीवनासोबत स्त्रीजीवनावरही त्याचा परिणाम झाला. शहरी स्त्रियांच्या पेहरावात व राहणीमानात बदल दिसू लागले. चंगळवादी व सुखवस्तू जीवन असावे हे मूल्य समाजात स्थिर होऊ लागले. जास्त पगार असणारा नवरा व

सुंदर, गोरी व शिकलेली मुलगी बायको म्हणून मिळावी यासाठी पुरुषांचा आग्रह वाढला. व्यसनाधिनता समाजात वाढीस लागली. भौतिक सुखाच्या कल्पनाही बदलत गेल्या. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची घर सांभाळून नोकरी करताना होणारी दमछाक होऊ लागली. नवऱ्याव्यतिरिक्त कामाच्या ठिकाणी अन्य पुरुषांचा येणारा संपर्क, त्यातून कुटुंबामध्ये गैरसमज वाढू लागल्याने घरगुती वादही वाढत गेल्याचे दिसून येते. या कारणांमुळे समाजात घटस्फोटांचे प्रमाणही वाढीस लागले. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर विभक्त राहू लागल्या. स्त्रियांना एकटे राहत असताना येणाऱ्या भावनिक एकटेपणातून त्यांच्या जीवनात अनेक प्रश्न उद्भवलेले दिसतात. पती-पत्नी यांच्या घटस्फोटानंतर त्यांच्या मुलांचे प्रश्नही निर्माण झाल्याने हे विषय स्त्रियांच्या कादंबऱ्यांमध्ये येवू लागले. या बदलत्या सामाजिक व कौटुंबिक प्रश्नांसोबत लैंगिक प्रश्नही २००० नंतरच्या स्त्री कादंबरी लेखिकांच्या लेखनात आलेल्या दिसून येतात. हे सर्व प्रश्न कमी अधिक प्रमाणात खालील लेखिकांच्या कादंबऱ्यांमध्ये वर्णिलेले आहेत. त्यांच्यावर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न या लेखातून केला आहे. सन २००० नंतरच्या कालखंडातील स्त्री लेखिकांच्या कादंबऱ्यांचा आढावा घेताना काही महत्त्वाच्या स्त्री लिखित कादंबऱ्यांचा व त्यातील आशयाचा उल्लेख या लेखात करणार असून यात सर्वच लेखिकांचा उल्लेख होवू शकणार नाही, ही या लेखाची मर्यादा असून यात कोणत्याही स्त्री कादंबरीकारास हेतुपुरस्सर वगळण्याचा हेतू नाही हे स्पष्ट करावेसे वाटते.

साहित्यात होणाऱ्या बदलास त्या काळातील समाजात होणारे बदल कारणीभूत ठरत असतात. त्यामुळे सन २००० नंतरच्या स्त्री कादंबरीतील बदलते विषय पाहता सामाजिकदृष्ट्या कुटुंब आणि विवाह संस्थेमध्ये झालेले बदल आणि बदलती मूल्यव्यवस्था ही महत्त्वाची कारणे सांगता येईल. शकुंतला खोत, इंद्रायणी जोग, कमलाबाई सोहनी, इत्यादी स्त्री कादंबरीकारांनी आपल्या भावविश्वाला लेखनातून वाट मोकळी करून दिली. या सर्व लेखिकांचे कादंबरी लेखन हे विविधांगी असून मध्यमवर्गीय चौकटीतले, स्त्रीवादी दृष्टिकोनाकडे झुकलेले दिसते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत स्त्रीचा होणारा कोंडमारा, शोषण आणि लग्नसंस्था या एकमेव घटकामुळे तिला बहाल होणारे कौटुंबिक व सामाजिक स्थान व तिचे अस्तित्व हे विषय प्रामुख्याने या लेखिकांनी आपल्या साहित्यात चित्रित केलेले दिसतात. त्यातील काही लेखिकांच्या निवडक कादंबऱ्यांचा

उल्लेख या लेखात केला आहे.

विदर्भातील ग्रामीण कादंबरीकार प्रतिमा इंगोले यांच्या ‘बुढाई’ (१९९९) या कादंबरीचा सर्वप्रथम उल्लेख करता येईल, कारण सन २००० मध्ये वाचकांच्या हाती ही कादंबरी आली. या कादंबरीत जमिनीला आईची उपमा देऊन तिच्यातील जननीचे महत्त्व लेखिकेने व्यक्त केले आहे. पावसाळ्यात काळ्या मातीच्या भेगांमध्ये पाणी गेल्यानंतर ती जमीन नरम होते व फुगून वर येते यालाच लेखिका ‘बुढाई’ असे संबोधते. या कादंबरीतील गोकर्णा शेतात कापूस वेचण्याचे काम करणारी महिला शहरात स्थलांतरित होते; परंतु तिच्या समस्यांचे स्वरूप बदलते व तिच्या सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होतात याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत आलेले आहे. प्रतिमा इंगोले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अभ्यास करून लेखन केले आहे. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून विदर्भातील ग्रामीण महिलांच्या समस्या मांडलेल्या असून विदर्भातील वऱ्हाडी भाषा हे त्यांच्या भाषेचे वेगळेपण ठरले आहे. त्यांच्या ‘पार्टटाइम’ (२००२) या कादंबरीतून स्त्रियांच्या वाट्याला येणारा मानसिक व शारीरिक छळ तसेच स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाची विकृत दृष्टी लेखिकेने या कादंबरीत मांडलेली आहे. पाच वर्षे अर्धावेळ महाविद्यालयात नोकरी करणाऱ्या अनुराधा नावाच्या स्त्रीला सहकाऱ्यांनी कुरघोड्या करून प्राचार्यांचे कान फुंकल्याने तिला नोकरीस डावलले जाते. नोकरी करत असताना तिची होणारी ससेहोलपट या कादंबरीत चित्रित झाली आहे. पण कोणत्याही परिस्थितीत आपले स्त्रीत्व ती गमावत नाही, यातच या स्त्री पात्राचे यश समावेले आहे. याशिवाय प्रतिमा इंगोले यांनी ‘बोढकी’ ही कादंबरी लिहिलेली आहे.

प्रतिभा रानडे यांची ‘रेघोट्या’ ही अगदी वेगळ्या विषयावरील कलात्मक कादंबरी आहे. या कादंबरीतील ‘निर्मला’ या स्त्री पात्राला जीवनविषयक अनेक प्रश्नांना कसे सामोरे जावे लागते, आणि तिचा जीवघेणा संघर्ष यात चित्रित झालेला आहे. पती-पत्नी नात्यात येणाऱ्या दुराव्याला निर्मलाच्या पतीची अतृप्त लैंगिक कामना हे कारण ठरते. या दोघांच्या मनाचा अत्यंत भावनात्मक स्तरावर वेध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीत झाला आहे. तारा वनारसे यांची ‘श्यामिनी’ (२०००) या कादंबरीतून शूर्पणखेच्या जीवनाची कहाणी असून याच कादंबरीत जानकीच्या हळव्या मनाचे चित्रण येते. शूर्पणखेने रामावर प्रेम करण्याचे मोठे धाडस केल्याने तिला मोठी शिक्षा भोगावी लागली. मिथक रुपात या कादंबरीचे

लेखन त्यांनी केले आहे. याच वर्षी प्रकाशित झालेली डॉ. विजया वाड यांनी ‘अभिनेत्री’ या कादंबरीतून अभिनेत्रीला फक्त चेहरा नसतो तर त्याच्या पलीकडे एक निर्मळ अंत:करणही असते हा विचार मांडला आहे. अभिनेत्रीला आपल्या आयुष्यात कितीतरी कठोर अभिनयाला सामोरे जावे लागते, याचे चित्रण या कादंबरीत येते. याशिवाय कविता नील यांची ‘भैरवी’, शुभांगी भडभडे यांची ‘झंझावात’, आशा परुळेकर यांची ‘वेड’, वैजयंता काळे यांची ‘सरांचा सौदा’, शुशिला खेडकर यांची ‘शापिता’ या कादंबऱ्यांतून पेशवेकाळात आनंदीबाईंवर कसा अन्याय झाला, आणि इतिहासात ही व्यक्तिरेखा कशी बदनाम ठरली आहे, याबद्दलचा त्यांनी आपला विचार मांडून या पात्राकडे नवीन दृष्टीकोनातून बघायला लावले. या सर्व कादंबऱ्या स्त्री मनाचा भावनिक कप्पा उलगडून दाखविणाऱ्या आहेत.

सन २००० मध्ये प्रकाशित झालेली आशा बगे यांच्या ‘सेतू’, त्यानंतरची ‘भूमी’ (२००४), ‘भूमिका आणि उत्सव’ (२०११), ‘मुद्रा’ आणि चरित्रात्मक ‘चक्रवर्ती’ या कादंबऱ्यांतून आशा बगे यांनी मानवी जीवनाचे सखोल चिंतन केले असून माणसाच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. अशा बगे या लोकप्रिय स्त्री कादंबरीकार म्हणूनही ओळखल्या जातात. १९७८ मध्ये प्रकाशित झालेली त्यांची पहिली कादंबरी ‘मनस्विनी’ ही वाचकांद्वारा खूप वाचली गेली. शिवाय झुंबर आणि त्रिदल या कादंबऱ्या वाचकांना अधिक भावल्या. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया या उच्चशिक्षित, बुद्धिमान असून त्यांच्या नोकरी–व्यवसायात यशस्वी आहेत. त्यांना रूढ चाकोरीबद्ध जीवन नको असून त्यांच्यातील स्वतंत्र वृत्ती सतत त्यांना जागरुक ठेवताना दिसते. त्यांच्या नायिका स्त्रीवादी भूमिकेतून बंड करताना मात्र दिसत नाही. अत्यंत कमालीचा संयतपण त्यांच्या ठायी दिसून येते. अनेकविध नात्यांची गुंफण त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसून येते. भावनिकदृष्ट्या ही सर्व पात्रे संपन्न आणि प्रगल्भ वाटतात. ‘भूमिका’मधील आजी–आजोबा आपल्या नातवाचा मुलीच्या मृत्यूनंतर सांभाळ करतात, तर ‘सेतू’ ही कादंबरी म्हणजे मानवी नात्यांतील सुंदर गोफच आहे. स्त्री-पुरुष यांच्या भावनिक नात्यातील ओलाव्याचे चित्रण त्या अधिक करतात. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये शारीरिक संबंधांचे चित्रण तुलनेत खूप कमी येते. पात्रांच्या मानसिक व भावनिक ताणतणावाचे चित्रण अत्यंत ताकदीने त्यांनी आपल्या साहित्यातून केले आहे. वसुमती, मंजू, शारदा, सरू, माधवी, मैथिली, नीरू

ही सर्व स्त्री पात्रे उदाहरण म्हणून सांगता येईल. त्याबरोबरच नैतिक मूल्ये जपणारी पात्रेही त्यांनी रंगविली आहेत. धार्मिक सण, उत्सव, मंगळागौर, डोहाळेजेवण, कुलदैवतेचा उपवास इत्यादी गोष्टींचे चित्रण त्या कादंबऱ्यांतून करतात. त्यामुळे वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी त्यांची कादंबरी आजही वाचकांच्या लक्षात राहते.

बदलती मूल्यव्यवस्था, समाजजीवन, मोबाईल, इंटरनेटसारखी माध्यमे या सगळ्याचा आजच्या कोवळ्या पिढीवर नेमका काय परिणाम होतो आहे, हे सांगणारी याच पिढीच्या मुलीने वयाच्या सोळाव्या वर्षी लिहिलेली 'लॉग आऊट' (२०१४) ही कादंबरी श्रुती आवटे यांची असून यात जान्हवी नावाच्या पौगंडावस्थेतील मुलीच्या स्वप्नाळू मनाचे चित्रण वर्णिलेले आहे. कमी वयामध्ये तरुणीने लिहिलेली ही कादंबरी आजच्या माध्यमांच्या जगात महत्त्वाची ठरते. 'पुत्र सागराचा'रोहिणी झेंडे आणि 'अश्वदा' संध्या देशपांडे यांच्या या कादंबऱ्या (२००७) मध्ये प्रकाशित झाल्या. 'पुत्र सागराचा' ही कादंबरी समुद्रतळाची माहिती सांगणारी वेगळी कादंबरी आहे. या कादंबरीतून सागराच्या तळाशी असलेली शंख, शिंपले, मोती, प्रवाळ ही जलसंपत्ती मिळविणाऱ्या लोकांच्या जीवनातील शौर्य लेखिकेने उभे केलेले आहे. 'अश्वदा' ही कादंबरी महाभारतातल्या पात्राचा संदर्भ देणारी पौराणिक कादंबरी आहे. 'उमंग' या मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कादंबरीत माणसाच्या आंतरिक वृत्ती-प्रवृत्तीचे, नैसर्गिक सृजनाच्या ऊर्मीचे चित्रण येते. मैत्री, माता, आई, चर्च, येशू, धर्म इत्यादी गोष्टींचे चित्रण त्यांनी अत्यंत भावनिक स्तरावर केले आहे. तर मीना देशपांडे यांनी 'म्यारीलीन मन्रो'या अभिनेत्रीच्या जीवनावर आधारीत चरित्रात्मक कादंबरी लिहिली असून त्याकाळात या अभिनेत्रीचे झालेले लैंगिक शोषणाचे विदारक चित्रण केले आहे. रोहिणी कुलकर्णी यांच्या 'पिंपळफेरे' (२००६) गर्भनाळ (२००६) या दोन कादंबऱ्या म्हणजे कुटुंब कथाच आहे. समाजाची स्त्रीविषयक दृष्टी बदलणे आणि स्त्री-स्त्रीसंबंध निकोप होणे किती महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी प्रत्येक स्त्रीनेच पुढाकार घ्यायला हवा हा विचार त्यांनी आपल्या कादंबरीतून मांडला आहे. आधुनिक काळातील 'स्त्री'विषयक प्रश्नांना कलात्म पातळीवर मांडून रोहिणी कुलकर्णी यांनी जीवनमूल्यांकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन दिला आहे.

आत्तापर्यंत स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा जो आढावा घेतला त्यामधील स्त्री लेखिकांच्या कादंबऱ्या या पारंपरिक स्त्री जीवनाचे चित्रण करणाऱ्या असून

फारसी बंडखोरपणाची भूमिका त्यांनी आपल्या साहित्यातून मांडलेली दिसून येत नाही. पण सन २०००५ नंतरच्या स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचे विषय बदललेले दिसून येतात. त्यास काही महत्त्वाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येईल. भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्यातील नवनैतिकता, देशीयता, स्त्रीवादी साहित्यातील वैचारिकता इत्यादी. या काळातील लेखिका स्त्रियांच्या लेखनात स्त्री-पुरुष समानता केंद्रस्थानी यावी असे मानणारा आहे. धर्म, रूढी, प्रथा-परंपरा यांना विरोध करणारा, मनुवादी विचारसरणी नाकारणारा स्त्रियांचा वर्ग, आपल्या साहित्यातून स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक, वस्तू म्हणून तिच्याकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन नाकारणाऱ्या दिसतात. भारतीय घटनेने सर्वांना दिलेली समानता प्रत्यक्षात स्त्रीला मिळावी यासाठी साहित्यातून परिवर्तनवादी विचार मांडणाऱ्या लेखिका आपल्या अस्तित्वाचा शोध कादंबऱ्यांतून घ्यायला लागल्या.

बंडखोर भूमिका आपल्या कथात्म साहित्यातून मांडणाऱ्या गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे, कविता महाजन, अरुणा सबाने, शांता गोखले, अंबिका सरकार, छाया महाजन, शैलजा वाडीकर इत्यादी स्त्री लेखिकांनी स्त्री- मुक्तीचा नवीन विचार आपल्या कादंबऱ्यांतून मांडलेला दिसून येतो. आपल्या अस्तित्वासाठी झगडणाऱ्या या स्त्री लेखिका आहेत. आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी व्यवस्थेला प्रश्न विचारलेले आहेत. स्त्रीवादी साहित्यातून पुरुषी संस्कृतीचा धिक्कार, पुरुषी वर्चस्वाला त्यांनी कडाडून विरोध केला आहे. या बदलत्या मानसिकतेचे चित्रण स्त्रियांच्या कादंबऱ्यांमध्ये चित्रित झालेले दिसते.

२००० नंतरचा काळ हा खऱ्या अर्थाने जागतिकीकरणातून सामाजिक बदलांचा होता. आजही सामाजिक मूल्ये, संरचना, कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था, अर्थकारण, राजकारण, संस्कृती, साहित्य या सर्वांवर याचा प्रभाव पडताना दिसत आहे. खुल्या आर्थिक धोरणामुळे या काळातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवनव्यवहार प्रभावित झालेला आहे. याचा समाजातील अनेक घटकांवर परिणाम देखील होत आहे. कादंबरीत सामाजिक घटनांचा संदर्भ अधिक येत असल्याने या काळातील स्त्री लेखिकांच्या साहित्यात बदलती मूल्यव्यवस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या सर्वांवर झालेला बदल त्यांच्या साहित्यात आलेला दिसतो. या लेखिकांवर स्त्रीवादी विचारांचा प्रभाव प्रामुख्याने दिसून येतो. मुळात परदेशी स्त्रीवादाने जगभरातील स्त्रियांना स्वत:च्या सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाकडे

बघण्याची नवी दृष्टी दिली. पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती, आणि सामाजिक जीवनातही स्त्रीला जी दुय्यम वागणूक दिली जाते, त्याबद्दलची चीड, आणि काही प्रमाणात आलेली स्वकेंद्री वृत्ती यांचा परिणाम या काळातील स्त्री कादंबरीवर झालेला दिसून येतो. या बदलत्या सामाजिक मूल्यांतून मेघना पेठे, कविता महाजन, नंदा खरे, छाया महाजन, अंजली जोशी, शैलजा वाडीकर यांच्या कादंबऱ्यांतून आलेले विषय बघता लक्षात येते.

मेघना पेठे यांची 'नातिचरामी' ही कादंबरी सन २००५ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीत महानगरातील सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या स्त्रियांच्या जीवनात पुरुषप्रधान संस्कृतीच्या दुराग्रही भूमिकेतून आलेल्या समस्या आणि जगण्याचे शोधलेले पर्याय स्त्रियांच्या जीवनाला उभारी देतात की नाही? याचा शोध कादंबरीतील मुख्य पात्र मीराच्या निमित्ताने घेतला आहे. आजच्या आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या महिलांच्या जीवनातील कौटुंबिक प्रश्नांचा आढावा या कादंबरीत येतो. बदलत्या सामाजिक परिस्थितीत कुटुंबसंस्थेला प्रचंड हादरे बसत आहेत. मेघना पेठे यांच्या या कादंबरीत कुटुंबसंस्था टिकविण्याच्या नावाखाली स्त्रियांनी मूकपणे नवरा आणि सासूचे जाच सहन करण्याचा काळ आता संपत आला असून, आपला आत्मसन्मान त्यांना अधिक महत्त्वाचा वाटतो. मीराचे दोन लग्न होऊनही घटस्फोट झाल्याने ती एकटीच आपले आयुष्य जगत आहे. स्त्रीविशिष्ट अनुभव लेखिकेने अत्यंत ताकदीने मांडला आहे. आजच्या स्त्रीची नवऱ्या बद्दलची व्याख्या बदललेली आहे. मीरा हे बंडखोर स्त्री पात्र कादंबरीत म्हणते 'मला पैशाचं आकर्षण अजिबात नाही. मला पुस्तकी शिक्षणातल्या पदव्यांचं फार कौतुक नाही. मला पोशिंदा नको आहे. संरक्षक पोलीसही नको आहे. मला नेकीनं आणि उत्साहानं जगणारा आणि आणि जगू देणारा, निरोगी, प्रामाणिक, सहचर, सोबती हवा आहे. मला त्याच्याबरोबर वैध सेक्स हवा आहे. आजूबाजूला असं कोण आहे? माझ्या चार वीत भवतालात, नजीकच्या भविष्यकाळात असं कोण मला भेटणार आहे?' (नातिचरामी : पृ. ३३) भारतीय विवाहसंस्था ही वैयक्तिक बाब न ठरता ती सामाजिक कशी ठरते, आणि लग्नसंस्कृतीत मारून मुटकून नवरा बायको का सोबत राहतात? घटस्फोट का होतात? महिलांचे त्यानंतर कोणते प्रश्न निर्माण होतात? त्यातून स्त्रियांना येणारा एकटेपणा या सर्वांवर मीरा आपले मत मांडते. विवाहबाह्य संबंध आणि स्त्री-पुरुष शारीरिक संबंधांतील प्रसंगांचे चित्रण मेघना

पेठे यांनी अत्यंत धाडसाने केले आहे. व गालिबच्या गझलांचा प्रभावीपणे कादंबरीतीत आशयासाठी वापर केला असल्याने भाषाशैलीला वेगळीच लय प्राप्त झाली आहे.

कविता महाजन यांनी 'ब्र' (२००५) आणि 'भिन्न' (२००७) या कादंबऱ्यांमधून स्त्रियांच्या समस्यांचा आढावा घेतला आहे. परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या, संकटांवर मात करू पाहणाऱ्या या धाडसी स्त्रिया लेखिकेने समाजातील वास्तव परिस्थिती डोळ्यासमोर ठेवून वर्णिल्या आहेत. या कादंबऱ्या रुपदृष्ट्या जरी बांधीव वाटत नसल्या, तरीपण यामधील स्त्रीजीवनाचा पैस व्यापक आहे. महानगरीय, ग्रामीण, आदिवासी अशा विभिन्न भू-सांस्कृतिक पर्यावरणातील स्त्रियांचे जगणे, त्यांचा सामाजिक-राजकीय अवकाश कवेत घेत त्यांनी हे सर्व चित्रण केले आहे. ग्रामीण भागात राजकीय आरक्षणातून आलेले स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्व आणि त्याला लगडून येणारा अधिकार, त्यातील स्त्रियांना राबवून घेण्याचा व्यवहार, या प्रक्रियेतून त्यांच्या जगण्यात कोणते महत्त्वाचे बदल व स्थित्यंतरे घेवून येतात याचा वास्तवदर्शी वेध कविता महाजन यांनी घेतला आहे. 'ब्र' या कादंबरीत प्रफुल्ला या स्त्रीच्या माध्यमातून आदिवासी स्त्रियांच्या व्यथा मांडलेल्या आहेत. प्रफुल्ला ही नवऱ्याचा जाच सहन करत विवाह बंधनातून मुक्त होवून आदिवासी भागात महिलांसाठी सामाजिक कार्य करणारी नायिका आहे. तर 'भिन्न'मध्ये एच. आय. व्ही. पॉझिटीव्ह-एड्सग्रस्त स्त्रियांचं वेगळे वास्तव वर्णिले आहे. एड्स या रोगाची विविध कारणे आणि पुरुषांपासुनच स्त्रियांना हा आजार जडतो असे वास्तव महाजन यांनी मांडले आहे. यासोबत या कादंबरीत पुरुष वेश्या, स्त्रीवेश्या, हिजडे, लेस्बियन, गे, समलिंगी होमो, इत्यादी समाजापासून अलक्षित असलेल्या मोठ्या वर्गाचे निर्भयपणे चित्रण या कादंबरीत केले आहे. समकालीन सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंभू असलेल्या स्त्रियांच्या व्यथा यानिमित्ताने कविता महाजन यांनी मांडल्या आहेत. सामाजिकदृष्ट्या भिन्न या कादंबरीतून एड्स या आजाराबद्दल लोकांच्या मनात जागृकता निर्माण करतेच शिवाय त्यासाठी कारणीभूत असलेल्या समाजव्यवस्थेची सूक्ष्म आणि धारदार चिकित्साही करते. भिन्नमध्ये मुख्य पात्र प्रफुल्लासोबतच लेनिना, रचिता, विभा, विनिता या दुय्यम पात्रांच्या संघर्षाच्या कहाण्याही येतात. आशयाचा बंध आदिवासी लोककथा, दैवतकथा यांनी अधिक समृद्ध झाला आहे. शिवाय आदिवासी भाषिक रूपांचा आणि आदिवासी समाजातील

चालीरीतींचा परिचय करून देण्याचं भाषिकदृष्ट्या कार्य केले आहे. एकंदरीत स्त्री प्रश्नांचा आढावा घेणारी, आणि त्यांच्यासाठी संघर्ष करणारी ही लेखिका वाचकांच्या नेहमीच लक्षात राहील. त्यांची 'कुहू' ही कादंबरी मल्टीमीडियाचा आधार घेत साकारली आणि त्यासाठी कविता महाजन यांनी स्वत: चित्रे काढली आहेत, त्यांच्यातील बोलकी चित्रकारिता यानिमिताने समोर आली हे महत्त्वाचे वाटते. रूपक कथेचा आधार घेत त्यांनी लिहिलेल्या या कादंबरीची मराठी साहित्यविश्वात स्वागत व चर्चा झाली.

छाया महाजन यांच्या 'कॉलेज' या कादंबरीतून सध्याच्या महाविद्यालयीन वातावरणातील मूल्यहीनतेचा सर्वंकष आलेख वर्णिला असून महाविद्यालयात प्रामाणिक काम करणाऱ्या प्राध्यापिकेस पवित्र अशा शिक्षण क्षेत्रात हिणकस अनुभव येतात. बदलणारी व्यावसायिक दृष्टी शिक्षण क्षेत्रातही कशी शिरकाव करत आहे, याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. 'तन अंधारे' या कादंबरीतून गोव्याच्या निसर्गरम्य व मुक्त वातावरणात विहरणाऱ्या तीन पात्रांची कहाणी वर्णिली आहे. शैलजा वाडीकर यांची 'एकटं असण्याची गोष्ट' या कादंबरीतून स्त्रीवादी विचारांचा परामर्श येतो. रेखा बैजल यांची कादंबरी मराठवाड्यातील स्त्रियांचे भावनिक शोषण दर्शविते. सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी 'तेजस्विनी' आणि 'वाळवंटातील वाट' या कादंबऱ्यांतून स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रातील पुरोगामी विचारवंतांनी स्त्रीत्वाचा केलेला पुरस्कार यामुळे सांस्कृतिक आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात या चळवळीचा प्रभाव पडत होता. त्याचाच एक भाग म्हणजे परित्यक्ता स्त्रीप्रती सामाजिक जाणीव वृद्धिंगत करणाऱ्या अरुणा सबाने यांच्या 'विमुक्ता' आणि 'मुन्नी' (२०१०) या कादंबऱ्या. स्त्रीत्वाचा स्वतंत्र पुरस्कार त्यांच्या वरील दोन्ही कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेला आहे. समाजात स्त्रीला एक व्यक्ती म्हणून जगण्याचा घटनादत्त मानवी अधिकार असल्याने स्त्रीने वाट्याला आलेल्या संकटांवर मात करत आपले जीवन आनंदाने कसे जगावे हे विमुक्ता कादंबरी शिकविते. स्त्री ही स्वबळावर आपलं स्वतंत्र जग उभारू शकते हे सबाने यांनी 'विमुक्ता'तील वसू आणि 'मुन्नी' मधील वैदेहीच्या उदाहरणाद्वारे दाखवून दिले आहे. मुन्नी हा अरुणा सबाने यांच्या स्त्रीवादी चळवळीचा लेखाजोखा मांडणारा आविष्कार असून स्त्रीवादाची दिशा 'मुन्नी' या कादंबरीत अधिक उजळून निघाली आहे. आधुनिक काळात पुरुषसत्ताक व्यवस्थेत

जेव्हा स्त्रीची कोंडी होते त्यावेळेस आजही समाजात अनेक स्त्रिया आत्महत्या हा मार्ग स्वीकारतात. परंतु स्वबळावर आपली मातृत्वाची व स्त्रीत्वाची भूमिका बजावणारी त्यांच्या नायिका स्त्रियांना प्रेरणादायी ठरतात.

शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर'मधील पुरुषी सत्तेला विरोध करून स्वचे अस्तित्व निर्माण नायिका ही मराठी कादंबरीत स्त्रीवादी साहित्याचा पडलेल्या प्रभावातून जशी लिहिली गेली, त्याप्रमाणे २००८ मधील 'त्या वर्षी' प्रसिद्ध झालेली ही लक्षणीय कादंबरी ठरली. कोणत्याही समाजाने धर्माचा जर अतिरेक केला तर विनाश हा ठरलेला आहे, असा संदेश देणारी ही कादंबरी आहे. आधुनिक काळात स्पर्धेचे वाढते वर्चस्व आणि त्यामध्ये सुरू असलेली गळेकापू स्पर्धा यामुळे संवेदनशील मनाची झालेली घालमेल यांचा वेध दोन पिढ्यांतील संघर्षाच्या आधारे कादंबरीत चित्रण येते.

सन २००० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन हा उपरोक्त विषय या लेखात मांडत असताना स्त्री कादंबरीकांच्या लेखनातून काही महत्त्वाचे विषय लिहिले गेले. परंतु अजूनही कुटुंब, विवाह, नातेवाईक, मित्रपरिवार, घटस्फोटामुळे स्त्रियांच्या विश्वात निर्माण झालेले प्रश्न या विषयांवर कादंबरी लेखन अधिक झालेले दिसून येते. आजही स्त्री लिखित बृहद कादंबरी किंवा जागतिक स्त्री समस्या यांचे चित्रण मराठीतील स्त्री लेखिकांकडून झालेले नाही. या त्यांच्या साहित्याच्या मर्यादा मान्य करूनही मराठीत स्त्री कादंबरीकारांनी स्त्रीला स्वत:चा आत्मशोध घ्यायला शिकविले. त्यामुळे स्त्रियांत आत्मभान जागृक झाल्याचे दिसून येते. कौटुंबिक, सामाजिक अन्यायाविरुद्ध आजची स्त्री कादंबरी बंड करते. पण अजूनही खरे स्वातंत्र्य म्हणजे काय? याचा शोध घेणाऱ्या लेखकांना अपेक्षित उत्तर साहित्यातून मिळालेले नाही, परंतु किमान विरोधाच्या, संघर्षाच्या अनेक दिशा या कादंबऱ्यांतून सामान्य महिलांपर्यंत पोहचत आहे हे महत्त्वाचे वाटते. पण अजूनही साहित्य क्षेत्रांतील संस्थांवर पुरुषसत्ताक वरचष्मा असल्याने साहित्यक्षेत्रात त्या दुय्यम ठरल्या. म्हणावे तसे यश आजही स्त्रियांना मिळत नसले तरीपण तिच्यात येणाऱ्या पुढील दशकांत नक्कीच अपेक्षित बदल होतील यात शंकाच नाही.

नाशिक

इ-मेल : vidyakulkarni993@gmail.com

* * * * *

# २००० नंतरची मराठी स्त्रीवादी कादंबरी

**- डॉ. वर्षा गणगणे**

२००० नंतरच्या स्त्रीवादी मराठी कादंबरीच्या क्षेत्रात विचार केला तर मेघना पेठे, कविता महाजन, अरुणा सबाने ह्या लेखिका धीटपणे स्त्रियांची सर्वांगीण बाजू निर्भीडपणे मांडण्याचा प्रयत्न करतात. आजची स्त्रीवादी कादंबरी समृद्ध करण्यात या लेखिकांचा महत्त्वाचा सहभाग आहे. १९७५ नंतर खऱ्या अर्थाने स्त्रीवादी जाणिवा साहित्यातून प्रकट करण्यास सुरुवात झाली. स्त्रीमध्ये कमालीचं दु:ख सहन करण्याची प्रचंड ऊर्जा आहे हे वास्तव समाजाने लक्षात घ्यायला हवं. काही प्रमाणात स्त्रीवादी साहित्यातून होणारं स्त्रीजीवनाचे चित्रण समाजाने मनावर घेतले ही. स्त्रियांच्या अंगी असणाऱ्या या प्रचंड ऊर्जेचा परिचय करून देण्याच्या हेतूनेच या समकालीन स्त्रियांच्या कादंबरीची प्रातिनिधिक चर्चा करण्यासाठी तीन लेखकांची निवड केली आहे. या तीनही लेखिका स्त्रीवादी जीवनाचं आणि स्त्रीवादी विचारसरणी प्रतिनिधित्व करताना दिसतात. या कादंबरीकारांच्या अंगी असणाऱ्या या प्रचंड ऊर्जेचा परिचय करून देण्याच्या हेतूनेच या समकालीन स्त्रियांच्या कादंबरीची प्रातिनिधिक चर्चा करण्यासाठी तीन लेखकांची निवड केली आहे. या तीनही लेखिका स्त्रीवादी जीवनाचं आणि स्त्रीवादी विचारसरणी प्रतिनिधित्व करताना दिसतात. या कादंबरीकार आजच्या वर्तमानाचं, प्रतिनिधित्व करीत असलेल्या वर्तमानाशी नाते सांगणारी कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न करीत असल्या तरी भूतकाळातील सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात डोकावताना दिसून येतात. आजच्या जगण्याशी त्याचा सांधा जोडताना दिसतात.

मेघना पेठे यांची 'नातिचरामि' ही कादंबरी २००५ मध्ये प्रकाशित झाली. 'नातिचरामि' ही कादंबरी स्त्रीच्या व्यक्ती म्हणून असलेल्या स्वतंत्र अस्तित्वाचा, प्रतिष्ठेचा, आत्मसन्मानाचा विचार करताना दिसते. परंपरांना छेद देत स्वत:च्या सत्वाचा व सत्वाचा ही विचार ही स्त्री करताना दिसते. स्त्री पुरुष संबंधाच्या बदलत्या जाणिवांचा ही आविष्कार मेघना पेठे यांच्या कादंबऱ्यांतून दिसतो. स्वत:च्या आत्मसन्मानासाठी, अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, प्रतिष्ठा मिळवण्यासाठी रूढ चाकोरी बाहेरची वेगळी वाट/जीवनपद्धती निवडल्याने स्त्रीच्या वाट्याला येणारे पुरुषी मानसिकतेचे, पुरुषी वर्तनाचे अनेक अनुभव या कादंबरीत येतात.

आपल्या पतीशी/मित्रांशी असलेल्या नातेसंबंधाचे सूक्ष्म निरीक्षण मीरा करते आणि नवऱ्याचे पुरुषकेंद्री स्वरूप पुढे करण्यात यशस्वी होते. नातिचरामि ही शपथ विवाहाशी संबंधित असली तरीही ही कादंबरी विवाह संस्थेपुरती मर्यादित न राहाता पुरुषसत्ताक व्यवस्थेने एकूणच स्त्री वर्तनाबाबत घातलेली शपथ ठरते. ही शपथ नाकारण्याचे धैर्य मीरा दाखवते. परंपरागत चौकटी बाहेर राहून विचार करणारी आणि समाज व्यवस्थेने लादलेली बंधने नाकारणारी मीरा एक माणूस म्हणून उभी राहतांना दिसते. पूर्णपणे लिंगभाव विरहीत असलेले पात्र मेघना पेठे मीराच्या स्वरूपात साकारतात. 'नातिचरामि' या कादंबरीत लग्न संबंध, स्त्री पुरुष शरीर संबंध, लग्नबाह्य संबंध अशा विषयांवर भरपूर चर्चा आहे. त्यांची नायिका अतिशय धीट, आत्मविश्वासू आणि वेगळ्या वाटेवरून जाणारी आहे. आपले आयुष्य स्वेच्छेने, स्वतंत्रपणे जगण्याची बाब आहे. स्वत:चे निर्णय स्वत: घेऊन त्या निर्णयाची जबाबदारी ही स्वत:च्या खांद्यावर घेण्याची तिची तयारी आहे. माणूस म्हणून स्त्रीची प्रतिमा निर्माण करताना मेघना पेठे लैंगिकतेचा शोध घेतात. माणूस म्हणून अर्थपूर्ण जीवन जगण्याचा ध्यास घेताना दिसतात. 'नातिचरामि' ही कादंबरी जीवनाचा पट स्त्रीवादी भूमिकेतून उलगडणारी, संबंधित जाण देणारी आहे. नात्यागोत्यातील सत्याचा शोध घेण्यासाठी अंतिम सीमेपर्यंत जाण्याचा प्रयत्न नातिचरामि या संघटनेतून नात्यागोत्यातील सत्याचा शोध घेण्यासाठी अंतिम सीमेपर्यंत जाण्याचा प्रयत्न 'नातिचरामि' यासंज्ञेतून दिसतो.

मेघना पेठे यांना समकालीन असणाऱ्या कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी २००५ मध्येच प्रकाशित झाली. या कादंबरीवर 'बाई माणूस' हा चित्रपट सुद्धा निघाला. त्यांची 'ब्र' आणि 'भिन्न' या दोन्ही कादंबऱ्यातून हाताळलेले विषय मराठी कादंबरी विश्वात नवीन आहेत. त्यांनी आपलं लेखन सामाजिक प्रबोधनासाठी आणि समाजात पीडित, शोषित, आदिवासी स्त्रियांकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी समाजात रुजण्याच्या हेतूनेच केलेले दिसते. आदिवासी बायकांच्या राजकारणातल्या करुण कहाण्या, स्वयंसेवी संघटना मधील ताणेबाणे आणि स्त्री-पुरुष संबंधातले राजकारण अशा तीन पातळ्यांवर 'ब्र'कादंबरीचा पट विणलेला दिसतो.

'ब्र' कादंबरीची नायिका प्रफुल्ला आदिवासी भागातील महिलांचे जग उघड्या डोळ्याने टिपते. संवेदनशील मनानं शोषित स्त्रियांच्या जगण्याचं अवलोकन करते. महिलांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांची नोंद घेते. तेव्हा तिला

जाणवते की स्त्री ही महानगर, शहर, खेडेगाव आदिवासी कोणत्याही भागातील असो:, तिला पुरुषी अहंकाराचे, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे दु:ख सहन करावं लागतं. हे दु:ख प्रफुल्लाच्यादेखील वाट्याला येतं. स्वयंसेवी संस्थांमधील राजकारणा सोबतच स्त्री-पुरुष संबंधातील राजकारणही प्रफुल्लाच्या लक्षात येते. त्यातील विकृती तिला जाणवते. आदिवासी स्त्रियांना राजकारणात मिळालेले आरक्षण व त्यांना पदावरून दूर करण्यासाठी पुरुषांकडून केलेल्या कृत्यावर ही कादंबरी प्रकाश टाकते. समाजाचं जीवन सफल करण्यासाठी ती जगण्याची आणि कर्तृत्वाची उदंड आकांक्षा पूर्ती करण्यासाठी धाडसाने 'ब्र' शब्द उच्चारते. समाजाच्या कोशात जीव गुदमरून मरण्यापेक्षा 'ब्र' उच्चारून मुक्तीचा मार्ग पत्करणे, समाजजीवनाला विधायक वळण लावणे ही जिद्द स्त्रीमध्ये उपजतच असते ही जाणीव 'ब्र'ने पुन्हा एकदा समाजाला करून दिली आहे. प्रफुल्लाला भूतकाळात रमायचं नसतं तर वर्तमान तिला खुणावतो, अस्वस्थ करतो. विमुक्तपणे नवीन जग स्वीकारण्याचं बळ ती मिळविते आणि स्वत:सोबत आदिवासी स्त्रियांच्याही दु:खावर फुकर घालण्याचा निर्धार करूनच नव्या जगाला सामोरी जाते.

कविता महाजन यांची 'भिन्न' ही २००७ मधील प्रकाशित कादंबरी. ही कादंबरी महिलांच्या लैंगिक आणि सामाजिक उपेक्षेचे प्रश्न हाताळणारी आहे. एकीकडे एड्सग्रस्त व्यक्तींचे होणारे हाल, त्याचा परिचय करून देतानाच हा आजार कोणत्या स्तरातील व्यक्तिला झाला आहे, यावर त्याची तीव्रता कशी अवलंबून आहे? याचे दाहक वास्तव ही कादंबरी चित्रित करते. प्रमुख तीन व्यक्तिरेखांना केंद्रस्थानी ठेवून समाजातील विविध स्तरातल्या एड्स ग्रस्तांच्या समस्या, स्वयंसेवी संस्थांमधील राजकारण आणि स्त्री-पुरुष संबंधातील राजकारण या तीन प्रमुख स्तरांचे दर्शन घडविते. 'भिन्न' मध्ये रचिता, प्रतीक्षा व लेनिना या तीन प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा मधून स्त्रियांच्या माणूसपणाचा शोध घेतलेला आहे. कविता महाजन यांनी 'ब्र' प्रमाणेच 'भिन्न' मधून स्वयंसेवी संस्था बद्दल चे विदारक सत्य मांडले आहे. एच आय व्ही आणि एड्स बद्दलचे अज्ञान कित्येक निरपराधांचे जीवन नष्ट करते हे कटू सत्य वाचतांना वाचक अंतर्मुख होतो. त्यातील आशय मांडणी व शैलीमुळे ही कादंबरी नावाप्रमाणे भिन्नच ठरते.

अरुणा सबाने यांची 'विमुक्ता' २००६ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी जीवनसंघर्षात खचलेल्या स्त्री मनांना निश्चितपणे आधार वाटावी अशी नायिका

प्रधान पहिली कादंबरी आहे. 'विमुक्ता' ही वसु नावाच्या कमालीच्या संवेदनशील असणाऱ्या स्त्रीची जीवन संघर्षाची कथा आहे. कादंबरी वाचत असताना वाचक अंतर्मुख होतो. कादंबरीत मांडलेला विषय काही नवीन नाही. प्रेमात पडल्यानंतर घरचा विरोध पत्करून प्रियकरासोबत लग्न करणे, नोकरीच्या निमित्ताने पती बाहेर गेल्यावर मित्राशी ओळख होणे आणि पतीचे म्हणजे शशांकचे वसुवर अकारण संशय घेणे असे अनेक प्रसंग समाजात आपल्या अवतीभवती घडत असतात. नवऱ्याच्या, सासूच्या अत्याचाराचे प्रमाणही वाढताना दिसते. अत्याचार करणारे, त्रास देणारे लोक आपलेच असतात आणि आपल्या लोकांनी दिलेल्या त्रासाचं दु:ख फार मोठं, भयानक असते हे वसूच्या भूमिकेतून दिसून येते.

वसुच्या संघर्षाची ही कहाणी अरुणा सबाने अत्यंत प्रत्ययकारी शब्दात साकार करतात. वसुला जीवनात आलेल्या अनुभवातून तिचे जीवनविषयक तत्त्वज्ञान बनलेले आहे. जे पाश ती स्वत: होऊन स्वीकारते ते अखेरीस तिला तोडावे लागतात. अरुणा सबाने यांच्या वाट्याला आलेल्या जीवनानुभवांमुळे सर्वसाधारण स्त्रीच्या जगण्याचा विचार ती वारंवार करते. अशा निराधार अवस्थेत तिला आनंदची मिळणारी साथ आश्वासक वाटते. ती आनंदची स्वच्छ, निर्मळ मैत्री जपत असताना या पवित्र मैत्रीच्या नात्याला मात्र समाज संघर्षाला सामोरे जावे लागते. एक सामाजिक कार्यकर्त्या आणि स्त्रीवादी जाणिवेने लेखन करणाऱ्या लेखिका म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला भारदस्तपणा, उठावदारपणा प्राप्त झाला आहे. समाजात स्त्रीला एक व्यक्ती म्हणून जगता आले पाहिजे या भूमिकेतूनच 'विमुक्ता'चे लेखन झाले आहे. वसुधाच्या निमित्ताने आधुनिक कुटुंबव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या वाट्याला येणारे दु:ख, छळ, अन्याय लेखिका मांडते. आधुनिक काळात पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्री जीवनाची कोंडी झाल्यावर वसुधा आपलं स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्यासाठी संघर्ष करते. हा सकारात्मक स्त्रीवाद आधुनिक काळातील स्त्रीवादी जाणिवांचे वास्तव रूप आहे असे म्हणता येते.

अरुणा सबाने यांची 'मुन्नी' (२०१०) ही वेश्यांच्या जीवनावर आधारित असणारी आजची वास्तववादी व समस्या प्रधान कादंबरी आहे. 'मुन्नी' मध्ये नागपुरातील गंगा जमुना नावाने ओळखल्या जाणाऱ्या वेश्यावस्तीतील स्त्रिया, मुन्नी सायनासारख्या निष्पाप मुलींना मनाविरुद्ध लाभलेल्या नकोशा जीवनातून मुक्त करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची लेखिकेची धडपड

आहे. गंगाजमुनातून मुन्नीची सुटका करून, शिक्षण देऊन तिला कलेक्टर होईपर्यंतचा प्रवास सिद्ध करणाऱ्या निष्पाप स्त्रीत्वाचा आविष्कार आहे. मुन्नी मध्ये स्त्रियांवरील अन्याय, समाजात बोकाळलेल्या वाईट प्रवृत्ती, स्त्री-पुरुष संबंधातील विविध स्तर, त्यातून स्त्री जीवनाच्या वाट्याला येणारे श्रेय, गंगा-जमुना तील भयानक जीवन जगणाऱ्या स्त्रिया, त्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे प्रश्न, एकूणच त्या बदनाम वस्तीतील जीवन लेखिका मांडते.

मुन्नी आणि सायना ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या तरी वैदेही हीच नायिका आहे. वैदेहीच्या निमित्ताने लेखिकेने लैंगिक शोषण करणाऱ्या पुरुषाविरुद्ध आवाज उठवलेला आहे. स्त्रियांच्या जीवनात अंधार पसरविणाऱ्या पुरुषाविरुद्ध दाहक स्वरूपात स्त्रीवाद मांडला आहे. स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रीला व्यक्ती म्हणून जगण्याचा हक्क या मूल्यांसाठी त्यांचा आग्रह आहे. समाजात सन्मानान जगण्यासाठी जे स्वातंत्र्य आणि अधिकार समाजाला दिलेले आहे ते पुरुषांच्या बरोबरीने, समानतेने मिळाले पाहिजे यासाठी त्यांचा स्त्रीवाद आहे. सबाने यांच्या स्त्रीत्वाचा, स्त्रीवादाचा संपन्न आविष्कार म्हणून त्यांच्या 'विमुक्ता' आणि 'मुन्नी' कडे पाहता येते.

मेघना पेठे, कविता महाजन आणि अरुणा सबाने या समकालीन, स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानतावादी स्त्रियांनी आजच्या काळातील स्त्रियांच्या वाट्याला येणारा भोगवटाच अधोरेखित केला आहे. एकूणच स्त्री कालही शोषित होती, आजही आहे हीच आंतरिक वेदना आहे. आजची मराठी स्त्रीवादी कादंबरी समृद्ध करण्यात या तीनही स्त्री कादंबरीकारांचा फार मोठा वाटा आहे. ह्या कादंबरीकार स्वतःच्या जीवनानुभवावरून, पूर्वानुभवावरून काळाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात. आज स्त्रीवादी कादंबरी विकासाकडे वाटचाल करीत आहे आणि ही स्त्रीवादी मराठी कादंबरी पुढे जाऊन परिणामकारकरित्या नक्कीच नवी परंपरा निर्माण करेल अशी आशा आहे.

लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वणी, जि. यवतमाळ - ४४५३०४

* * * * *

# दोन हजारनंतरचे स्त्रियांचे नाट्यलेखन

**- डॉ. गोविंद काजरेकर**

मराठी साहित्यात स्त्री नाटककारांची संख्या अल्प असलेली दिसते. याची प्रमुख कारणे आपल्या सांस्कृतिक व्यवस्थेत असलेली दिसतात. जितक्या प्रमाणात लेखकांनी नाटक हा लेखनप्रकार हाताळला तितक्या प्रमाणात लेखिकानी हाताळलेला दिसत नाही. नाटक हा प्रयोगलक्ष्यी लेखनप्रकार असल्यामुळे आणि नाट्यलेखानानंतर प्रयोगरूपांतरापर्यन्त जे प्रत्यक्षदर्शी कार्य करावे लागते त्यात स्त्रीला मिळणारा अल्प अवकाश यामुळे बहुतांश लेखिका नाट्यलेखानपासून दूर राहाणे पसंत करताना दिसतात. मराठी रंगभूमीच्या इतिहासाकडे पाहता नाटक आणि रंगभूमीकडे पाहण्याची समाजाची अनुदार दृष्टी, स्त्रीच्या भूमिका पुरुषनटानी वठवणे, नाट्यदिग्दर्शन करण्यासाठी विशेषत: रात्रीच्या वेळेत करावे लागणारे काम, नाटकासाठीचे परमुलखातील दौरे यामुळे नाटक या लेखनप्रकारावर पुरुषी वर्चस्वच अधिक असलेले दिसते. तरी आधुनिक काळात खुल्या सामाजिक दृष्टीमुळे आणि स्त्रियांचा रंगभूमीवरील वावर वाढल्यामुळे अनेक लेखिकांनी नाट्यलेखन केले आहे.

दोन हजारनंतर नाट्यलेखन करणार्यात लेखिकांमध्ये मनस्विनी लता रविंद्र यांची 'सिगारेट्स' आणि 'अलविदा' (२००७), सुनंदा साठे यांची 'आयाराम गयाराम', 'रमा करते राम राम', 'भटाला दिली ओसरी', 'स्त्री मुक्ती ऐशी की तैशी', 'सारचं ओम फस्स' (२०००), 'मातीला सुगंध फुलाचा', 'मला जगायचे आहे' (२००५), प्रज्ञा दया पवार यांचे 'धादांत', 'खैरलांजी' (२००७), देशपांडे सुषमा यांचे 'बया दार उघड' (२०१२), उषा परब यांचे 'फुलपाखरू एक कीटक आहे' (२०१३), देशपांडे मीना यांचे 'नलू सांगा कुणाची' (२०००), मेधा तेलंग यांचे 'मनोमयी' (२०००) सुनीता कवळे यांचे 'सुरूंग' (२००५), विद्या जोशी यांचे 'सार काही बाळासाठी' (२०१०) जयश्री घारपुरे यांचे 'माई' (२०००), सुनंदा गोरे यांचे 'नवी प्रतिज्ञा' (२०१९) या प्रकाशित नाटकांबरोबर शिल्पा कांबळे यांच्या 'बिर्याणी' या नाटकासह अनेक जुन्या नव्या लेखिकांची दोन हजारनंतर लिहिलेली नाटके अप्रकाशित असलेली दिसतात.

स्त्रियांची बहुतांश नाटके कुटुंब या चौकटीच्या संदर्भाने रचलेली दिसतात. नात्यातील ताणतणाव, त्यातून उद्‌भवणारे संघर्ष, स्त्रीच्या पारंपरिक भूमिकेचा सन्मान, मुलांचे बदलते मानसविश्व या नाटकांच्या आशयविश्वाचा भाग झालेले दिसते. मात्र काहीलेखिकांनी स्त्रीचे मुक्त स्वातंत्र्य, नवी जीवनशैली, पारंपरिक कुटुंबव्यवस्थेला दिलेला नकार या आशयसूत्राभोवती नाट्यरचना केलेली दिसते. जागतिकीकरणोत्तर समाजातील बदलेले मूल्यभान या लेखिकांनी व्यक्त केलेले दिसते. स्त्रियांच्या नाटकातील आशयसूत्रांविषयी शीतल पावसकर यांचे एक निरीक्षण नोंदवता येईल त्या म्हणतात. 'ही नाटके जागतिकीकरणानंतरचे बदलते आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण उभे करतात. संवाद कमी होत चाललेल्या, विस्कटत, विखंडीत होत चाललेल्या कुटुंबव्यवस्थेच्या अवकाशात वाढलेल्या तरुण-तरुणींच्या कुटुंबव्यवस्थेच्या संदर्भातील संकल्पना, कुटुंबांतर्गत आणि कुटुंबबाह्य नातेसंबंधातील बांधिलकीची मते, वैयक्तिक आणि व्यावसायिक पातळीवरील श्रेयस प्रेयसाच्या संदर्भातील संभ्रमावस्था, व्यक्तिस्वातंत्र्यातून आणि व्यक्तिवादातून उपलब्ध झालेला अधिकाचा वैयक्तिक अवकाश, भिन्नलिंगी व्यक्तीच्या सहवासाच्या उपलब्ध संधीमध्ये झालेली वाढ, आकर्षण मैत्री, प्रेम यातील सीमारेषेबाबतचे भांबावलेपण, विवाह संस्थेअंतर्गत असणारे सहजीवन, विवाहापूर्वीचे सहजीवन, लग्न संस्थेच्या पारंपरिक आशयाला नकार देण्याच्या प्रेरणेतून विवाहाशिवायच्या सहजीवनाचा केलेला स्वीकार, विवाहपूर्व लैंगिक संबंधांचा उघडपणे आणि सहजपणे केलेला स्वीकार, या स्वीकारातून निर्माण झालेले गुंते, आभासी विश्वाचे आकर्षण...'[१] अशी अनेक सूत्रे या नाटकातून दिसतात. मानवी नातेसंबंधामध्ये होत असलेले अनेक बदल नव्या नाटकातून या लेखिका आविष्कृत करताना दिसतात.

मनस्विनी लता रवींद्र यांनी सिगारेट्स आणि अलविदा ही दोन नाटके लिहिली. या शिवाय त्यांची तीन नाटके अप्रकाशित आहेत. शहरी शिक्षित तरुणांच्या काहीशा स्व- तंत्र जगण्यावर त्यांची नाटके प्रकाश टाकतात. गौतम, नेहा, नंदिनी आशीष या चार तरुण पात्रातील संवादातून सिगारेट्स या नाटकाची उभारणी झाली आहे. नव्या काळातील नवे जगणे वाट्याला आलेल्या पिढीचे हे प्रतिनिधी आहेत. एकमेकांच्या प्रेमाला, मैत्रीला आसुसलेले आहेत. दोन शतकांच्या सांध्यावरचे संस्कार असल्यामुळे काहीसे मानसिक द्वंद्वाचे बळीही आहेत. सर्वांना शारीरिक भूक आहे. यातील नेहा कधी गौतमशी तर कधी आशीषशी जवळीक

साधते. आशीष हा तरुण नाटकाच्या शेवटी नेहाला फटकारतो आणि आधीच्या पिढीतील आईबाबा, काका यांच्या संस्कारातून पूर्णत: बाहेर न आल्यामुळे तुझ्यासारख्या व्यभिचारी मुलीशी आपल्याला विवाह करता येणार नाही असे ठणकावून सांगतो. नेहाच्या सिगारेट ओढण्याच्या कृतीतून नाटकाचा शेवट होतो. मुक्त स्वातंत्र्य हवे आणि सोईच्या परंपरा हव्यात अशा गोंधळात आशीषसारखे तरुण अडकलेले दिसतात. नाटकाला सुरुवात आणि शेवट असा नाही आणि सुराचीत कथानकही नाही. तरुण मुलींनी सिगरेट ओढणे ही नवलाची गोष्ट नसली तरी सिगरेट ओढण्याच्या कृतीचा नाट्यांशाला समुचित वापर केला आहे. मनावरचे ताण हलके करण्यासाठी, आनंदासाठी, बेफिकिरी व्यक्त करण्यासाठी तसेच आधुनिक जीवनशैलीच्या प्रकटीकरणासाठी त्याचा वापर केला आहे. यासंदर्भात पुढील संवाद पाहा -

**गौतम** : नको पिऊस सिगारेट.

**नेहा** : (मोठ्याने) हा ऽऽ तू सिगरेट पितेस?
(नंदिनी जरा घाबरते, जरा बावचळते)

**नंदिनी** : नाही, गंमत म्हणून.

**नेहा** : अगं, मला पण खूप आवडते सिगरेट. ओढून दाखवू? (उत्साहात गौतमच्या हातून सिगरेट घेते, भराभर ओढते.)

**गौतम** : तू तर एक्स्पर्ट दिसतेस.

**नेहा** : प्लीज, आशीषला नको सांगूस. तो रागावतो.

**नंदिनी** : सांग रे, आय ॲम जेलस. ती माझ्याहून छान ओढते सिगरेट.

**नेहा** : ए, तुला सिगरेट पिणाऱ्या मुली आवडतात?

**गौतम** : नाऽऽही.

अर्थात नाव तरुणामध्ये असलेली चंगळवादी मनोवृत्ती या कृतीतून व्यक्त होताना दिसते. नव्या पिढीची मानसिकता, जीवनव्यवहार सिगारेटच्या माध्यमातून व्यक्त होतात. सिगरेट ही सर्वांना बांधून ठेवणारी आणि मोकळं करणारी बाब होते. जगण्याला निश्चित अशी कोणतीही दिशा नाही. त्यामुळे मनाला आलेली द्वंद्वशीलता नाटकात मार्मिकपणे प्रत्ययाला येते. नव्या पिढीचे मुक्त लैंगिक संबंध, मैत्री आणि प्रेम यांच्यातील धूसर झालेल्या सीमारेषा आणि सहज उपलब्ध असलेल्याचा कोणत्याही गोष्टीचा असजगतेने घेण्यात येणारा उपभोग हे नव्या पिढीच्या वर्तनाचे बंध नाटकात प्रत्ययाला येतात.

अलविदा या नाटकात मनस्विनीने एक कुटुंबकथा मांडली आहे. मात्र त्या कथेतील माणसावर काळाचा ठसा उमटलेला आहे. ध्येयवादी चळवळीत वावरणारी नीला आणि प्रकाश हे दोघे प्रेमविवाह करतात, एका मुलीला जन्म देतात. मात्र त्याच ध्येयवादामुळे त्यांचे जीवन दुभंगले जाते. प्रकाश ग्रामीण भागात समाजकार्य करण्याच्या उद्देशाने घर सोडून निघून जातो. आणि नीला वर्तमानपत्रात नोकरी करते. मुलगी आईकडे राहण्याचा निर्णय घेते. नवरा निघून गेल्यामुळे नोकरी करून मुलीची जबाबदारी आईला पार पाडावी लागते. तिला सतत जाणवणारे एकटेपण, मुलीला वाढवण्यात आपण अपुरे पडत असल्याची खंत अशा मनसिकतेने ती ग्रासली आहे. मुलीच्या वर्तनावर सतत लक्ष ठेवल्यामुळे मुलगी सईची चिडचिड होत राहते. सई आणि आई नीला यांच्यात संघर्ष होत राहतो. सई आणि त्याच्या मैत्रिणी पूजा, तनिशा मित्र निशांत यांच्या संवादातून भावनिक एकटेपणा, जगण्यातील असुरक्षिताता असे नव्या पिढीचे मानस व्यक्त होते. निशांत या तरुणाच्या माध्यमातून लेखिकेने जागतिक घडामोडी व्यक्त केल्या आहेत. विशेषतः पुढील पन्नास वर्षात विविध प्रोजेक्टमुळे पर्यावरणाचा ऱ्हालस होऊन इंधनाचा तुटवडा जाणवेल अशाजागतिक संकटांचे सुचन लेखिका करते. मराठी नाट्यविश्वासाठी हे नवे संभाषित आहे असे म्हणता येईल.

लिंगसत्ता, जातसत्ता, राजसत्ता आणि अर्थसत्ता यांच्यातील अमानुषतेचे, विकृतीचे दर्शन प्रज्ञा दया पवार यांनी धादांत खैरलांजी या नाटकातून घडवले आहे. प्रज्ञा दया पवार यांनी भंडारा जिल्ह्यातील जातीय द्वेशातून दलित स्त्रियावर झालेला अत्याचार, बलात्कार आणि समाजातील विकृत मानसिकतेच्या समूहाकडून संपूर्ण कुटुंबाची झालेली हत्या या विषयाला केंद्रावरती ठेवून घटना प्रसंग उभे केले आहेत. ग्रामीण, दलित स्त्रीच्या वाट्याला आलेले अन्यायग्रस्त जगणे, हताशपण, पुरुषसत्तेकडून शोषले जाणे असे अनेक आयाम जे मूळ वास्तव घटनेलाही आहेत ते नाट्यरचनेही दिसतात. आधुनिक काळात राजकारणाच्या आडून केली जाणारी हिंसा आणि त्यावर रंजक कलाकृती निर्माण करण्याचे प्रयत्न याविषयीचा उपहास नाटकात लेखिका करते. सामाजिक घटनेवरील तीव्र आणि जळजळीत प्रतिक्रिया असे नाटकाचे स्वरूप असले तरी सुराज्य आणि सामाजिक समतेचा उदोउदो केला जाण्याच्या काळात विकृत लिंगभावाचे राजकारण करून स्त्रीला लांछित केली जाणारी कृती काळ आणि समाजाची नेमकी प्रतिमा उभी करणारी आहे.

'नवी प्रतिज्ञा' या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या सुनंदा गोरे यांच्या बालनाटकात दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष आणि पाण्याचे साठे स्वच्छ व निर्मळ ठेवण्यासाठीची आवश्यकता अशा सामाजिक प्रश्नावर मार्मिक भाष्य केले आहे. लोकहितार्थ स्वर्गातून पृथ्वीवर गंगा आणणाऱ्या भगीरथाच्या पौराणिक मिथकाचा वापर आधुनिक जीवनार्थाच्या संदर्भात करून बालनाट्याची आशयसमृद्धता साधली आहे. मीना नाईक यांचे 'वाटेवरती काचा गं' हे नाटक बाहुल्याच्या माध्यमातून स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्याम पुरुषी छळाचे दर्शन घडवते. तर उषा परब यांनी 'फुलपाखरू एक कीटक आहे' या नाटकात मुलांच्या जीवनात, शिक्षणात येणारी यांत्रिकता मांडली आहे. शिवाय अन्य नाटकातून कोकणातील सांस्कृतिक जीवनातील विसंगती विनोदी अंगाने रेखाटली आहे. सुनंदा साठे यांनी मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेतील बदलते नातेसंबंध, त्यांचा मुलांच्या मानसविश्वावर होणारा परिणाम आणि कौटुंबिक संघर्ष चित्रित केला आहे.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की, जागतिकीकरणोत्तर कालवास्तवाचा वेध स्त्री नाटककारांनी घेतला आहे. विशेषत: मनस्विनी लता रवींद्र यांनी आपल्या नाटकातून स्त्री-पुरुष नात्याचे नवे आयाम अत्यंत धीटपणे मांडले. तरी ही नाटके लैंगिकतेचे उघडेवाघडे दर्शन घडवीत नाहीत. अत्यंत सूचकतेने माणसांच्या वर्तनबदलाचा पट त्यांनी नाटकातून उभा केला आहे. मनस्विनीच्या नाटकातील पात्रे साधीच आहेत. ही पात्रे विचारवंत नाहीत तरी अनेक पात्रे आत्मचिंतन करतात, जिवनचिंतन मांडतात. आधीच्या पिढीच्या जीवनाचे अर्थनिर्णयन करू पाहतात. त्या कसोटीवर आपल्या जीवनाची यथार्थता तपासून पाहातात. कोणत्याही सामाजिक बंधनांचे विधिनिषेध न धरता जीवनाचे श्रेयस शोधतात. म्हणूनच ही पात्रे काळ्या पांढऱ्या रंगात चित्रित न होता स्वाभाविकपणे आपले माणूसपण घेऊन येतात. हे या नाटकांचे यश म्हणावे लागेल.

**संदर्भ :**

१) शीतल पावस्कर-भोसले, नव्वदोत्तरी मराठी नाटक : स्त्री नाटककार आणि स्त्री रंगकर्मी, मुक्त शब्द, मार्च २०२०, पृ. १५.

तळवडे, सावंतवाडी

मो. ९२८४४०२९९७

* * * * *

# एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे निवडक 'ललित लेखन'

**- डॉ. पद्मरेखा धनकर**

'ललित लेखन' हा साहित्यप्रकार रसिकाप्रिय आहे. वाचकांना गुंगवून त्यांच्या मनावर आधिराज्य गाजविण्याचे कसब 'ललित लेखना' च्या स्थानी आहे 'स्व'गत आणि चिंतन यांच्या मिश्रणातून 'ललितबंध' निर्माण होत असते. अनुभव-आठवणी-प्रवास- स्वगतव्यक्तिचित्रण-पत्रसंवाद अशी कितीतरी रूपे ललित लेखनात आढळून येतात. 'ललित साहित्याची' व्याख्या करणे सोपे, मात्र ललित गद्य लेखनाची व्याख्या सहज सुलभ नाही. कोणत्याही एका साहित्यप्रकारामध्ये बंदिस्त करण्याजोगे नाही. असे ललित लेखनासंदर्भात म्हणता येऊ शकते. मुक्त-स्वैर असे लेखन जे स्वानुभवाशी आणि स्वानुभूतीशी काव्यात्मक-कलात्मक-कल्पकतेच्या पातळीवरून 'स्व' अंतर्भूत किंवा केंद्रस्थानी ठेऊन केलेले लेखन म्हणजे ललित लेखन होय.

प्राचीन मराठी साहित्याकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास मराठी साहित्य परंपरा काव्यरूपात दिसून येते. अपवाद महानुभावी साहित्याचा महानुभावी साहित्यामध्ये लिळाचरित्र, श्रीगोविंदप्रभू चरित्र, श्रीकृष्ण दर्शन, दृष्टांतपाठ या मधून ललित गद्य दिसून येते काय? याचे उत्तर काही प्रमाणात 'होय' असे आहे. आजचे प्रगत ललित गद्य जसे दिसून येते तसे या महानुभावी साहित्याचे रूप नाही. मात्र त्यामध्ये प्राथमिक पातळीवरचे ललित गद्याचे रूप आपल्या नजरेत भरते. आत्मानुभव, उत्कट भावनाविष्कार, गोष्टीवेल्हाळता आणि चिंतनशीलता यांचे अनुपम मिश्रण गोविंदप्रभू चरित्र व इतर ग्रंथात दिसून येते. याअर्थाने प्राचीन मराठी साहित्याच्या इतिहासात ललित गद्याचे प्राथमिक रूप दृग्गोचर झाले आहे.

मुळात 'ललित गद्य' हा प्रकार इंग्रजी साहित्यातून अवतीर्ण झाला असे मानले जाते. फेंच लेखक मॉतेनच्या ऐसेजवरून ललित गद्य निर्माण झाले असे मानले जाते. पुढे इंग्रजीमधील चा लॅब, बेकिंसी या एकोणीसाव्या शतकातील निबंधकारांनी व पुढे ए. जी. गार्डनर, इ. व्ही. ल्युकस यांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात 'ललित निबंध' लिहिले. या ललित निबंधाचा मराठी साहित्यावर प्रभाव असल्याचे दिसते. एकोणिसशे तीसच्या दरम्यान ना. सी.

फडके यांनी जे ललित निबंध लिहिले ते स्वानुभवावर आधारित होते. त्यांनी

त्या निबंधांना 'गुजगोष्टी' (१९३३) हे नाव दिले. काही काळ ना. सी. फडक्यांच्या या 'गुजगोष्टी' मराठी साहित्य वर्तुळात खूप गाजल्या त्याच मुमारास वि. स. खांडेकर, अनंत काणेकर यांनी सुद्धा 'ललित निबंध' लिहिले. ललित साहित्याला प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्यात विंदा करंदिकर, दुर्गा भागवत, माधव आचवल, इरावतीबाई कर्वे, श्रीनिवास कुळकर्णी आणि कुसुमावतीबाई देशपांडे ही नावे अग्रस्थानी आहेत. यांचे ललित निबंध लेखन जुन्या किंवा पारंपरिक साच्यात अडकणारे नाही. प्रखर चिंतनशीलता, स्वानुभव, संवेदनशीलता, कल्पकता आणि विषयांचे वैविध्य यातून हे ललित निबंध आपल्या नजरेत भरतात. दुर्गाबाई भागवतांचे महाभारतावरील 'व्यासपर्व' यामधून त्यानी ज्या व्यक्तिरेखा मांडलेल्या आहेत. त्या दुर्गाबाईच्या चिंतनशीलता आणि भावनाप्रधानात याचा उत्कट आविष्कार आहे. इरावतीबाईच्या 'युगांत' मधून त्यांच्या उत्तुंग बुद्धिवैभवाचा व कल्पकतेचा आविष्कार दिसतो. एखादा कुंभार जेव्हा कच्ची माती घेऊन चाकावरती ठेवतो आणि आपल्या मनातील आकृतीला हाताने आकार देतो तशाच प्रकारे दुर्गाताईंनी महाभारतातल्या व्यक्तिरेखांना आपल्या मनातील भावनेचा आकार दिला आहे. इरावतीबाई कर्वे यांनी महाभारतातील व्यक्तिरेखांचा ऐतिहासिकतेच्या दृष्टिकोनातून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीनिवास कुलकर्णी यांचे ललित लेखन मानवी मनाच्या गुढतेचा शोध घेण्यासाठी उपयोग पडते. माधव आचवलांनी आस्वाध पद्धतीने आणि खेळकरपणे मानवी जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. विंदा करंदीकरांनी मानवी जीवनातील तत्वे विडंबनाच्या आणि वात्रटिकेच्या पातळीवरून ललित गद्याचा आविष्कार केला आणि कुसुमावतीबाई देशपांडे यांनी स्त्रीमनाच्या विविध भावभावनांचा आलेख दिवसाच्या प्रहरांच्या छटांच्या रूपाने चित्रित केला. या सगळ्यांचे मूळ स्वानुभव आणि स्वानुभूती हे आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात परिवर्तनाचे आणि आधुनिकतेचे युग अवतरले. गावगाड्यामध्ये शाळा उघडल्या गेल्या. ग्रामीण आणि शहरी भागातील मुले आणि मुली शिकावयास लागले. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील प्रबोधनाचा वारसा याकाळात जोमाने कार्य करावयास लागला स्त्री आणि पुरुषांमध्ये शिक्षणाने नवा आत्मविश्वास जागा झाला. साठ ते ऐंशीच्या कालखंडात स्त्रियांच्या शिक्षणाला गती मिळाली आणि सत्तर ऐंशीच्या दशकात दुर्गाबाई भागवत, इरावतीबाई कर्वे, कुसुमावतीबाई देशपांडे या विदुषींनी

पारंपरिक लेखनाची चौकट मोडून एकूनच मराठी साहित्याला नवी दिशा दिली. यामुळे पुढील कालखंडातील स्त्रीलेखकांना लिखाणाचे बळ मिळाले.

एकविसाव्या शतकातील स्त्रियांच्या ललित लेखनाकडे दृष्टिक्षेप टाकला असता या शतकाची स्पंदने टिपण्याचा लेखकांनी कसोशीने प्रयत्न केला आहे. मध्यमवर्गीय स्त्रीजाणिवेतून सुरुवातीच्या काळात ललित गद्य लेखन केले गेले. या शतकात समाजातील सर्व स्तरातल्या स्त्री लेखकांनी ललित गद्य लिहून या प्रवाहाला समृद्ध केले. एकविसाव्या शतकाने संपूर्ण जगाला एक वेगळ्या बंधात बांधून टाकले. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या धोरणांनी मानवी जग प्रभावीत झाले. लोकशाहीधिष्टित समाजवाद बाजूला पडून भांडवलशाही प्रवर्तक अर्थसत्ताकेंद्रे निर्माण झालीत. स्त्री-पुरुषांना केवळ ग्राहक समजले गेले. अर्थ, सत्ता, धर्म, संस्कृती यांच्या मिश्रणातून जे सामाजिक, आर्थिक परिवर्तन घडून आले, त्यामुळे माणूस हा केंद्रस्थानापासून ढळला. त्याचे अवमूल्यन झाले. स्त्रीसुद्धा याला अपवाद ठरली नाही.

एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अरुणा ढेरे, अश्विनी धोंगडे, रेखा बैजल, मंगला गोडबोले, सुलभा हेर्लेकर यांनी ललित लेखनाला नवी दृष्टी दिली. अरुणा ढेरे यांच्या 'अर्ध्या वाटेवर', 'कृष्णकिनारा', 'आठवणीतील' 'अंगन' 'कवितेच्या वाटेवर यातून ललित लेखन समृद्ध झाले. 'प्रवास करणं, वाचणं, माणसांना भेटणं हे स्वैर लेखन वेळोवेळी माझ्याकडून झालं आहे या ललित लेखनाला विशिष्ट असा रंग नाही सूत्र नाही. थोडं आभाळातल्या सांध्यमेधांसारखं त्यांच रूप आहे, असं म्हणता येईल', अशी भूमिका अरुणा ढेरे यांनी 'अर्ध्या वाटेवर' च्या मनोगतात व्यक्त केली आहे. अरुणा ढेरे यांच्या लेखनाचा मुख्य विषय 'बायका' हाच आहे. लहानपणी रस्त्यावरच्या वळणावर असलेल्या देवळात ज्या बायका जायच्या तसेच वडाला फेऱ्या घालणाऱ्या बायका पाहिल्या की त्यांची अस्वस्थता वाढीस लागायची, हताश, दुःखी अशा या बायका पाहिल्या म्हणजे त्यांना त्यांची कविता सुचत असे. अरुणाताई यांचा 'कृष्णकिनारा' हा महाभारतातील स्त्री व्यक्तिचित्रणाचा उत्कृष्ट नमूना आहे. राधा, कुंती आणि द्रौपदी त्यांना कशा खुणावत होत्या त्यांच्याशी कशा संवाद साधत होत्या याचे अप्रतिम चित्रण 'कृष्णकिनारा' मधून आले आहे. इरावतीबाई कर्वे यांचे 'युगांत' आणि दुर्गा भागवतांच्या 'न्यासपर्व' पुढील हे महत्त्वाचे लेखन आहे.

अश्विनी धोंगडे यांनी 'जगणे व्हावे सुंदर म्हणूनी' व 'बायकां विषयी काही' या ललित लेखनातून स्त्रीसंदर्भातील आपले विचार व्यक्त केले आहे. अश्विनी धोंगडे यांचा 'बाई' हा चिंतनाचा आणि जगण्याचाही विषय आहे. स्त्रीच्या सामाजिक दर्जाविषयी अश्विनी धोंगडे फार आग्रही आहेत हे त्यांच्या काव्यलेखनातूनही स्पष्ट होते. 'स्त्रीसूक्त' 'अपौरूषेय' आणि 'बाई डॉट कॉम' ही त्यांच्या कवितासंग्रहाची शीर्षके पाहिलीत तरी आपल्या लक्षात येते. स्त्रीला कुटुंबामध्ये कोंबून तिला सालंकृत करून तिच्या सौंदर्याचे पोवाडे गाणे त्यांना आवडत नाही. स्त्रीसौंदर्याची परिभाषा आपण बदलवली पाहिजे या मताचा पुरस्कार त्यांच्या ललित लेखनाचा केंद्रबिंदु आहे.

एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित ललित लेखनाची खरीखुरी स्पंदने नीरजा, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार, संध्या रंगारी, संजिवनी तडेगांवकर, अश्लेशा महाजन, निलिमा गुंडी आणि सिसिलिया काहीलो यांच्या ललित लेखनाने टिपली गेली. विशेष म्हणजे मलिका अमर शेख यांनी कवितेबरोबरच कथालेखन केले आहे. 'झाडपणाची गोष्ट' 'कोहम', 'एक होता उंदीर' या कथासंग्रहातून त्यांनी जी मांडणी केली ती ललित लेखनाच्या जवळ जाणारी आहे. त्यांच्याकडून उत्कृष्ट ललित लेखन घडण्याची संभावना व्यक्त कराविशी वाटते.

नीरजा यांनी 'चिंतनशलाका' व 'बदलत्या चौकटी' या दोन ललित लेखनातून आजच्या बदलत जाणाऱ्या जगाचा तीव्रतम पातळीवर वेध घेतला आहे. शिक्षणाचा स्त्रियांपेक्षा फायदा पुरुषांनाच जास्त झाला. आजही शिक्षित स्त्री आणि नौकरदार स्त्री पाहिली म्हणजे तिच्या वाट्याला दुहेरी भूमिका आलेली आहे. संसाररथाचा गाडा आणि नोकरीचे ठिकाण या दोन्ही ठिकाणी तिला समतोल साधावा लागतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्या स्त्रीने आपला निर्णय कुटुंबासमोर ठेवला तरी तो मान्य होईलच असे नाही. त्याबरोबरच तिने कमावलेला पैसा खर्च करण्याची परवानगी सुद्धा तिला घ्यावी लागते. एकीकडे एकविसाव्या शतकात मोबाइल हातामध्ये असलेली स्त्री अजूनही कुटुंबाच्या बंधनात अडकलेली दिसून येते. या स्त्रियांच्या स्थितीचे दर्शन 'बदलत्या चौकटी' मधून प्रभावीपणे त्यांनी मांडले आहे.

'चिंतन शलाका' मधून त्यांनी 'लोकसत्ता'साठी वर्षभर जे स्तंभलेखन केले त्या निवडक लेखांचे संकलन आहे. यामधून साहित्य, साहित्य संमेलने,

सांस्कृतिक प्रवास, पुरुष-स्त्रीच्या आरशातून मृत्यूचे सावट, प्रेमाचा दिवस अशा अनेक विषयांवर आपली मते मांडली आहे. साहित्य संमेलनाच्या निमित्याने त्याचे मिळणारे अध्यक्षपद स्त्रियांच्या वाट्याला कां कमी आले? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. संमेलनांमधून विद्रोह नको तर समन्वय हवा हाही विचार त्यांनी व्यक्त केला आहे. साधारणत: पुरुष हा स्त्रीकडे माता, भगिनी, पत्नी, मुलगी, देवी या रूपात पाहतो या अर्थानेच त्यांचे स्त्रीविषयी प्रेम व्यक्त होते स्त्रियांनी कोणते कपडे घालावेत हे पुरुष ठरवितो. पुरुषांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन पारंपरिक आणि सत्ता गाजविण्याचा असतो. मात्र एखाद्या स्त्रीला तिचा एखादा पुरुष मित्र असणे तिच्या पतीला मान्य नसते. स्वत: स्त्रियांबरोबर आणि स्त्रियांबद्दल पुरोगामी स्वीकारणारेही आपल्या घरच्या स्त्रियांनी पुरुष मित्रांसोबत बोलणेही त्यांना खटकत असते हा पुरुषांचा दांभिक किंवा दुटप्पी चेहरा 'चिंतन शलाकामधून' त्यांनी मांडलेला आहे.

कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल' म्हणजे त्यांच्या लेखनप्रवासातील वैचारिक आणि भावनिक कोलाहलांच्या आणि कल्लोळाच्या डायरीवजा नोंदी ! कविता, कादंबरी, लेख, संशोधनपर निबंध अशा लेखनाबरोबरच त्यांनी ललित लेखन केले आहे. 'ग्राफिटी वॉल' म्हणजे आपल्या मनाला जे वाटते तसे मोकळेपणाने लिहिण्याची जागा ! लेखकाला काय लिहावे आणि काय लिहू नये अशा अंर्तद्वंद्वात सापडण्याची शक्यता दाट असते. मात्र कविता महाजन यांचे व्यक्तित्व आणि वाङ्:मयीन कर्तृत्व पारदर्शी आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुभवांना 'ग्राफिटी वॉल' मधून व्यक्त केले आहे. लेखक जी भूमिका जगतो ते त्याच्या लेखनातून अवतरले पाहिजे. 'लेखक नावाच भूत' या ललित लेखात त्यांनी आपल्या लेखनापाठची भूमिका महाभारतातल्या धर्मराजाच्या प्रवासात जी भूतं भेटतात त्या कथेच्या अनुषंगाने मांडले आहे.

कोणत्याही लेखकाच्या काही खाजगी आणि व्यक्तिगत जागा असतात. जवळचा मित्र किंवा मैत्रिणींनाही सांगण्याच्या पलीकडच्या असतात त्या आपल्या डायरीवजा नोंदीतून किंवा 'ग्राफिटी वॉल' मधून प्रगट करता येतात. ते कविता महाजनांनी प्रखरतेने प्रगट केले आहे.

लेखनाला काही विषय आपल्या लेखनातून वर्ण्य करावेसे वाटतात. ज्या विषयांमुळे लेखकाचे लेखकपण गोत्यात येईल अशी भिती लेखकाला वाटत असते, उदा 'पुरुष वेश्या आणि गिऱ्हाईक बायका' असा विषय एखाद्या

लेखकाला लेख लिहिण्यासाठी प्रेरित करेलच असे नाही. मात्र कविता महाजनांचा पिंड हा समकालीन ज्वलंत विषयाला थेट भिडण्याचा असल्यामुळे अशा विषयांवरही त्या सहजतेने लिहितात.

प्रज्ञा दया पवार यांचा 'टेहलटिकोरी' या शीर्षकाने प्रकाशित झालेला ललित गद्यसंग्रह शीर्षकनामानेच आकर्षित करून घेतो. 'टेहलटिकोरी' म्हणजे मुक्त भ्रमंती. पण ही भ्रमंती एका स्थळापासून दुसऱ्या स्थळापर्यंतची नव्हे तर आपल्या मनाला स्वैर विहारासाठी सोडले म्हणजे ते कुठून कुठपर्यंत धाव घेईल याचा थांगपताही लागत नाही. 'स्व' हा जात, धर्म, पंथ, स्वदेश, प्रदेश, भाषा, लिंग यांच्या पल्याड जाऊन माणूसपणाचा शोध घेतो. 'टेहलटिकोरी' हे प्रज्ञा दया पवार यांच्या व्यक्तिगत जगण्याचा आलेख आहे. अंजली कुळकर्णी यांच्या 'बदलत गेलेली सही' मधील प्रगल्भ कविता पाहून आणि 'बदलत गेलेली सही' या शीर्षकाकडे पाहून त्यांना स्वशोध घेता आला. प्रज्ञा पवार ते प्रज्ञा दया पवार व्हाया प्रज्ञा लोखंडे असे आपसुकच बदलत गेलेल्या सहीच्या रूपाने प्रत्ययास येते.

'माझा साक्षात्कारी एंजलायटिस' मधून त्यांनी नवीन घेऊन आणलेल्या फिशपॉटमध्ये एक एंजल मासोळी असते. त्या तिच्यावर जीव लावतात आणि एंजलही त्या दिसल्या म्हणजे पाण्याबाहेर येण्याचा प्रयत्न करते. लेखिकेला एकदिवस चटकन जाणवते 'चंबूत राहणारे एंजल्स बद्ध की मुक्त? आणि हे बद्ध/मुक्तत्व नेमकं कशातून उद्‌भवत? त्यांच्या जाणिवेतून की त्यांच्या भोवतीच्या मानव-निर्मित चंबूजन्य भौगोलिक व्यवस्थेतून? आणि मग लेखिकेला जाणवते की केवळ एंजलच चंबूमध्ये बंदिस्त नाही तर आपलं जगणंही समाजामध्ये बंदिस्त आहे आणि आपण मासोळीप्रमाणे नाका-तोंडात पाणी जावे आणि आपण हातपाय मारत रहावे अशी स्थिती आपलीही होत नाही काय? असा अंतर्मुख करणारा प्रश्न त्या वाचकांसमोर मांडतात.

सिसिलिया काहीलो यांचे नाव ललित लेखनासाठीही प्रसिद्ध आहे. 'मुठीतले आकाश' आणि 'पैंजणाचे झाड' या ललित गद्यामधून त्या वाचकांच्या समोर आहेत. त्यांच्या जगण्याच्या प्रवासात ज्या स्मृती आठवणी आहेत. जो भूतकाळ घडून गेलेला आहे, ज्याच्या खाणाखुणा क्षीणपणे दिसत आहेत. त्यावर त्यांनी दृष्टिक्षेप टाकलेला आहे. 'पैंजणांचे झाड' ही प्रतिमा त्यांच्या वसईच्या परिसरात दिसणाऱ्या नेवरी या झाडाचे एक नाव आहे. आज हे नेवरी झाड नष्ट होत

आहे. पूर्वी हे झाड विहिरीच्या किंवा बावखलाच्या ठिकाणी दिसून येत असे. बावखल म्हणजे एकप्रकारचा पानवठाच आज वसईच्या परिसरात हे बावखल नष्ट झाले आहे आणि नेवरीचे झाडही तुरळक प्रमाणात दिसून येतात. त्या झाडाची सळसळ पैंजणांची रूमझूम ऐकू याची अशी असणारी आहे. या स्मृती त्यांच्या मनाला कायम सलत असतात. सिसिलिया कार्व्हालो यांचा बायबलचा अभ्यास आहे. ख्रिस्ती वातावरणात त्यांचे पोषण झाले आहे. चेहरा या ललित लेखात एका चित्रपट निर्मात्याला येशू खिसावर चित्रपट बनवायचा असतो म्हणून तो येशू ख्रिस्तासारखा दिसणारा सुंदर, सुहृदयी, कोमल, सुस्वभावी तरुण शोधून काढतो. त्या मुलांच्या सुस्वरूपामुळे चित्रपट बराच चालतो पुढे त्या चित्रपट निर्मात्याला येशू ख्रिस्ताचा विश्वासघात करणारा त्याचा शिष्य 'ज्युडास' याच्या जीवनावरही चित्रपट काढावा असे वाटते म्हणून तो अतिशय रागीट व क्रूरतेचा भाव असलेल्या व्यक्तीच्या शोधात निघालो एका गुत्यात त्याला असा एक 'चेहरा' दिसतो तो तरुण दारू पिऊन तर्रर असतो तरी त्याला तो निर्माता घरी आणतो कारण त्याच्यामध्ये त्याला ज्युडास दिसतो. मात्र त्याच्या लक्षात येतं की येशूच्या पात्रासाठी त्याने ज्याला निवडले होते तोच ज्युडास म्हणूनही समोर आला आहे. मानवी स्वभावातील विसंगतीचे दर्शन सिसिलिया कार्डालो यांनी 'चेहरा' मधून अतिशय नेमकेपणाने मांडले आहे.

संध्या रंगारी हया अलीकडच्या काळातील महत्त्वाच्या कवयित्री आहेत. अगदी किशोरवयापासून कविता लिखाण केल्यामुळे व विविध संमेलनांमध्ये कविता सादर केल्यामुळे सुरूवातीला बालकवयित्री म्हणून त्या ओळखल्या गेल्या. पुढे त्यांचे काव्यलेखन महत्त्वाचे ठरले. 'संध्यारंग' म्हधून काव्याचे अनेक रंग त्यांनी उधळलेत. कवितेबरोबरच त्यांनी 'चांदणचुरा' हे ललित गद्य प्रकाशित केले. या 'ललित गद्या'मधून त्यांनी जे अनुभवले ते यात प्रकर्षाने मांडले. काव्यात्मकता, उत्कटता, संवेदनशीलता आणि भावनाप्रधानता त्यांच्या ललित लेखनाचे वैशिष्ट्य आहे. लेखिका म्हणून जगत असताना वाट्याला येणारे अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले. 'चांदणचुरा', 'एक कळ अंगभर', 'आठ मार्च', 'उष्टावलेल्या पोरी' या लेखांमधून स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुःख त्यांनी मांडलेले आहे. 'उष्टावलेल्या पोरी'मधून ज्या पोरीवर जबरी संभोग घडून आला त्या पोरीची मनोवस्था संध्या रंगारींनी तेवढयाच कळवळीने आणि त्वेषाने मंडित केली आहे. संध्या रंगारी यांच्या लेखनाचा पिंड हा गंभीर असून स्त्री ही

केंद्रस्थानी ठेवून तिच्याशी निगडित असलेल्या प्रश्नांना त्या कसोशीने मांडतात.

संजीवनी तडेगावकर यांनी ‘चिगूर’ व ‘आणि झरे मोकळे झाले’ हे दोन ललित गद्य लिहिले आहे. संजीवनी तडेगावकर या संवेदनशील कवयित्री असून ग्रामीण भागात त्यांचे वास्तव्य आहे. या ग्रामीण जीवनाचे आणि परीसराचे निरीक्षण करून आत्मानुभवही घेतलेला आहे. विशेषत: मुलींवर आईचा प्रभाव मोठा असतो तो त्यांच्यावरही आहे. आपल्या वाट्याला जे अनुभव आले ते ‘चिगूर मधून त्यांनी मांडले आहे. लहानपणापासून ते तारूण्यावस्थेपर्यंतचे जे अनुभव त्यांनी घेतले ते ‘हिरवी पानं’, ‘दिवा’ व अन्य लेखातून दृष्टीस पडते. एक प्रकारचे हे त्यांचे एकप्रकारचे प्रांजळ आत्मकथनच आहे. ‘आणि झरे मोकळे झाले’ या ललित गद्यातून त्यांनी संत कवयित्री कान्होपात्रापासून आजच्या प्रज्ञा दया पवार पर्यंत यांच्या काव्याचा ललित्यपूर्ण आढावा घेतला आहे. ह्या कवयित्रींच्या कवितेचा शोध व्यक्तित्वाच्या अनुषंगाने घेतला आहे.

एकविसाव्या शतकातील काही निवडक ललित लेखन करणाऱ्या स्त्री लेखकांच्या निवडक आणि महत्त्वाच्या ललितगद्याचा विचार या लेखात केला आहे. यात काही ललित लेखिकांचे नावे सुटण्याचा संभव आहे. परंतु प्रतिनिधिक स्वरूपाची लेखिकांची निवड केली आहे. एकविसाव्या शतकात काही जुन्या जाणत्या लेखिकांचे ललित लेखन प्रकाशित झाले आहे. त्यामध्ये सुनीताताई देशपांडे, शांता शेळके, शिरीष पै ही नावे आहेत. मात्र त्यांचा लेखनाचा कालखंड आणि भूमिका बघता त्यांना यामध्ये समाविष्ट केलेले नाही. अरुणाताई ढेरे, नीरजा, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार, सिसिलिया कार्डालो, संध्या रंगारी, अश्विनी धोंगडे, संजिवनी तळेगावकर यांच्याच बरोबरीने निलिमा गुंडी, विद्युतलता अकलुजकर, ज्योत्सना आफळे, रेखा बैजल, मंगला गोडबोले, प्रतिमा इंगोले, माधुरी शानबाग, राणी बंग, अश्लेषा महाजन यांनी ललित लेखन केले आहे. एकविसाव्या शतकातील स्त्री लेखकांनी जे ललित लेखन केले त्याचा प्रामाणिक परामर्श घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

मराठी विभाग सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
मो. ९८८१९४५५५७

* * * * *

# अनुभवाचे अंतःस्वर : २००० नंतरचे स्त्रियांचे ललितलेखन

- सीमा शेटे - रोठे

'काही अनुभव बचकेने घ्यायचे असतात तर काही चिमटीने उचलायचे असतात. असाच चिमटीने उचलला जाणारा अनुभव, ललित साहित्याचे रूप धारण करून येतो' असं श्री. म. माटे यांनी म्हटले आहे तर त्यालाच ना सी फडके यांनी 'गुजगोष्टी'चे रूप दिले आणि प्राध्यापक वि. शं. चौघुले यांनी 'मुक्तगद्य' म्हटले. दिसायला साधा पण खरे पाहता लेखकाचे ज्ञान, त्याचा व्यासंग आणि त्याची लेखन शैली दर्शविणारा असा हा प्रकार! आधी फ्रेंच भाषेत आणि मग इंग्रजीत आलेला ललित निबंध! बेकनने इंग्रजीत आणला. 'पर्सनल एसे' म्हणून तिथे स्थिरावला आणि मग हळूहळू मराठीत एक वाङ्मय प्रकार म्हणून रुजला. मूळ शब्द 'ऍसे' म्हणजे प्रयत्न. बेकनने त्याला ऍसे म्हटले कारण मनात आलेले अस्ताव्यस्त विचार शब्दबद्ध करण्याचा तो प्रयत्न होता, जो ऍसे शब्दाचा अर्थ प्रगट करत होता. मनातल्या अस्ताव्यस्त विचारांना नेटके रूप प्रदान करणारे ललित लेखनाचे स्वरूप म्हणजे भावविश्वात झंकार उठविणाऱ्या अनुभवांभोवती केलेले विणकामच जणू! हे विणकाम करण्यासाठी स्त्रियांनी सुद्धा ललित लेखन हा वाङ्मय प्रकार जवळचा मानला. कवितेमध्ये जे मावत नाही आणि कथेमध्ये गावात नाही ते सारे ललित लेखनात सापडते, या भावनेने स्त्रियांनी ललित रचनांची निर्मिती केली आहे. दुर्गाबाई भागवत यांच्या सखोल व्यासंगातून ललित लेखांची फुटलेली हिरवी डहाळी असो की, संवेदनात्मक जगण्याचे अधीर आणि रसरशीत मन घेऊन पाझरलेले इंदिरा संत यांचे ललित लेखन असो...मराठी वाचकांना त्याने नेहमीच प्रसन्न अनुभव दिला आहे. तर वाचकाला हिरव्यागार मखमली वरून नेताना मातीखाली दडलेल्या शोषणाच्या अंगार खुणा दर्शविणाऱ्या इरावती कर्वे यांच्या ललित लेखनाने चिंतनशीलता प्रदान केली आहे. अनुभव - आशय - विषय - आविष्काराच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या या लेखन प्रकारात अलिकडच्या काळात कोणत्या संवेदना प्रकट होत आहेत? किंवा कोणती स्पंदनं उमटत आहेत? याचा वेध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

कोणत्याही भाषेतलं साहित्य हे त्या त्या भाषेतल्या उगवत्या पिढीच्या अभिव्यक्ती बरोबर जसं बहरतं, जिवंत राहतं...तसंच ते मागल्या पिढीने उमटविलेल्या

पाऊलखुणाही दर्शवितं त्यातूनच वाचकासमोर समाजाच्या मानसिक स्थित्यंतराचा विकासपट उलगडत असतो. हे असेच बदल ललित लेखनातही आढळतात. आयुष्य जगत असताना वाचलेल्या, पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी किंवा आठवणी सहजतेनं मांडणारं ललित लेखन पुष्कळदा आत्मकथना भोवती फिरणारं किंवा 'मी' व्यक्त करणारं असतं. त्यामुळे सरसकट 'ह्या लिखाणाला काही मूल्य नाही', असा निष्कर्ष काढला जातो' त्यातुनही बायकी विषय म्हणून स्त्रियांच्या ललित लेखनाची हेटाळणी होते. 'लालित्य याचे दुसरे नाव भावकाव्यगुण आहे', हे गृहित धरून स्त्रिया अलंकार, उपमा, प्रतिमा - प्रतिकांचा वापर करून जे वास्तव कवितेच्या अल्पाक्षरत्वात बसत नाही तो अनुभव, ललित गद्यात मांडतात आणि शब्दांचा पिसारा फुलवत शब्दांच्या प्रदेशात वाचकाला फिरवत ठेवतात...असा आक्षेप त्यांच्यावर घेतल्या जातो. स्त्रियांच्या ललित लेखनाबाबतची ही मतं खरी आहेत का? विशेषत: या बदलत्या जागतिकीकरणात अगदी अलिकडच्या, २००० नंतरच्या काळात लिखाण करणाऱ्या स्त्रिया काय विचार करतात? कसं लिहितात? या उत्सुकतेने ललित लेखन विश्वात नुसतं डोकावलं तरी त्यात आढळणाऱ्या विषय वैविध्याने आपण आश्चर्यचकित होतो. बदलत्या जीवन पद्धतीचं स्वच्छ, पारदर्शक आणि थक्क करणा? प्रतिबिंब त्यात दिसतं. आत्ता-आत्तापर्यंत निसर्ग प्रतिमांमध्ये रममाण होत आठवणींच्या स्वरूपातील आत्मपर लेखनात गुंतून पडलेली 'स्त्री' आता माणूस जाणून घेत, त्या विविध दिशांचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसते आहे. कॅमेऱ्यातून समोरचं बघते आहे...न की सेल्फी मोडमध्ये गुंतते आहे.

'तुम्हाला माणसांना वाटतं की पाणी म्हणजे नदी पण पाण्याबरोबर नदीचं रक्त आहे, सोनेरी गाळ...नदीचे किनारे, तिचे तट, तिची घाटदार वळणे, तिचं सुपिक मुख हे पाण्याने कमी आणि गाळाने जास्त बनतं पण तुम्हाला सरळधोप पाहिजे. जिवंत विश्व सुटंग, सोपं नसतंच...एका गवताच्या पातीवर चढलेल्या मुंगीचे लागेबांधे थेट आकाशाशी, थेट मातीशी असतात', असे जेव्हा परिणीता दांडेकर लिहितात तेव्हा ते केवळ नदीचे आत्मवृत्त नसतं तर पर्यावरणाचं वास्तव समाजासमोर मांडणं असतं. हा केवळ रिपोर्ताज किंवा कोलाज नसतो तर ललित अंगाने मांडलेलं ते 'नदीसुक्त'' असतं. हा जो ललित लेखनातला अनुभवाचा जिवंतपणा अलिकडच्या काळात आढळतो आहे, तो अतिशय सकारात्मक आहे. मागल्या पिढीतील आजही लिहित्या असणाऱ्या प्रभा गणोरकर,

अरुणा ढेरे, सिसिलिया कार्व्हालो, मंगला गोडबोले, माधुरी शानभाग, प्रतिमा इंगोले यांच्या प्रमाणे वाचकांच्या अभिरुचीला समृद्ध करणारे लेखन अनेकींच्या ललित लेखनातून जाणवते. स्त्री-पुरुष नात्यातल्या लैंगिकतेच्या एकूण लिंगभावाच्या राजकारणाचं भान आणि सामाजिक ताणेबाणे लेखनात समर्थपणे उतरवणारी मनस्विनी लता रवींद्र, लोककथांमधलं निसर्गभान उलगडू पाहणारं लिखाण करणाऱ्या वर्षा गजेंद्रगडकर, 'काही मनातलं, मनापासून सांगावसं हळुवार काहीतरी भिजलेलं पाखरू जसं...' म्हणत कानगोष्टी करणारी स्पृहा जोशी, 'कितीतरी प्रश्न वेढून असतात कधीतरी उत्तरे सापडतात. कधी नाही. कधी तडजोडी होतात. कधी गुंता सुटत नाही बघून दोर कापून टाकण्यात पर्यवसान होतं. तुटलेले दोर आयुष्यभर सतत राहतात. ते एक वेगळेच आणि कधीकधी तेच तुटलेले दोर गाठी बांधून जोडल्यावर गुलजार म्हणतो तसं 'मैने तो इक बार बुना एक हि रिश्ता...लेकिन उसकी सारी गिऱ्हे साफ दिखाई देती है यार जुलाहे', अशी ही गोष्ट असतेच', असं 'हे जीवन सुंदर आहे' पण कसं आहे, ते अलगदपणे उलगडत नेणारी माधवी भट, स्वाती धर्माधिकारी, क्रांती सडेकर यांचं ललित लेखन हे परंपरेचं बोट धरून पण नवतेच्या दिशेने वाचकाला घेऊन जाणा? लिखाण आहे. तसंच सध्याच्या लादलेल्या एकांतात हातात पुस्तक घेऊन आपापल्या खिडकीतून बाहेरच्या प्रदेशात डोकावताना कित्येक प्रदेश आठवत राहतात पुस्तकातले, मनातले आणि प्रत्यक्षातले अशा प्रदेशांचा मागोवा घेत 'प्रतिभेच्या प्रदेशात' घेऊन जाणाऱ्या शर्मिला फडके यांचं ललित लेखन! प्रत्येकीच्या लिखाणाचा पोत वेगळा, शैली वेगळी, धाटणी आगळी. बंद दाराआड राहायचं आणि खिडकीतून दिसेल तितकाच आभाळाचा तुकडा बघायचा या बंधनात स्त्री अभिव्यक्ती अडकलेली होती, त्यातून बाहेर पडून जीवनाला सर्वार्थाने भिडू पाहणा? जगणं जेव्हा ती अनुभवू लागली तेंव्हा तिचं अनुभवविश्वही विस्तारलं. या विस्तारित क्षेत्राची स्पंदनं तिच्या सृजनक्षम मनाने टिपायला सुरुवात केली आणि तिच्या लेखणीतून शब्द रूप घेऊ लागली. हा बदल गेल्या अनेक वर्षापासून होतोय पण त्यातही वीस पंचवीस वर्षाच्या काळात आत्मशोधाबरोबरच प्रगल्भ जीवन जाणिवांचा समंजस आविष्कार स्त्रियांच्या इतर लेखनात प्रकटतो तसाच तो ललित लेखनातही उमटतो आहे. या वेगवेगळ्या विषयांवर लिहिताना त्या, आपलं 'स्त्रीपण', खास स्त्रियांचे असे जे विषय असतात ते विसरताहेत का? तर तसंही नाही. उलट नव्या जाणिवेनं त्या या जगण्याकडे पाहतात. म्हणूनच 'साडी आणि बरच काही' हा पारंपरिक विषय

सुद्धा आकर्षक आणि निराळ्या धाटणीतून त्या पुढे आणू शकतात. साधं रोजचं जेवण पण त्याकडे बघताना किंवा खाद्यसंस्कृतीचा वेध घेताना, 'आजी, आई, काकू, बहिणी, सासुबाई यांचा विचार करत होते, तेव्हा मला एक गोष्ट जाणवली या सगळ्या जणी आपापलं घर सोडून एका नवीन वातावरणात राहायला आल्या. त्या वातावरणाला त्यांनी नुसतं आपलं म्हटलं नाही तर आपलंसं केलं. प्रत्येक माणूस हा लहानपणापासून आपल्या घरातल्या एका विशिष्ट प्रकारच्या खाण्याशी मनानं बांधला गेलेला असतो. जसजसे आपण मोठे होतो, आपण खाण्यापिण्याचे वेगवेगळे प्रयोग करतो. पण तरी प्रत्येक घराचं एक कम्फर्ट फूड असतं. त्या घरातले सदस्य त्या कम्फर्ट फुडनं एकत्र बांधले गेले असतात आणि त्यामुळेच ते घर एकच राहतं', असं सायली राजाध्यक्ष मांडतात. त्या लिखाणातून स्त्रीत्वाची भावना तर डोकावतेच पण आधुनिक जगण्यातील अस्पष्ट कंगोरे ही त्या नजरेत आणून देतात.

'आज रख...कल करना अगला काम...आज रख' असं म्हणत सोळा-सतरा दिवस रसायनाचा स्पर्श होऊ न देता कापडात नैसर्गिक रंगांची जादू भरणाऱ्या अजरख समाजाची कहाणी मृदुला बेळे लिहितात. वाचताना  वाचकही 'मोहे रंग दे...' भावनेनं वाचनात गुंतत जातो. कारण जणू एखाद्या अज्ञात प्रदेशाचे दर्शन व्हावे तसं हे सगळं त्याच्यासाठी नवं असतं. स्वतःच्या सुरक्षित चार भिंतीच्या आड राहूनही त्याला या ललित लेखनातून शब्दभ्रमंती करता येते. आजवर काही पुरुषांनी असे 'हटके' विषय हाताळले होते पण काही अपवाद वगळता स्त्रियांच्या लेखनाचा परीघ मर्यादित होता. मात्र आता या सगळ्या जणी वेगळ्या विश्वात उतरून, स्वानुभवावर आधारित लेखन करत आहेत. ते मांडताना कोणताही उसना अभिनिवेश नसतो. शब्दांचा फापटपसारा नाही आणि त्यात लालित्य ही आहे, असं ते वास्तवदर्शी लिखाण वाचकांच्या पसंतीस नाही उतरलं तरच नवल!

'पालख्या सजायला लागल्या की माणसे सजतात. पालखी खेळते म्हणजे माणसे खेळतात, तरीही म्हणतात पालखी नाचतेय बघा. चला! सहाणेवर लवकर चला! नाचणारी पालखी मी पाहायला जाते तेव्हा देव्हाऱ्यातल्या बाळकृष्णाच्या पाळण्या एवढी पालखी माझ्या आत असते. ती झुलणारी पालखी खेळायला लागते. जाग्यावर झोके घेते. वर जाते - खाली येते, हिंदकळते, गरगर फिरते. अवघी सहाण माझ्यात संचारते. कोकणातल्या शिमग्यातल्या फाकाची वेगळीच मजा असे. आता पूर्वी इतक्या आणि तसल्या

फाका राहिल्या नाहीत. तेव्हा मला त्या खूप फाजिल वाटायच्या. त्यानंतर त्यातले शास्त्र कळले. आता फाका संपल्या. त्यावरून होणाऱ्या भानगडी संपल्या. शिमगा कोरडा होत चालला. तरुण पिढीला ही खेळकर टीका संपल्याचेही जाणवणार नाही. ही टीका संपली म्हणजे आपण आपल्यातला राग, मत्सर, शेजाऱ्यांचे अवगुण उत्स्फूर्तपणे व्यक्त करण्याची संधी गमावून बसलो आणि आपल्यातली कमतरता समजण्याची संधी गेलीच', असं 'भुईरिंगण' सजविणाऱ्या रश्मी कशेळकरांचं ललित लेखन वाचकाला 'हरवले त्याची' सहज आठवण करून देतं. कोणत्याही माणसातील संवेदनशील मन अनेक लहान गोष्टींची नोंद घेत असतं...त्या नोंदी कुठेतरी मनाच्या सांदण कोपऱ्यात कायम असतात. त्या अशा नॉस्टॅल्जिक लिखाणामुळे अलगद वर येतात नि वाचकाच्या स्वत:च्या आठवणीशी 'मर्मबंधी नाळ जोडतात.

काही ललित लेख म्हणजे व्यक्तीचित्र रेखाटन असते. जसे कल्पना दुधाळ यांच्या ललित लेखातून ताई - आई - आजी - मावशी यांची व्यक्तिमत्व निसर्ग प्रतिमांच्या पार्श्वभूमीवर ठळक होत जातात...शेती हा त्यांचा श्वास आहे, त्या काळ्याआईची विविध रूप शब्दबद्ध करताना तिच्या अंगाखांद्यावर फुलणारी झाडे झुडपे, पाऊस वारा, पीक पाणी हे जसे लेखनाचे विषय होतात तसेच त्यावर अवलंबून असणारे अवतीभवती वावरणारे माणसंसुद्धा शब्द रूपातून सामोरे आणले जातात. माणसांच्या जगण्याचे जीवन रीतींचे आणि मानवी धारणांचे अनेक तरल पदर त्यात असतात, जगण्यातल्या सामान्य अनुभवांचे अंत:स्वर असतात. विनया जंगले यांच्या ललित लेखनात 'मुख्य वेदना - बोलक्या संवेदना' वन्य प्राण्यांच्या संदर्भात व्यक्त होतात.

स्त्रियांच्या या अशा विविध विषय हाताळणीमुळे जगण्याच्या अनवट वाटा दिसू लागल्या आहेत. हा केवळ कोणत्या गोष्टीचा शोध किंवा हृदयातून आलेला भावनेचा ओघ नाही तर तो माणूसपणाच्या संवेदनांचा, स्पंदनांचा शोध आहे. अवघड तरीही आनंददायी असा ललित लेखनाचा प्रवास आहे. त्यात निसर्ग आहे पण त्याचबरोबर वैचारिकतेची डुबही आहे. स्त्रीपणाची जाणीव आहे पण बंधनांची चौकट नाही. लिखाणात सहजता आहे. जगण्याच्या सर्व संवेदनांनिशी प्रतिसाद देण्याची तहान त्यात आहे. त्यात रुणझुणत्या पैंजणांची किणकिणही आहे आणि घंटानादही आहे. तिळावर साखरेची पुटं चढत चढत काटा येऊन हलवा तयार व्हावा तसे शब्दरूपही आहे. मी - माझं यातून बाहेर पडून स्वत: अनुभवलेला प्रवास इतरांसमोर मांडताना उगाच शब्दांची कलाकुसर

नाही. जे दिसलं, जसं वाटलं, भावलं, जाणवलं तसं ते या लेखिका मांडतात आणि ते प्रत्यक्षातून आलेलं असल्यामुळेच वाचकांना आवडतं. जीवनाला भिडून माणसाच्या सुखदु:खाशी नातं सांगत लिहिल्यामुळे भावतं.

कोरोनाच्या या काळात वृत्तपत्रातील पानंच्या पानं कमी झाली आहेत. त्यामुळे त्यातील ललित विभाग झपाट्याने आक्रसतो आहे. म्हणून मग ललित लेखनाच्या निर्मितीवर बंधने आलीत का? तर तसंही काही होताना दिसत नाही. उलट फेसबुक, ब्लॉग आणि ट्विटरच्या माध्यमातून अनेक नव्या जणी लिहित्या झाल्या आहेत. कुठली तरी आठवण... दखल घेण्याजोगी एखादी घटना...एखादी व्यक्ती, प्राणी, प्रसंग... आपल्या भाषेत व्यक्त करत आहेत. हे त्यांचं सांगणं ललित साहित्यात भरच घालत आहे. 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या उक्तीप्रमाणे 'व्यक्ती तितक्या अभिव्यक्ती', त्यामुळे हे दालन अधिकाधिक समृद्ध होत आहे. अर्थात सर्वच लिखाण सरस असतं असं नाही पण त्यातूनच सकस लिखाणाच्या शक्यता निर्माण होतात. सृजनवाटा दिसतात. जर या ब्लॉग विश्वातील ललित लेखनात एक फेरफटका मारला तरी जाणवतं की, विविधांगी विषयांची हाताळणी होते आहे. त्यात वेश संकल्पना मांडणारी नीरजा पटवर्धन, तळ्यामळ्याच्या काठावर रेषेवरची अक्षरे उमटविणारी मेघना भुस्कुटे, मृण्मयी रानडे, मुक्ता चैतन्य, शेफाली वैद्य, 'श्वासाचं बांधकाम' उभारणारी जुई कुलकर्णी, गौरी कानेटकर, मृणालिनी चितळे, अपर्णा संखे, दिशा महाजन अशी अनेक अनेक नावं लक्ष वेधून घेतात. कुठलाही कृत्रिम शब्द सोस नसलेलं, उत्कट संवेदनांचा प्रत्यय देणारं हे ललित साहित्य वाचकांना लोभस आनंद देत आहे, असंच म्हणावं लागेल. पूर्वी गद्य लेखनातील वर्णन, चित्रण आणि जमल्यास शेवटी एखादा जीवनविषयक तत्त्वविचार, या मर्यादा ललित लेखनात जाणवायच्या. त्यापेक्षा वेगळं पण वर्तमानातील स्वत्वाचा शोध घेणारं विचार - चिंतन - कल्पनांची मांडणी करणारं चौकटीपलीकडचं संस्कृतीविश्व निर्माण होताना दिसतंय. एकूण काय? तर, रंजनवादी प्रवाह बदलतो आहे. वास्तवाकडे दृष्टी वळते आहे. जिवंत सळसळती उत्फुल्लता, जीवनवेधी टोकदारपणा पेलणारे अनुभव स्त्रियांच्या ललित लेखनात उतरायला लागले आहेत, हे निश्चित!

अकोला.

* * * * *

# एकविसाव्या शतकातील मराठी बालसाहित्य : स्त्रियांचे योगदान

**- डॉ. पृथ्वीराज तौर**

मागील वीस-तीस वर्षांत जागतिकीकरणामुळे जग आमूलाग्र बदलले असले आणि त्यामुळे साहित्य जगतातही मोठ्या प्रमाणात उलथापालथ झालेली असली तरी बालसाहित्य हे निदान मराठीत तरी परिघावरच राहिले आहे. या समांतर साहित्यविश्वाला गांभीर्याने घेण्याचा विचार अजूनही मराठीतील धुरीणांच्या मनाला शिवलेला नाही. अखिल भारतीय असो की विभागीय साहित्य संमेलने, बालकुमारांसाठी त्यात मिळालेच तर फार अल्प स्थान मिळालेले असते. शासकीय पुरस्कार मग ते राज्य शासनाचे असोत की साहित्य अकादमीचे असोत, बालकुमार साहित्यासाठी ठेवलेल्या रकमा पाहिल्या तरी या समांतर साहित्याला मिळणारे दुय्यमत्व लक्षात येते. अजूनही आमच्या बहुतेक विद्यापीठांना बालकुमारसाहित्य हा पदवी स्तरावर गंभीरपणे अभ्यासण्याचा विषय वाटत नाही, यावरून शैक्षणिक क्षेत्रातील उदासीनताही लक्षात यावी. गावात-शहरात असणाऱ्या एखाददुसऱ्या पुस्तकाच्या दुकानात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ म्हणवल्या जाणाऱ्या बालसाहित्यिकांची पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध नसणे वाचन संस्कृतीच्या बाजाराचे वास्तव सांगून जातात. सांस्कृतिक पटलावर बालकुमार साहित्याची सद्य:स्थिती लक्षात घेण्यासाठी ही उदाहरणे पुरेशी आहेत.

पहिलीपासून इंग्रजी हे धोरण राज्य शासनाने अमलात आणले त्याला वीस वर्षे झाली आहेत. या दोन दशकात मराठी शाळांची पीछेहाट झाली आणि गावोगाव इंग्रजी शाळा उगवून आल्या. वाडीतांड्यातसुद्धा इंग्रजी शाळांमध्ये इंग्रजीनंतर हिंदी भाषेला स्थान मिळते. संवादासाठी मराठीऐवजी हिंदी वापरा अशी सक्ती केली जाते. याचा परिणाम बालकांवर नक्कीच झाला आणि मराठीचा अजिबात गंध नसणारी पिढी मोठ्या प्रमाणात आपल्याकडे निर्माण झाली. अशा पिढीला साहजिकच मराठी बालकुमार साहित्य वाचण्यात रुची नाही. दुसरीकडे माध्यमविश्वात मोठे बदल झाले, आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजले गेलेले अनेक 'शो' भाषांतर होऊन मराठीतही उपलब्ध झाले. त्यामुळे टी व्ही पाहणारा आणि मराठी जाणणारा जो वाचक-प्रेक्षक बालकुमार आहे त्याचे नायक बदलले. डिस्ने आणि अन्य हिंदी नायकांनी ही जागा पटकावली. छोटा

भीम, बालगणेश, डोरोमान, वीर, पेपा पिग, पॉली, शिवा, लिटल सिंघम असे नवे नायक बालकुमारांचे आवडते झाले. आणि दुर्दैव असे कि या काळात सगळ्या मराठी मुलांना आपला वाटेल असा नायक अस्तित्वात आला नाही. (बोक्या सातबंडे, समशेर कुलूपघरे, ठोंब्या असे जे काही चार दोन नायक आहेत ते लेखकांनी निर्माण केले, शिवाय त्यात अजूनही नायिकेचा अभाव आहेच.)

शाळेचा अभ्यासक्रम, घरातील पालकांचे वर्तन व वाचन, टीव्हीतील कार्यक्रम, मोबाईल मधील गेम ॲप यांनी मध्यमवर्गीय कुटुंबातील बालकांचे मानस घडवले आहे, हाच मराठी बालकुमार साहित्याचा केंद्रवर्ती वाचक आहे. त्याला समोर ठेऊनच मोठ्या प्रमाणात वाचन होते. विशेष बालके, झोपडपट्टीतील बालके, सुधारगृहातील बालके किंवा जंगलवस्तीतील वा भटकत्या समूहातील बालके यांचा विचार प्राधान्याने अजूनही होत नाही, त्यामुळे त्यांच्यासाठी अजूनही पुस्तक ही नवलाईची बाब आहे किंवा अनास्थेची बाब आहे. मराठी बालकुमार साहित्य हे काही बालकांकडे अजूनही नीटपणे बघायला तयार नाही आणि ज्यांचा विचार ते करू पहाते ती मुले त्यांना मिळणाऱ्या सोयीमुळे अगोदरच कितीतरी मैल पुढे गेली आहेत. बालकांचे लेखक/लेखिका आणि प्रत्यक्षात बालक यांच्यात असणारी दरी वर्तमानात रुंदावत जात असल्याचे दिसते. मुलांसाठी लेखन करणे म्हणजे बाळबोध पद्धतीने लिहिणे, एखादा विषय सोपा करून सांगणे, शिकवणूक देण्यासाठी लिहिणे, मोठ्या टाईपात प्रकाशित करणे, यमक जोडत जोडत लिहिणे, स्वत:च्या बालपणातील हकीकती सांगणे असे एक ना दहा गैरसमज अजूनही बऱ्याच लेखकात असल्याने बालकुमार आणि त्यांचे लेखक यांच्यातील अंतर वाढतच जात आहे.

अर्थात नकाराचा हा पाढा मोठा असला आणि अजूनही तो वाढवता येण्यासारखा असला तरी या काळात लेखिकांनी बालकुमार साहित्यात दिलेले योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. किंबहुना 'काहीही बरे चाललेले दिसत नाही' या पार्श्वभूमीवर हे प्रयत्न अधिक महत्त्वाचे आहेत. दिशादर्शक स्वरूपाचे आहेत.

बालकुमार साहित्याविषयी काही बाबी लक्षात घ्याव्या लागतात. एकतर बालकुमार साहित्याचे जग हे प्रौढ मराठी साहित्याला दोन बिंदूवर छेदणारे स्वतंत्र वर्तुळ आहे. बालसाहित्यातील श्रेष्ठ कलाकृती या बाल आणो प्रौढ या

भिन्न वर्तुळातील अंतर संपवण्यास मदत करत असतात. किंवा प्रौढ साहित्यातील काही कलाकृती या वर्तुळात सामावून जातात. प्रौढ साहित्यात असतात तसे प्रवाह आणि प्रकार बालकुमार साहित्याच्या या समांतर वर्तुळातही पहावयास मिळतात. उदाहरणार्थ बालकविता, बालकथा, बालनाट्य इ. बालकवितेचेही उपप्रकार आढळतात उदाहरणार्थ शिशुकविता, खेळगाणी, बडबडगीते, स्फूर्तीगीते इ. किंवा कथा आणि कादंबरीचे विज्ञानकथा, हेरकथा, चातुर्यकथा, लोककथा, शोधकथा, इतिहासकथा, चरित्रकथा असे उपप्रकार आढळतात. ग्रामीण, दलित, विज्ञान हे प्रवाह बालकुमार साहित्यातही पहावयास मिळतात. शिवाय चित्रकथा, शब्दरहित चित्रकथा, शब्दकोडे असा व्याप वाढतच जातो. बालकुमारांच्या पुस्तकात चित्रकाराचेही स्वत:चे स्थान असते. लेखक कवी ज्या जागा रिकाम्या सोडतो त्या भरून काढण्याचे काम त्याला करावे लागते. (या दृष्टीने रेश्मा बर्वे यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. त्यांची चित्रकला बालकांच्या पुस्तकांना अधिक अर्थवाही करते.) बालनाट्यामुळे बालरंगभूमी उदयाला आली; सुधा करमरकर, रत्नाकर मतकरी आणि इतरांनी या रंगभूमीला स्वत:चा चेहरा मिळवून दिला. लक्षात घेण्याजोगी दुसरी बाब अशी की प्रौढ वाचकांचा म्हणून जसा एक गट कल्पिता येतो तसे बालकुमार साहित्याच्या बाबतीत होत नाही. शिशु, बाल, कुमार असे वयाप्रमाणे उपगट निर्माण करावे लागतात. हे गट अभ्यासाच्या सोयीसाठी नाहीत तर लेखननिर्मिती होत असताना ते लेखाकाच्याही मनात असतात. उदाहरणार्थ शिशु गटासाठी लिहायचे आहे कि कुमारांसाठी? सहा ते नऊ या वयोगटासाठी लिहायचे आहे की दहा ते बारा या वयोगटातील वाचकांसाठी? हे लेखकाला विचारात घ्यावेच लागते. त्यामुळे निर्मितीपासूनच बालकुमारांसाठी लेखन करणाराला अडथळ्यांची शर्यत पार करावी लागते. 'मनात आले ते लिहिले' असे बोलून बालकुमारांसाठी लिहीणारास मोकळे होता येत नाही.

हे सगळे विचारात घेऊन २००० नंतरच्या बालकुमार साहित्यात लेखिकांनी काय भर घातली आहे? हे पाहू जाता अनेक चांगल्या बाबी हाती लागतात. बालकविता, बालकथा, बालकादंबरी, बालनाट्य यासोबतच चरित्रे, भाषांतर, संपादने, समीक्षा, नियतकालिके अशा विविध पातळीवर लेखिकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

नियतकालिके ही बालकुमार साहित्याच्या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. बालकुमारांच्या बहुतेक नियतकालिकांच्या संपादकपदी स्त्रिया आहेत. 'किशोर'

या बालभारतीच्या मासिकाचे कार्यकारी संपादकपद हे दीर्घकाळ ज्ञानदा नाईक यांच्याकडे होते. ‘किशोर’ या नियतकालिकाचा दर्जा उंचावण्याचे काम त्यांच्या संपादकीय भूमिकेने केले. ‘अहम आवाम वयम’ या कल्पक चौकस किशोर मासिकाच्या मुख्य संपादक शुभदा चौकर आहेत, ‘मुलांचे मासिक’ या पंच्याण्णव वर्षांची परंपरा असणाऱ्या मासिकाची व्यवस्थापकीय जबाबदारी जयिता मोडक यांच्याकडे आहे, ‘ खेळगडी’ हे कोकणातून प्रकाशित होणारे त्रैमासिक मानसी हजेरी संपादित करत असतात. एक ते आठ या वयोगटासाठी असणाऱ्या चिकू पिकू चे संपादकपद डॉ श्रुती पानसे यांच्याकडे आहे. ब्रेन टॉनिक हे द्वैभाषिक मासिक नाशिक येथून प्रकाशित होत असे, मंगला वरखेडे या त्याच्या संपादक होत्या. ज्ञानरंजक टॉनिक हे मासिक नीता तोरसकर संपादित करत असत. तर जडणघडण या मासिकाच्या स्मिता देशपांडे या संपादक आहेत. छोट्या दोस्तांचा छोटू (संपादक- सुजाता टिकेकर), गंमत जंमत (प्रकाशक- सुधा देशपांडे), छावा (संपादक- डॉ गीताली टिळक), छोट्यांचा आवाज (संपादक- वैशाली मेहेत्रे) या दिवाळी अंकांची जबाबदारीही स्त्रियांकडेच आहे. बालकुमारांच्या मासिकांच्या संपादक प्रकाशक व्यवस्थापक असणाऱ्या या स्त्रिया लेखिका म्हणून आणि बालकांसाठी नवा विचार मांडणाऱ्या अभ्यासक म्हणून परिचित आहेत. आपल्या नियतकालिकातून त्या स्वत:ची पालक, शिक्षक, अभ्यासक, कार्यकर्ता म्हणून असणारी भूमिकाही मांडत असतात म्हणून वरील प्रत्येक नियतकालिकाचा चेहरा निराळा आहे. त्याची मांडणी आणि त्यातून पुढे येणारे विषय एकसारखे नाहीत. मराठी बालसाहित्याचा चेहरा किती विविधांगी आहे, हे समजून घेण्यासाठीही ही नियतकालिके उपयुक्त आहेत.

भाषांतरित साहित्याने मराठी बालसाहित्याला समृद्धी बहाल केली आहे. दुर्गा भागवत, लीलावती भागवत, मृणालिनी पाठक, निर्मला चंद्रकांत, चारुशीला वालावलकर आणि इतरांनी गेल्या शतकात मोठ्या प्रमाणावर बालकुमारांच्या कथा कादंबऱ्या मराठीत अनुवादित केल्या. नॅशनल बुक ट्रस्ट, प्रथम, भारत ज्ञान विज्ञान समुदाय, मासिक ऋग्वेद चिल्ड्रन रिलीफ फंड, ओरिएण्ट लॉंगमन, कजा कजा मारू या प्रकाशनांचे यासाठी मोठे योगदान राहिले. अलीकडच्या दोन दशकात माधुरी पुरंदरे यांनी कुमारांसाठी केलेले अनुवाद लोकप्रिय झाले. विशेषत: हॅनाची सुटकेस ही कॅरन लीवाईन यांनी लिहिलेली चरित्रात्मक कादंबरी विशेष वाचकप्रिय झाली. चेतना सरदेशमुख गोसावी यांनी मराठीत भाषांतरित

केलेल्या तोत्तोचान (तेत्सुको कुरुयोनागी) या कादंबरीच्या मागील वीस वर्षात वीस आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. 'फ्रँकलिन'ची समग्र मालिका मंजुषा आमडेकर यांनी मराठीत आणली आहे. अमृता सुभाष (बोस्कीचे अजब गजब धनवान, बोस्कीची), उषा मेहता (बोस्की) सुनाली, सविता दामले (बोस्कीचे पंचतंत्र) यांनी गुलजार बोस्की कथामालिकेचे काही भाग मराठीत भाषांतरित केले आहेत. शोभा भागवत यांनी अनुवादित केलेले 'बहुरूपी गांधी' (अनु बंधोपाध्याय) हे कुमारांना आवडल्याचे दिसते. याशिवाय उष:प्रभा पागे, सुनीती नामजोशी, लीना सोहोनी, विद्यागौरी टिळक, शशिकला उपाध्ये, विनया मालती हरी आदी लेखिकांनी जगभरचे बाल साहित्य मराठीत आणले आहे.

विजया वाड यांनी 'कुमार विश्वकोश' हे एक महत्त्वाचे पाऊल उचलले होते, त्यासोबतच त्यांनी केलेली कथाकोश, कविताकोश यांची संपादने मराठी बालसाहित्याचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी महत्त्वाची आहेत. निवडक बालकुमार साधना, निवडक किशोर या खंडांमधून देखील मराठी बालसाहित्यात लेखिकांनी घातलेली मौलिक भर पहाता येते. माधुरी पुरंदरे यांनी केलेले 'लिहावे नेटके' आणि 'वाचू आनंदे' हे दोन्ही प्रकल्प मराठी बालकुमार साहित्याची उंची भारतीय पातळीवर वाढवणारे आहेत. पुरंदरे यांना त्यांच्या समग्र लेखनासाठी साहित्य अकादमीचा 'बालसाहित्य' पुरस्कार देखील लाभला. बालकुमार लेखनासाठी 'साहित्य अकादमी'ने सन्मानित झालेल्या त्या एकमेव लेखिका आहेत. ही यादी आगामी काळात वाढेल असा विश्वास वाटतो. बालसाहित्य समीक्षेच्या संदर्भात लीला दीक्षित, नीलिमा गुंडी, विद्या सुर्वे बोरसे, हेमा लेले यांचे उल्लेख महत्त्वपूर्ण आहेत. लीला दीक्षित यांनी शतकातील बालकुमार कवितेचे संपादन केले होते, या संपादनासाठी लिहिलेली दीर्घ प्रस्तावना आणि पुढील काळात चार बालकवींच्या संदर्भाने केलेले 'बालकविता चार कवींची' हा अभ्यास लक्षणीय आहे. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, कल्याण इनामदार आणि सुरेश सावंत यांच्या कवितेच्या अनुषंगाने दीक्षित यांनी अभ्यास केला आहे. (यात एकही कवयित्री नाही, हे विशेष.) लीला पाटील, रेणू दांडेकर या शिक्षणतज्ज्ञांची नोंद बालशिक्षण, बालविकास यादृष्टीने महत्त्वाची आहे. विद्या सुर्वे बोरसे या अलीकडच्या काळात सातत्याने लिहिणाऱ्या बालसाहित्य समीक्षक आहेत. 'बालसाहित्य: आकलन आणि समीक्षा' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. याशिवाय रजनी हिरळीकर यांचा उल्लेख आवश्यक आहे. 'बालसाहित्याचे

अंतरंग' या आपल्या समीक्षा ग्रंथामध्ये त्यांनी दक्षिण महाराष्ट्रातील अनेक नव्या जुन्या लेखकांची नोंद केली आहे. ग ह पाटील जन्मशताब्दी निमित्त डॉ मंदा खांडगे आणि डॉ लीला दीक्षित यांनी संपादित केलेला 'बालशिक्षण, बालसाहित्य: विविध आयाम' हा ग्रंथ विविध अंगांनी महत्त्वपूर्ण आहे. बालसाहित्य या संकल्पनेची नेमकी चर्चा या ग्रंथात करण्यात आली आहे. बालकुमारांचा आणि त्यांच्यासाठीच्या लेखनाचा अभ्यास कसा करता येऊ शकतो हे समजून घेण्यासाठी प्रस्तुत संपादन दिशादर्शक आहे. मूल्यशिक्षण, पाठ्यपुस्तके, मुलांची मासिके, वृत्तपत्र पुरवण्या, प्रसारमाध्यमे, बालाण्र्गाभूमी, मुलांची भाषा, ग्रंथ सजावट अशा विविध मुद्यांचा उहापोह खांडगे दीक्षित संपादित ग्रंथात आहे.

मुलांचे लेखन हे बालसाहित्यातील एक समृद्ध दालन आहे. शाळा आणि महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे लेखन पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जाताना दिसतात. बालकांना योग्य वेळीच प्रोत्साहन मिळाले तर त्यांच्यातील प्रतिभेचे अंकुर विकसित होऊन आगामी काळात त्यांच्याकडून विलक्षण निराळ्या लेखनाची अपेक्षा करता येते. धारा भांड आणि मनस्विनी लता रवींद्र ही उदाहरणे पुरेशी आहेत. धारा भांड यांची 'टीटूडू' ही बालकादंबरी आणि मनस्विनी लता रवींद्र चा कविता संग्रह योग्य वेळी प्रकाशित झाला, नंतरच्या काळातही या दोघींच्या लेखनात सतत सातत्य राहिलेले दिसते. लक्ष्मी बनसोडे (जिव्हाळा) साक्षी सीताराम लाड (काव्यज्योत), तेजश्री पाटील (तेजाश्रीच्या कविता), समृद्धी शेलार (समृद्धीच्या कविता), श्रावणी दवणे (भावना), अस्मिता चव्हाण (सैनिक), सारिका पाटील (सारिकाच्या कविता), शिवानी चौगुले (शिवानीच्या कविता) हे शाळकरी विद्यार्थिनीचे कवितासंग्रह मागील काही वर्षात प्रकाशित झाले आहेत. सोनाली गावडे या इयत्ता आठवीतील विद्यार्थिनीने लिहिलेल्या 'माझी दैनंदिनी' या पुस्तकाला राज्य शासनाचे उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचे पारितोषिक लाभले. यामुळे विद्यार्थी लेखकांचे लेखन पुस्तक रूपाने येण्याचा वेग वाढला आहे. केवळ कविताच नव्हे तर नाटकासारखा साहित्यप्रकार विद्यार्थी समर्थपणे हाताळत आहेत. 'ड सेव्हन लेटर्स ऑफ द युएफओ' हे दिव्यांशू सिंह यांचे पुस्तक यादृष्टीने विचारात घेता येईल. मंजिरी निमकर (मुलांचे सृजनात्मक लिखाण), स्वाती काटे (सृजनपंख), तृप्ती अंधारे (दप्तरातील कविता) यांनी आपल्या

संपादनातून विद्यार्थी लेखकांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. नरेंद्र लांजेवार, बालाजी मदन इंगळे, सुरेश सावंत, माथु सावंत यांनी संपादित केलेल्या अशा पुस्तकात विद्यार्थिनिंची संख्या मोठी आहे. मैत्री नरेंद्र लांजेवार या नववीतील विद्यार्थिनीने आपल्या मैत्रिणींना सोबत घेऊन आबा गोविंदा महाजन यांनी लिहिलेल्या पुस्तकांची समीक्षा लिहून त्याचे संपादन केले. मुलांसाठी लिहिणाऱ्या लेखकाला बालवाचकांनी दिलेला हा प्रतिसाद सर्जनशिल आहे. मुलांमधून त्यांच्या साहित्याचे समीक्षक आकाराला येतील असे सुतोवाच मैत्री लांजेवार हिच्या प्रकल्पाने केले आहे.

मुलांचा सक्रीय सहभाग असू शकतो असे दुसरे क्षेत्र म्हणजे रंगभूमीचे. बालरंगभूमी आणि शालेय रंगभूमी ही बहुतेक ठिकाणी केवळ वार्षिक स्नेहसंमेलनापुरतीच अवतरते. तथापि या ठिकाणी बालकांकडून मिळणारा प्रेक्षक प्रतिसाद बालनाट्य लेखन करणारासाठी उत्साह वाढवणारा ठरू शकतो. सई परांजपे, निर्मला देशपांडे, कांचन सोनटक्के, सुलभा देशपांडे, मीना नाईक अशी काही मोजकी नावे वगळली तर बालनाट्य व बाल रंगभूमीविषयी लेखिका उदासीन आहेत असे दिसते. नाटक या कलेचे समूहानिष्ठ असणे, तालमी, प्रयोग असा सगळा व्याप आणि त्यासाठी वेळ देणे आवश्यक असते. कदाचित त्यामुळे लेखिकांची संख्या बालनाट्य लेखनाच्या क्षेत्रात कमी असू शकेल. या पार्श्वभूमीवर माधुरी माटे (ढग रंगीत झाले), मथु सावंत (लगीनघाई? मुळीच नाही!), सुनंदा गोरे (नवी प्रतिज्ञा), पूजा अकोटकर (बंडी ते बुंग), उर्मिला चाकूरकर (अग्निशिखा कावेरी), मधुपिया (मी हत्ती टून्रा) यांचे उल्लेख महत्त्वाचे ठरतील. स्वातंत्र्यसंग्राम ते पर्यावरण चळवळी असा व्यापक आलेख या नाटकांमधून मांडला गेला आहे. रोज दिसणारी फुले आणि आकाशातील ढग यांची धमाल गोष्ट 'ढग रंगीत झाले' मध्ये आहे. 'बंडी ते बुंग'मधील भाषिक अवकाश आणि नरम विनोद खिळवून ठेवतात. पर्यावरण आणि प्रदूषण यासंदर्भातील ठळक भाष्य 'नवी प्रतिज्ञा' मध्ये आले आहे. सुनंदा गोरे यांच्या या बालनाट्याला राज्य शासनानेही सन्मानित केले आहे. मुळात कथाकार असणाऱ्या सुनंदा गोरे यांनी 'नवी प्रतिज्ञा' मधून बालसाहित्याच्या भूमीवर पाउल ठेवले आहे. हे बालनाट्य प्रचलित नाट्य अवकाशाची फेरमांडणी करते व जल प्रदूषणाची समस्या इतक्या सहजपणे प्रेक्षकांपर्यंत पोहचवते की हसता

हसता कथानकात वाहात जाणारा बालकुमार सभोवतालाविषयी सजग होतो. अर्चना डावरे यांनीही बालवाडीच्या मुलांसाठी स्वतंत्रपणे नाटुकली लिहिली आहेत.

बालनाट्यामध्ये बोटावर मोजता येईल अशी अत्यल्प संख्या तर दुसरीकडे बालकवितेच्या प्रांतात मात्र अफाट गर्दी आणि अचाट प्रयोगशीलता पहावयास मिळते. शांता शेळके, लीलावती भागवत, वसुधा पाटील, लीला दीक्षित, अरुणा ढेरे, लीला धनपलवार, ज्ञानदा आसोलकर, संगीता बर्वे, मालती पहाडे, माया धुप्पड, उर्मिला चाकूरकर, लीला शिंदे, कविता मोरवणकर, आश्लेषा महाजन, सुरेखा मत्सावार, माया तळणकर, मीनाक्षी सरदेसाई, स्मृती डहाणूकर, वासंती इनामदार जोशी, सुरेखा खरे, प्रतिमा विश्वास, निर्मला सारडा, श्रुती बोरवणकर, शोभा बडवे, कविता मेहंदळे, सुमन नवलकर, निर्मला मठपती, निरुपमा ठाकरे, वैशाली जुन्नरकर अशी वाढत जाणारी संख्या दिसते. प्रत्येक दिवाळी अंकात, मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या बालकवितांची संख्या लक्षणीय आहे. बालकवितेत केले जाणारे प्रयोगही महत्त्वाचे आहेत. कथामालिका, म्हणींच्या कविता, कोड्यांच्या कविता, खेळ कविता, कथाकाव्य, शिशुगीते अशा विभिन्न प्रकारात कविता लिहिली जात आहे. अर्थात चार सहा नावे सोडली तर यातील पुष्कळ कविता लक्षात रहात नाही, विषय आणि आशयाच्या पातळीवर मोठ्या प्रमाणावर तोचतोपणा आहे. शंभर वर्षातील बालकविता संपादित करणाऱ्या लीला दीक्षितांनी पुढील काळात बालकवितेचा विस्ताराने अभ्यास करून मोजक्या चार बालकवींवर लिहिले त्यात एकाही कवयित्रीचा समावेश नाही, हा दाखलाही या संदर्भात पुरेसा आहे.

बालकथा आणि बालकुमार कादंबरी याबाबत मात्र आपल्याकडे भारतीय पातळीवर सांगू शकू अशी काही नावे नक्कीच आहेत. लीलावती भागवत, विजया वाड, कविता महाजन, स्वाती राजे, माधुरी माटे यांचा उल्लेख याबाबतीत अपरिहार्य आहे. लोककथा, पुराणकथा, इतिहासकथा यांच्या पुढे जात अनेक नवे विषय लेखिकांनी बालकथेत मांडले. मथु सावंत यांची 'निवडुंगाची फुले', विद्या डेंगळे यांची 'भटक भवानी', 'भटक बहाद्दर', 'करामती गुगी' ही पुस्तके लक्षणीय आहेत. सुरेखा शहा आणि लीला शहा यांनी कुमार वाचकांसाठी वैविध्यपूर्ण लेखन केले आहे. सुरेखा शहा यांचे नवी पहाट, आपलं घर, देव भेटला ही पुस्तके आणि लीला शहा यांच्या 'युगपुरुष डॉ. अल्बर्ट श्वाइटझर,

कथा शास्त्रज्ञाच्या' ही चरित्रे महत्त्वपूर्ण आहेत. सरिता वैद्य, निधी पटवर्धन, रजनी हिरळीकर, हेमा लेले, अंजली धानोरकर, प्रतिमा इंगोले, मंजुश्री गोखले, अरुणा ढेरे, संगीता बर्वे, अंजली कीर्तने या लेखिकांनी स्वत:चे स्वतंत्र स्थान मराठी बालसाहित्यात निर्माण केले आहे. शर्मिष्ठा ठाकूर, मीनाक्षी केतकर, उज्ज्वला केळकर, कल्पना कुलकर्णी यांनी पाश्चात्त्य कथांवर मराठी साज चढवला आहे.

याशिवाय माहितीपर लेखन करणारांची एक फळी आपल्याकडे आहेच. या पुस्तकांचेही स्वत:चे महत्त्व आहेच. मंगला नारळीकर, शुभदा चौकर, मंगला गोखले, मेघाश्री दळवी, सुरेखा दळवी, सोनाली कुलकर्णी, अरुणा जोशी, वंदना भागवत, दीपा देशमुख शैलजा सुरवसे, मृणालिनी वनारसे यांचे उल्लेख करता येतील. भूगोल ते गणित आणि जागतिक सामान्य ज्ञान ते खगोलशास्त्र अशा विविध विषयांची माहिती अत्यंत रंजक पद्धतीने या लेखिकांनी मराठीत आणली आहे.

मराठी बालकुमार साहित्य अनेक वाटांनी व्यापक होण्याचा प्रयत्न करत आहे. ते रंगीत झाले आहे, अधिक आकर्षक झाले आहे. माहिती व तंत्र ज्ञानाच्या युगात जेव्हा बाल कुमार मोबाईलच्या जाळ्यात अडकत जात आहे, मराठी बालसाहित्य त्याला पुस्तकांच्या हमरस्त्यावर घेऊन येण्याचा प्रयत्न करत आहे. मराठी बालसाहित्याच्या या जडणघडणीत लेखिकांचे स्थान ठळक अक्षरात नोंदवावे असे आहे.

मराठी विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड - ४३१६०६
मो. ७५८८४१२१५३

* * * * *

# २००० नंतरचे बालसाहित्य

**- ज्ञानदा आसोलकर**

मुलांचे भावविश्व समजून घेऊन लिहिलेले, बालमनाच्या भाषिक-सामाजिक विश्वाशी संवादी साहित्य मुलांना वाचनीय वाटते. एकविसाव्या शतकातील, (नव्या पिढीतील) मुलांची भाषा, जगणे यात बदल झाला आहे. नव्या तंत्रविज्ञानामुळे, माध्यमक्रांतीमुळे त्यांच्या आकलनाचा परीघ, त्यांचे अवघे भावविश्वच पार बदलले आहे. समाज बदलतो तसे साहित्यही बदलते. बदलत्या जीवनसंदर्भाच्या पार्श्वभूमीवर मराठी बालसाहित्यात गेल्या वीस वर्षामध्ये लेखनप्रकार, लेखन शैली, भाषिक सर्जनशीलता इ. बाबत कोणत्या नव्या जाणिवा, प्रयोग झाले आहेत याविषयीची निरीक्षणे मांडणे ही प्रस्तुत निबंधाची भूमिका आहे.

सन २०१२ मध्ये नॅशनल बुक ट्रस्टच्या पुढाकाराने चांगली पुस्तके कोणती यासाठी काही निकष लावून त्याचा एक दस्ताएवज तयार केला गेला. हाही एक प्रयोगच म्हणावा लागेल. नामवंत प्रकाशक, विचारवंतांनी याबाबत काही ढोबळ मार्गदर्शक तत्त्वांची चर्चा केली. त्यातूनच चांगल्या पुस्तकांचे निकष म्हणून – व्यापक आशय, विश्वासार्ह व्यक्तिरेखा, तर्कसुसंगत प्लॉट/ रचना, वयोगटानुसार समृद्ध भाषा, जीवनविषयक मूल्ये इ. गोष्टी मांडल्या गेल्या.

मुलांसाठी लिहिणं हे आव्हानात्मक आहे. नामवंत लेखक मुलांसाठी आवर्जून लिहिते झाले किंवा त्यांना लिहितं केलं गेलं. पु.ल. देशपांडे, आचार्य अत्रे, विजय तेंडुलकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, जी.ए. कुलकर्णी इ. प्रतिभावंतांनी मुलांसाठी दर्जेदार लेखन केले आहे. असा प्रयोग अलिकडच्या काळात 'साधना'च्या बालकुमार दिवाळी अंक, 'किशोर', 'माऊस', इ. नियतकालिकांतून होताना दिसतो. 'छात्रप्रबोधन', 'निर्मळ रानवारा', 'जडणघडण', इ. मुंबई-पुणे, नागपूर, औरंगाबाद पासून सुरू असलेलं बालमासिकांचं केंद्र 'ॠग्वेद' (कोल्हापूर), 'खेळगडी' (राजापूर) पर्यंत विस्तारलेलं दिसतं. गेल्या पंचवीस वर्षामध्ये पूर्वापार चालत आलेल्या काही नियतकालिकांचा चेहरामोहरा बदलला. काही प्रयोगशील नियतकालिके मात्र वाचक, वाचनालये, शाळा यांच्या अत्यल्प प्रतिसादामुळे बंद पडत गेली. गेल्या दशकात सकस व

सर्जनशील बालसाहित्य निर्मितीसाठी विविध प्रयत्न करणारे 'ब्रेन टॉनिक अचानक बंद पडल्याचे कळते.

बालसाहित्याशी असणाऱ्या सर्वस्वाच्या नात्यातून अस्सल प्रयोगशीलता ज्यांच्या लेखनातून दिसते अशी काही ठसठशीत नावे म्हणजे माधुरी पुरंदरे, अनंत भावे, राजीव तांबे यांच्या लेखनातील प्रयोगशीलतेचे नाते कुठेतरी त्यांच्या बालसाहित्याशी असणाऱ्या सर्वस्वाच्या जाणिवेशी निगडीत असावे असे म्हणता येईल. माधुरी पुरंदरे यांच्या 'राधाचं घर' (२००३), 'यशच्या गोष्टी' (२००९) या पुस्तकमालिका मुलांच्या स्वतःच्या जगाबद्दल त्यांना बोलतं करतात. त्यातल्या नात्यांकडे, घटनांकडे, घटनांपलीकडे त्यांना डोळसपणे बघायला शिकवतात. माधुरी पुरंदरे यांच्या लेखनात तरल पद्धतीने कुठलंही तात्पर्य न सांगता थेट उपदेशाचा डोस टाळून, जे सांगायचं ते अत्यंत सुरेखपणे मांडलेले दिसते. मुलांना आपलं जग कसं दिसतय, मुलांवर त्याचा होणारा परिणाम काय आहे याचा अदमास घेऊन, त्याचं प्रतिबिंब मुलांच्या भाषेमध्ये वागण्यामध्ये जसं उमटेल त्याबद्दल त्यांचे बरेचसे लेखन आहे. मुलांसाठी लिहिणं हा प्रयत्नपूर्वक आणि विचारपूर्वक करण्याचा उद्योग आहे असं त्यांचं म्हणणं आहे.

मराठी भाषा बोलायला आणि लिहायला शिकविण्याचे भरीव कार्य आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग वाचन माले'ने केले. त्यानंतर 'वाचू आनंदे आणि 'लिहावे नेटके' हे माधुरी पुरंदरे यांनी प्रत्यक्षात आणलेले प्रकल्प 'नवयुग वाचनमाले' हून व्यापक आणि महत्त्वाचे आहेत. 'वाचू आनंदे' मध्ये वैविध्यपूर्ण वेच्यांबरोबरच चित्रे, निसर्गचक्राशी जोडून येणारी भित्तीचित्रे, लोककला, काही सूत्रविषय सूत्र विषय - उदा. निसर्ग, प्राणीसृष्टी, माणसांनी निर्माण केलेली सृष्टी इ. गोष्टींची, अभिव्यक्तींची दखल घेतलेली आहे. अभिजात मराठी साहित्याची तोंडओळख मुलांना होऊन त्यांची वाचनाची आवड टिकून रहावी व चित्रकला या स्वतंत्र कलाप्रकाराशी मुलांचा परिचय व्हावा या उद्देशाने निर्माण झालेले हे खंड शालेय शिक्षणाचे अविभाज्य घटक असायला हवेत.

मुलांमध्ये निसर्ग, पर्यावरण विषयक जाणिवा रुजविणारे बालसाहित्य विपूल प्रमाणात लिहिले गेले. कायम वेगळेपणाच्या शोधात असणाऱ्या अनिल अवचटांनी 'सृष्टीत गोष्टीत' आणि 'जनात वनात' या पुस्तकात ओघवत्या भाषेतून सृष्टीचं अनोखं विश्व उलगडलं आहे. ही दोन्ही पुस्तके बालसाहित्याच्या

रूढ व्याख्येमध्ये बसत नाहीत. रूढ साच्यापेक्षा वेगळं काही निर्माण करण्यासाठी परंपरेचे भान असावे लागते. अवचटांचे हे लेखन फॅण्टसीच्या पातळीवरचं आहे. दगडधोंडे, झाडेफुले, पानेवेली, पायवाटा यांच्याशी ते संवाद साधतात. कोणतेही तात्पर्य थेटपणे न सांगता गोष्टींमधून छान सहजपणे पोहचवतात. 'अक्षर गंमत' या पुस्तकामध्ये त्यांनी एकेक अक्षर घेऊन त्याच्या गंमत गोष्टी सांगितल्या आहेत.

आज जगणे विलक्षण गतिमान झाले आहे. आजच्या मुलांना 'श्यामच्या आई' तला श्याम कसा जगला याची काहीच कल्पना नाही. घराबाहेर पडून काहीतरी पराक्रम गाजवावासा त्यांना वाटतो. त्याअर्थी गतिमान अशा साहित्याची त्यांना अधिक ओढ आहे. ना.धो. ताम्हणकरांचा 'गोट्या', भा.रा.भागवतांचा 'सुपर हिरो' त्यांना कदाचित संथ, उपदेशपर वाटेल. पण 'बोक्या सातबंडे' मात्र मुलांना आपलासा वाटतो. चुणचुणीत बोक्या शेंडेफळ असल्याने त्याचे होणारे लाड, डाफरणारा तरीही समजून घेणारा मोठा भाऊ, आदरयुक्त धाक असलेले बाबा, प्रेमळ आई आणि 'चिन्मयानंदा' या बोक्याच्या खऱ्या नावाने त्याला हाक मारणारी एकमेव व्यक्ती म्हणजे आजी या अतिशय खऱ्या वाटणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. दिलीप प्रभावळकर यांनी श्रुतिका म्हणून केलेले हे लेखन कथेमध्ये रूपांतरित केले आहे. यामध्ये रहस्य आहेत, विनोद आहे, वेगवान घटनाक्रम आहे आणि तर्काधारित गमतीचा भागही आहे. कथनाची शैलीही संवादी, आकर्षित करणारी आहे. दिलीप प्रभावळकर यांनी स्वत:च म्हटल्याप्रमाणे यात आजकाल मुलं बोलताना वापरतात त्या शब्दांचा वापर केला आहे. भाषेपलीकडे एकूणच वातावरणही महत्त्वाचं असल्याने मोबाईल, संगणक यासारख्या काळानुरूप उपकरणांचा वापर यामध्ये दिसतो.

राजीव तांबे यांनी विविध साहित्यप्रकारांमध्ये प्रयोगशील लेखन केले आहे. विविध संकल्पनांवर आधारित कथामालिका, विज्ञान प्रयोग कथा, भयकथा, संवादकथा, गणितकथा, साहसकथा, प्राणीकथा, बोलक्या गोष्टी, प्रवासवर्णन, पत्र, कादंबरी, एकपात्रिका, द्विपात्रिका, एकांकिका, नाटक असे खूप काही लिहिलं आहे. मुलांना स्वत:चाच शोध घ्यायला प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी (होय, मी सद्धा!) किंवा 'जंगल तोड, मोडेल खोड' हे बालनाट्य असो, कुठलाही विषय समंजसपणे व कल्पकतेने मांडण्याचे दुर्मिळ कसब त्यांच्यापाशी आहे. विज्ञान नावाची अशी काही खास गोष्ट नाही. ती काही फक्त पाठ्यपुस्तकातच

असते असे नाही. मुलांनाच नाही तर पालकांनाही विज्ञानाची एक अनामिक भीती वाटत असते. राजीव तांबे यांनी मात्र रोजचं जगणं आणि विज्ञान यांचा परस्परसंबंध सहजपणे जोडला आहे. अवती भवती सहज उपलब्ध असणाऱ्या गोष्टीतून केलेले प्रयोग आणि त्यामागील विज्ञान सोप्या भाषेत समजावून सांगणाऱ्या विज्ञान प्रयोगकथा म्हणजे 'गंमत शाळा' ही पुस्तके. या मुळे मुले स्वत: प्रयोग करत, निरीक्षण करत, अनुभवातून शिकताना, विज्ञानाचे हसतखेळत धडे घेतात.

कविता हे मुलांच्या शब्द जाणिवेत वाढ करणारे एकमेव माध्यम आहे. शब्दांच्या अर्थवलयातील गंमतजंमत या आधी विंदा करंदीकर, शंकर वैद्य आदी कवींनी उलगडून दाखवली आहे. नव्या कल्पनेबरोबरच अभिव्यक्तीचे नवे नवे घाट रचत (उदा. मंत्र कविता) विंदांनी मराठी बालकवितेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. विंदांसारखीच मुलांच्या मनाची दारे हळूवारपणे उघडून ताल, लय, ठेका यांचे भान त्यांना आणून देणारी कविता अनंत भावे यांनी लिहिली आहे. मुलांची एक बोलभाषा असते. त्याला व्याकरणाचे नियम नसतात. शिस्त नसते. भाषेची मोडतोड करणारी, भाषेशी खेळणारी, मुलांच्या मनाची सततची जाणीव ठेवून लिहिलेली त्यांची कविता आहे. गमतीदार अफलातून विषय, हलकी फुलकी भाषा, विनोदाची पखरण त्यांच्या कवितेमध्ये दिसते. 'चिक्कीखाव चिक्कीखाव', 'पटपटपूर', 'हसो हसो', 'टंगळ मंगळ', 'झिम झिम सरी', 'घसरगुंडी पसरगुंडी', 'कासव चाले हळूहळू', 'झोका अलटपलट', 'टमू, ठमू, ढमू', 'अग्गडहत्ती तग्गडबंब', 'चलो डोंगरगाव', 'अब्दुल गब्दुल' इ. संग्रहांची नावेच मुलांना आकर्षित करतात. या कविता मुलांमधील उत्साह, अभिव्यक्ती आणि सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या आहेत. शब्दांची नादमय आवर्तने, कोलांट्या उड्या मारतात. उदा. 'बागुलबोवा – चांगुलबोवा' कधी नवीन शब्दांची रचना करतात - 'अग्गडहत्ती, तग्गडबंब', 'गाणे सुखाड सुट्टीचे, बुचाडबुट्टीचे, गाणे उनाडपट्टीचे, गमाडगट्टीचे, बाताडबट्टीचे'. शब्दांची मोडतोड करत कविता रचण्याच्या खेळामध्ये मुलांना आपसूक सामील करून घेतात. मुलांची टिंगटिंगटिंगमचिक्कीचिंगम अशी अजब गजब अफलातून दुनिया आणि त्यातील डिंगडाँग अनंत भावेंना पुरेपुर कळली आहे. छोटी मुले म्हणजे मोठी गंमत असते आणि ही गंमत त्यांनी आपल्या कवितांमधून जपली आहे. मुलांच्या बोलण्या-वागण्यातली लटकझटक लय, त्यांचं अटकपटक सूचणं आणि ते

सटकपटक शब्दांतून फुसांडत असणं, सगळं सगळं अनंत भावेंच्या कवितेतून मुलांना पुन्हा भेटतं.

निलिमा गुंडी (कानामात्रा), मुलांची द्रवरूप मानसिकता समजून घेऊन महावीर जोंधळे (पावसाचे पाय), दासू वैद्य (क कवितेचा) इंद्रजित भालेराव (गावाकडे) यांनी तरल बालकविता लिहिली आहे. वेगळा आशयविषयावरील कविता लिहिणाऱ्यांमध्ये माधुरी माटे (रावण बाळ), संगीता बर्वे (झाड आजोबा) अरुणा ढेरे (सौरपरी), विश्वास वसेकर (कबीरवड), मंदा कदम (संगणक दादा), संजय उपाध्ये (इंडेमाऊची गाणी) अहिराणी आणि मराठी या दोन्ही भाषेतील आबा महाजन यांचा संग्रह 'मन्हा मामाना गावाले जाऊ' ही काही उल्लेखनीय नावे. ल.म. कडू, दासू वैद्य यांनी प्रार्थना, कोडी, आरती इ. पारंपरिक रचनांचा उपयोग नव्या पद्धतीने कवितेतून केलेला दिसतो. विश्वनाथ खैरे यांनी 'युगाणी' या संग्रहातून विज्ञानकाव्याचा प्रयोग केला आहे. त्यांचाच 'ईमराठी गाणी' हा भाषांतरीत संग्रह आपले वेगळेपण राखताना दिसतो.

कथाप्रकारांमध्ये विजया वाड, कविता महाजन यांची लेखनशैली लक्षवेधी आहे. स्वाती राजे यांची 'प्रवास', 'रस्ता' आणि 'पाऊस' ही रंगीत पुस्तके महानगरातील तसेच ग्रामीण भागातील मुलांच्या भावविश्वाशी नाते जोडणारी आहेत. या पुस्तकांचे विषय मुलांबरोबरच मोठ्यांनाही अंतर्मुख करणारे आहेत. कथनपद्धतीने नवेपणा, आशयातील नाविन्य, सहज-सोपेपणा यादृष्टीने 'इरावतीच्या गोष्टी' (श्रीनिवास पंडित), 'बाहुलीचं घर' (निर्मला मोने) ही पुस्तके लक्षणीय आहेत. 'गोष्टी जन्मांतरीच्या' या पुस्तकात रेणू गावस्कर संवादी आणि सहजसोप्या लेखनशैलीमध्ये विविधस्पर्शी कथा कथन करतात. हे लेखन मुलांसाठी असलं तरी मोठ्यांनाही अंतर्मुख करणारं आहे. संगीता बर्वे यांची 'पीयूची वही' (डायरी) उल्लेखनीय आहे. कथाकाव्य प्रकारामध्ये 'जंगल जंगल जंगलात काय' हे आसावरी काकडे व इंदिरा कुलकर्णींचे 'गीत पंचतंत्र' लक्षणीय आहेत.

कादंबऱ्यांमध्ये सामाजिक आशय, विज्ञानविषय हाताळलेले असले तरी बऱ्याच अंशी त्या रहस्यप्रधानच आहेत. ल.म. कडू (खारीच्या वाटा) परिणामकारक आहे. मुलांची कल्पनाशक्ती अफाट असते. त्यांना सतत काहीतरी नवे नूतन हवे असते. त्यांना नवे नायक, नवी पात्रे, नवी आव्हाने, नवा आशय हवा असतो. भारत सासणे यांनी मुलांच्या साहसी वृत्तीचा परिपोष करणारे अद्भूततेचे एक मोठे विश्व साकारले आहे. 'समशेर कुलुपघरे', 'टूणटूण बेडकाचा प्रवास',

'जंगलातील दूरचा प्रवास' या कादंबरीमध्ये कल्पकता आणि वास्तव यांचा मेळ त्यांनी घातला आहे. 'जंगलातील दूरचा प्रवास' ही सस्पेन्स थ्रिलर अद्‌भुतरम्य कादंबरीही मुलांच्या मनातील कल्पनेला वाट मोकळी करून देते. यातील चमत्कृती, अद्भूततेतून उभे राहणारे दृश्य मुलांना खिळवून टाकते.

बालसाहित्यातील बालनाट्य हा दुर्मिळ किंवा अवघड प्रकार. मुलांच्या बदललेल्या भावविश्वावर काही बालनाट्ये लिहिली गेली. विनिता पिंपळखरे यांचे 'ढब्बू ढोल रिमोट गोल' किंवा 'मम्मी रोबो'वर आधारित 'आईशपथ', राजीव तांबे यांचे 'जंगल तोड, मोडेल खोड', द्वारकानाथ लेले यांचे 'सतरा रत्नांचा नग' ही काही उदाहरणे. प्रकाश पारखी यांनी 'बिनकपड्याचा राजा' मध्ये लोककलांचा वापर रंजक पद्धतीने केला आहे. विनोदाचे मुलांच्या मनावर प्रभुत्व असते. दिवाकरांच्या नाट्यछटा त्यातील विनोदामुळे मुलांना आवडतात. त्यांच्यानंतर माधव गवाणकर यांनी (धम्मूची धम्माल आणि इतर) त्या दर्जाच्या नाट्यछटा लिहिल्याचे दिसते.

मराठी बालसाहित्यामध्ये ठळकपणे जाणवणारी एक गोष्ट म्हणजे फॅक्शन (Fact+Fiction) चा अभाव. इंग्रजी साहित्यामध्ये अशा पुस्तकांची एक स्वतंत्र शाखाच आहे. मुले त्यातल्या गोष्टींमध्ये रंगून जातात. पुस्तकातील तळटीपांमधून सोबत असलेल्या चित्रांमधून, तक्त्यांमधून विस्तृत आणि परिपूर्ण माहिती त्यांना मिळते. नारळीकरांच्या काही विज्ञानकथा तसेच मुंग्यांच्या विश्वाची सुरस रोचक माहिती देणारं अनिल एकबोटे यांचं 'साखरेचं बाळ' (अनुवादित), मदन हजेरीचं 'गाय बगळा' ही काही पुस्तके महत्त्वाची आहेत.

मुलांसाठी ललितलेखन हा साहित्यप्रकार अल्प प्रमाणात हाताळलेला दिसतो. विलास गोगटे यांचं 'गोष्ट पावसाची' नावाचं पुस्तक या प्रकारातील आहे. ती गोष्ट नाही किंवा कादंबरीही नाही. बदलत्या पर्यावरणाचा एक आढावा आहे. एका आजोबांनी सुट्टीवर आलेल्या आपल्या नातवंडांसोबत घेतलेला. त्यात प्राणी पक्ष्यांबद्दलच्या गप्पा आहेत. निरीक्षणं आहेत. 'पंख येतील पक्षाला' या लीला शिंदे यांच्या ललितलेखनाची शैलीही लक्षवेधी आहे.

गेल्या दोन दशकातील उपलब्ध असलेल्या बालसाहित्यात मूळ परदेशी साहित्यावरून अनुवादित, भाषांतरित पुस्तके अधिक प्रमाणात आढळतात. सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस, तुलिका, प्रथम, एकलव्य इ. प्रकाशकांनी वैभाषिक पुस्तकांचा प्रयोग केला आहे. एकाच पुस्तकात दोन भाषेमध्ये गोष्ट छापलेली

असते. मध्ये चित्र व पानाच्या वरच्या बाजूला २-४ ओळीमध्ये इंग्रजी भाषेत आणि पानाच्या खालच्या बाजूला त्याचा मराठी अनुवाद छापलेला असतो. NBT, भारत ज्ञान विज्ञान समूह, साहित्य अकादमीची भाषांतरीत पुस्तके ही अशीच मूल्य विचार देणारी आहेत. मुलांवर संस्कार करणे ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यांच्या नैतिक विकासाबाबत आपल्या काही ढोबळ कल्पना असतात. मुलांना प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची, उत्सुकतेने शोधण्याची संधी मिळाली तरच मूल्ये रुजतात. केवळ उपदेश आणि तात्पर्य सांगून नाही. मुलांच्या मनातील विविध भावनांचा कल्लोळ आणि त्यातून त्यांना पडणारे प्रश्न, निर्माण होणारा संघर्ष यांचा समावेश असणारे लेखन परिणामकारक ठरते.

बालसाहित्य प्रकाशनांमधील कॉपीराईटच्या देवाण घेवाणींचा प्रयोगही महत्त्वपूर्ण ठरला आहे. दिल्लीतील विविध देशांच्या वकिलाती तसेच इतर संस्था या पूस्तकांच्या कॉपीराईटसाठी प्रयत्न करताना दिसतात. तुलिका प्रकाशन, ज्योत्सना प्रकाशनाने इराणी पुस्तकांची हक्क मिळवून प्रसिद्ध केलेले मराठी अनुवाद त्यांच्या वेगळेपणामुळे उठून दिसतात. भाषांतरीत, अनुवादीत लेखनामुळे भाषा समृद्ध होते हे खरे आहे. पण ती आहेत म्हणून आपल्या भाषेतील पुस्तकांची गरज नाही असे होणे योग्य नाही.

आजच्या बालसाहित्याचा वाचक कोण आहे, कुणासाठी हे लेखन आहे यावर जर चिंतन केले तर असे दिसते की शहरी व उच्च मध्यमवर्गीय भागातील मुले डोळ्यासमोर ठेवून केलेले हे लेखन आहे. वाड्या-वस्त्यांवर, खेड्या पाड्यात, पाडे-तांड्यांवरच्या मुलांसाठी काही हे साहित्य नाही. या पार्श्वभूमीवर मुलांसाठी लेखन कार्यशाळांच्या माध्यमांतून, जिल्हा परिषद शाळांतील, शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांना लिहिते करण्याचे काही प्रयोग झाले. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा या संस्थेने नामदेव माळी आणि दयाशंकर बन्ने यांच्या संपादनामध्ये ‘शाळकरी मुलांच्या कविता’ हा मुलांचे अस्सल भावविश्व असलेला संग्रह प्रसिद्ध केला. ‘माझी दैनंदिनी’ उच्चभ्रू वस्तीच्या परिघाबाहेर जाऊन लोकसंस्कृती, लोकभाषा यांच्याशी जिवंत नाते प्रस्थापित करताना दिसते. ‘मनातली शाळा’ हे कजा कजा मरू प्रकाशनचे पुस्तक इ. दुसरीतील सई लिमये हिच्या जंगलशाळेविषयीचे कल्पनाविश्व, प्रकट करते. मंजिरी निमकर यांचे ‘मुलांचे सृजनात्मक लिखाण’ तसेच महाराष्ट्रातील

सुमारे ३५ शाळांमधील मुलांच्या कवितांचा संग्रह 'सृजनपंख' मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा आहे. असे तुरळक झालेले प्रयोग साहित्याद्वारे मूल्यभान रुजवत आहेत असे वाटते.

गेल्या दशकभरामध्ये मराठी सहीत अन्य भाषेतील बालसाहित्याच्या पुस्तकातील प्रयोग उपक्रम आणि कल्पना यामुळे पुस्तकाचे दृश्यरूप आणि मांडणी यामध्ये बदल दिसतो आहे. चित्रशैलीच्या विविधते मध्ये महाराष्ट्रातील वारली, मध्य प्रदेशातील गोंडशैली, ओरिसातील पटचित्र शैली, बंगालची काली घाट, बिहारची मधुबनी इ. विविध चित्रशैलीतील चित्रांनी मुलांची पुस्तके समृद्ध झालेली दिसतात. आदिवासी जमातीतील लेखकांनी लोककथांवर आधारित लिहिलेल्या गोष्टी आणि त्यांच्यातील चित्रकारांनी त्यासाठी काढलेली चित्रं असा लेखन आणि चित्रं याबाबत झालेला एक प्रयोग दखल घेण्याजोगा आहे. अशाप्रकारची वर्षा सहस्त्रबुद्धे यांनी लिहिलेली आणि माधुरी पुरंदरे यांनी चित्रबद्ध केलेली पुस्तकेही मराठी आणि आदिवासी भाषेमध्ये आहेत.

बालसाहित्यामध्ये चित्रांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. भाषा कळत नसली तरी चित्र मुलांना कळतात. चित्रविरहीत पुस्तके मुलांना रूक्ष वाटतात. शब्दांचा अर्थ लागत नाही तिथे चित्रं त्यांच्या मदतीला येतात. प्रसिद्ध चित्रकार द.ग. गोडसे यांनी पुस्तक सजावटीबद्दल बोलताना म्हटले आहे 'पुस्तकाची सजावट हा तिरंगी सामना असतो. लेखक उदास, प्रकाशक अज्ञानी आणि चित्रकार घाईत!' खरे तर पुस्तकालाही त्याचे म्हणून एक व्यक्तिमत्व असते अन ते लेखक चित्रकार घडवत असतो. सकस लेखन आणि उत्तम चित्रे यांची सांगड कमी दिसते. यासाठी प्रकाशकांचा पुढाकार महत्त्वाचा ठरतो.

सुंदर चित्र, गुळगुळीत कागद, रंगीत छपाई परवडण्याजोगी नाही अशी प्रकाशकांची कायम तक्रार असते. अशी पुस्तके प्रकाशित करण्याची प्रकाशकांची तयारी नसते. सर्वसाधारणपणे लेखक लिहितो आणि ते छापण्याचा विचार संपादक/प्रकाशक करतात. मुलांच्या पुस्तकाबाबत हा विचार इतर पुस्तकांहून वेगळा असतो. पुस्तकाचा आकार, कागद, टाईप, फॉन्ट, रंगीत छपाई असे तांत्रिक मुद्दे महत्त्वाचे असतात. पण त्याआधी आशय, विषय, मुलांसाठीची भाषा, चित्र इ. मुद्दे विचारात घेतले जातात. चित्र आणि चित्रकारांमुळे पुस्तकाचे बजेट वाढते आणि मुलांसाठीची पुस्तके चित्रांशिवाय छापण्यात अर्थ नसतो. प्रकाशन व्यवसाय अजूनही व्यावसायिक पद्धतीने केला जात नसल्याने अनेक

अडचणी आहेत. उत्तम निर्मितीमूल्याची जाणीव असलेल्या व बालसाहित्याकडे त्या दृष्टीने पहाणारी मंडळी कमीच आहेत. मुखपृष्ठ, पुस्तकाची अंतर्गत सजावट यांची सांगड बऱ्याचदा घातली जात नाही.

तरीही काही प्रकाशक मुलांसाठी वेगळं काही देण्याच्या हेतूने निश्चितपणे प्रयत्न करताना दिसतात. कागदाचा दर्जा, चित्रांमधील कल्पनेची झेप, चित्रांना त्रिमित परिणाम देण्याचा कल्पक विचार...इंग्रजी पुस्तकांतून दिसणारा हा अनुभव मराठीतही थोडा फार मिळतो आहे. चंद्रमोहन कुलकर्णी, पुंडलिक वझे, गिरीश सहस्त्रबुद्धे, रेश्मा बर्वे, ल.म.कडू, ऋतुजा घाटे इ. चित्रकार मुलांच्या पुस्तकांची चित्रे काढताना वेगळा विचार करताना दिसतात. केवळ जे लिहिलेलं आहे त्याचच चित्र न काढता लेखकाच्या मनातील आभासी प्रतिमा, काही वेळा एखादे अंडर स्टेटमेंट असतं ते चित्रांद्वारे हे चित्रकार साकारतात. 'गावाकडं' (मनोविकास प्रकाशन) 'जोयानाचे रंग' (ज्योत्सना प्रकाशन), 'पाऊस माझा साथीदार' (स्पर्श प्रकाशन) इ. स्वतंत्रपणे पुस्तकनिर्मिती करताना आशयानुरूप मुखपृष्ठ, अंतर्गत सजावट, टाईप, शब्दमांडणी याबाबत प्रकाशक, चित्रकार, लेखक- कवी यांनी एकत्रित संवाद साधत विचारपूर्वक पुस्तकनिर्मिती केलेली दिसते. पुस्तकातील चित्रे केवळ सजावटीसाठी न येता, आशयानुरूप आणि मुलांच्या भावभावना अधिक समृद्ध व ठळक करताना दिसतात. रंगीत चित्रे असलेली पुस्तके मुलांना प्रथमदर्शनी आवडतात. ही चित्रपुस्तके (ज्गूलि ंददे) टी.व्ही., संगणक, मोबाईल गेम्स, अशा दृश्य माध्यमांना समर्थपणे टक्कर देणारी आहेत.

पुस्तकातील चित्रांमुळे मुलांची सौंदर्याभिरूची वाढीला लागली पाहिजे. कलावंत निर्माण होण्यासाठीच कलाशिक्षण असते असे नाही. तर त्यातून उत्तम रसिक ही घडत असतो हे लक्षात घेतले पाहिजे. रत्नाकर मतकरी यांनी म्हटले आहे - 'चांगले स्वतंत्र बालसाहित्य ही अत्यंत दुर्लभ गोष्ट आहे. सुमार बालसाहित्य आणि उत्तम बालसाहित्य यातला फरक ना वाचकांना कळतो ना समीक्षकांना. चांगल्या रोपांना तणापासून जी भीती असते, तीच आज चांगल्या बालसहित्याला भासते आहे.'

मराठी बालसाहित्याची समीक्षा अल्पप्रमाणात झालेली दिसते. 'मराठी बालसाहित्य : सृजन, समीक्षा, दायित्व व प्रसार' (विश्वास वसेकर), 'गंध मोहवी हा काव्याचा' (शैलजा देशमुख), 'पाठ्यपुस्तकातील कवितांचा रसास्वाद'

(संगीता बर्वे) 'शतकातील बालकविता' (लीला दीक्षित) ही समीक्षेतील काही उल्लेखनीय नावे. 'बालसाहित्य :आकलन आणि समीक्षा' हे विद्या सुर्वे बोरसे यांचे लेखन सहज सोप्या शैलीमध्ये मुलांनी काय वाचावं याविषयी सांगते.

पुराणकथा, लोककथा, मिथकांनी प्रत्येक टप्प्यावर आणि प्रत्येक पिढीतील लेखकांना भूरळ घातली आहे. अशा गोष्टींची नव्या काळाशी सुसंगत पुनर्रचना, त्यातील गाभा घेऊन त्यावर आधारित नव्या गोष्टींची रचना, (उदा. अंधश्रद्धा निर्मूलन होण्याचे) मुलांसाठी विज्ञान कथा असे प्रयोग मराठीतून स्वतंत्रपणे झाले पाहिजेत.

मुलांना काय वाचायला आवडेल, काय जवळचं वाटेल याबद्दल काही ठोकताळे बांधणे चुकीचे आहे. कारण शेवटी प्रत्येक वाचणाऱ्या मुलाला त्याचे म्हणून विचार करणारे एक स्वतंत्र मन असतं. स्वत:च्या वृत्ती-विशेषांशी मेळ घालणारं लेखन मुलांना आवडतं हे मात्र नक्की. त्यामुळे मुलांसाठी अमूक लिहिलं पाहिजे आणि तमूक नको असे म्हणणे चुकीचे होईल. एकविसाव्या शतकातील आजची काही मुले परीकथांमध्ये रमतील तर काही साहसी कृत्यांमध्ये रस घेतील. आणि म्हणून मुलांसाठी सहजपणे लिहिणे महत्त्वाचे.

**संदर्भ :**

१) अक्षरयात्रा (२०१३-१४) बालकुमार साहित्य : काही विचार, काही अनुभव - संपा. प्रकाश पायगुडे अ.भा.म.सा. महामंडळ, टिळक रस्ता, पुणे ३०.

२) पालकनीती बालसाहित्य विशेषांक (ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१३).

'वंदना', न्यू कॉलनी, माठेवाडा, सावंतवाडी,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग - ४१६५१०
इ-मेल : dnyanadaa@yahoo.co.in

* * * * *

# एकविसाव्या शतकातील आत्मचरित्रे

**- डॉ. वर्षा स. तोडमल**

स्त्रीलिखित आत्मचरित्रे स्त्री जीवनाचा एक पटच आपल्यापुढे मांडतात. प्रत्येकीची कथा निराळी आहे. व्यथा निराळी आहे. अभिव्यक्तीही निराळी आहे. परंतु पितृसत्ताक संकेतांना त्या क्वचितच आव्हान देताना दिसतात. आयुष्यभर धुमसत राहिलेले असंतोष एखाद दुसऱ्या विधानातून व्यक्त करतात. परंतु त्यामध्ये समाजिक उद्रेकाची क्षमता दिसत नाही. स्त्रिया स्वत:ला व्यक्त करू लागल्या, आपल्या इच्छा आकांक्षा मोकळेपणाने मांडू लागल्या ही विकासाची मोठी झेपच महाराष्ट्रातील स्त्री सुधारणा चळवळीने घेतली हे नाकबूल करून चालणार नाही.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी लिहिल्या जात असलेल्या आत्मवृत्त किंवा आत्मचरित्र यांचे स्वरूप बदलले गेले ते स्त्री आत्मचरित्रकारांकडून. आपल्या सासर माहेरच्या घरांचा परिचय, पती व कुटुंबाबरोबर असलेले आपले सहजीवन, आपले भावजीवन, आपल्या सभोवतालचे समाजजीवन या एकातून एक विस्तारत जाणाऱ्या व उलगडत नेताना स्वत:ला स्वत:चा नव्याने लागणारा शोध हे या काळातील आत्मचरित्रात प्रामुख्याने दिसून येत होते.

'पतीचरीत्र किंवा सहचरित्र यातून आत्मचरित्र' असाही एक आकृतीबंध या काळात स्त्री आत्मचरित्रकार यांनी रूढ केला. एकूणच संसार, मुलेबाळे हे त्यांचे अवघे विश्व होते व त्यांच्यासहवासात, त्यांच्या आधाराने आकार घेत त्यांचे आयुष्य साकारत होते. पतीचा मृत्यू ही जणु त्यांना जीवनाची अखेर वाटत होती आणि त्यामुळेच पतीच्या निधनानंतर मनाच्या पातळीवर पती बरोबरचे सहजीवन पुन्हा अनुभवावे, पतीच्या आठवणी मध्ये रमावे, या हेतूने काही स्त्रिया लिहायला सिद्ध झाल्या. आणि त्यातून 'पतीचरित्र सहचरित्रातून आत्मचरित्र' हा आकृतीबंध विकसित झाला. या आकृतीबंधात माहेरच्या आठवणी मोजक्याच असतात. कथनाला वेग येतो तो विवाहाच्या हकीकतीपासून ते पतीच्या मृत्यूपर्यंत येऊन या आठवणी थांबतात. पतीच्या जीवनाशी आपल्याकडील स्त्रीच्या जीवनाचा गोफ किती घट्ट विणला होता आणि त्यांचे बाह्य व अंतर जीवन कसे पतीसमवेतच होते त्याची उदाहरणे म्हणजे 'साथसंगत' रागिणी

पुंडलिक, ‘वंचीता’ विद्यादेवी परचुरे, ‘कुणास्तव कोणीतरी’ यशोदा पाडगावकर, ‘रास’ सुमा करंदीकर यांची आत्माचरित्रे वाचली म्हणजे लक्षात येते.

‘गोष्ट झऱ्याची’ (२००८) या आत्मकथनात, पती सदानंद वर्दे यांच्याबरोबरच्या आपल्या आदर्श सहजीवनातील काही आठवणी सुधाताई वर्दे यांनी सांगितल्या आहेत. राष्ट्र सेवा दलाचे कलापथक, महिला दक्षता समिती अशांसारखे संदर्भ यात येतात, मित्र मैत्रिणींचे उल्लेख येतात पण ते भरघोसपणे न सांगितल्यामुळे त्याला दस्तऐवजाचे मोल प्राप्त होत नाही.

२००६ साली ‘सुस्वराली’ या नावाने प्रभा अत्रे यांच्या आत्मपर लेखाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. आत्मपर लेखामधून आणखी एक सिद्ध झालेले पुस्तक म्हणजे इंदिरा संत यांचे ‘मृद् गंध’ होय. कोल्हापूरच्या सकाळ मधून सलग दोन वर्षे लिहिलेल्या आत्मपर ललित लेखांचे हे संकलन आहे. नसीमाहुजरूक यांचे ‘चाकाची खुर्ची’, अनुताई वाघ यांचे ‘कोसबाडच्या टेकडीवरून’, वसुधा वाघ यांचे ‘सारीपाट’ ही याची आणखी काही उदाहरणे.

गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रिया आत्मपर लिखाण करू लागल्या ही चांगली गोष्ट आहे. डॉ. शांता सप्तर्षी, शांताबाई कांबळे, रोहिणी भाटे, विजया मेहता यांचे आत्मचरित्र म्हणजे स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा चढता आलेख हे निर्विवाद. या कर्तबगार स्त्रियांची ओळख त्यांच्या आत्मचरित्रातून वाचकाला होते. त्याचप्रमाणे त्यांच्या कार्यक्षेत्राचाही अंदाज येतो.

नाट्य, संगीत, कला क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी लिहिलेले आत्मचरित्र हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची पुनर्रचना करण्यासाठी उत्तम दस्तऐवज आहेत. विजया मेहता यांचे, ‘झिम्मा - आठवणींचा गोफ’ यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. विजया मेहता यांचे आत्मचरित्र महाराष्ट्रातील समृद्ध रंगभूमीचा इतिहास उभा करतात. ‘झिम्मा (राजहंस २०१२) ’मध्ये विजयाबाईंनी रंगभूमीच्या व्याकरणाची, मूलभूत तत्वांची आणि नाट्य प्रयोगांची सविस्तर आणि उद्बोधक चर्चा केली आहे. ‘झिम्मा’मुळे वाचकाची कला रंगभूमीविषयक समजूत वाढण्यास मदत होते.

साहित्यकृतीच्या पातळीवर जाणारे दुसरे आत्मकथन म्हणजे ज्योत्स्ना कदम यांचे ‘सर आणि मी’. प्राध्यापक संभाजी कदम यांची ही विद्यार्थिनी. प्रेयसी आणि पत्नी या नात्याचा सुंदर प्रवास या पुस्तकात आलेला आहे.

मुळात संभाजी कदम यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते कलाशिक्षक, सौंदर्य मीमांसक त्याचे जाणकार म्हणून ते सर्वांना परिचित होते. जे. जे. मध्ये शिकत असताना ज्योस्त्नाबाईंच्या आयुष्यात कदम सर अगदी योगायोगाने आले. पुढे सतरा-अठरा वर्षे त्यांचे सहजीवन विविध नात्यांनी समृद्ध होत गेलं. मृत्यूपर्यंत पती-पत्नी, गुरु-शिष्य, चित्रकार व मॉडेल अशा अनेक छटा या नात्याला होत्या. अर्थांचे अनेक पदर अलगदपणे कसे उघडले जाऊ शकतात याचं मनोज्ञ दर्शन या आत्मकथनात घडतं. 'सर आणि मी' मध्ये गुरू शिष्य नातं प्रधान राहिल्यामुळे आदर्शाकडे झेपावणारे चित्रण आहे. त्यांच्या स्वभावाला असलेले कंगोरे फारसे आलेले नाहीत पण आत्मपर लेखनात विशेषत: अतिशय खाजगी स्वरूपाचे तरल अनुभव वाचकांसमोर मांडतांना समतोल राखावा लागतो. एकीकडे खाजगीपण जपायचं पण त्याचवेळेस त्या अनुभवाला सार्वकालिक रूप द्यायचं ही कठीण गोष्ट ज्योत्स्नाबाईंनी साधलेली आहे. स्त्री-पुरुष नात्यातल्या आणि दोन कलावंतांच्या सहजीवनातून उमललेल्या आठवणी कलात्मक गांभीर्याने आलेल्या आहेत. त्यामुळे चित्रकलेच्या क्षेत्राबरोबरच मराठीतील स्त्रियांच्या चरित्र लेखनामध्ये या पुस्तकाला वेगळे महत्त्व आहे.

आत्मवादी कथन ही स्वतंत्र संकल्पना मांडून मराठी आत्मकथनांना नवे परिमाण देण्याचा प्रयत्न पद्मजा फाटक या मराठी साहित्यातील प्रसिद्ध लेखिकेने केलेला आहे स्वत:वर कराव्या लागलेल्या किडनी रोपणासाठी दिलेली झुंज त्यांनी स्मरणीय केली आहे. मधुमेहाशी दोस्ती करून कार्यक्षम आयुष्य आनंदी वृत्तीने जगण्याचा वस्तुपाठ विशाखा पाठक 'मधुमेहासह नाबाद ३६' मधून देतात. तरुण वयात कॅन्सरसारख्या दुर्धर दुखण्याची एकदा नव्हे तर चारदा झुंज देणाऱ्या प्रेरणा वर्मा (प्रेरणा), जगणे ढवळून टाकणाऱ्या कॅन्सरशी दिलेल्या लढ्याचे अनुभव कथन करणाऱ्या विद्या मुडगेदीकर (गुडबाय कॅन्सर), व स्वत: लिव्हर डोनर होऊन तिला जीवदान देणाऱ्या कल्पना जावडेकर (रुपेरी किनार), पर्किन्सन या आजाराने ग्रासलेल्या पतीचा संघर्ष चित्रित करणाऱ्या मंदा चित्रे (पर्किन्सनचे दिवस), आनंदी सकारात्मक जीवनाची प्रेरणा देतात. या दशकात जवळपास १६० च्या संख्येत स्त्रियांची आत्मकथने प्रकाशित झालेली दिसतात. मागील पिढ्यांच्या मूल्याधिष्ठित जीवनाचा आग्रह करणाऱ्या स्त्री जीवनापासून आजच्या नैतिकतेचा कळस झालेल्या बारबालेच्या स्त्री जीवनापर्यंत मोठा व्यापक आणि प्रातिनिधिक स्त्री- जीवनपटच या दशकातील स्त्रीआत्मकथनातून प्रत्ययास

येतो. या कालखंडातील अशा काही निवडक आत्मकथनांचा येथे विस्तार विचार केला आहे, मागोवा घेतला आहे. मराठी साहित्य विश्वातले स्त्रियांच्या आत्मकथनाचे दालन मूळातच समृद्ध आहे.

माणूस घडतो तो घडवला जात नाही. त्याची आंतरिक निर्माणशक्ती, ग्रहणशक्ती चेतना आणि चिंतनशीलता या बळावर हे घडणे होत असते. या घडण्यातून त्याचेस्वत:चे आयुष्य आकाराला येतेच, त्याशिवाय त्याचा भोवताल आकारात असतो. भोवताल व्यक्तींचा असतो तसाच तो नैसर्गिक सांस्कृतिक वाङ्मय अशा विविधस्तरांचा असतो. यातूनच व्यक्तीच्या जीवनविषयक प्रेरणांचा उगम होतो आणि त्यातच त्याच्या जीवनाचे प्रयोजन स्थिरावते. आपल्या प्रेरणांसह तो जीवनाला सन्मुख होऊन व्यक्त होऊ पाहतो. ही अभिव्यक्ती अनेक माध्यमातून घडत असते. संगीतकला हे त्यापैकीच एक प्रभावी माध्यम होय.

दैनंदिन आयुष्यात आपण असंख्य माणसांना भेटत असतो, कधी पुस्तकाच्या पानातून, कधी गाण्यातून, तर कधी पडद्यावरच्या कथेतून ती माणसं भेटत असतात पण ती माणसं वाचता आली पाहिजे. वाचता वाचता शब्दातून साकार करता आले पाहिजे. हे कसब २००० नंतर आलेल्या आत्मचरित्र स्त्रियांनी समर्थपणे पेलले आहे, हे खालील कलाकृतीवरून समजते.

संस्कृती प्रकाशनाची २००० नंतरची उल्लेखनीय आत्मचरित्रे, म्हणजे सरोजिनी बाबर लिखित ‘माझ्या खुणा माझ्या मला’, मधू कांबीकर यांचे ‘मधुरंग’, हौसाताई पाटील यांचे ‘मी क्रांती मी संघर्ष’, पद्मावती कोरेकर लिखित ‘अमृतपान’, इंदुमती जोंधळे यांचे ‘निर्मोही ठसे’, अनिता धायगुडे यांचे ‘अपराजित योद्धा’, ‘मी क्रांती मी संघर्ष’ हे हौसाताई पाटील यांचे आत्मचरित्र. त्या कॉम्रेड क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कन्या. क्रांतिसिंह यांच्या नेतृत्वात हौसाबाईनी देखील प्रतिसरकारच्या आंदोलनात व स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान दिले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून हौसाबाई पाटील लढल्या. भूमिगत कारवायांमध्ये हौसाबाई यांचे मुख्य काम असायचे माहिती गोळा करण्याचे. वयाच्या विशीत त्याकाळी एखाद्या महिलेने अशा पद्धतीने काम करणं हे खरोखरच क्रांतिकारक होतं. हैदराबाद मुक्तिसंग्राम तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही त्यांनी योगदान दिले आहे.

लिखित साहित्याची परंपरा सुरू होण्याआधी मौखिक परंपरेतील लोकसाहित्य अस्तित्वात आलेले असते. हा आविष्कार म्हणजे स्त्रियांच्या जगण्याचाच भाग.

जगण्यासाठी जशी अन्न वस्त्र निवारा या गोष्टींची गरज असते तशी दळतांना, कृषिकर्म करताना, कुलाचार सांभाळतांना, दैवतांची आराधना करताना, आपोआपच लोकसाहित्य निर्माण होत असते. पद्मावती कोरेकर यांनी आपल्या आईच्या ओव्या 'अमृतपान' या चरित्रात लोकसाहित्याच्यास्वरूपात संकलित करून चरित्र रेखाटले आहे.

'माझ्या खुणा माझ्या मला' (सरोजिनी बाबर) यांचे आत्मचरित्र. सृजनाची अनेक रूपे एकाच व्यक्तिमत्त्वात एकवटलेली असा अनुभव देणारी माणसे फार दुर्मिळ असतात. त्यातही परिस्थिती आणि प्रत्यक्ष जगण्यातील विरोधाभास ठळक असतानाही, केवळ सृजनाच्या बळावर आयुष्य यशस्वी करणारी माणसे आणखीनच दुर्मिळ असतात. या माणसांमध्ये सरोजिनी बाबर यांचा समावेश करावयाला हवा यात शंका नाही. जीवनाला समृद्ध करणाऱ्या पाच गोष्टी असतात. ज्ञानसाधना, समाजसाधना, मूल्यसाधना, साहित्यसाधना आणि आत्मसाधना या त्या पाच गोष्टी होत. या पाचही बाबी सरोजिनी बाबर यांच्या जीवनात एकरूप झालेल्या होत्या. लोकसाहित्याचे महत्त्व ओळखणे, त्या साहित्याचे सर्वांगीण संकलन करणे, त्यातून लोकसंस्कृतीची ओळख करून देणे, या संस्कृतीमधील स्त्रियांचे योगदानावर भर देणे आणि जीवनाला उन्नत नी विशुद्ध बनवणाऱ्या चिरंतन मूल्यांची थोरवी सूचित करणे आणि भारतीय संस्कृतीविषयी असणाऱ्या जातिवंत जिव्हाळ्याचे दिपवून टाकणारे सगुण रूप म्हणजे सरोजिनी बाबर यांचे आत्मचरित्र होय.

'शब्दांकित' हा एक नवा प्रकार याच काळातील. आपल्याव्यक्तिगत जीवनातील व कलाजीवनातीलघटना आत्मचरित्रकार व्यक्ती सांगत असते आणि शब्दांकन करणारी व्यक्ती ते लिहून घेत असते. वार्धक्यामुळे आपण सांगावे व दुसऱ्या कोणीतरी लिहून घावे हाही हेतू अशाप्रकारच्या लेखनामागे असतो. सार्वजनिक जीवनात व्यस्त असणाऱ्या व्यक्ती किंवा स्त्रिया आपल्या आत्मकथनाचे शब्दांकन करून घेताना दिसतात. उदा. 'प्रत्यंचा' शोभा फडणीस – श्रीपाद जोशी, 'मी भरून पावले आहे' मेहरुन्निसा दलवाई –सरितापदकी, 'रात्रंदिन आम्हा' शांताबाई दानी, भावना भार्गवे, 'सांगण्याजोगे' शांता गुलाबचंद- सविता भावे. ही अशाप्रकारची काही उदाहरणे सांगता येतील.

संपूर्ण जीवनविषयक लिहिण्यापेक्षा जो काळ आपल्या अस्तित्वाला प्रश्न करून गेला, जगण्याविषयी सजग करून गेला आयुष्यातील तेवढेच तपशील

लिहावयाची आणि आत्मकथने/ अनुभवकथने प्रसिद्ध केली जाऊ लागली. उदा. 'हसरी किडनी' पद्मजा फाटक, 'गुडबाय कॅन्सर' विद्या मुदगेरीकर 'एका श्वासाचे अंतर' नीता गद्रे इत्यादी.

नीलिमा गुंडी यांचे 'गतकाळाची गाज' (मौज प्रकाशन) हे पुस्तक स्त्रीलिखित आत्मकथनांचा एका वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करते. सामाजिक दस्तऐवजाचे मूळ असलेल्या या लेखनातून आपल्याकडच्या आधुनिकतेच्या बीजारोपणचा कालखंड उजेडात येतो. त्यामुळे हे पुस्तक स्त्रियांच्या आत्मकथनपर लेखनाच्या आधारे आपल्याकडची सामाजिक संक्रमणाची प्रक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न करते.

एकंदर स्त्री साहित्याने आत्मचरित्र लिहण्यात घेतलेली झेप पाहून असे दिसते की अखिल महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातल्या स्त्रियाही आता लेखन करू लागल्या आहेत. त्यातही लेखन ही विशिष्ट स्तराची मिरासदारी उरलेली नाही. बृहन्महाराष्ट्रातील अनेक लेखिका, परदेशातील काही लेखिका या सर्वांचा स्त्रीलिखित साहित्य क्षेत्राच्या विकासात हातभार मोलाचा आहे. शहरी, महानगरीय, ग्रामीण, दलित, आदिवासी अशा विविध साहित्य प्रवाहातील तसेच विविध जाती-जमाती-धर्म वेगवेगळ्या विचारसरणी यांच्याशी संबंधित अशाही लेखिकांनी केलेले चरित्रलेखन महत्त्वाचे आहे.

एकेकाळी नशीब म्हणून किंवा गत जन्मीचे पाप म्हणून जे आयुष्य वाट्याला आले त्याबद्दलची खंत स्त्रिया व्यक्त करीत असत तिची जागा आता स्वमत प्रकटनाने घेतलेली दिसते.

आत्मचरित्र हा स्त्रियांना आपलासा वाटणारा लेखन प्रकार आहे आत्मानुभूतीची सर्व स्पंदने मोकळेपणाने प्रकट करीत जीवनात अनुभवलेल्या सुखदु:खाचे कथन स्त्रियांनी आत्मचरित्रातून केले आहे. जीवनाच्या समस्यांना सामोरे जावे लागले. अटळपणे जे संघर्ष करावे लागले त्या सगळ्याची हकीगत स्त्रियांच्या आत्मचरित्रातून व्यक्त होते. वर्गभेदाप्रमाणे या आत्मकथनाचे रंग रूपे बदलत गेलेली दिसतात.

गेल्या दीडशे वर्षात सुधारकांच्या अथक प्रयत्नांनी आजची स्त्री ही सुशिक्षित व स्वावलंबी मोठ्या प्रमाणात झाली आहे, संसार व जीवनात आत्मभान आलेल्या आजच्या सावित्रीच्या लेकी पुरुष वर्गाकडून खरीखुरीसमता मागत आहेत. पण पुरुषसत्ताक समाजरचनेचे फायदे शतकानुशतके घेणारा पुरुषवर्ग

ती देतांना खळखळ करीत आहे, प्रसंगी टोकाचा विरोधही करत आहे, जैविकभेद सोडला तर स्त्रीला पुरुषाच्या इतकीच समप्रमाणात संधी व अधिकार जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मिळायला हवा हा विचारही स्त्रीलिखित आत्मचरित्रातून दिसतो.

साधारणपणे १९६० नंतर बदलांचे वारे वाहू लागले. अनेक सामाजिक व राजकीय स्थित्यंतरे या काळात घडून येत होती आणि त्याचा परिणाम म्हणजे आत्ता पर्यंत व्यक्त न झालेला घटक/समाज व्यक्त होऊ लागला. आपल्या व्यथा मांडू लागला आणि त्याचा दृश्य परिणाम म्हणजे मराठी साहित्यात नवनवीन विचार प्रवाह अस्तित्वात येऊ लागले. ज्यांनी मराठी साहित्य समृद्धकेले. स्त्रीचळवळीतून दलित चळवळीतून एक वेगळेच अस्तित्वभान सर्व स्तरांमधील लोकांना हळूहळू येऊ लागले. आत्मविष्काराची नैसर्गिक उर्मी त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांच्या जवळचे अनुभव सच्चे होते. आणि समाज वास्तवाचे विदारक चित्रण घडवणारे होते. या सर्व घुसळणीतून लिहिलेले साहित्य आजही महत्त्वपूर्ण मानले जाते. नवीन आशयासाठी नवे आकृतिबंध, नवी भाषा आणि नवे आकार आले. रूढ कल्पना बदलत गेल्या.

जगताना विविध पातळ्यांवर आपण वाटचाल कशी केली? अजूनही समाजात माणूस म्हणून स्वतंत्रपणे कसे जगू शकत नाही? सर्व धर्मात, जातीत, थरात वेगवेगळ्या रूपाने माणूसपणापासून वंचित जिणे कसे व का जगावे लागत आहे? दडपणूक कशी अनुभवावी लागत आहे? या आधुनिक जगतातही कुटुंबाच्यासंरचनेत विवाहित स्त्रियांना कोंडीच कशी अनुभवावी लागते? हे ही याआत्मचरित्राच्या लेखिका सांगत असतात हे अनुभवणाऱ्या व सांगणाऱ्या स्त्रियांच्या स्वत:च्या मानसिकतेमध्ये ही परिवर्तन दिसून येते. या स्त्रिया आत्मजाणिवांशी प्रामाणिक राहून दडपणुक आणि कोंडी याबाहेर पडण्याची संघर्षशील जाणीव प्रकट करतात. कमला काकोडकर, आशा आपराद, सुशीला पगारिया, स्वाती सामक, मीनल बाटे, यशोधरा गायकवाड, ऊर्जा दर्डा यांच्या आत्मकथनातून कुटुंब व्यवस्था ढासळू न देता कधी दोन पावले मागे जात तर कधी दोन हात करूनही स्त्रिया, स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण कसे केले ते सांगतात.

वीस वर्ष प्रकाशन व्यवसाय केल्यावर आपल्या अनुभवांचे कथन करणाऱ्या शशिकला उपाध्ये (माझं पुस्तक), 'जादूगार' म्हणून देश-परदेशात वावरणाऱ्या अगदी वेगळ्या वाटेवरच्या मंदाकिनी जाधव-मेहता (मेरीगोल्ड), 'हॉर्स रेसिंग'

हा मध्यमवर्गीय, रुढ चाकोरीबाहेरचा व्यवसाय उत्तम रीतीने करणाऱ्या सरिता वाकलकर, (जॅकपॉट) ‘एलेक्ट्रोलिसस उपचार पद्धती’ या वेगळ्या वैद्यकीय व्यवसायाचा अवलंब करणाऱ्या डॉक्टर ज्योती ढमढेरे (ज्योतिर्मयी), आणि मुंबईतील दीडशे बारमध्ये काम केलेल्या वैशाली हळदणकर (बारबाला) ही वेगवेगळ्या व्यवसाय वाटेवरून जाणाऱ्या स्त्रियांनी लिहिलेली आत्मकथने याच काळात प्रकाशित झालेली आहेत.

या काळात प्रकाशित झालेल्या आत्मकथनातील दलित स्त्रीचे जीवन टोकाचे दिसते डॉ. आंबेडकर यांच्या प्रभावातून घडलेल्या मातापित्यांनी आपल्या मुलीला शिकवले, तिचा विवाह शिकलेल्या पतीशी करून दिला पण स्वत: समाजव्यवस्थेने दिलेल्या कनिष्ठतेच्या अनुभवांची जाणीव असणारा हा पुरुषही पत्नीला अधिकच कनिष्ठ दर्जा देतो, तेव्हा तिला जीवनात ‘चुलीत घातलेल्या हेलकुड्याप्रमाणे परंपरागत जळावे लागते’, त्याचे दर्शन घडविणाऱ्या यशोधरा गायकवाड (माझी मी) एका बाजूला दिसतात, तर दुसऱ्या बाजूला प्रेमविवाह, उच्च शिक्षण, नोकरी यांचे स्वातंत्र्य मिळवणाऱ्या, स्वत:ची परिवर्तनवादी घडण करणाऱ्या, विविध स्तरातील दलित स्त्रीचे वास्तव्य मांडणाऱ्या उर्मिला पवार (आयदान) दिसतात. अशी आणखीनही दलितस्त्रियांची आत्मकथने या कालखंडात प्रकाशित झाली आहेत.

## ऑटोपॅथॉग्राफी

‘ऑटोपॅथॉग्राफी’ या शब्दाने ‘आत्मव्याधीकथन’ अशा स्वरूपाचे मराठी रूपांतर करून, साधे मानवी आयुष्य टिकवण्यात, त्यासाठी झगडण्यात, वेगवेगळ्या जीवघेण्या अनुभवांना सामोरे जाण्यात जो संघर्ष करावा लागतो त्याचे चित्रण हा ही आत्मकथनांचा विषय होय हे आत्मव्याधीकथनाने सिद्ध करणारी, ऑटोपॅथोग्राफी ही आत्मकथनाची नवी जात आहे. ‘स्व’जीवनाकडे पाहणारी ती एक नवी दृष्टी आहे, असे नवे परिमाण देणाऱ्या, मराठीतील स्त्रीआत्मकथनाची संख्याही वाढताना दिसते.

प्रेरणा वर्मा यांचे’ ‘प्रेरणा’ (२००९), विशाखा पाठक यांचे ‘मधुमेहासह नाबाद ३६’, (२००९), मंदाचित्रे यांचे ‘पार्किन्सचे दिवस’ (२०००) . इ. एकूणच स्त्री आत्मचरित्रासारख्या वास्तवदर्शी लेखनाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते आहे. तरीही स्त्रियांच्या स्वजीवनाचे वास्तवदर्शी वाङ्मयीन दर्शनच वाचकांच्या पसंतीस अधिक उतरते.

सहजीवन चित्रे, दलित जीवनातील अनुभव व्यक्त करणारी आत्मचरित्रे उदाहरणार्थ, यशोधरा गायकवाड यांचे 'माझी मी' (२००७), एक वाटेवर जाणार्या स्त्रियाउदाहरणार्थ सरिता वाकलकर यांचे 'जॅकपोट' (२००७), बारबाला ऐका मराठीबारबालेचे आत्मकथन आहे जे (२००८) मध्ये वैशाली हळदणकर यांनी लिहिले आहे. चित्रपट व कला सृष्टीतील स्त्रियांच्या आत्मचरित्रमध्ये २००७ मध्ये वनमालायांनी लिहिलेले 'परतीचा प्रवास'. नाटक आणि चित्रपट या उभयविध क्षेत्रातत्याचा ठसा उमटविणाऱ्या अभिनेत्री वनमाला यांचे हे आत्मकथन. लावणीसम्राज्ञी म्हणून गाजलेल्या सुलोचना चव्हाण या पूर्वाश्रमीच्या सुलोचना कदम त्यांनी लिहिलेलं, 'माझं गाणं माझं जगणं' २००९ मध्ये प्रकाशित झालं.

शिक्षणक्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविणाऱ्या स्त्रियांची आत्मचरित्रे महत्त्वाची आहेत. अध्यापनाच्या क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारी काही आत्मकथने म्हणजे सुधा काळदाते यांनी लिहिलेले 'जीवनसुधा' (२००८), निर्मला किराणे यांनी लिहिलेले 'निर्मल गोपाल' (२००७) . निर्मला किराणे या हाडाच्या शिक्षिकेचे हे आत्मनिवेदन आहे. ' जीवन सुधा' म्हणजे समाजशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळवलेल्या सुधा काळदाते यांचे आत्मकथन आहे. तर सुनीता शिंदे यांनी (२०१०) मध्ये 'पुस्तक उघडलं' यातूनआपल्या जिद्दीच्या आणि मनोबळाच्या जोरावर, एका मोलकरणीची, आदर्शविद्यार्थीप्रिय शिक्षिका होण्याचा चमत्कार करून दाखवणाऱ्या सुनीता शिंदे या आत्मकथनातून पहायला मिळतात. अध्यापन संशोधन यामध्ये आपले व्यक्तिमत्त्व घडविणार्या या क्षेत्रातील ज्ञानवर्ती, कर्तृत्ववान स्त्रियांची ही आत्मकथने प्रातिनिधिक म्हणून उल्लेखनीय आहेत.

समकालीन सामाजिक व राजकीय बदलांचे आणि घडामोडींचे चित्रण करण्याचा प्रयत्न काही राजकीय क्षेत्रातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातून झालेला आहे. कमलदेसाई यांचे वडील गांधीजींचे अनुयायी होते. नऊ-दहा वर्षांच्या असतानाच १९३० चाली झालेल्या सत्याग्रहात वडिलांबरोबर त्यांनीही सत्याग्रह केला होता. काळानुसार बदलणारी जीवनसरणी आणि जीवनमूल्ये यांची स्पंदनं टिपण्याचे सामर्थ्य असलेल्या कमल देसाई यांचे 'जय हो' (२०१०) मध्ये आले.

स्त्रियांच्या आत्मचरित्रमध्ये कमला काकोडकर यांचे 'एक धागा सुताचा'

(२०१०) मध्ये आलेले आत्मचरित्र शाश्वत मूल्यांच्या सावलीत तृप्त जीवनाचे समाधान व्यक्त करणारे आत्मनिवेदन आहे. तर विजया लवाटे यांचे 'स्पर्श मानव्याचा' (२००६) मध्येआलेले आत्मचरित्र, वेश्या त्यांची मुले आणि एड्सग्रस्त बालके यांच्यासाठीसामाजिक कार्य करतांना जे अग्निदिव्य केले त्याचा जिवंत पट म्हणजे 'स्पर्शमानव्याचा' हे आत्मकथन आहे. त्याचप्रमाणे मतिमंदांसाठी कार्यकरणाऱ्या सिंधूताई जोशी यांचे (२००५) मध्ये 'मागे वळून पाहताना' आणिऑटिझमच्या रुग्णांसाठी सुहासिनी मालदे यांनी केलेले काम (२०१०) मध्ये 'एकइझम निरागस' या आत्मचरित्रातून वाचायला मिळते. ऑटिझमसाठी त्यांनी केलेल्याकार्याचे त्यांचे अनुभवकथन हे समाजमन जागे करण्याचा प्रयत्न करणारी तळमळ घेऊन आलेले आहे.

गृहिणींच्या आत्मकथानामध्ये अलका गोडे यांचे 'धाकट्या नजरेतून' (२०१०), आत्मपरलेखनाचा वेगळा प्रयोग करणारे 'मैत्रपंचमी', (२००२) मध्ये, वसुमती धारप यांनीलिहिलेले 'गोष्ट सत्यवान सावित्रीची', एका जिद्दी तसेच प्रेमळसहधर्मचारिणीचे दर्शन या आत्मकथनातून घडते.

सिंधूताई जोशी, चंदा आठवले, नलिनी लडके, शोभा फडणवीस, विमल लेले, निर्मला देशपांडे, सुशील पगारिया, सुमतीदेवी धनवटे, गिरिजा कीर, वनमाला, विदुला जवळगेकर, आशा भेंडे, सुलोचना चव्हाण, सरिता वाकलकर इ. सरस आत्मकथने लिहिणाऱ्या या स्त्री लेखिका आहेत


मराठी विभागप्रमुख

आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

इ-मेल : varsha.todmal@gmail.com

मो. ९०९६९५१२००


* * * * *

## ‘अक्षरयात्रा’ २०२०-२०२१ या वार्षिकांकासंबंधी माहिती


| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ | : अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, औरंगाबाद |
| प्रसिद्धीचा नियतकाल | : वार्षिक |
| प्रकाशकाचे नाव | : डॉ. दादा गोविंदराव गोरे,<br>कार्यवाह, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, औरंगाबाद<br>द्वारा, मराठवाडा साहित्य परिषद,<br>सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००१ |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| संपादकाचे नाव | : डॉ. दादा गोरे<br>कार्यवाह,<br>मराठवाडा साहित्य परिषद,<br>अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ,<br>सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००१ |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| छपाई | : गोदा प्रकाशन, औरंगाबाद. |
| नियतकालिकाची मालकी | : अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ,<br>द्वारा : मराठवाडा साहित्य परिषद,<br>सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००१ |

मी, डॉ. दादा गोविंदराव गोरे असे प्रकट करतो की,
वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.




अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

२०२० - २०२१

## पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. कौतिकराव ठाले पाटील, औरंगाबाद

उपाध्यक्ष : श्री. कपूर वासनिक, बिलासपूर

कार्यवाह : डॉ. दादा गोविंदराव गोरे, औरंगाबाद

कोषाध्यक्ष : डॉ. रामचंद्र काळुंखे, औरंगाबाद

सदस्य

प्रा. मिलिंद जोशी, पुणे

श्री. प्रकाश पायगुडे, पुणे

श्रीमती सुनिताराजे पवार, पुणे

श्री. विलास मानेकर, नागपूर

श्री. गजानन नारे, अकोला

प्रा. प्रदीप दाते, वर्धा

प्रा. उषा तांबे, मुंबई

डॉ. उज्ज्वला मेहंदळे, मुंबई

प्रा. प्रतिभा सराफ, मुंबई

डॉ. भालचंद्र शिंदे, गुलबर्गा

डॉ. विद्या देवधर, हैदराबाद

प्रा. पुरुषोत्तम सप्रे, भोपाळ

श्री. रमेश वसकर, गोवा

श्री. प्रसाद देशपांडे, बडोदा

श्री. फादर फ्रान्सिस दिब्रिटो, मुंबई